NUTA BULLETIN

FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION

Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10

YEAR : 21 15TH OCTOBER, 1996 No. 4

**महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या उभय सभागृहांनी जरी विकास मंडळांच्या स्थापनेचा ठराव दिनांक २६ जुलै १९८४ रोजी एकमताने मंजूर केलेला असला तरी प्रत्यक्षात वैधानिक विकास मंडळांची स्थापना दिनांक १ मे १९९४ रोजी म्हणजे त्यानंतर जवळ जवळ १० वर्षांनी झाली. एखाद्या राज्यातील विकसित भाग आपल्या विकासाच्या आधारे जी राजकीय शक्ती प्राप्त करून घेतात त्या राजकीय शक्तीचा वापर करून अविकसित भागांच्या विकासाला पूरक ठरणाऱ्या एखाद्या लहानशा घटनात्मक तरतुदीला सुद्धा प्रत्यक्ष अमलात येण्यापासून किती दीर्घकाळ प्रलंबित ठेवू शकतात याचे स्वतंत्र भारताच्या इतिहासात - घटनेच्या कलम ३७१ (२) इतके - दुसरे नामवंत उदाहरण शोधून सापडेल असे वाटत नाही.**

**हे ३७१ कलम, त्यानुसार राष्ट्रपतींनी काढलेले आदेश, त्यातून राज्यपालांना प्रदान केलेली शक्ती व त्यानुसार राज्यपालांनी केलेली 'व्यवस्था' आणि या व्यवस्थेमुळे ज्या निरनिराळ्या क्षेत्रात अविकसित भागांना न्याय मिळेल असे सांगितले जाते, त्यातील "वैद्यकीय महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप" या एका लहानशा क्षेत्रामधील विशेष तपशिलासह व एकूणच हा "न्याय" मिळण्याची सद्यःस्थिती काय आहे हे पुढील परिच्छेदातून विदित केले आहे.**

**प्रा.बी.टी.देशमुख,**
विधान परिषद सदस्य

# अनुशेष विशेषांक

१. **"महाराष्ट्रातील विविध विभागांचा समतोल विकास झालेला नाही, अशी जनमानसात भावना असून सर्व विभागांचा समतोल विकास घडवून आणावा** अशी मागणी विधान मंडळ व इतर माध्यमांमार्फत सातत्याने करण्यात येत आहे. याबाबत शासन जागरूक असून राज्यातील सर्व विभागांचा समतोल विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने वेळोवेळी उपाययोजनाही करण्यात आलेल्या आहेत... विकासातील विभागीय असमतोलाचा शास्त्रशुद्ध व सखोल अभ्यास करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्याकरिता शासनाने तज्ज्ञांची समिती नियुक्त करण्याचे ठरविले आहे." असा स्पष्ट कबुलीजबाब महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने दिनांक ३ ऑगस्ट १९८३ रोजी प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयाच्या (आरडीव्ही/१०८२/सीआर-३८/पीआरजी- १४) प्रास्ताविकामध्ये नमूद आहे.

२. हा शासननिर्णय निर्गमित होण्याच्या चार पाच दिवस अगोदर **"विभागीय असमतोलाबाबतचा अभ्यास करण्याकरिता एक सत्यशोधन समिती स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे"** अशा प्रकारची स्पष्ट घोषणा महाराष्ट्र राज्य विधान सभेमध्ये दिनांक २९ जुलै १९८३ रोजी नियम ४६ अन्वये एक निवेदन करून त्यावेळच्या अर्थ व नियोजन मंत्र्यांनी केली होती. "विकासातील असमतोलाचा अंदाज करण्यासाठी दर्शक (इंडिकेटर्स) ठरविणे व त्यावर आधारित १९६० साली व अद्यावत माहिती उपलब्ध असलेल्या अलिकडील वर्षी महाराष्ट्राच्या सरासरी विकासाच्या संदर्भात विकासातील जिल्हावार असमतोल निश्चित करणे. तसेच १९६० पासून अद्यावत माहिती उपलब्ध असलेल्या काळापर्यंत विकास कार्यासाठी जिल्हानिहाय किती खर्च केला व त्याची अंमलबजावणी किती झाली याची माहिती काढणे" हा या समितीकडे सोपविलेल्या विषयांपैकी प्रमुख विषय असल्याचे निवेदनावरून दिसून येते. अशाच अर्थाचे निवेदन त्याच दिवशी विधानपरिषदेत खात्याच्या राज्यमंत्र्यांनीही केले होते.

३. पहिल्या परिच्छेदात नमूद केलेल्या शासन निर्णयाने सत्यशोधन (दांडेकर) समितीची स्थापना झाली व या समितीने एप्रिल १९८४ मध्ये आपला अहवाल शासनाला सादर केला. महाराष्ट्राच्या विविध विभागांच्या विकासामध्ये असलेला प्रादेशिक असमतोल या अहवालामुळे ठसठशीतपणे समोर आला. हा असमतोल दूर करण्यासाठी या समितीने केलेली एकही शिफारस शासनाने आजपावेतो मान्य केलेली नाही. **"प्रत्येक विकास क्षेत्रासाठी उपलब्ध असलेला निधी त्या विकास क्षेत्रामध्ये बिगर अनुशेष जिल्ह्यांना १५ टक्के व अनुशेष जिल्ह्यांना ८५ टक्के या प्रमाणात द्यावा" ही या समितीची एक शिफारस जरी शासनाने मान्य केली असती तरी या अनुशेषाचे पार कंबरडे मोडले असते.** पण शासनाने दांडेकर समितीच्या शिफारसी मान्य करण्याबाबतचा निर्णय गेल्या १०-१२ वर्षामध्ये न घेतल्यामुळे तसेच बलवान व विकसित जिल्ह्यांनी निधी आपल्या वाट्यावर मोठ्या प्रमाणात ओढून नेल्यामुळे हा अनुशेष कमी तर झाला नाहीच पण तो मोठ्या प्रमाणात वाढला हे आता स्पष्टपणे दिसून आले आहे.

४. **दांडेकर समितीचा अहवाल सादर झाल्यानंतरच्या महाराष्ट्र**

**विधानमंडळाच्या जुलै १९८४ च्या अधिवेशनात गुरुवार दिनांक २६ जुलै १९८४ रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी वैधानिक विकास मंडळाबाबतचा पुढील ठराव उभय सभागृहात मांडला :-**

"भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१ खंड (२) या अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, भारताच्या राष्ट्रपतींनी महाराष्ट्र राज्याच्या संबंधात आदेश काढून त्याव्दारे विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वेगवेगळी विकास मंडळे स्थापन करावीत अशी विनंती महाराष्ट्र शासनाने राष्ट्रपतींना करावी."

५. **दोनही सभागृहांनी हा ठराव एकमताने मंजूर केला.** ठराव मांडतांना मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी जे भाषण केले त्यातील चार महत्त्वाचे मुद्दे मी त्यांच्याच शब्दात खाली नमूद करीत आहे :-

(१) "१९५६ चा राज्य पुनर्रचनेचा कायदा व अनुषंगिक संविधानिक दुरुस्त्या यांचा संसदेमध्ये ज्यावेळी विचार झाला, तेव्हा नागपूर करारातील तरतुदी दृष्टीसमोर ठेऊन कलम ३७१ (२) ची तरतूद करताना असे सांगण्यात आले होते की. वेगवेगळ्या विभागांना विकास कार्यक्रमांमध्ये न्याय मिळेल किंवा नाही अशी जी शंका व्यक्त करण्यात येत होती, तिचे निरसन करण्यासाठी स्वतंत्र विकास मंडळाची तरतूद घटनेमध्ये करण्यात आली."

(२) "महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे विधेयक मांडतांना तत्कालीन मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांनी शासनातर्फे एक धोरणात्मक निवेदन केले होते. त्या निवेदनात हे स्पष्ट करण्यात आले होते की, विदर्भ आणि मराठवाडा हे विभाग मागासलेले आहेत हे लक्षात घेऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे विशेष लक्ष दिले जाईल व त्या विभागांकरिता स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्यात येतील."

(३) "परंतु अशी स्वतंत्र प्रादेशिक विकास मंडळे स्थापन केल्यास प्रादेशिक किंवा वेगळेपणाच्या प्रवृत्तींना जोर चढेल असा विचार करून राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून अशी मंडळे स्थापन करू नयेत असा निर्णय त्यावेळच्या मंत्रिमंडळाने घेतला होता."

(४) परंतु "आज सर्वांची अशी भावना झालेली दिसते की घटनेच्या कलम ३७१ (२) प्रमाणे प्रादेशिक विकास मंडळे स्थापन केल्याशिवाय या राज्याच्या वेगवेगळ्या विभागांचा विकास अपेक्षित वेगाने व समन्यायाने घडू शकणार नाही."

६. महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाच्या उभय सभागृहांनी जरी उक्त ठराव एकमताने दिनांक २६ जुलै १९८४ रोजी मंजूर केलेला असला तरी वैधानिक विकास मंडळांची प्रत्यक्ष स्थापना ही दिनांक १ मे १९९४ रोजी म्हणजे जवळ जवळ १० वर्षांनी झाली. एखाद्या राज्यातील **विकसित भाग आपल्या विकासाच्या आधारे जी राजकीय शक्ती प्राप्त करून घेतात त्या राजकीय शक्तीचा वापर करून अविकसित भागाच्या विकासाला पूरक ठरणाऱ्या एखाद्या लहानशा घटनात्मक तरतुदीला सुद्धा प्रत्यक्ष अमलात येण्यापासून किती दीर्घकाळ प्रलंबीत ठेवू शकतात याचे स्वतंत्र भारताच्या इतिहासात** (घटनेच्या कलम ३७१ (२) इतके) **दुसरे नामवंत उदाहरण असेल असे वाटत नाही.**

७. हे ३७१ कलम, त्यानुसार राष्ट्रपतींनी काढलेले आदेश, राज्यपालांना प्रदान केलेली शक्ती, त्यानुसार राज्यपालांनी केलेली 'व्यवस्था' व या व्यवस्थेमुळे ज्या निरनिराळ्या क्षेत्रात अविकसित भागांना न्याय मिळेल असे सांगितले जाते, त्यातील "वैद्यकीय महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप" या एका लहानशा क्षेत्रामधील विशेष तपशिलासह व एकूणच हा न्याय मिळण्याची सद्यःस्थिती काय आहे हे पुढील परिच्छेदातून विदित केले आहे.

८. भारतीय संविधानाच्या कलम ३७१ (२) मध्ये असे म्हटलेले आहे की :-

"**महाराष्ट्र व गुजराथ या राज्यांबाबत विशेष उपबंध** : ३७१ (१) या संविधानात काहीही असले तरी महाराष्ट्र किंवा गुजाराथ ह्या राज्यांबाबत आदेश करून त्याव्दारे राष्ट्रपतीला पुढील गोष्टींसाठी राज्यपालावर कोणतीही विशेष जबाबदारी सोपवण्याचा उपबंध करता येईल.

(क) विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र किंवा प्रकरणपरत्वे सौराष्ट्र, कच्छ व उर्वरित गुजरात यांच्यासाठी अलग अलग विकास मंडळे स्थापन करून, त्यापैकी प्रत्येक मंडळाच्या कामकाजाचा अहवाल दरवर्षी राज्य विधानसभेसमोर ठेवला जाईल अशी तजवीज करणे;

(ख) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्रावरील **विकासखर्चासाठी पैशाची समन्यायानुसार वाटणी करणे**; आणि

(ग) सबंध राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, उक्त क्षेत्राबाबत **तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण** यासाठी पर्याप्त सोयी व **राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीची पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्यायानुसार व्यवस्था करणे**"

९. घटनेमध्ये मुळांत हे कलम १९५३ च्या नागपूर कराराला घटनात्मक आधार देण्याच्या घडपडीतून आले. राज्यपुनर्रचनेच्या वेळी आणलेल्या विधेयकावर संसदेच्या दोनही सभागृहांची जी संयुक्त चिकित्सा समिती नेमली होती त्या समितीच्या अहवालामध्ये पुढील उल्लेख आहे :-

"On page 4, original clause 21,--- It was argued before the Committee by its Members from the Vidarbha that the agreement entered into September, 1953 known as Nagpur Agreement should to the extent practicable be given constitutional recognition. The Members from other Maharashtra area gave their full support to this proposal. A new clause has accordingly been added to the proposed article 371 with the consent of the Members from Maharashtra."

**१०.** वैधानिक विकास मंडळांची व्यवस्था ही कलम ३७१ (२) मधील अधिकारांच्या वापरानुसार राष्ट्रपतींनी आदेश काढून स्थापीत करावयाची व्यवस्था आहे. त्यांनी तसे आदेश काढले नाही तर हे "निष्प्रभावी कलम" म्हणून घटनेमध्ये सुस्त पडून रहाणार. भारताच्या राष्ट्रपतींनी १९९४ सालापर्यंत असे आदेश काढले नाहीत हा इतिहास आहे. कां काढले नाहीत? याचे उत्तर अतिशय स्पष्ट आहे. **सुरुवातीला जरी "विदर्भ आणि मराठवाडा हे विभाग मागासलेले आहेत हे लक्षात घेऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे विशेष लक्ष दिले जाईल व त्या विभागांकरिता स्वतंत्र विकास मंडळे स्थापन करण्यात येतील." अशी भूमिका त्यावेळच्या राज्यकर्त्यांनी घेतली होती तरी पुढे त्यांनीच "परंतु अशी स्वतंत्र प्रादेशिक विकास मंडळे स्थापन केल्यास प्रादेशिक किंवा वेगळेपणाच्या प्रवृत्तीना जोर चढेल असा विचार करून राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून अशी मंडळे स्थापन करू नयेत" अशी भूमिका घेतल्यामुळे ३७१ (२) हे कलम १९९४ सालपर्यंत "झोपविले" गेले.**

**११.** घटनेच्या कलम ३७१ (२) अन्वये भारताच्या मा. राष्ट्रपतींना असलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी **दिनांक ९ मार्च १९९४ रोजी "महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश १९९४" (सहपत्र : एक,** *पृष्ठ ६७ पहा)* पारीत करून महाराष्ट्राच्या राज्यपालांना शक्ती प्रदान केली. या आदेशाच्या परिच्छेद दोन मध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, :-

"**2. Special responsibility of governor :** The Governor of Maharashtra shall have special responsibility for the establishment of separate Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra and for matters specified in sub-clauses (b) and (c) of clause (2) of Article 371 of the constitution in respect of the area of each such Development Board."

या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राच्या राज्यपालांनी **दिनांक ३० एप्रिल १९९४ रोजी "विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी**


## मराठवाडा शिक्षक संघ

*केंद्रीय कार्यालय : घाटनांदूर , जि. बीड ( र. नं. महा. ३४/९४ )*

**मा. संपादक, ' नुटा बुलेटीन '**

स. न.

राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप व अनुशेषासंबंधी आपण विशेषांक काढीत आहात. अभिनंदन. त्यामुळे मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्राच्या अनुशेषाबाबत वस्तुस्थिती जनतेसमोर येईल व वैद्यकीय जागांबरोबरच विकासाच्या कामासाठी निधीचे समन्यायी वाटप करण्यासाठीच्या माहितीवरून मागास भागातील जनतेचे उद्बोधन होऊन हक्कासाठी लोक आणखी पुढे येतील. म्हणून या अंकास ' मराठवाडा शिक्षक संघाच्या'

**शुभेच्छा.**

| | | |
|---|---|---|
| **प. म. पाटील** | **अनंतराव देशमुख** | **राजेश्वरराव देशमुख** |
| सरचिटणीस | कार्याध्यक्ष | अध्यक्ष |

तसेच सर्व पदाधिकारी व सदस्य

**विकास मंडळे आदेश, १९९४"** हा आदेश प्रख्यापित केला. **(सहपत्र : दोन,** *पृष्ठ ६७ पहा)*

१२. महाराष्ट्राच्या मा. राज्यपालांनी प्रख्यापित केलेल्या या उपरोक्त आदेशाला राज्याच्या अधिनियमांचे स्वरूप प्राप्त झाले असून महाराष्ट्र विधानमंडळाने केलेले अधिनियम ज्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या भाग चार मध्ये प्रसिद्ध होतात त्या भागाच्या (असाधारण, १ मे १९९४) पृष्ठ क्रमांक २३२ अ ते २३२ ड वर हा आदेश प्रसिद्ध करण्यात आला आहे. या आदेशाचा परिच्छेद १० पुढील प्रमाणे आहे :-

"**शिक्षण, प्रशिक्षण आणि सेवायोजन यासाठी सुयोग्य व्यवस्था -** राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन प्रत्येक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी **तंत्रशिक्षण व व्यावसायीक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्यायी व्यवस्था करण्याची राज्यपाल खातरजमा करतील** आणि त्यासाठी राज्यपाल, वेळोवेळी, राज्य शासनास योग्य ते निदेश देतील; आणि असे करीत असतांना आवश्यक आणि योग्य वाटल्यास राज्यपाल कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा व्यक्तिसंघाचा या बाबतीत सल्ला घेऊ शकतील."

१३. मा. राज्यपालांचा हा आदेश १ मे, १९९४ च्या महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिद्ध झालेला असला तरी प्रत्यक्ष त्याच्या प्रती उपलब्ध होण्यास २-३ आठवडयांचा कालावधी लागला. या राजपत्राच्या प्रति उपलब्ध होत नाहीत, तोच १० जून १९९४ च्या शासन निर्णयाने विद्यापीठनिहाय वैद्यकीय जागाचे अन्याय्य वाटप करणारे, वैद्यकीय महाविद्यालयातील जागासाठी प्रवेश देणारे "प्रॉस्पेक्टस" विद्यार्थ्यांच्या हाती पडले. अमरावती विभागातील विद्यार्थ्यांवर खूपच मोठा अन्याय या जागा वाटपाने केला होता. **१३४ जागा अमरावती विभागाला व ८० ते ९० जागा मराठवाड्याला कमी देणारा अन्याय्य असा हा शासन निर्णय लोकांच्या, विशेषतः विद्यार्थ्यांच्या क्षोभाचा विषय ठरला.**

१४. जागा वाटपाच्या या अन्याय्य आदेशामुळे स्वाभाविकच अमरावती विभागामध्ये संतापाची तीव्र लाट उठली. विद्यार्थी नागरिक, पालक यांच्या या असंतोषाला वाट करून देण्यासाठी कृती समितीची स्थापना करण्यात आली. या कृतीसमितीने वर्षभर केलेल्या कामाचा अहवाल "**वैद्यकीय महाविद्यालयीन प्रवेशासंबंधी अमरावती विभागावर झालेल्या अन्यायाविरुद्ध दिलेल्या लढ्याचा वृत्तांत**" या मथळ्याखाली डॉ. रमेश गोडबोले व डॉ. उध्दव देशमुख या दोन पदाधिकाऱ्यांच्या सहीने छापून यापूर्वीच त्यांनी प्रसिद्ध केला असून तो **सहपत्र : तीन** *(पृष्ठ ६९ पहा)* म्हणून सोबत दिला आहे. त्यामुळे त्यातील कामाचा वेगळा उल्लेख टाळलेला आहे.

१५. कृती समितीची पहिली बैठक अमरावती येथे जोशी हॉलमध्ये जुन १९९४ च्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात झाली. त्यावेळी जागाच्या अन्याय्य वाटपाच्या या शासननिर्णयाला उच्च न्यायालयामध्ये आव्हान द्यावे असे ठरले. याचिका दाखल करण्यासाठी निरनिराळ्या मुद्यांची जुळवाजुळव या सभेत ठरली. कृती समितीच्या या सभेत इतर मुद्यांच्या सोबत "भारतीय संविधानाच्या कलम ३७१ (२) नुसार मा. राष्ट्रपतींनी काढलेले आदेश, मा.राज्यपालांनी प्रसृत केलेले अधिनियम समतुल्य आदेश व त्यानंतर सुद्धा अन्याय्य वाटप होणे" हा मुद्दा (यापुढे "समन्यायी वाटपाचा मुद्दा" असे म्हणू) प्रामुख्याने याचिकेमध्ये अंतर्भूत करावा असे मी आग्रहाने प्रतिपादन केले. महाराष्ट्र शासन राजपत्राच्या माझ्जवळील प्रतीसुद्धा कृतिसमितीच्या पदाधिकाऱ्यांकडे मी या सभेतच सोपविल्या. **समन्यायी वाटपाचा हा मुद्दा याचिकेमध्ये दाखल करावा असे या सभेत ठरले.**

१६. महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिवेशन, सोमवार दिनांक ११ जुलै १९९४ या तारखेला सुरू होणार होते. त्याच्या ८-१० दिवस अगोदर कृतीसमितीची आणखी एक बैठक अमरावती येथे श्री.ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयामध्ये भरली. अन्यायाचे उग्र स्वरूप स्पष्ट झाल्यामुळे या सभेला उपस्थिती चांगलीच होती. मी स्वतः या सभेच्या अध्यक्षस्थानी होतो. कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी याचिका मा. उच्च न्यायालयापुढे सादर करण्यात आल्याचे सांगितले. **मात्र समन्यायी वाटपाचा मुद्दा वगळण्यात आला असून तो याचिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला नाही असे पदाधिकाऱ्यांनी सभेला सांगितले.**

१७. "समन्यायी वाटपाचा मुद्दा" याचिकेमध्ये समाविष्ट करण्यात आला नाही हे ऐकून मला अतिशय वाईट वाटले. इतर मुद्यांची जी स्थिती मला माहीत होती त्या पार्श्वभूमीवर समन्यायी वाटपाच्या मुद्याशी संबधित सर्व कागदपत्रांची (राजपत्रातील आदेशासह) मी सभेला तपशीलवार माहिती दिली व कोणत्याही परिस्थितीमध्ये या मुद्याचा समावेश याचिकेमध्ये झाला पाहिजे असे आग्रही प्रतिपादन केले. या मुद्याशी संबंधीत कागदपत्रांचा एक संच कृतीसमितीच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाधीन केला. **कृतीसमितीच्या पदाधिकाऱ्यांसह एकमताने "उच्च न्यायालयासमोरील याचिकेमध्ये दुरुस्ती करून समन्यायी वाटपाचा मुद्दा समाविष्ट करावा" असा निर्णय या सभेत घेण्यात आला** व कृतीसमितीने त्याप्रमाणे कारवाई पूर्ण केली. कृतीसमितीच्या छापील प्रकाशित वृत्तांतामध्ये **(सहपत्र : तीन,** *पृष्ठ ६९ पहा)* याबाबतचा उल्लेख पुढील शब्दात आहे :-

"**न्यायालयासंबंधी :-** उच्च न्यायालयाने सरकारला वेळोवेळी सूचना देवूनसुध्दा सरकारने स्पष्टीकरण देण्यास तब्बल दीड महिना लावला. याच दरम्यान **आ.बी.टी.देशमुख यांनी जुलै ९४ मध्ये हा प्रश्न विधानपरिषदेसमोर मांडला. तसेच त्यांचेच सल्ल्याप्रमाणे व राष्ट्रपतींनी काढलेल्या अध्यादेश ३७१/२ चा आधार घेऊन उच्च न्यायालयासमोर** (Equitable distribution) **समन्यायी जागावाटपाच्या मुद्यावर अर्ज सुधारून घेतला."**

१८. समन्यायी वाटपासंबंधीचा मुद्दा या याचिकेमध्ये समाविष्ट करून कृतीसमितीने खूपच महत्त्वाची व अभिनंदनीय कामगिरी बजावली असे म्हणावे लागेल. कारण न्यायालयात हा एकटाच मुद्दा पुढे टिकला, एवढेच नव्हेतर त्यामुळे अनुशेषबाधित विभागाचा एक नवा इतिहास सुरू झाला. ऑगस्ट १९९६ पावेतो न्यायालयात, विधिमंडळात किंवा शासनात हा मुद्दा मागे हटलेला नाही तो पुढेच जात आहे. या मुद्याच्या अंतिम यशामध्ये महाराष्ट्राच्या अविकसित भागाच्या विकासाची किरणे सामावलेली आहेत. **अंतिम यश मिळाले तर या जागांबरोबर नोकऱ्यांमध्ये समन्यायी वाटपाची दारे खुली होतील व विकासाच्या कामासाठी निधीचे वाटप सुद्धा समन्यायी पद्धतीनेच करावे लागेल.**

१९. लौकिक अर्थाने याबाबत कृतीसमितीचे अभिनंदन करीत असतांनाच तांत्रिक अर्थाने कु.भक्ती रमेश गोडबोले, कु. वैशाली जुगलकिशोर जाजू, कु.सुनिता रामकिसन अग्रवाल, कु.अनिता मदन मुंदडा, कु.सारीका विनयकुमार गुप्ता, कु.सोनाली वासुदेव वानखडे, रोहीत रविंद्र चोरडिया, कु.अनुजा गोपाल काशीकर, कु.अनघा अशोक होशंगाबादकर, कु.शिल्पा शंकरराव देशमुख, कु.ममता घनश्याम गांधी, कु.शांती बाळासाहेब भेंडे, कु. राजश्री कृष्णराव देशमुख, तापन प्रल्हाद रावत **या १२ वा वर्ग पास झालेल्या १४ मुलामुलींचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले पाहिजे, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर १९९४ च्या याचिका क्रमांक १५९४ मधील अर्जदार या नात्याने.**

२०. मुळात जुलै १९९४ च्या विधानमंडळाच्या अधिवेशनासाठी आम्ही मुंबईला गेलो त्यावेळी सादर झालेली याचिका 'ॲडमिट' झाली किंवा नाही?, समन्यायी वाटपाच्या मुद्यांची दुरूस्ती त्या याचिकेमध्ये करण्यात आली किंवा नाही? याबाबतची कोणतीहि निश्चित माहिती आमच्या जवळ नव्हती. अशा स्थितीमध्ये **अमरावती व नागपूर विद्यापीठांतर्गत वैद्यकीय महाविद्यालयांतील प्रवेशासंबंधी सर्वश्री विजय पाटील, विष्णू अण्णा पाटील, रमेश गुप्ता, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना सभागृहामध्ये मंगळवार दिनांक **१९ जुलै १९९४** रोजी चर्चेसाठी आली. मुळात नियमाप्रमाणे जी बाब न्यायप्रविष्ट असेल त्याबाबतीत


**SHREE HANUMAN VYAYAM PRASARAK MANDAL, AMRAVATI.**

( Our Motto : " AGE BADHO - SABSE AGE BADHO " )

The only private Institution in India maintaining 100 acres sports complex, foundation of which was laid down by *Rashtrapita Mahatma Gandhi* on 21-12-1926.

**The Academic qualification & Training** in following Courses is given by Colleges & Institutions run by the Mandal : B. A.M. S. , M. D., B. P. E. , B.P.Ed., M. P. Ed., C. P. Ed., D. Ed., D.Y. Ed. & Post Graduate Diploma & Certificate Courses in Computer Science and Naturopathy. There are also facilities for carrying out Research work.

**The Complex is having modern Sports facilities** such as 2 Tracks , Gymnasiums, Olympic Type Standard Swimming Pool, Stadium with Indoor Halls , Modern Health Centre, Grounds for all Indian and Foreign Games, Audio-visual Teaching Aids, Band Training, Library with Indian and Foreign Journals & Magazines, Computer Department , Research Laboratory with latest " Tread - mill ". It has 10 Sleparate Hostels for Boys and Girls.

**The other facilities** in the Complex are :Co-operative Stores, Dispesdary, State Bank Counter, Mandal's Sahakari Patpedhi, Post Office, Dairy, Canteen & Physio Theoraphy Deptt. **.... HON. GENERAL SECRETARY**

सभागृहामध्ये चर्चाच होवू शकत नाही. शासनाच्या लेखी निवेदनात स्पष्टपणे असे नमुद करण्यात आले होते की "शासनाच्या सदरहू निर्णयास उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठात रिट याचिका क्रमांक १५९४/९४ व १५९७/९४ अन्वये आव्हान देण्यात आलेले असून **ही बाब न्यायप्रविष्ट आहे.**"

**२१.** आमच्या जवळ असलेल्या "माहितीची लेव्हल" काय होती हे मी विचारलेल्या पुढील प्रश्नावरून सहज लक्षात येऊ शकते :- "अध्यक्ष महाराज, जी मॅटर कोर्टात सब-ज्युडीस आहे त्यासंबंधी मी प्रश्न विचारत नाही. परंतू ती मॅटर कोर्टात सब-ज्युडीस आहे किंवा नाही याबद्दल मला सन्माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे. त्यासंदर्भात अध्यक्ष महाराज, मला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. जणू काही अमरावती आणि नागपूर असे या दोन विभागांमध्ये वाद आहे अशा संदर्भात लक्षवेधी सूचना विचारण्यात आलेली आहे. मी जी लक्षवेधी सूचना दिली होती त्यामध्ये दोन मुद्दे स्वायत्त मंडळाबाबत उपस्थित केलेले होते. ती माझी लक्षवेधी या लक्षवेधीला टॅग झाली. हे दोन मुद्दे जर कोर्टातील पीटीशनमध्ये चॅलेंज झाले असतील तर त्याबद्दल मी येथे काही प्रश्न विचारणार नाही. इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन झाले पाहिजे आणि डेव्हलपमेंट एरीयावाईज वाटप केले गेले पाहिजे असे माझे दोन मुद्दे होते हे दोन मुद्दे जर न्यायालयासमोर आव्हानीत केले गेले असतील तर त्यासबंधी मी काही प्रश्न विचारणार नाही, **जर ते न्यायालयासमोर आव्हानीत झाले असतील तर मग न्यायालयामध्ये जो काही निर्णय व्हावयाचा असेल तो होईल. तेव्हा असे झाले आहे काय हे मंत्रीमहोदयांनी सांगावे.**" सर्व साधनसामुग्री व मनुष्यबळ असलेल्या शासनाजवळ उपलब्ध असलेल्या "माहितीची लेव्हल" सुध्दा आमच्या पेक्षा काही फार वरच्या दर्जाची होती असे नाही हे माझ्या वरील उपप्रश्नाला राज्यमंत्री श्री. मर्झबान पात्रावाला यांनी जे उत्तर दिले त्यावरून लक्षात येईल. ते म्हणाले :- "अध्यक्ष महोदय रिट याचिका के अंतर्गत काफी मुद्दे उपस्थित किए गए है और उनपर बहस चल रही है. सन्माननीय सदस्यने जो मुद्दे यहां उपस्थित किए है, **उसकी जानकारी अभी मेरे पास नही है.** अगर सन्माननीय सदस्य चाहेंगे तो मैं वह जानकारी सभागृह के पटलपर रखने के लिए तैयार हूं."

**२२.** एका बाजूला "ही बाब न्यायप्रविष्ट आहे" असे लक्षवेधी सुचनेवरील आपल्या लेखी निवेदनामध्ये शासनाने नमुद करणे, बाब न्याय प्रविष्ट असल्यास तीवर सभागृहामध्ये चर्चा होऊ शकत नाही असा नियम असणे, व उच्च न्यायालयामध्ये निश्चितपणे काय स्थिती आहे याबाबतची आम्हालाहि माहिती नसणे, घटना त्या दोनतीन दिवसातच घडत असल्यामुळे शासनाजवळ सुध्दा पुरेशी माहिती नसणे, यास्थितीमध्ये चर्चा पुष्कळ झाली तरी या चर्चेतून काहीही निष्पन्न होऊ शकले नाही. प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या "**जर हे मुद्दे आव्हानीत नसतील तर त्यासंबंधीची सभागृहात चर्चा होऊन त्यासंबंधी शासनाचे धोरण आम्हाला समजले पाहिजे.**" या प्रश्नावर मा. सभापतींनी दिलेल्या "**कोर्टातून सब-ज्युडीस मॅटर संपल्यानंतर मी ही चर्चा करण्यास परवानगी देईन.**" या निर्णयाने या लक्षवेधीवरील चर्चा संपली.

**२३.** मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर २७ सप्टेंबर १९९४ रोजी या प्रश्नाचा निवाडा झालेला होता. डॉ.रमेश गोडबोले व डॉ. उध्दव देशमुख या कृतीसमितीच्या पदाधिकाऱ्यांनी निवाड्याची प्रत मला उपलब्ध करून दिली होती. या पार्श्वभूमीवर बुधवार, दिनांक **३० नोव्हेंबर १९९४** रोजी सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे, वसंतराव मालधुरे, श्रीमती वसुधा देशमुख, सेलिन डिसिल्वा, अशोक मोडक, विश्वनाथ पाटील यांची "विद्यापीठ निहाय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप" या विषयावरील लक्षवेधी सूचना उत्तरासाठी होती. लक्षवेधी सूचनेच्या मसुद्यामध्ये असे नमूद करण्यात आले होते की, "१० जून १९९४ च्या शासन निर्णयाने विद्यापीठ निहाय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे केलेले अन्याय्य वाटप, वस्तुतः १९९४ च्या विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ आदेशाच्या परिच्छेद १० प्रमाणे विशेष जबाबदारी अंतर्गत हे वाटप उक्त विभाग निहाय करण्याची गरज, बाराव्या वर्गाला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन समन्यायी वाटप करण्यात न आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, १ नोव्हेंबर १९९४ ला अमरावती येथे जिल्हाधिकाऱ्यांचे कार्यालयावर नेण्यात आलेला मोर्चा, ५ नोव्हेंबर, १९९४ पासून शहिद स्मारकाजवळ चालू असलेले साखळी उपोषण,१९ नोव्हेंबर १९९४ रोजी शाळा महाविद्यालये बंद ठेवण्याचा झालेला कार्यक्रम, आमरण उपोषणाचा कृती समितीने घोषित केलेला कार्यक्रम, मुख्यमंत्र्यांशी कृती समितीने वेळोवेळी केलेली चर्चा, **वैधानिक विकास मंडळ आदेश १९९४ प्रमाणे विकास मंडळ प्रदेश घटक धरून जागांचे समन्यायी वाटप करण्यात शासनाला आलेले अपयश,** त्यामुळे जनमानसामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

**२४.** वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या वतीने मा. मंत्रिमहोदयांनी केलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आलेले होते की "राज्यातील शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील ३० टक्के जागा राज्यस्तरीय गुणवत्तायादीतील व ७० टक्के जागा विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांमधून भरण्यात येतात. अमरावती विद्यापीठ सन १९८३ साली स्थापन झाल्यानंतर सन १९९३ पर्यंत या विद्यापीठ क्षेत्रात भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता असलेले एकही वैद्यकीय महाविद्यालय अस्तित्वात नव्हते. तथापि सन १९९३ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यास भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता प्राप्त झाल्यावर अमरावती विद्यापीठ नागपूर विद्यापीठापासून वैद्यकीय प्रवेशासाठी वेगळे करण्यात आले. सदरहू निर्णयास उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठात रिट याचिका क्र. १५९४/९४ व १५९७/९४ अन्वये आव्हान देण्यात आले व न्यायालयाने दि. २७.९.९४ रोजी दिलेल्या निकालात अमरावती व नागपूर

*सहपत्र बारा : परिच्छेद ८४ व ९४ पहा*

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
***No. 368/95/657 Law & Judiciary Department,***
***Maharashtra Sadan, Copernicus Marg,***
**NEW DELHI**
Ph : 3385212 Dated : 6.5.96

To,
**Shri. S.S.Gokhale,**
Administrative Officer, Directorate of
Medical Education & Research, Mumbai.

**Sub :** SLP (C) No. 17810-11/95 (From the Judgement and Order dated 13.7.95 of the Bombay High Court, Nagpur Bench, in W.P. No. 1594/94 and 1690/94)

*Nagrik Samiti, Malkapur & Ors. Vs. State of Maharashtra*

**Ref :** Our File No. 368/95.

Sir,

The aforesaid matter was listed for hearing on 30.4.96 before Court No. 1, as item No. 46 when I appeared in the matter on behalf of the State. **The Court has directed the Government to pass appropriate orders within 4 weeks.** It was pointed out to the Court that the report is not yet submitted to the Governor in view of the elections. **The Court has therefore, stated in its order that this decision should be taken within 4 weeks, as this policy of the Government of equitable distribution should be implemented in the next academic year.** If the decision is not taken within 4 weeks it might amount to contempt of Court.

Yours faithfully,
**Sd/- (D.M.Nargolkar)**
Government Advocate.

SHRI GAJANAN SHIKSHAN SANSTHA' S

**SHRI SANT GAJANAN MAHARAJ COLLEGE OF ENGINEERING**

**SHEGAON -** 444 203 DIST. BULDANA ( M.S.)

*AFFILIATED TO AMRAVATI UNIVERSITY AND APPROVED BY AICTE,NEW DELHI.*

**4 YEAR GRADUATE B. E. COURSES.*** Electronics and Telecommunication Engg.* Electrical ( Electronic and Power Engg.) * Computer Science and Engg. * Mechanical Engg.
**FEATURE OF INSTITUTION** * Established in 1983 * 63 acres of laidout Campus. * Dedicated & Qualified Staff. * 2000 Engineers passed in 9 Batches.* Well Equipped Laboratories & Computer Centre. * Well stocked Library.
**2 YEAR POST GRADUATE COURSE.** * Master of Business Administration

**S. S. PATIL**
*Chairman*

**Dr. D. G. WAKDE**
*Principal*

विद्यापीठ वैद्यकीय प्रवेशासाठी वेगळी करण्याचा शासनाचा निर्णय वैध असल्याचा निर्वाळा दिला आहे. **१९९४ च्या विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ आदेशा" च्या परिच्छेद-१० प्रमाणे विशेष जबाबदारी अंतर्गत जे वाटप विभागनिहाय करावयाचे आहे त्या बाबतच्या सूचना मा. राज्यपाल यांचेकडून शासनास अद्यापि प्राप्त झालेल्या नाहीत.** सदरहू सूचना प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने योग्य तो निर्णय घेण्यात येईल."

२५. अनुपूरक चर्चेमध्ये श्री. बी.टी.देशमुख यांनी "१९९४ चा विदर्भ,मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ आदेश" निर्गमित झाला आहे आणि त्याला कायद्याचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या गॅझेटच्या भाग-४ मध्ये तो आदेश प्रसिद्ध झाला आहे आणि त्याच्या परिच्छेद १० मध्ये स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की, यापुढे "या जागांचे इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन केले पाहिजे आणि त्याकरिता विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र हे तीन डेव्हलमेंट रिजन वाटपाचे आधारभूत घटक मानले पाहिजे'" हे लक्षात आणून देऊन विचारलेल्या "आपण हे जागांचे डिस्ट्रीब्युशन विद्यार्थ्यांची एकूण संख्या लक्षात घेऊन केले आहे? की ॲपिअर्ड विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात केले आहे? की पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात केले आहे? की ॲडमिशनसाठी उपलब्ध जागांच्या प्रमाणात केले आहे की, या पेक्षा वेगळा काही निकष लावण्यात आला आहे? **१० जून १९९४ चा जागा वाटपाचा शासननिर्णय काढतांना काय विचार करण्यात आला होता?**" या उपप्रश्नाला मा. राज्यमंत्र्यांनी "अध्यक्ष महाराज, विद्यापीठनिहाय आपण व्यवस्था केलेली आहे." असे उत्तर दिले.

२६. २७ सप्टेंबर १९९४ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयाचा उल्लेख मा. मंत्रिमहोदयांच्या लेखी निवेदनामध्ये होता व त्याच संदर्भात अनुपुरक चर्चेत ज्यावेळी प्रा.बी.टी.देशमुख यांनी "परंतु इक्विटेबल डिस्ट्रिब्युशन करण्यास तुम्हाला कोणी मनाई केली होती काय?" असा उपप्रश्न विचारला तेव्हा मा.राज्यमंत्र्यांनी असे नमूद केले की "अध्यक्ष महाराज इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन देण्यास कोणीही मनाई केलेली नव्हती. **परंतु कोर्टाने निर्णय दिलेला होता की, विद्यापीठनिहाय ॲडमिशन्स देण्यात याव्यात आणि त्याप्रमाणे ॲडमिशन्स कराव्या लागल्या** " मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयासंबंधात जेव्हा "**कोर्ट कचेरी नंतर आली. मुळात इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन केले नाही....** अध्यक्ष महाराज. मुंबई विभागामध्ये २४ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि त्या ठिकाणी ६०० जागा देण्यात आल्या आहेत, त्यानंतर पुणे विभागामध्ये २६ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि त्याठिकाणी ५४० जागा देण्यात आल्या आहेत. अमरावती विभागामध्ये १८ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि त्याठिकाणी फक्त १५० जागाच देण्यात आल्या आहेत. **या संदर्भात मी आपल्याला असे विचारू इच्छितो की इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनच्या संदर्भात कोर्टाने काय म्हटलेले आहे?**" असा उपप्रश्न प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारला तेव्हा विभागाच्या कॅबिनेट मंत्र्यांनी "अध्यक्ष महाराज, न्यायालयाने हा जो निर्णय दिलेला आहे त्याप्रमाणे अमरावती आणि नागपूर विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी वेगळे प्रवेश नियम लावावेत असे कळविले आहे." असे उत्तर दिले.

२७. समन्यायी वाटपाबद्दल मंत्रिमहोदया काहीच बोलत नव्हत्या त्यावेळी प्रा.बी.टी.देशमुख यांनी जेंव्हा "अध्यक्ष महाराज, न्यायालयाने जे कळविल्याचे आता नामदार मंत्री महोदया सांगत आहेत ते बरोबर आहे. **पण समन्यायी वाटपाबद्दल काय? अध्यक्ष महाराज, मी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शाळेतील एक विद्यार्थी या नात्याने त्यावेळी भाग घेतला आहे. मराठी भाषिकांचे राज्य झाले ही त्या पिढीने अनेक पीढ्यांना दिलेली देण आहे आणि हा सारा अनुशेष जो आहे तो आमच्या एका पिढीचे पाप आहे.**" असे उद्‌गार काढले त्यावेळी संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये एक जेष्ठ सेनानी म्हणून काम केलेल्या सभापतीस्थानी विराजमान असलेल्या जयंतरावजी टिळकांच्या तोंडून पुढील उद्‌गार बाहेर पडले "**महाराष्ट्र आता फुटण्याची वेळ आलेली आहे. मधल्या काळात बरेच पाणी वाहून गेलेले आहे.**"

२८. समन्यायी वाटपाबाबत उच्च न्यायालयाने काय निर्णय दिलेला आहे याबाबतचा कोणताही उल्लेख मा. मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तरात केला नाही. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयासंदर्भात "**कोर्टाने याबाबत आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ९९ (अ) मध्ये असे म्हटले आहे की,** "We, therefore, propose to keep the above question of equitable distribution of seats in the whole of the State open" म्हणजेच इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनच्या प्रश्नावर हायकोर्टाने निर्णय दिलेला नाही पण तुम्ही जे केलेले होते त्याबद्दल कोर्टाने म्हटले आहे की, आता इतका विलंब झालेला आहे. की, आम्ही या इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनच्या प्रश्नामध्ये आता शिरणार नाही. तर ती गोष्ट ओपन ठेवलेली आहे." हा भाग सभागृहामध्ये प्रा.बी.टी.देशमुख यांनी उधृत केल्यानंतरही मा. मंत्रिमहोदयांनी समन्यायी वाटपाबाबत कोणतेहि उत्तर दिले नाही. मात्र राज्यमंत्र्यांनी एका उपप्रश्नाच्या उत्तरात असे नमूद केले की "अमरावती विद्यापीठ हे नवीन विद्यापीठ असल्याने **सकृतदर्शनी येथे जागा कमी दिसतात हे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे ते तसे खरे आहे. पण पूर्वीपेक्षा विद्यापीठनिहाय जागा देण्याचे सुरू झाल्यापासून आपल्याकडील विद्यार्थांना तीन पटीने जागा जादा मिळाल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.**"

२९. "या विभागामध्ये विद्यापीठाच्या निर्मितीस उशीर झाला म्हणून अमरावती विभागातील विद्यार्थ्यांचा त्यात काही दोष नाही..... त्यामुळे या वर्षीच्या विद्यार्थ्यांचे जे नुकसान झालेले आहे ते शासन कसे काय भरुन काढणार आहे." या श्री.बबनराव चौधरी यांनी विचारलेल्या उपप्रश्नाला उत्तर देण्यासाठी स्वतः मा. मुख्यमंत्र्यांनी चर्चेत हस्तक्षेप करून असे सांगितले की "एका दृष्टीने तेथील विद्यार्थ्यांना अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांप्रमाणे न्याय मिळाला नाही ही गोष्ट सत्य आहे..... राज्य सरकारने स्वतःहून पुढे येऊन यासंबंधी निर्णय घेतला पाहिजे होता या तत्त्वाशी आम्ही सहमती दाखविली आहे. **दोन-तीन मार्ग त्यात आम्ही काढलेले आहेत. एक म्हणजे तळेगांव येथे एका नवीन महाविद्यालयास परवानगी देण्याचा निर्णय इंडियन मेडिकल कौन्सिलने घेतला आहे.त्या महाविद्यालयामध्ये ज्या जागा उपलब्ध होणार आहेत त्यातील ५० जागा या आम्ही अमरावतीच्या विद्यार्थ्यांसाठी यंदापासूनच राखून ठेवल्या आहेत** .... याशिवाय हा प्रश्न कायमचा निकालात निघण्यासाठी **यवतमाळच्या महाविद्यालयामध्ये सिटस् वाढवण्यासंबंधीचा निर्णय राज्य सरकार घेत आहे.... या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये आणखी एखाद दुसऱ्या वैद्यकीय कॉलेजला परवानगी देण्यासंबंधी त्यासाठी आवश्यक ती शिफारसही इंडियन मेडिकल कौन्सिलकडे करण्याचा राज्य सरकारने विचार केलेला आहे.**"

मा. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या या उत्तरानंतर प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या "अध्यक्ष महाराज, मा. मुख्यमंत्री महोदयांनी तळेगांव दाभाडे येथे **५० जागा वाढवून देण्याबाबत सूचना दिल्या हे जे या ठिकाणी सांगितले ते स्वागतार्ह आहे. ही तात्पुरती उपाययोजना झाली. परंतु त्या ठिकाणी जर काही विलंब झाला, कोर्ट कचेरी झाली तर प्रश्न निर्माण होणार आहेत.** अध्यक्ष महाराज, या भागामध्ये जागा वाढविणे किंवा एखाद्या चांगल्या संस्थेला महाविद्यालय देणे हा उपाय योग्य आहे पण त्याला वेळ लागेल. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी **पुढच्या जूनमध्ये 'स्टेट ॲज ए होल' उपलब्ध जागांचे इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशन हे झाले पाहिजे आणि त्याचा बेसीस 'डेव्हलपमेंट रिजन' हे असले पाहिजे. यासबंधी माननीय मुख्यमंत्रीमहोदयांना काय सांगावयाचे आहे?**" या उपप्रश्नाला स्वतः मा. मुख्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले की "अमरावती कार्यक्षेत्रामध्ये मेडीकलच्या सीटस् वाढविण्याबाबतची जी खबरदारी घ्यावयाला पाहिजे ती घ्यावीच लागेल. ती खबरदारी घेण्याच्या दृष्टीने राज्य शासनाकडून पावले टाकली जातील. यामध्ये जर काही मर्यादा आल्या तर राज्यातील एकंदर १२ वी सायन्सच्या परिक्षेला बसणाऱ्यासाठी तसेच मेडीकलसाठी प्रवेश

**संयुक्त महाराष्ट्र होऊन खूप दिवस झाले अजून समन्यायी महाराष्ट्र झाला नाही !**

**जिजाऊ शिक्षण समिती, यवतमाळ**

***प्रगत संगणक*** ***जिजाऊ शिक्षण महाविद्यालय***

**डॉ. शरद कळणावत** – अध्यक्ष
**प्राचार्य शंकर सांगळे** – उपाध्यक्ष
**प्रा. ना. श्री. टिकले** – सचिव

घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी एकंदर विद्यापीठवाईज संख्या, **राज्यात उपलब्ध असलेल्या सगळ्या मेडीकलच्या सीटस् यांचा एकत्रीत विचार करुन त्या पद्धतीने प्रत्येक विद्यापीठामध्ये समान प्रमाणात कोटा देण्याच्या संबधीचा निर्णय घेतला जाईल.**"

३०. वैद्यकीय महाविद्यालयातील जागांच्या समन्यायी वाटपाच्या प्रश्नावर न्याय मिळविण्याच्या दृष्टीने बुधवार दिनांक ३० नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूर अधिवेशनांत विधानपरिषदेमध्ये या लक्षवेधी सुचनेच्या निमित्ताने झालेली ही चर्चा अत्यंत उपयुक्त ठरली.

एक म्हणजे "**तळेगांव येथे एका नवीन महाविद्यालयास परवानगी देण्याचा निर्णय इंडियन मेडिकल कौन्सिलने घेतला आहे.त्या महाविद्यालयामध्ये ज्या जागा उपलब्ध होणार आहेत त्यातील ५० जागा या आम्ही अमरावतीच्या विद्यार्थ्यासाठी यंदापासूनच राखून ठेवल्या आहेत** आणि ते अतिरिक्त विद्यार्थी तेथे सामावून घेण्यासंबंधीचा निर्णयही शासनाने घेतलेला आहे. तशा प्रकारच्या सूचनासुद्धा त्या मॅनेजमेंटला दिलेल्या आहेत, त्यांचेशी याबाबत बोलणे झालेले आहे." असे स्पष्ट आश्वासन मिळाले व तेही राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्याकडून, दुसरे व आणखी महत्वाचे आश्वासन खुद्द मुख्यमंत्र्यांनीच दिले ते पुढील शब्दात " **राज्यात उपलब्ध असलेल्या सगळ्या मेडीकलच्या सीटस् याचा एकत्रीत विचार करुन त्या पद्धतीने प्रत्येक विद्यापीठामध्ये समान प्रमाणात कोटा देण्याच्या संबंधीचा निर्णय घेतला जाईल.**"

३१. प्रादेशिक असमतोलाचा प्रश्न व नागपुरात अधिवेशन असल्यामुळे विधानपरिषद सभागृहामध्ये झालेल्या या कडाक्याच्या चर्चेला विदर्भातील वृत्तपत्रातून दुसऱ्या दिवशी खूपच प्रसिद्धी मिळाली. आपल्या दिनांक १ डिसेंबर १९९४ च्या अंकात **नागपूर पत्रिकेने** "बी.टी.म्हणजे बीटीच" या मथळ्याखाली दिलेल्या बातमीत म्हटले होते. "अमरावतीच्या गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये वैद्यकीय प्रवेशाबद्दल अन्याय झाल्याची भावना निर्माण झाल्याचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी आज मनाचा मोठेपणा दाखवून मान्य तर केलेच, शिवाय राष्ट्रीय स्तरावरील वैद्यकीय प्रवेश बारावीला विज्ञान विषय घेऊन बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि वैद्यकीय महाविद्यालयातील जागा लक्षात घेऊन आगामी शिक्षण वर्षाच्या प्रवेशाबाबतचा समतोल राखल्या जाईल, असे प्रयत्न राज्य शासन करेल, अशी घोषणाही केली. **मुख्यमंत्री शरद पवार यांच्या कडून या बाबी मान्य करायचे काम अमरावतीचे 'कडक' शिक्षक आमदार बी.टी.देशमुख यांनी केले. बी.टीं.चा विधान परिषद सभागृहातला आजचा एकामागे एक अभ्यासपूर्ण प्रश्न विचारण्याचा 'सपाटा' जबरदस्त होता.** वैद्यकीय शिक्षणमंत्री पुष्पाताई हिरे, राज्यमंत्री डॉ. शरद काळे यांनी प्रारंभी देशमुखांच्या लक्षवेधीवरील चर्चेला उत्तर दिले. परंतु बी.टीं.चे समाधान होईना आणि त्यांना हवे ते उत्तरही मंत्रिमहोदयांकडून येईना. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे प्रवेश झाल्याचे ज्यावेळी वैद्यकीय शिक्षणमंत्री पुष्पाताई हिरे यांनी सांगितले, तेव्हा बी.टी. कडाडलेच आणि म्हणाले, "माननीय मंत्रिमहोदया साच्यातले उत्तर देत आहेत. त्यावरून तर आतापर्यंत कितीतरी पाणी वाहून गेले आहे. मला १० जून ९४ च्या शासन निर्णयाचे काय ते सांगा." चर्चेत मंत्री कोंडीत सापडलेले पाहताच मुख्यमंत्री स्वतः उठून उभे राहिले आणि त्यातून मार्ग काढून बी.टीं.ना अपेक्षित उत्तर दिले. बी.टीं.नी आज त्यांच्या लक्षवेधीवर सरकारला योग्य ते उत्तर देण्यास भाग पाडून या सबंध हिवाळी अधिवेशन काळात आजची लक्षवेधी लक्षणीय ठरविली."

३२. "ही लक्षवेधी मांडतांना बी.टी.देशमुख यांनी अमरावतीवर झालेल्या अन्यायाकडे लक्ष वेधून सरकारला चांगलेच धारेवर धरले. त्यांच्या मुद्देसूद प्रश्नांना आरोग्य मंत्री पुष्पाताई हिरे आणि राज्यमंत्री शरद काळे व्यवस्थित उत्तरे देऊ शकले नाहीत. त्यामुळेच मुख्यमंत्र्यांना हस्तक्षेप करावा लागला." असे नमूद करून दैनिक **तरुण भारताच्या** १ डिसेंबर ९४ च्या अंकातील बातमीत पुढे असे म्हटले होते की, "**संयुक्त महाराष्ट्रात सामील झाल्याची शिक्षा आम्हाला देत आहात का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.** बी.टीं. च्या एका प्रश्नावर पुष्पाताई हिरे यांनी सर्वोच्च न्यायालयाचा एक जुना निकाल उद्धृत केला. त्यावर बी.टी. जाम संतापले आणि म्हणाले, जुने निकाल काय सांगता? नव्या निकालाबद्दल बोला. उच्च न्यायालयाने तुम्हाला समान वितरणाबद्दल मनाई केलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. (निकालाच्या ओळी वाचून दाखवतात) मंत्री म्हणतात मनाई नव्हती हे मान्य आहे. **सकृत दर्शनी अमरावती विभागाला कमी जागा मिळाल्या ही वस्तुस्थिती आहे, असेही डॉ. काळे यांनी मान्य केले**".

३३. ३० नोव्हेंबर १९९४ रोजी राज्याचे मुख्यमंत्री श्री शरद पवार यांनी हे जे समन्यायी वाटपाचे आश्वासन दिले ते सन १९९४ च्या तिसऱ्या अधिवेशनातील आश्वासन क्रमांक २२२ म्हणून सभागृहाच्या कामकाजामध्ये नोंदविले गेले असून **या जागांचा असमतोल संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने हे अत्यंत महत्वपूर्ण आश्वासन म्हणावे लागेल. कारण होणारा अन्याय इतका तीव्र व त्यातून होणारी प्रादेशिक असमतोलाची जखम इतकी खोल होती की पुढे शासन बदलले तरी हे आश्वासन बदललेल्या शासनाला बदलविता आले नाही. त्याची आम्ही अंमलबजावणी करणार नाही असे म्हणता आले नाही. त्या आश्वासनाच्या मागे जाता आले नाही तर नव्या शासनाला सुद्धा त्यापुढेच जावे** लागले एवढी ही असमतोलाची जखम खोल होती, हे खरे असले तरी ज्या सत्तारूढ पक्षाने आपल्यावर हा अन्याय केला त्याच्या बद्दलचा लोकांच्या मनातून राग काही गेला नाही. तत्कालीन सत्तारूढ पक्षाच्या पराभवाच्या कारणमीमांसेचे राजकीय विश्लेषण कोणी काय केले असेल ते असो, पण त्या पराभवाच्या अनेक कारणामध्ये, निदान विदर्भात तरी, निरनिराळ्या विकासक्षेत्रामध्ये निर्माण झालेला व सातत्याने वाढणारा अनुशेष हे एक अत्यंत महत्वपूर्ण कारण होते, असे माझे ठाम मत आहे. १९९४ चे नागपूर अधिवेशन संपल्यानंतरच्या महिन्या दोन महिन्यात विधानसभेच्या निवडणूकांची धामधूम सुरू झाली. अमरावतीहून प्रसिद्ध होणाऱ्या दै. '**जनमाध्यम'च्या** २३ जानेवारी १९९५च्या "**नाकर्त्यांना जाब विचारा**" या अग्रलेखातील पुढील विचार पहा :-

"वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशाच्या बाबतीत अमरावती विभागावर धडधडीत अन्याय झाला असतांना मिठाची गुळणी घेऊन गप्पगार बसलेले स्थानिक नेते व लोकप्रतिनिधी आता कोणत्या तोंडाने मते मागण्यास मतदारांकडे जात आहेत? .... मागासलेल्या विदर्भासाठी वैधानिक विकास मंडळ स्थापिल्याचा दावा करणाऱ्या राज्य सरकारने धडधडीत बेकायदेशीर आदेश काढून या मंडळाच्याच छाताडावर तांडव नृत्य केले. .... विदर्भाच्या कोरडवाहू शेतीत राहणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांच्या दुःखाबद्दल आता निवडणूक काळात ग्लिसरिनचे अश्रू ढाळणाऱ्या या मंडळीला त्यावेळी ना कष्टकरी शेतकरी दिसला ना त्याची कफल्लक पण हुशार- गुणवान मुले! .... मते मागण्यास येणाऱ्या प्रत्येक उमेदवारास मतदारांनी या प्रश्नाबद्दल आता जाब विचारला पाहिजे. आमच्या मुलांना नव्वद टक्क्याहून अधिक गुण मिळूनही वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळू शकला नाही. यासाठी जबाबदार कोण? .... निवडणुकीच्या हंगामात घरापर्यंत चालत येणारे हे पांढरे बगळे नंतरची पांच वर्षे दृष्टीसही पडणार नाहीत. अन्यायाविरुद्ध संघर्षासाठी ती सापडणे तर दूरच! मते मागण्यास दारी आलेली ही माणसे इ.स. २००० सालीच आपणास भेटणार हे त्यांनी (मतदारांनी) कायम ध्यानात ठेवायला हवे."

प्रादेशिक असमतोलाच्या खोलवर झालेल्या जखमांमुळे अनुशेष भागातील जनमानसामध्ये निर्माण झालेल्या तीव्र असंतोषाचे मोठे बिनचुक प्रतिबिंब **'जनमाध्यम'च्या** या विचारातून शब्दांकीत झालेले आहे.

३४. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन १९९५ च्या पहिल्या अधिवेशनामध्ये निरनिराळ्या दोन वेळा हा प्रश्न सभागृहामध्ये चर्चेसाठी आला. शुक्रवार, दिनांक **३१ मार्च १९९५** रोजी **सर्वश्री पी.जी.दस्तुरकर, व्ही.यु. डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील, दि.बा.पाटील** यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५६ हा प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये दुसऱ्याच क्रमांकावर उत्तरासाठी होता. त्यादिवशी या प्रश्नावर सभागृहामध्ये भरपूर कडाक्याची व

**Janata Shikshan Prasarak Mandal, Pusad. ( Distt. Yavatmal ) ( Regd. No. F\97 Yavatmal )**
**Founder :** Hon. Late V. P. Naik ( Ex Chief Minister, Maharashtra State)

**OUR ACHIEVEMENTS** * Phulsing Naik Mahavidyalaya, Pusad 1961 * Phulsing Naik Mahavidyalaya Hostel, Pusad. 1961 * Kamala Nehru Girls' Hostel, Pusad.1983 * Babasaheb Naik College of Engineering,Pusad. 1983 * Institute of Pharmacy, Pusad. 1984 * B. N. College of Engineering Hostel No.1,2,3 & 4 1984 * J. S. P. M. High School, Banshi, 1984 * Backward Class Hostel, Pusad. 1989 * Backward Class Hostel, Banshi. 1989 * Smt. Vastalabai Naik Mahila Mahavidyalaya,1989 * J. S. P. M. High School, Pusad. 1989 * J. S. P. M. Primary School, Pusad. 1989 * J. S. P. M. Urdu High School, Fulsawangi. 1990 * J. S. P. M. High School, Pimpalgaon. 1990 * J. S. P. M. Urdu Primary School, Pusad. 1990 * Priyadarshani Indira Gandhi Girls' Hostel 1991 * J. S. P. M. High School, Gaul kd. 1992

| **Dr. N. P. HIRANI** | **JAI S. NAIK** | **MANOHARRAO NAIK** |
|---|---|---|
| President | Vice - President | Secretary. |

खूपच खडाजंगी चर्चा झाली. "यावर्षी बारावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीन प्रदेशांमध्ये महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप करण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केलेली आहे," या प्रश्न भाग दोनच्या लेखी उत्तरामध्ये मा. मंत्रिमहोदयांनी असे नमूद केले होते की, "अशा प्रकारे प्रदेशनिहाय जागा वाटपाबाबतचा कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही. **तथापि राज्यातील वैद्यकीय व दंत महाविद्यालयांतील एकूण प्रवेश जागा एकत्रित करून त्यांचे विद्यापीठनिहाय समन्यायी वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.**"

**३५.** प्रश्न भाग ३ च्या लेखी उत्तरात "या प्रस्तावाबाबतच्या कायदेशीर बाजू तपासण्यात येत आहेत." असे नमूद करण्यात आले होते. अनुपुरक चर्चेमध्ये श्री. पी.जी.दस्तुरकर यांनी विचारलेल्या "हा प्रस्ताव तपासण्यास एवढा विलंब का लागत आहे? किती दिवसामध्ये हा प्रस्ताव तपासण्यात येईल?" या उपप्रश्नाला उत्तर देतांना वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ. दौलतराव आहेर यांनी असे सांगितले की "अमरावती विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. नागपूर हायकोर्टाचा निकाल लागल्यानंतर ही मंडळी सुप्रिम कोर्टामध्ये गेली. त्याठिकाणी मार्च १९९५ मध्ये याचा निकाल लागला आहे. **सुप्रिम कोर्टाने हे सर्व मॅटर राज्यशासनाकडे पाठविले आहे आणि राज्य शासनाने नागपूर हायकोर्टाकडे रेफर केले आहे. समान वाटप कसे होईल याप्रकारे आदेश दिले आहेत. याबाबतीत लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल.**"

**३६.** मा. मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये यापूर्वी दिलेली आश्वासने प्रा.बी.टी.देशमुख यांनी तपशीलवारपणे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली व असा प्रश्न विचारला की, "अध्यक्ष महाराज, अशा प्रकारे तेव्हा पॉझीटीव्ह निर्णय सांगितलेला आहे. **गेल्यावर्षी मुलांचे नुकसान झाले, मुलांनी आंदोलने केली, कोर्ट कचेऱ्या केल्या, महाराष्ट्रामध्ये असलेल्या सर्व जागांचे वाटप करीत असतांना विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील हे तीन युनिट धरून समन्यायी वाटप करणार आहात का नाही? यासंबंधी केव्हा आदेश काढण्यात येतील?**" त्यावर मा. मंत्रीमहोदयांनी "अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी अत्यंत पोटतिडकीने हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. याबाबतीत त्यांना यापूर्वीच्या सरकारने न्याय दिलेला नाही. मी त्यांना...." असे उत्तर दिले.

शासन ही एक सातत्य असलेली व्यवस्था आहे. **जुन्या शासनाने घेतलेला एखादा निर्णय लोकहिताचा नसेल तर तो बदलविण्याचा नव्या शासनाला अधिकार असतो हे जेवढे खरे, तेवढेच हेही खरे की लोकहितार्थ जुन्या शासनाने एखादा निर्णय घेतला असेल तर त्याच्या अम्मलबजावणीचे उत्तरदायीत्व पार पाडणे ही नव्या शासनाची जबाबदारीच असते. उत्तरदायीत्वाचे हे विधीमय हस्तांतरण नव्या सत्ताधारकांनी स्वीकारलेल्या जबाबदारीचा एक अविभाज्य भाग असतो ही गोष्ट मान्य करायला मा. मंत्रिमहोदयांची मनस्थिती तयारच नव्हती** व त्यामुळेच मा. मंत्रिमहोदयांच्या या उत्तराने एकदम अनेक सन्माननीय सदस्य उठून बोलायला लागले. त्यावेळी सभापतीस्थानी असलेल्या मा. उपसभापतींनी चर्चेत हस्तक्षेप करून असे विदित केले की "सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी यापूर्वी सभागृहामध्ये जी चर्चा झाली त्या चर्चेच्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी जे सांगितले ते या ठिकाणी उधृत केले आहे. यासंदर्भात पुढे काय कारवाई झाली किंवा कारवाई होण्यास उशीर का होत आहे? यासंदर्भात उत्तर द्यावे." त्यावर मा. मंत्रीमहोदयांनी **"त्यावेळच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिलेले होते ते आश्वासन पाळण्याची जबाबदारी त्या सरकारची होती हे मला परत याठिकाणी नमूद करावयाचे आहे."** असे विधान केल्यामुळे सभागृहात बराच गोंधळ झाला.

**३७.** सभागृहातील चर्चेच्या अधिकृत प्रतिवेदनाचे अवलोकन केल्यास असे दिसून येईल की खुद्द वैद्यकीय शिक्षणमंत्री श्री.दौलतराव आहेर **"आश्वासन त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी दिले होते त्याची अंमलबजावणी त्यांनी करावयास पाहिजे होती, त्यांनी ती केली नाही"** हे सूत्र धरून बोलत होते. सत्तारूढ पक्षाचे सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, प्रकाश जावडेकर कमीजास्त प्रमाणात हीच बाजू मांडत होते. विरोधी पक्षाचे सदस्य सर्वश्री अरुण मेहता, बबनराव चौधरी, वसंत चव्हाण आदी सदस्य **"या प्रश्नाला राजकीय वळण देण्याचा प्रयत्न करू नका मूळ प्रश्नाबाबतची भूमिका सांगा"** या सूत्राला धरून बोलत होते. श्री. वसंत चव्हाण यांनी प्रश्नोत्तराच्या तासात **"राजकीय शेरेबाजी"** या विषयावर अतिशय चांगला औचित्याचा मुद्दा मांडला. ते म्हणाले "सभापती महोदय, ज्यावेळेला अर्थसंकल्पावरील, राज्यपालांच्या अभिभाषणावरील अथवा एखाद्या विधेयकावरील भाषणे असतात त्यावेळेला आपण पॉलिटीकल कॉमेंट्री करतो, ती दोन्ही बाजूने होते. त्यावेळेला जे काही दोन हात करायचे असतील ते करतो. परंतु हा वाईट प्रघात या सदनात कधीही झालेला नाही. पॉलिटीकल कॉमेंट्री करण्याचा वाईट प्रघात या सदनामध्ये प्रश्नोत्तराच्या तासात कधीही झालेला नाही. माननीय मंत्रिमहोदयांना, आपल्या शासनाबद्दल काय सांगायचे असेल ते सांगावे." त्यावर मा. उपसभापतींनी पुढील प्रमाणे निर्णय दिला "प्रश्न हा अतिशय महत्त्वाचा आहे त्या प्रश्नावर नेमकी नीटनेटकी चर्चा होण्याऐवजी हरकतीचा मुद्दा, औचित्याचा मुद्दा याच्यामध्येच जास्त वेळ खर्च होत आहे. ही गोष्ट बरोबर नाही. **मी सर्व माननीय सदस्यांना सूचना करतो की, प्रश्न विचारणाऱ्या माननीय सदस्यांनी नेमके प्रश्न विचारावेत आणि त्याच्यामध्ये राजकीय खोच असू नये आणि त्याला माननीय मंत्रिमहोदयांनी सरळ उत्तर द्यावे, व्यवस्थित उत्तर द्यावे प्रश्न विचारणाऱ्या सदस्याच्या प्रश्नामध्ये राजकीय खोच असेल तर उत्तरामध्ये ती थोडीशी आली तर माननीय सदस्यानी राग मानू नये.**"

**३८.** **"राजकीय शेरेबाजी"**च्या संदर्भातील चर्चा व त्यावर मा. उपसभापतींचा निर्णय झाल्यावर चर्चा पुन्हा सुरू झाली तेंव्हा प्रा.बी.टी.देशमुख यांनी "मंत्र्यांचे उत्तर मी अतिशय काळजीपूर्वक ऐकत होतो परंतु त्याला राजकीय वळण लागले या संदर्भात पूर्वीच्या शासनाने मान्य केलेला शासन निर्णय अजूनपर्यंत निघाला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आता आपण शासन म्हणून आहात तेव्हा पुन्हा शासन या संदर्भात जो निर्णय घेईल तो केव्हा घेईल? अध्यक्ष महोदय, निश्चित उत्तर सदनामध्ये मिळावयास पाहिजे. नाहीतर या अन्यायाबाबत निषेध करून आम्ही सभागृहाबाहेर जावू शकतो या जागांच्या बाबतीत इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशन झाले पाहिजे याबाबत राष्ट्रपतींनी ऑर्डर पास केलेल्या आहेत, त्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या व राज्यपालांची ती विशेष जबाबदारी आहे. माननीय राज्यपालांच्या संदर्भात आपण येथे चर्चा करू शकत नाही हे मला माहीत आहे. मागच्या वेळेस मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात निश्चित असे आश्वासन दिलेले आहे." अशी माहिती देवून तेव्हा "माझा प्रश्न असा आहे की, **राज्यामध्ये असलेल्या सर्व जागा १२ वी च्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेवून त्या त्या विभागामध्ये वाटप करण्याविषयीचा निर्णय घेणार आहांत की नाही?**" असा प्रश्न विचारला, तेव्हा आपल्यावर काहीतरी दबाव टाकण्यात येत आहे अशा प्रकारची भावना श्री.दौलतराव आहेर यांच्या मनामध्ये निर्माण झाली व त्या भावनेच्या पोटी पटकन त्यांच्या तोंडून **"मी या संदर्भात यापूर्वी स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे परंतु अशाप्रकारे सन्माननीय सदस्य दबाव टाकून.....**" असे उद्‌गार निघाले. त्यांचे उद्‌गार पूर्ण होतही नाहीत तर अनेक सदस्य एकाच वेळी सभागृहात उभे राहिल्यामुळे श्री. आहेर हे आपले वाक्य अपुरे ठेवून खाली बसले पण खाली बसता बसता त्यांनी "मागच्या मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात काही केले नाही" असे उद्‌गार काढले आणि त्यामुळे सभागृहात खूपच गोंधळ झाला, मंत्र्यांनी माफी मागितली पाहिजे अशी मागणी श्री. रामदास आठवले यांनी केली. सर्व सभासदांना शांत करीत सभापतीस्थानी असलेल्या मा. उपसभापती श्री. ना.स.फ़रांदे यांनी पुढील प्रमाणे उद्‌गार काढले :- "सर्व सन्माननीय सदस्यांनी एकाच वेळी


## नगर परिषद, वणी ( जि. यवतमाळ )

हार्दिक शुभेच्छा

**नागरिकांकडून अपेक्षित सहकार्य.** १. मालमत्ता कर व पाणी कर वेळीच भरुन नगर परिषदेच्या विकास कार्यास सहकार्य करा. २. सार्वजनिक जागेवर अतिक्रमण करून विकास कार्यात अडथळे आणू नका. ३. कुटुंब कल्याण कार्यात सहभागी होऊन राष्ट्रीय कार्याला सहकार्य करा. ४. आपल्या घरासमोर वृक्षारोपण करून प्रदूषण टाळा. ५. जन्म मृत्यूची नोंद नगरपरिषदेकडे वेळेवर करा. व आपले हित साधा.

**वणी नगरपरिषदेने तीन वर्षात केलेली विकास कामे** एकात्मिक शहर विकास योजने अंतर्गत खालील बांधकामे केलेली आहेत. १. आरक्षण क्रमांक ३१ वर ४४ दुकान समुहाचे बांधकाम. २. आरक्षण क्रमांक ३२ वर ३० दुकानांचे मॉडेल मार्केटचे बांधकाम. ३. आरक्षण क्रमांक १३ वर ४४ दुकान समुहाचे बांधकाम. ४. आरक्षण क्रमांक १४ वर ४१ दुकानांचे बांधकाम. ५. आरक्षण क्रमांक ७८ वर १८ दुकानांचे बांधकाम. । वणी - नागपूर व वणी - यवतमाळ रोडवर सोडीयम व्हेपर लँम्पचे विद्युतीकरण. । नेहरु पार्क व बालोद्यानाचा विकास .। हिंदू स्माशनभूमी व मुस्लीम कब्रस्थानाचा विकास. । शहरातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण.

| | | | |
|---|---|---|---|
| **जी. एन. कुर्वे** | **डॉ. अ. ल. नालमवार** | **सं. नि. दरेकर** | तथा |
| मुख्याधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | **नगर परिषद वणी चे समस्त सदस्यगण.** |

बोलण्याचे थांबवावे. एक गोष्ट मला सदनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, **विदर्भातील किंवा कोणत्याही भागातील अनुशेषाचा जेव्हा प्रश्न उपस्थित होतो त्यावेळेला तो प्रश्न मांडतांना सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख हे भावनावश होतात हे सर्वांना माहीत आहे. ते तो विषय पोटतिडकीने मांडतात तेव्हा ते आपल्यावर दबाव आणतात असे मंत्र्यांनी समजू नये.** सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांची बोलण्याची शैली नवीन आरोग्य मंत्र्यांना माहीत नाही. त्यामुळे माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्याबद्दल मंत्र्यांच्या मनात काही गैरसमज झाला असेल तर तो त्यांनी काढून टाकावा."

त्यानंतर सुद्धा अनेक सदस्य एकाच वेळी बोलायला लागले. कोणी मंत्र्यांनी माफी मागावी असे म्हणू लागले, तर कोणी त्यांचे शब्द रेकॉर्डवरून काढून टाकावे, अशी मागणी केली. काहिंनी मंत्र्यांनी त्यांचे शब्द परत घ्यावे व दिलगिरी व्यक्त करावी अशी मागणी केली. शेवटी सभागृहात घोषणा झाल्या. **मंत्रिमहोदयांच्या उत्तराचा निषेध करून विरोधी पक्ष सदस्यांनी सभात्याग केला.**

३९. सभागृहामधील या ताणतणावाच्या वादविवादानंतर व विरोधी पक्ष सदस्यांच्या सभात्यागानंतर मा. मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले की "अध्यक्ष महाराज, सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे समप्रमाणांत कसे वाटप करता येईल या दृष्टीने शासनाचा प्रयत्न राहणार आहे आणि यंदाच्या वर्षापासून त्याची अंमलबजावणी शासन करण्याचा प्रयत्न करील." त्यावर श्री. वसंतराव मालधूरे यांनी "या विषयाची गांभीर्यता लक्षात घेवून शासन काही करण्याबाबत उत्सुक आहे. कदाचित हे शासन नवीन असल्यामुळे त्यांना निर्णय घेण्यासाठी वेळेची आवश्यकता असेल. परंतु यंदाच्या १२ वी च्या परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वी शासन या संदर्भात निर्णय घेईल काय?" असा प्रश्न विचारला असता श्री. दौलतराव आहेर त्यांनी "सजेशन फॉर ॲक्शन." असे उत्तर दिले व या प्रश्नावरील त्यादिवशीची चर्चा संपली.

४०. १९९५ च्या पहिल्या अधिवेशनात हाच प्रश्न पुन्हा चर्चेसाठी आला तो शुक्रवार दिनांक **६ एप्रिल १९९५** रोजी सर्वश्री **बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील, कृष्णराव भेगडे व व्ही.यु.डायगव्हाणे** यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने. लक्षवेधी सूचनेमध्ये असे नमूद करण्यात आले होते की, "अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना सन १९९४-९५ या वर्षात तळेगांव येथील मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ५० जागा राखून ठेवल्याचे व तशा प्रकारच्या सूचना व्यवस्थापक मंडळाला दिल्याचे मा. मुख्यमंत्र्यांनी ३० नोव्हेंबर १९९४ रोजी सभागृहामध्ये मान्य करूनही (सांगूनसुद्धा) त्या बाबत अद्यापपावेतो कोणतीही कारवाई न होणे, सर्वोच्च न्यायालयाने तीन आठवड्यामध्ये याबाबत निर्णय घेण्याचा दिलेला आदेश तसेच व्यवस्थापन या विद्यार्थ्यांना घेण्यासाठी तयार असतानासुद्धा केवळ शासनाकडून स्पष्ट सूचना न गेल्यामुळे व्यवस्थापनाची झालेली कोंडी परिणामी या विद्यार्थ्याचे होत असलेले नुकसान व याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई."

४१. शासनाच्या वतीने मा. वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी केलेल्या निवेदनामध्ये अशी माहिती देण्यात आली होती की, "अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील काही विद्यार्थ्यांनी विद्यापीठ क्षेत्रे वेगळी करण्याच्या उच्च न्यायालयाने पूर्वी दिलेल्या आदेशाविरूद्ध सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील याचिका दाखल केली होती. त्या याचिकेच्या सुनावणीच्या वेळी राज्य शासनाकडून मा. सर्वोच्च न्यायालयापुढे असे प्रतिपादन करण्यात आले होते की, अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील ५० विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे तळेगाव येथील महाविद्यालयामध्ये सामावून घेण्याबाबत राज्यशासनाचा प्रस्ताव आहे. **सदर याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दि. २७ मार्च १९९५ रोजी निर्णय दिला असून अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांची मागणी मान्य केली नसून, राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यासाठी हे प्रकरण उच्च न्यायालयाकडे सुपूर्त केल्याचे निदेश दिले आहेत.**"

४२. तळेगाव दाभाडे येथील महाविद्यालयामध्ये असमतोलग्रस्त वऱ्हाडातील विद्यार्थ्यांना ५० जागा दिल्या जातील असे मा. मुख्यमंत्र्यांनी कृती समितीला सांगितले होते. ३० नोव्हेंबर १९९४ रोजी विधानपरिषदेत तसे स्पष्ट आश्वासनही दिले होते. या जागा आज मिळणार, उद्या मिळणार अशी आशा लावून लोक बसले होते. याबाबत या निवेदनामध्ये पुढील प्रमाणे उल्लेख होता "अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील ५० विद्यार्थ्यांना पुणे विद्यापीठ क्षेत्रातील नव्याने सुरू होणाऱ्या महाविद्यालयात सामावून घेण्यासाठी न्यायालयाची रीतसर परवानगी मागण्यासाठी उच्च न्यायालय, नागपूर खंड पिठापुढे योग्य तो अर्ज दाखल करण्यात आला होता. **तथापि, मा. उच्च न्यायालयाकडून सदर अर्ज दि. १७.१.१९९५ रोजी फेटाळण्यात आला.**" या ५० जागांबाबतचा आपला हक्क फेटाळण्यात आला आहे ही गोष्ट लोकांना सर्वप्रथम कळली ती या निवेदनामुळेच.

४३. अनुपूरक चर्चेमध्ये प्रा. बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या "माननीय मंत्री महोदयाकडून मला पहिली माहिती अशी हवी आहे की, जून जुलै महिन्यामध्ये या जागांचे समन्यायी वाटप करणार आहात की नाही? बारावी पास असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या आणि महाराष्ट्रामध्ये उपलब्ध असलेल्या जागा यांचे वाटप करणार आहात काय?" या उपप्रश्नाला उत्तर देतांना मा. वैद्यकीय शिक्षणमंत्री श्री. दौलतराव आहेर यांनी असे सांगितले की "अध्यक्ष महाराज, अशा प्रकारचे सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत आणि शासनाचीही अशाच प्रकारची भूमिका आहे. मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, **मी विधानसभेमध्ये असतांना येथील विद्यार्थ्यांवर अन्याय होतो म्हणून तत्कालीन शासनाकडून या विषयावरील अन्याय दूर करण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्नशील होतो.** विद्यार्थ्यांची संख्या आणि जागा यांचे वाटप योग्य झाले पाहिजे अशी शासनाची भूमिका राहणार आहे आणि शासन या दृष्टीने धोरण राबवणार आहे." स्वीकारलेल्या धोरणाबाबतचे प्रत्यक्ष आदेश निर्गमित होण्याच्या बाबतीत विचारलेल्या "अध्यक्ष महाराज, येत्या एक-दीड महिन्यामध्ये ॲडमिशनची प्रोसेस सुरू होणार आहे. आमच्या भागामध्ये एका बॅचचे नुकसान झालेले आहे, तेथील लोकांमध्ये नाराजी आहे. तेव्हा हे आदेश केव्हा निर्गमित होणार आहेत?" या उपप्रश्नाला मा. वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांनी "अध्यक्ष महाराज, **रुल्स आणि रेग्युलेशन तयार करण्याच्या दृष्टिकोनातून तीन लोकांची समिती गठीत करणार आहोत. हे नियम मे महिन्यापर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या ॲकॅडेमिक वर्षापासून ते अंमलात येतील.**" असे उत्तर दिले. ६ एप्रिल १९९५ रोजी प्रत्यक्ष सभागृहामध्ये या चर्चेत जरी मा. मंत्रीमहोदयांनी "अध्यक्ष महाराज, **रुल्स आणि रेग्युलेशन तयार करण्याच्या दृष्टिकोनातून तीन लोकांची समिती गठीत करणार आहोत. हे नियम मे महिन्यापर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या ॲकॅडेमिक वर्षापासून ते अंमलात येतील.**" असे सांगितले असले तरी प्रत्यक्ष त्याप्रमाणे कोणतीही कारवाई झाली नाही.

४४. तळेगांव दाभाडे येथील ५० जागांबाबत प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या एका उपप्रश्नाला उत्तर देतांना मा. मंत्रिमहोदयांनी पुढील प्रमाणे माहिती दिली :- "पुणे विद्यापीठाने स्पष्ट आदेश किंवा सूचना दिल्या होत्या की, जोपर्यंत मेडिकल कौन्सील ऑफ इंडियाची मान्यता मिळत नाही तोपर्यंत शासनाने ॲडमिशन देण्याचे आदेश देऊ नयेत. असे आदेश दिले तर पुणे विद्यापीठ त्याला मान्यता देणार नाही. आता तळेगाव दाभाडे मेडिकल महाविद्यालयास परवानगी मिळाली आहे. अशा ५० विद्यार्थ्यांच्या बॅचला ॲडमिशनला परवानगी देण्याच्या बाबतीत १५ दिवसामध्ये आपला निर्णय बदलला. त्यांनी परवानगी द्यावी असे म्हटले आहे, परंतु ॲडमिशनच्या दोन टर्मस् संपलेल्या आहेत तेव्हा त्या विद्यार्थ्यांना सामावून घेण्याच्याबाबतीत अनेक


**श्री. शिवाजी शिक्षण संस्था संचालित**

***श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती.***

***ह्या संस्थेत खालील अभ्यासक्रम सुरू आहेत.* शिक्षण शाखा** : १. बी. एड. २. बी. एड. ( अवकाशकालीन ) ३. एम. एड. ४. माध्यमिक शिक्षण विस्तार केंद्र ५. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक चे बी. एड., एम.एड., एम. फिल. अभ्यासक्रम.

**शारीरिक शिक्षण शाखा** : १. बी. पी. एड. ( १ वर्षीय ) २. बी. पी. ई. ( प्रथम वर्ष ) ३. बी. पी. ई. ( व्दितीय वर्ष ) ४. बी. पी. ई. ( अंतिम वर्ष ) ५. डी. वाय. एड. ( १ वर्ष ) ६. तखतमल श्री. वल्लभ योग केंद्र

**महाविद्यालयाची वैशिष्ट्ये :** तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वर्ग , सुसज्ज ग्रंथालय, खेळण्यासाठी मैदान व भरपूर क्रीडा साहित्याची सुविधा, सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजनबद्ध आयोजन, उत्कृष्ट निकाल, विद्यार्थ्यांना आपुलकीच्या भावनेने मार्गदर्शन , सुसज्ज वसतिगृह, आधुनिक हेल्थ सेंटर.

**श्री. वा. मो. उपाख्य दादासाहेब काळमेघ**
*अध्यक्ष, श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.*

**डॉ. बी. एच. बंड**
*प्रभारी प्राचार्य श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती.*

प्रकारच्या अडचणी निर्माण होणार आहेत म्हणून अशा प्रकारची परवानगी देणे शासनाला आता शक्य होणार नाही. **पुढच्या ॲकॅडेमिक वर्षापासून त्याप्रकारची महाविद्यालयांना परवानगी देण्यात येईल.**'' याच चर्चेत मा. मंत्रिमहोदयांनी असेही आश्वासन दिले की "**पुढच्या वर्षापासून समन्यायी वाटप करणार आहोत तेवढे शासनाच्या हातामध्ये आहे आणि तेवढे आम्ही करणार आहोत.**'

४५. सभागृहामध्ये ६ एप्रिल १९९५ रोजी ही चर्चा सुरू असतांना त्याच्या ८-१० दिवस अगोदर दिनांक **२७ मार्च १९९५** रोजी सर्वोच्च न्यायालयामध्ये मा. न्यायमूर्ती श्री.के.एस.परिपुरण व श्रीमती सुजाता मनोहर यांच्या खंडपीठाने याबाबतीत एक आदेश (Order) दिलेला होता **(सहपत्र : चार,** *पृष्ठ ६८ पहा)* अर्थात सभागृहातील ६ एप्रिलच्या चर्चेच्यावेळी ही प्रत मला मिळालेली नव्हती. मा. मंत्रिमहोदयांना त्यांच्या वकिलाने कळविलेला आदेशातील मजकूर उपलब्ध झाला होता असे दिसून येते. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामध्ये स्पष्टपणे असे नमूद करण्यात आले होते की :- ""**So far as Question of equitable distribution is concerned,** which has been dealt with in paragraphs 99 and 99A & 99B, we are inclined to think that question is likely to raise its head year after year and therefore, **It would be desirable to put an end to the contention rather than keeping the question open as the High Court has done. we, therfore, set aside that part of the High Court order and remit the matter back to the High Court decision on the question regarding equitable distribution of seats as raised before it.**"

सर्वोच्च न्यायालयाच्या याच निर्णयात पुढे असेही नमूद करण्यात आले होते की "In Order that this question is settled at the earliest and before the question of admission to the next academic year begins, it is desirable that the High Court gives priority to this matter and disposes it of as early as possible the question being of recurring nature. **We therefore remit the matter for this limited purpose to the High Court** with a request to the High Court to give priority to the question at issue and dispose it of as early as possible preferably before the next academic year commences."

४६. सभागृहामध्ये कबूल केल्याप्रमाणे समन्यायी वाटपाची व्यवस्था नमूद करणारे प्रतिज्ञापत्र हायकोर्टासमोर दाखल करून त्याप्रमाणे कारवाई करण्याऐवजी शासनाने **३१ मे १९९५** रोजी जुन्याच नियमांचा समावेश असलेले प्रॉस्पेक्टस छापून प्रसिद्ध करून टाकले व त्यामुळे सभागृहात स्पष्ट शब्दात आश्वासन दिलेले असले तरी समन्यायी वाटपाची व्यवस्था त्यावर्षी (९५-९६) अस्तित्वात येवू शकली नाही. शासनाच्या वतीने प्रत्यक्षात हे प्रतिज्ञापत्र **(सहपत्र : पाच,** *पृष्ठ ७० पहा)* २१ जून १९९५ रोजी नागपूर उच्च न्यायालयासमोर दाखल करण्यात आले. **३० नोव्हेंबर १९९४ व ६ एप्रिल १९९५ ला समन्यायी वाटपाबाबत शासनाकडून निश्चित स्वरूपाची आश्वासने मिळाली व परिणामी ती भूमिका शासनाला सोडता आली नाही व उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये शासनाला या भूमिकेशी चिकटून रहावे लागले.**

४७. दिनांक **१० जुलै १९९५** रोजी सभागृहामध्ये याच विषयावर ता.प्र.क्रमांक १३४५ वर झालेल्या अनुपुरक चर्चेमध्ये प्रा.बी.टी.देशमुख यांनी "समन्यायी वाटपाची स्कीम तयार करण्याचे काम अधिकाऱ्यांना दिले होते, ती स्कीम अधिकाऱ्यांनी तयार केली काय?" असा प्रश्न विचारून पुढे "आपण आता सांगितले की, याची स्कीम तयार करून फायनल ऑर्डर हायकोर्टाकडून घेवू. माझे म्हणणे असे की, आपण जी स्कीम तयार केली आहे तीची प्रत सभागृहासमोर ठेवाल काय? " अशी मागणी केली असता मा. मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले की, "**नागपूर हायकोर्टापुढे जी स्कीम ठेवलेली आहे ती सदनाच्या पटलावर ठेवण्याची गरज नाही.**" हायकोर्टामध्ये सादर केलेली कागदपत्रे सभागृहासमोर सादर करण्यास मा. मंत्रीमहोदयांनी दिलेल्या या स्पष्ट नकाराबद्दल सभागृहात अनेक सदस्यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या, शेवटी खुद्द मा. सभापतींनी जेव्हा "**कोर्टामध्ये १ रुपया फी भरून जी माहिती कोर्टातून मिळू शकते ती माहिती सदनाच्या पटलावर ठेवण्यास तुम्हाला काय हरकत आहे?**" असे विचारले त्यावेळी मंत्रीमहोदयांनी "**अध्यक्ष महाराज, ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.**" असे कबूल केले.

४८. १० जुलै १९९५ रोजी सभागृहात कबूल केल्यानंतर बऱ्याच उशीराने "**वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यापीठ निहाय जागाच्या समन्यायी वाटपाबाबत मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे २१ जुन १९९५ रोजी शासनाने सादर केलेले शपथपत्र" अधिक माहितीच्या स्वरूपात ९ ऑगस्ट १९९५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवले.** पण त्यापूर्वी हा प्रश्न पुन्हा शुक्रवार दिनांक **२८ जुलै १९९५** रोजी सभागृहामध्ये आला तो सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेमुळे. (या चर्चेच्या वेळी व्यक्तीगत प्रयत्नांनी शासनाच्या या २१ जुन १९९५ च्या शपथपत्राची प्रत मला उपलब्ध झालेली होती) या लक्षवेधी सूचनेमध्ये सदस्यांनी असे नमूद केले होते की "राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याच्या दृष्टीने नियम मे १९९५ पर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या ॲकॅडेमिक वर्षापासून ते अंमलात येतील" असे सभागृहात सांगूनही त्या कामी शासनाला आलेले अपयश, शेवटी दिनांक १३ जुलै १९९५ रोजी नागपूर खंडपीठाने समन्यायी वाटपाची व्यवस्था शासनाने तयार करावी असे दिलेले आदेश, त्याचबरोबर अमरावती विभागातील विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अन्यायापोटी ५० जागा तळेगाव दाभाडे येथील वैद्यकीय महाविद्यालयामध्ये या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबाबत नागपूर खंडपीठाने दिलेला आदेश, याबाबत शासनाकडून कारवाईस होत असलेला विलंब, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका."

४९. मा. मंत्रिमहोदयांनी केलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले होते की "मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २७.३.१९९५ रोजी राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याबाबतचे प्रकरण मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे वर्ग केले आणि सदर प्रकरणी शक्यतो या शैक्षणिक वर्षापूर्वी तोडगा काढावा असे निर्देश मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठास दिले. या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होवून दि. १३.७.१९९५ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने निर्णय दिला आहे. समन्यायी वाटपाचे सूत्र ठरविण्याकरीता न्यायालयाने शासनास अवधी दिला असून अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना तळेगाव दाभाडे येथे नव्याने सुरू होणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयातील ५० टक्के जागांवर या वर्षापुरता प्रवेश देण्याचे निदेश दिले आहेत याची अंमलबजावणी शासनाव्दारे करण्यात येत आहे."

५०. सभागृहामध्ये चर्चेला सुरुवात झाल्यानंतर सभागृहात आश्वासन दिल्याप्रमाणे विभागाने कारवाई केली नाही. **समन्यायी वाटपाचे शपथपत्र वेळेच्या आंत न्यायालयासमोर सादर केले नाही, जे केले ते उशिरा केले व वेगळेच केले** याबाबत प्रा.बी.टी.देशमुख यांनी तपशीलवार माहिती देऊन प्रश्न विचारला तो पुढील प्रमाणे :- "अध्यक्ष महाराज, म्हणजे जे तुम्ही येथे


**AMRAVATI UNIVERSITY AMRAVATI - 444602**

**( MAHARASHTRA )**

***Gram*** *- AMUNI :* ***FaX*** *- (0721) 662135 :* ***Tel.-*** *662358 , 662373 ( VC), 662173 ( R )*

Maharashtra Government has established Amravati University in May,1983 It. is located on lush green campus of about 600 acres of land. Various teaching departments, Hostels, Administrative Offices, Library, Staff Quarters, Amenities etc. are deveoped in the campus . The University has jurisdiction of 4 districts viz - Amravati, Akola, Yavatmal, Buldhana.

The Amravati University started with an inherited tradition of learning from 67 affiliated Colleges, today in 1996-97 session have 178 affiliated Colleges excluding one conducted education College and 22 post Graduate Departments in different subjects viz Chemical Technology, Bio-Technolgy, Business Admisitration and Management , Physics, Chemistry, Micro - Biology, Botany, Applied Electronics, Computer Science with M. C. A., Zoology, Sociology, Home- Science,Marathi,Functional Hindi, Geology, Mathemitcs, Statistics, Library and Information Science, Law, Physical Education and M.Phil Courses Faculty members of the University have own National and International awards and honours in recognition of their out standing work. During the short span of 13 years University has made phenomenal progress in teaching , research and extension activities.

**Dr. S. T. DESHMUKH**
VICE-CHANCELLOR

**Dr. VANDAN MOHOD**
REGISTRAR

सांगितले ते केलेच नाही. ३१ मे रोजी प्रॉस्पेक्टस छापून पब्लीश केले. तेथे जे सांगितले ते केले नाही. येथे तुम्ही सांगितले होते की ९५-९६ या वर्षापासून हे समन्यायी वाटप अंमलात आणू आणि मे महिन्यामध्ये त्याचे नियम तयार करण्यात येतील सभागृहामध्ये हे सांगितल्यानंतर पुढील वर्षापासून म्हणजे ९५-९६ पासून ते समन्यायी वाटप अमलात येणार होते. "तेवढे शासनाच्या हातामध्ये आहे आणि तेवढे आम्ही करणार आहोत" असे या ठिकाणी तुम्ही ६ एप्रिल १९९५ रोजी सांगितले आणि मंत्री महोदय यांनी त्या दिवशी असेही सांगितले होते की, "सदनाच्या भावना लक्षात घेऊन इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे." हे सांगितल्यानंतर तुम्ही ते केले नाही. तुम्ही ३१ मे रोजी जी.आर. काढला मागच्या वर्षीच्या नियमाप्रमाणे प्रॉस्पेक्टस छापून टाकले. मागच्या वर्षाचे जुनेच नियम ९५- ९६ साठीसुद्धा लागू केले..... हायकोर्टामध्ये तुम्ही असे सांगितले की,

"The time available for this exercise is very limited and it is not possible in this short period to make any recommendations on this issue."

सभागृहामध्ये तुम्ही ६ एप्रिल १९९५ रोजी जे सांगितले त्याच्या हे अगदी उलटे सांगितले. हायकोर्टाच्या ॲफीडेव्हीटमध्ये आणखी काय म्हटले आहे? ......

"The Government would be required to comprehensively apply it's mind to this issue. This entire process would take some time and in any event would not be complete before the admissions to the current academic year"

मागच्या वर्षी तुम्ही आमच्या भागातील मुलांचे नुकसान केले होते. ९५-९६ या वर्षी जे करतो म्हणून येथे सांगितले जे कबूल केले ते केले नाही. आणि हायकोर्टामध्ये उलटे सांगितले. म्हणून हायकोर्टाने पुन्हा असाच निर्णय दिला. हायकोर्टामध्ये हे ॲफिडेव्हीट केले जून महिन्याच्या शेवटी शेवटी माझे म्हणणे असे आहे की, हे तुम्ही का केले?"

**५१.** त्यावर सभापतीस्थानी असलेल्या मा. उपसभापतींनी " सभागृहामध्ये दिलेले आश्वासन आणि खंडपीठासमोर केलेले ॲफिडेव्हीट याच्यामध्ये काही तफावत आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. हे खरे आहे काय?" असे विचारले असता मा. मंत्रीमहोदयांनी "अध्यक्ष महोदय. ॲडमिशन्स बारावीचा रिझल्ट लागल्यानंतर होतात. ॲडमिशन्स वेळेवर व्हावयाला पाहिजेत या दृष्टिकोनातून प्रॉस्पेक्टस तयार व्हावयाला पाहिजेत आणि मग ज्या वेळेस रिझल्ट लागतो त्यावेळी तो लागल्यानंतर विद्यार्थ्यांच्या हातामध्ये प्रॉस्पेक्टस मिळाले पाहिजे." असे उत्तर दिले.

मा. मंत्रिमहोदयांच्या या असमाधानकारक उत्तराने अनेक सदस्य उभे राहून प्रश्न विचारण्याचा प्रयत्न करीत असतांना पुन्हा मा. उपसभापतींनी चर्चेत हस्तक्षेप करून "सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. खंडपीठासमोर करण्यात आलेले ॲफेडेव्हीट खरे आहे किंवा नाही याबाबतीत मी विचारलेले नाही. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनीसुद्धा विचारलेले नाही. सरकारने केलेले ॲफेडेव्हीट हे खरे आहे या संदर्भात सभागृहामध्ये जे आश्वासन देण्यात आले होते ते लक्षवेधी सूचनेमध्ये अवतरण चिन्हात दाखविलेले आहे तेव्हा **सभागृहामध्ये दिलेले आश्वासन आणि खंडपीठासमोर सादर केलेले ॲफेडेव्हीट यामध्ये तफावत आहे काय? अशा प्रकारची तफावत असेल तर ती का आहे यासंबंधी मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा.**" असे विचारले.

**५२.** मा. उपसभापतींनी विचारल्यानंतर सुद्धा या विसंगतीबाबतचा कोणताही खुलासा मा. मंत्रिमहोदयांच्या कडून आला नाही तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. अरुण मेहता यांनी "अध्यक्ष महाराज आम्ही वारंवार प्रश्न विचारत आहोत परंतु सन्माननीय मंत्रीमहोदय त्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे मात्र टाळत आहेत. या लक्षवेधी सूचनेमध्ये पहिल्या तीन ओळीत ज्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे आणि त्या संदर्भातील बाकीची सगळी माहिती सन्माननीय सदस्य बी.टी.देशमुख यांनी वाचून दाखविलेली आहे. शासनाने यापूर्वी सभागृहामध्ये जे आश्वासन दिले होते त्या आश्वासनाला पूर्णपणे हरताळ फासावयाचा, दिलेल्या आश्वासनाच्या विरोधी वागावयाचे आणि पुन्हा सांगावयाचे की आम्ही यातून विद्यार्थ्यांचे भले व्हावे असे पाहतो आहोत. काय भले आहे त्यामुळे या हरकतीच्या मुद्याव्दारे मी आपल्यासमोर मांडू इच्छितो की, असा जर हा प्रश्न लोंबकळत राहिला तर अमरावतीच्या मुलांना कधीही न्याय मिळणार नाही कारण अमरावतीला मेडिकल कॉलेज नाही आणि तेथील १२ वीला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या या गोष्टीचा विचार करून हा निर्णय घेतला होता तेव्हा सन्माननीय सदस्य श्री बी.टी.देशमुख यांच्या प्रश्नाला संपूर्ण न्याय मिळवून देणे महत्त्वाचे आहे." असा हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर निर्णय देतांना मा. उपसभापती "सन्माननीय सदस्यांच्या हरकतीच्या मुद्दामध्ये तथ्य आहे आणि या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेमध्ये एकंदर जी काही प्रश्नोत्तरे झाली आहेत... " असे सांगत असतांना मा. उपमुख्यमंत्र्यांनी "अध्यक्ष महाराज आपण या हरकतीच्या मुद्यावर निर्णय देण्यापूर्वी मी आपल्यामार्फत सदनाला काही सांगू इच्छितो आपण निर्णय दिल्यानंतर आम्ही त्यावर काही बोलू शकणार नाही म्हणून त्यापूर्वी मला आपल्याला काही सांगायचे आहे." असे नमूद करून "या संदर्भात या सदनामध्ये शासनाने पूर्वी दिलेले आश्वासन आणि हायकोर्टामध्ये शासनाने केलेले ॲफिडीव्हीट यामध्ये अंतर आहे काय असा प्रश्न त्यांनी येथे विचारलेला आहे अध्यक्ष महाराज आता या संदर्भात खंडपीठाचा निर्णय लागलेला आहे आणि महाराष्ट्र सरकारने हायकोर्टात या ॲफीडिव्हीट व्दारा सांगितले आहे की, कोठल्याही रिजनमध्ये अशा प्रकारचा अन्याय यापुढे होऊ देणार नाही तेव्हा आता याबाबत निर्णय लागल्यामुळे यापुढे १९९६-९७ च्या प्रवेशामध्ये अन्याय होण्याचा काही प्रश्नच राहिलेला नाही. आता सन्माननीय सदस्यांच्या मनात केवळ जो एक प्रश्न आहे वा शंका आहे की **गेल्या वर्षी जसा अमरावतीच्या विद्यार्थ्यांना या प्रवेशासंबंधात अन्याय झाला होता तसाच याही वर्षी होणार आहे काय? तर तो अन्याय झालेला आहे या त्यांच्या मताशी मी सहमत आहे.**" असे सभागृहाला सांगितले. मा.उपमुख्यमंत्र्याच्या निवेदनानंतर श्री. अरुण मेहता यांच्या हरकतीच्या मुद्दावर मा. उपसभापतींनी पुढील प्रमाणे निर्णय दिला :-"आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मेहता यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे तो योग्य आहे किंवा नाही याचा निर्णय मी देणार आहे. त्या मुद्याबाबत माननीय उपमुख्यमंत्री यांनी काही गोष्टीचा खुलासा केलेला आहे. तरीही मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांच्या हरकतीच्या मुद्यांमध्ये तथ्य आहे हे मी सुरुवातीलाच सांगितले आहे. **या वर्षी अशा प्रकारे अन्याय अमरावती विभागातील विद्यार्थ्यांवर होणार नाही असे निवेदन आपण येथे केले याच्याशी या क्षेत्रातील जे काही प्रश्न उपस्थित करणारे आहेत वा ही लक्षवेधी सूचना देणारे आहेत ते कोठल्याही प्रकारे सहमत नाहीत.** कारण या वर्षीची सारी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यामुळे अमरावतीच्या विद्यार्थ्यांना आता न्याय मिळेल अशी परिस्थिती नाही. आता भविष्यकाळात म्हणजे १९९६-९७ मध्ये मात्र अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना न्याय मिळेल असे आपण सांगितले ते बरोबर आहे."

**५३.** पुढे झालेल्या अनुपुरक चर्चेमध्ये प्रा.बी.टी.देशमुख यांनी "आता हायकोर्टामध्ये तुम्ही कबूल केले की, ९६-९७ पासून ईक्विटेबल डिस्ट्रिब्युशन लावू. माझे म्हणणे असे की, फक्त ५० जागा यावर्षी दिल्या तुम्ही तसे ॲफीडीव्हीट केल्यामुळे दिल्या हे खरे आहे. प्रश्न असा की, **पुढील वर्षी जूनमध्ये समन्यायी वाटपाची परिस्थिती लागू होईल हे नमूद करून हायकोर्टामध्ये तुम्ही कमिटमेंट दिले** आहे. त्याप्रमाणे मा. हायकोर्टाचा निर्णयही झाला आहे तेव्हा एक महिन्याच्या आत लोकसंख्येच्या आधारावर ईक्विटेबल डिस्ट्रिब्युशन फार्मुला, हायकोर्टामध्ये आपण सादर करणार काय?" या विचारलेल्या उपप्रश्नानंतर


**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला. ४४४ १०४**

***शेतक-यांच्या सेवेत***

* शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणाची उद्देशपूर्ती. * शेतकी शाळा, ग्रमीण शिक्षण संस्था व ग्रामसेवक प्रशिक्षण, कृषी विज्ञान केंद्रा द्वारे निम्न कृषी शिक्षण व स्त्रियांसाठी गृह विज्ञानशास्त्र विषयी प्रशिक्षणाची सोय. * कृषीउद्यानविद्या, वनविद्या, कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, दुग्धतंत्रज्ञान, पशुवैद्यक ह्या विषयाचे पदवीपूर्व, पदव्युत्तर व उच्च शिक्षणाची सोय. * शेतक-यांच्या गरजेनुसार संशोधन करणे व तंत्रज्ञान +´É±ÉÆÉ¤ÉhªÉÉ°ÉÉ`öÕ प्रवृत्त करणे. * अधिक उत्पन्न देणा-या निरनिराळ्या पिकांच्या जातीचे संशोधन. * वैशिष्ट्यपूर्ण पिकांच्या नरमादी वाणाची निर्मिती. * निरनिराळ्या प्रशिक्षणाचे आयोजन. * शेतकरी मेळावा, शिवार फेरी व कृषी प्रदर्शनी इ.

***शेतकरी हिताच्या कार्यक्रमांचे आयोजन.***

* [illegible]

* [illegible]

पुढील प्रमाणे प्रश्नोत्तरे झाली :-

"**डॉ.दौलतराव आहेर** : मी सदनाला सांगत होतो की, मघाशी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे आपल्याकडे मेडीकल फॅकल्टिज वेगवेगळ्या आहेत....

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांचा प्रश्न पॉईंटेड आहे, त्याचे नेमके उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे.

**डॉ.दौलतराव आहेर : ईक्विटेबल डिस्ट्रिब्युशन करायला शासन कटिबद्ध आहे.**

**प्रा.बी.टी.देशमुख : नुसते कटिबद्ध नको, एक महिन्यात समन्यायी वाटपाचे सूत्र सादर करणार काय? या माझ्या प्रश्नाला उत्तर येत नाही.**

**डॉ.दौलतराव आहेर** : हा अन्याय फक्त अमरावतीमध्ये झाला नाही तर नॉर्थ महाराष्ट्र, मराठवाडा, शिवाजी विद्यापीठामध्ये सर्वच ठिकाणी झाला."

वरील चर्चा चालू असतांना एक मिनिटापूर्वी "**ईक्विटेबल डिस्ट्रिब्युशन करायला शासन कटिबद्ध आहे.**" असे सांगणाऱ्या मंत्रिमहोदयांना "**नुसते कटिबद्ध नको, एक महिन्यात समन्यायी वाटपाचे सूत्र सादर करणार काय?** " असे विचारल्याबरोबर महिना दोन महिने अशी कांही मुदत सांगण्याचे बाजूला सोडून जेव्हा त्यांनी "हा अन्याय फक्त अमरावतीमध्ये झाला नाहीतर नॉर्थ महाराष्ट्र, मराठवाडा, शिवाजी विद्यापीठामध्ये सर्वच ठिकाणी झाला." असे उद्‌गार काढले तेव्हा ते मुळ प्रश्नाला बगल देण्याचा प्रयत्न करीत आहेत अशी एकदम धक्का बसल्यासारखी भावना सभागृहात पसरली. निश्चित उत्तराच्या अभावी सभागृहामध्ये अनेक सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतांना ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबतचा आपला निर्णय मा. उपसभापतींनी पुढील शब्दात घोषित केला "सर्व माननीय सदस्यांनी खाली बसल्याशिवाय मी कुणालाही बोलावयास परवानगी देणार नाही. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने जे **जे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले आहेत त्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर या सर्व चर्चेतून मिळत नसल्यामुळे मी ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलीत आहे.**"

५४. मा. न्यायमूर्ती एम.बी.घोडेस्वार व न्या.व्ही.एस. सिरपुरकर यांच्या नागपूर खंडपीठाने **१३ जुलै १९९५** रोजी या प्रकरणात दिलेला निर्णय समन्यायी वाटपाच्या प्रवासातील एक महत्वपूर्ण निर्णय म्हणून नमूद करता येईल. **(सहपत्र : सहा,** *पृष्ठ ७१ पहा)* या निर्णयाच्या परिच्छेद ११ मध्ये सुरूवातीलाच असे म्हटले आहे की"We have heard the learned counsel for the respective parties for a considerable time. **It is now an admitted position that the state of Maharashtra has accepted in principle the question of equitable distribution of seats for admission to M.B.B.S./B.D.S.Course throughout the state**, As stated in the affidavit sworn by the Dean, Government Medical College, Nagpur" सभागृहामध्ये वारंवार देण्यात आलेल्या आश्वासनाबाबतचा उल्लेख सुध्दा निर्णयाच्या याच परिच्छेदात दिसून येतो तो पुढील शब्दात :-

**"Shri. S. C. Aney, learned A panel counsel for the respondent No. 1 and 2, has submitted that twice the minister concerned has given an assurance and the state has accepted the principle of equitable distribution.** " समन्यायी वाटपाच्या तत्वाबद्दल निर्णय देतांना या निकालाच्या परिच्छेद बारामध्ये असे म्हटले आहे की :-

**"As the state Government has accepted the principle of equitable distribution as the criteria for admission of students through out the State and therefore there is no contest any more in the positions, Hence, we propose to dispose of these writ petitions, giving time as prayed to the State Government to complete the exercise and process to formulate the principles of equitable distribution."**

५५. सभापतीस्थानी असलेल्या मा. उपसभापतींनी २८ जुलै १९९५ रोजी राखून ठेवलेली ही लक्षवेधी सूचना दिनांक **९ ऑगस्ट १९९५** च्या कामकाज पत्रिकेवर लक्षवेधी सूचनेमध्ये पहिल्याच क्रमांकावर दाखविण्यात आली होती. हा १९९५ च्या दुसऱ्या अधिवेशनाचा कामकाजाचा शेवटचा दिवस होता. कोणत्याही **अधिवेशनाचा शेवटचा दिवस असला म्हणजे त्यादिवशी कामकाज पत्रिकेवर एकंदर कामकाजाची खूपच गर्दी होते** तशी ती या दिवशीच्या कामकाज पत्रिकेमध्येसुद्धा होती. आणि त्यामुळे **सामान्यतः शेवटच्या दिवशी १२ वाजता भरणारी विधानपरिषदेची बैठक त्या दिवशी २ तास अगोदर म्हणजे सकाळी १० वाजता बोलाविण्यात आली होती.**

५६. विधानसभेने पारीत केलेले "महाराष्ट्र करविषयक कायदे (सुधारणा) विधेयक १९९५" हे विचार, खंडशः विचार व चर्चा संपवून पारीत करण्यासाठी होते ते वित्त विषयक निवेदन नसल्यामुळे सभागृहात शेवटी चर्चेला घ्यावे लागले. "मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक १९९५" पारीत करण्यासाठी कामकाज पत्रिकेवर दाखविले होते व ते विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा एक प्रस्तावही कामकाजात होता. याशिवाय विधानसभेने पारीत केलेली/केल्याप्रमाणे/केल्यास, विचार, खंडशः विचार व चर्चा संपवून पारीत करण्यासाठी सहा विधेयके दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये दाखविण्यात आली होती. निरनिराळे १४ अल्प सूचना प्रश्न व त्याशिवाय ४० तारांकित प्रश्न उत्तरासाठी होते, निरनिराळ्या सात प्रकरणांमध्ये, दुरुस्त उत्तर किंवा अधिक माहिती किंवा पूरक माहिती, सभागृहाच्या पटलावर ठेवली जाणार होती. त्यामध्ये "विद्यापीठ वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप" या विषयावरील ता.प्र.क्र. १३४५ ला दिनांक १० जुलै १९९५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येणार होती. अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी व सातवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली जाणार होती. तीन अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवले जाणार होते. निरनिराळ्या चार हक्कभंगाच्या सूचना होत्या, निरनिराळी नियम ९३ ची सात निवेदने सभागृहासमोर येणार व त्यावर चर्चा होणार होती. याशिवाय नियम ४६ ची दोन निवेदने होणार. शेवटचा दिवस असल्यामुळे लक्षवेधी सूचनेवरील १२४ निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावयाची होती व त्याशिवाय चार लक्षवेधी सूचना चर्चेसाठी कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आल्या होत्या.

५७. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नियम २५९ अन्वये एक अत्यंत महत्त्वाचा "**अंतिम आठवडा प्रस्ताव**" त्या दिवशीच्या कामकाज पत्रिकेमध्ये नमूद होता. "रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ येथील एन्‌रॉन प्रकल्प शासनाने रद्द केल्यामुळे निर्माण झालेल्या स्थितीवर करावयाची उपाययोजना विचारात घ्यावी" असा हा ठराव स्वतः विरोधी पक्षनेते श्री. शरद पवार हे मांडणार व उपमुख्यमंत्री श्री. गोपीनाथ मुंडे त्याला उत्तर देणार त्यामुळे स्वाभाविकपणे संबंध महाराष्ट्राचे लक्ष या चर्चेकडे लागून होते. सभागृहात उपस्थिती उत्तम होती. सभागृहाच्या गॅलऱ्या खचाखच भरलेल्या होत्या. अगोदरच शेवटचा दिवस, त्यात कामकाज पत्रिकेमध्ये विषय खचाखच भरलेले त्यातून राजकीय दृष्ट्या स्फोटक अशी एन्‌रॉनसारखी महत्वपूर्ण चर्चा त्यामुळे वेळेचे नियोजन करतांना पीठासीन अधिकाऱ्यांना स्वाभाविकपणे मोठ्याच अडचणीला तोंड द्यावे लागत होते. आज आपल्याला वेळ नाही, आता यावर जास्त प्रश्न होणार

**श्री. शिवाजी शिक्षण संस्था संचालित**

***डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय,***

***शिवाजी नगर, अमरावती.*** *दूरध्वनी : ६६२३०३/ ६६२३२३ : स्थापना १९८४*

*(अमरावती विद्यापीठाशी संलग्न असणारे एकमेव खाजगी वैद्यकीय महाविद्यालय.)*

***वैशिष्ट्ये :*** *एम. बी. बी. एस. पर्यंतचे अभ्यासक्रम * सी. पी. एस. डिप्लोमा अभ्यासक्रम * अत्याधुनिक पुस्तकांनी समृद्ध ग्रंथालय * २६७ बेडसचे अद्यावत रुग्णालय. * आधुनिक रोगनिदान व उपचाराची व्यवस्था. * एन्डोस्कोपी, क्ष-किरण युनिट, आधुनिक पॅथॉलॉजी प्रयोगशाळा, अतिदक्षता विभाग, अल्ट्रासोनोग्राफी व तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन उपलब्ध. * पोलिओ, ट्रिपल, गोवर, धनुर्वात इ. रोगप्रतिबंधक लसी टोचण्याची व्यवस्था. * ग्रामीण विभागातील रुग्णांची सोय.*

***स्व. भाऊसाहेबांच्या स्वप्नांची पूर्ती करण्याचा एक यशस्वी प्रयोग.***

| | | |
|---|---|---|
| ***डॉ. के. वाय. विल्हेकर*** | ***डॉ. वा. पु. राऊत*** | ***प्रा. वा.मो. उपाख्य दादासाहेब काळमेघ*** |
| *अधिष्ठाता* | *कोषाध्यक्ष* | *अध्यक्ष* |

नाही, कदाचित लक्षवेधी सूचनांवर चर्चा होऊ शकणार नाही. अशी चर्चेला नियंत्रणात ठेवणारी वाक्यरचना सभागृह सुरू झाल्यापासूनच पीठासीन अधिकाऱ्यांना वापरावी लागत होती.

५८. अशा या गर्दीमध्ये आज आपल्या या लक्षवेधी सूचनेवर नक्कीच चर्चा होऊ शकणार नाही अशी लक्षणे स्पष्टपणे दिसत होती. बाकीच्या लक्षवेधीवर झाली नाहीच. तेव्हा "दाभोळ येथील एन्‌रॉन प्रकल्पाबाबतच्या अंतिम आठवडा प्रस्तावा"वरील चर्चा सुरू होण्यापूर्वी काही वेळ नंतर मिळू शकेल काय ते पहावे म्हणून मा. सभापतींना मी अशी विनंती केली की "अध्यक्ष महाराज, अंतिम आठवडा प्रस्ताव घेण्यापूर्वी आपल्याकडून मला संरक्षण हवे आहे. दिनांक २८ जुलै १९९५ रोजी राखून ठेवलेली लक्षवेधी सूचना वैद्यकीय महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटपाबाबतची आजच्या कार्यक्रम पत्रिकेतील लक्षवेधी सूचनांमध्ये पहिल्याच क्रमांकावर आहे. आज या सत्राचा शेवटचा दिवस असल्याने घाई होऊ नये. ही लक्षवेधी सूचना आपण चर्चेसाठी घ्यावी." मी एकदम मध्येच उभा राहून बोलायला लागल्यामुळे शिक्षण खात्याविषयीच्या एखाद्या प्रश्नाबद्दल मी बोलत आहे असे वाटल्यावरून मा. सभापतींनी "**सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्याकडून माहिती घ्या असे माननीय शिक्षण मंत्र्यांना सांगण्यात येईल.**" असे उद्‌गार काढले. त्यावर मी जेव्हा "माझ्याकडून माहिती घेण्याचा प्रश्न नाही. मेडिकलच्या इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशनचा प्रश्न आहे. हा विषय शिक्षण मंत्र्यांचा नसून आरोग्य मंत्र्यांचा आहे." असे म्हणालो तेंव्हा कामकाज पत्रिकेवर खरोखरच भरपूर काम असल्यामुळे व वेळ थोडा असल्यामुळे मा. सभापती म्हणाले "**आपल्याकडे वेळ नाही.**" मी पुन्हा माझा आग्रह "**आपण १०-१५ मिनिटे तरी या पहिल्या लक्षवेधी सूचनेसाठी द्यावीत अशी माझी आपल्याला विनंती आहे.**" या शब्दात सभागृहात मा. सभापतींच्या पुढे मांडला त्यावर ते म्हणाले "**एक लक्षवेधी सूचना घेतली तर बाकीच्या लक्षवेधी सूचनाही घ्या असे सन्माननीय सदस्य म्हणतील.**" मी पुन्हा माझे आर्जव पुढील शब्दात मांडले "माझ्या भागातील हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. निदान १० मिनिटे तरी या लक्षवेधी सूचनेसाठी देण्यात यावीत." त्यावर मा. सभापतींनी असे उद्‌गार काढले की "**आपल्याकडे वेळ शिल्लक राहिला तर लक्षवेधी सूचना आपण नंतर घेणार आहोत.**" आज या साऱ्या गडबडीत या लक्षवेधीवर नक्की चर्चा होणार नाही, हे अधिवेशन हातून जाईल व मग नागपूर अधिवेशनापर्यंत वाट पहावी लागेल. म्हणून मन खट्टू झाले असतांना मी पुन्हा आग्रह धरला "**आपण वेळ वाढवून द्या. आम्ही अधिक वेळ बसायला तयार आहोत.**" त्यावर मा. सभापतींनी असे उद्‌गार काढले की, "**शक्य झाल्यास वेळ वाढवून देवू.**"

५९. एन्‌रॉन प्रकल्पावरील अटीतटीची चर्चा संपली. त्या प्रकल्पाविषयीची चर्चा सुरू असतांना मा. सभापतींनी मी कोणत्या लक्षवेधी विषयी त्यांच्याकडे वेळेची मागणी करीत होतो हे बहुधा पाहून ठेवले असावे. पुढे त्यांनी जे उद्‌गार काढले त्यावरून त्यांनी ते निश्चितच पाहून ठेवले होते हे स्पष्टपणे दिसून येते. आपल्या अत्यंत महत्त्वाच्या लक्षवेधी सूचनेविषयी आता चर्चा होणार की नाही? या बाबतीत मा. सभापती काय पुकारा करतात? हे मी कानात जीव ओतून ऐकत होतो. तोच मा. सभापतीच्या तोंडून पुढील उद्‌गार निघाले. "**यानंतर वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य बी.टी.देशमुख यांनी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. ही लक्षवेधी सूचना नंतर घेवू असे मी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना कबूल केले होते. त्याप्रमाणे आता आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली पहिली लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्यात येईल.**"

६०. त्यादिवशी दुसऱ्या कोणत्याही लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली नाही. पण वैद्यकीय महाविद्यालयातील जागांच्या समन्यायी वाटपाची ही लक्षवेधी सूचना चर्चेला आली याचे कारण त्या लक्षवेधी सूचनेमध्ये फार मोठा सार्वजनिक हिताचा महत्त्वपूर्ण प्रश्न गुंतलेला होता हे तर खरेच, पण त्याचबरोबर सभागृहातील तणावाच्या आणि घाईगर्दीच्या स्थितीमध्ये सुद्धा जयंतराव टिळकांच्या सारखी समन्यायी बुद्धीने काम करणारी एक व्यक्ती सभापतीस्थानी बसलेली होती या वस्तुस्थितीला सुद्धा आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. विरोधी पक्षाचा एक प्रभावी सदस्य या नात्याने विधानमंडळात काम करण्याची संधी मिळाल्यामुळे विरोधी पक्षीय सदस्यांच्या वाजवी भावभावनांची कदर करण्याचे मन लाभलेला नेता, मंत्री या नात्याने काही वर्षे काम केल्यामुळे सत्तारूढ पक्षाच्या अडीअडचणींची जवळून कल्पना करू शकणारा एक प्रशासक, एक तप राज्यसभा सदस्य या नात्याने व तीन तपाहून जास्त काळ सव्यसाचि पत्रकार या नात्याने अनुभव गाठीशी असलेला एक ऋषितुल्य जाणकार जयंतराव टिळकांच्या रुपाने सभापतींच्या स्थानी विराजीत असल्यामुळे आमच्या सभागृहाच्या श्रीमंतीत व वैभवात खरोखरीच मोठी भर पडलेली आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या त्यावेळच्या नेतृत्व मंडळामध्ये आघाडीवर असलेला एक सेनानी या नात्याने प्रादेशिक असमतोलाच्या कोणत्याही प्रश्नाच्या दर्शनाने त्यांना होणाऱ्या वेदना अशा प्रश्नावरील चर्चेतील त्यांच्या उद्‌गारातून सहज बाहेर पडलेल्या दिसतात. "महाराष्ट्र आता फुटण्याची वेळ आलेली आहे. मधल्या काळात बरेच पाणी वाहून गेलेले आहे" हे याच प्रश्नावरील चर्चेत त्यांनी दिनांक ३० नोव्हेंबर १९९४ रोजी सभागृहात काढलेले उद्‌गार यापेक्षा वेगळे काय दर्शवितात? म्हणूनच प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी कोणत्याही सदस्याने सभागृहात कोणत्याही आयुधांचा वापर केला असेल, चर्चा उपस्थित केली असेल तर नियमांच्या चौकटीत राहून करता येईल तेवढे सर्व सहाय्य 'चेअर' मधून देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. प्रसंगविशेषी याकामी नियमांची चौकट बाजूला ठेवण्याससुद्धा ते मागे पुढे पहात नाहीत. अधिवेशन संपले की त्या अधिवेशनातील उरलेले सर्व प्रश्न नियमाप्रमाणे व्यपगत होतात. पण अमरावती पाणीपुरवठ्याच्या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेवून "**खरे म्हणजे नियमाप्रमाणे हा प्रश्न लॅप्स व्हावयास हवा. पण मी स्वतः तो राखून ठेवल्याने तो लॅप्स असला तरी घेतला**" हा त्यांनी सभागृहात दिलेला (२५ जुन १९८७) निर्णय काय? किंवा अकोल्याच्या बाबतीत १० टक्के लोकवर्गणीची अट शिथिल केल्याचा निर्णय सभागृहात जाहीर केला होता व तो बदलविण्यात आला तेव्हा "**या सभागृहामध्ये मा. मंत्रिमहोदयांनी यापूर्वी जे सांगितले त्याला काही किंमत आहे की नाही?**" असे मंत्रिमहोदयांना सभागृहामध्ये स्पष्टपणे सुनावून "**एखाद्या प्रकरणी सभागृहात एकदा निर्णय जाहीर झाल्यानंतर त्यासंदर्भात शासनाने मागाहून फेरनिर्णय घेतला असल्यास सभागृहातील निर्णयास तो बंधनकारक नाही**" हा - लोकसभाध्यक्ष श्री शिवराज पाटील यांच्या एका निर्णयाचा दाखला देवून - अकोला पाणीपुरवठ्याबाबत सभागृहातच त्यांनी दिलेला निर्णय (१६.७.१९९३) म्हणजे प्रादेशिक असमतोलाच्या खोल जखमांवर आपल्या शक्तीनुसार फुंकर घालण्याचा प्रयत्न होय असेच कोणीही म्हणेल.

६१. आजच्या या गर्दीत आपली लक्षवेधी सूचना निश्चितपणे चर्चेला येणार नाही याची बेचैनी मनात असतांना मा. सभापतींनी "पहिली लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्यात येईल" असे म्हटले त्यावेळी मला झालेला आनंद खरोखरीच अवर्णनीय होता. वेळेची धावपळ एवढी जोरदार होती की मनात खूप भावना असतांनासुद्धा उपप्रश्नांचा वेळ जावू नये म्हणून "अध्यक्ष महाराज, विषयाचे महत्त्व लक्षात घेवून आज घाई असतांना वेळ दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे" एवढे एकच वाक्य वापरून मी थेट विषयावरील उपप्रश्नाला सुरुवात केली, ती आभार मानण्यात सुद्धा जास्त वेळ गमावण्यात आज काही अर्थ नाही या भावनेतूनच होय. याच प्रश्नावरील चर्चेमध्ये मा. उपसभापती श्री. ना.स.फरांदे यांनी ३१ मार्च १९९५ रोजी सभागृहात काढलेले "विदर्भातील किंवा कोणत्याही भागातील अनुशेषाचा जेव्हा प्रश्न उपस्थित होतो त्यावेळेला तो प्रश्न मांडतांना सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख हे भावनावश होतात हे सर्वांना माहीत आहे. ते तो विषय पोटतिडकीने मांडतात" हे उद्‌गार पाहिले म्हणजे सभागृहातील चर्चेमध्ये सहभागी होतांना अशाप्रकारच्या भावभावनांचे कल्लोळ मनामध्ये असता उपयोगी नाही व योग्यही नाही हे कळत असून सुद्धा ते आपल्याला का टाळता येवू नये याचा विचार मनामध्ये आल्याशिवाय राहत नाही.

Vidarbha Youth Welfare Society's

**COLLEGE OF ENGINEERING BADNERA - 444 701. ( Approved by AICTE, NEW DELHI )**

IN THE SERVICE OF NATION'S ENGINEERING AND TECHNICAL MANPOWER DEVELOPMENT.

ALSO MARCHING AHEAD IN THE FIELD OF SUPER COMPUTING.

* Undergraduate programme in Civil, Computer , Mech.,Production & Electronics . * Post graduate programme in Computer,Electronics, Environmental Engg. * Collaboration with C- DAC.* Production Activities & Consultancy Services in various field.

**ACADEMICS :** An excellent track record of academic achievements from ranking in Amravati University Merit List to Gold Medals.

**LABORATORIES :** Fully equipped laboratories in every department confirming to A. I. C. T. E. specifications.

**LIBRARY :** Fully equipped library with more than 29800 volumes & 157 perodicals of National and International.

**SPORTS :** A winning record of games and sports with many colour holders ofAmravati University.

**FACULTY :** Highly qualified, experienced ( Both academic & Industrial ) and dedicated staff.

| **Prof. RAM MEGHE** | **SHRI. S. R. DESHMUKH** | **Prof. D. K. DESHMUKH** | **Prof. B. D. HIWASE** |
|---|---|---|---|
| Chairman | Vice- Chairman | Memeber | Memeber |

६२. मी स्वतः संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शाळेतील विद्यार्थी या नात्याने त्यावेळी भाग घेतला होता. **संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला पाठिंबा देणारी एक फार मोठी फळी विदर्भामध्ये त्यावेळी महाविद्यालयीन व विद्यालयीन विद्यार्थी चळवळीने बांधली होती व त्या चळवळीचे केंद्र अमरावतीमध्ये होते.** सर्वश्री. अण्णासाहेब वैद्य, बाबासाहेब सोमवंशी, बबनराव मेटकर, यशवंतराव खापर्डे, यशवंतराव शेरेकर, अनिल कायंदे, डॉ. बी.जी. तायडे हे महाविद्यालयीन विद्यार्थी या चळवळीचे नेतृत्त्व करीत होते. वर्धेच्या मॉडेल हायस्कूलमध्ये शिकणारा मी विद्यालयीन विद्यार्थी, श्री. शेषराव जाधव, श्री. वामनराव घोरपडे व श्री. पी.डी.मराठे या वर्ध्यातील जेष्ठ नेत्यांच्या प्रोत्साहनाने विद्यालयीन विद्यार्थ्यांची चमु घेवून या चळवळीत सहभागी होण्यासाठी अमरावतीच्या बैठकांना येत असे. त्यातूनच पुढे मला माझा मुक्कामच अमरावतीला हलवावा लागला. मला आजही आठवते श्रीराम सरोदे (आज तो पोलीस खात्यात मोठ्या हुद्यावर आहे) या नावाचा विद्यालयीन विद्यार्थी हा त्यावेळी आमच्यातला वयाने सर्वात लहान विद्यार्थी म्हणून त्याची ओळख करून दिली जात असे. श्री. यशवंतराव शेरेकर पुढे महाराष्ट्र मंत्रिमंडळात राज्यमंत्री झाले हा नंतरचा भाग झाला पण आपल्या विद्यार्थी जिवनात ते "संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सहभागी होते" असे पोलीस चौकशीत आढळून आल्यामुळे निवड होवून सुद्धा "सैन्य दलातील कमिशन" ला त्यांना मुकावे लागले होते, ही गोष्ट आमच्या पीढीला विसरता येणे कसे शक्य आहे? आमच्या विद्यार्थी जीवनात झपाटल्यासारखे आम्ही या चळवळीमध्ये सामील झालो होतो. **जीवनाच्या उमेदीच्या वर्षात ज्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये आपण मोठ्या उत्साहाने 'खारीचा वाटा' उचलला होता त्याच महाराष्ट्रामध्ये "देशानां दक्षिणो देशो तत्र वैदर्भमण्डलम" म्हणून त्रिविक्रम भट्टाने ज्याचे वर्णन केले आहे व 'सारस्वती जन्मभूः' म्हणून राजशेखराने ज्याला गौरविले आहे" त्या या विदर्भाची आज झालेली दैनावस्था व वाताहत पाहिली म्हणजे मन गलबलुन गेल्याशिवाय रहात नाही.** फरांदेसर म्हणतात ही भावनावशता कदाचित "पूर्वायुष्यातील या आमच्या अपराधाच्या" पोटी तर आमच्या मनामध्ये येत नसेल ना? असे वाटल्यावाचून रहात नाही आणि सभागृहातील चर्चेच्या वेळी या भावनांची गर्दी मनामध्ये होवू नये असे ठरविले तरी त्यात हमखास अपयश आल्याशिवाय रहात नाही. आमच्या पिढीच्या मनामध्ये असलेल्या या भावना त्या पीढीबरोबरच संपुष्टात येतील.

दिनांक २० जुलै १९९५ रोजी जलसिंचन अनुशेषावर सभागृहामध्ये तपशीलवार चर्चा झाली. मी या चर्चेमध्ये खूपच ताकदीने भाग घेतला. अनुशेषाच्या निर्मितीची कारणमीमांसा व बिनचुक आकडेवारी अत्यंत आक्रमकपणे सभागृहात मांडली. सतत वाढणाऱ्या अनुशेषाचे उगमस्थान असलेल्या "रुपयांच्या विषम वाटपाच्या रक्कमांच्या" अधिकृत आकडेवारीबाबतचे निवेदन ऐकून सभागृह सुन्न झाले. दांडेकरांनी काढलेला जलसिंचनाचा अविकसित भागाचा अनुशेष कमी झाला नसून तो वाढलेला आहे हे मी सप्रमाण अधिकृत आकडेवारीनिशी सभागृहात सांगीतले. माझी ही विधाने या चर्चेत कोणालाही (पाटबंधारे मंत्र्यांनासुद्धा) खोडून काढता आली नाहीत. विकसित भागांच्या सभागृहातील प्रतिनिधींनासुद्धा हा अनुशेष पाहिजे तेवढा कमी झाला नाही हे ठाउक होते, पण तो मोठ्या प्रमाणात वाढतो आहे हे ऐकून सखेद आश्चर्य वाटल्याचे मला जाणवले. भाषण संपवून मी खाली बसलो तर "चेअर" मधून मा. उपसभापती श्री. ना.स.फरांदे यांनी शिपायाकरवी एक चिठ्ठी पाठवून मला कळविले "**प्रिय.बी.टी. अभ्यास, तळमळ, आक्रमकता, आर्जव यांचे पुन्हा दर्शन घडले. तुमच्या प्रत्येक मुद्यांशी कोणीही न्यायी माणूस सहमत होईल. विदर्भाची ससेहोलपट पाहून डोळ्यात अश्रू उभे राहतात**" आमच्या दैन्यावस्थेच्या वर्णनाने "बिगर अनुशेषाच्या उपभोगाने संपन्न" असलेल्या प्रदेशातील न्यायनिष्ठूर माणसाच्या डोळ्यांच्या कडा जेथे ओल्या होतात तेथे "सतत वाढत जाणाऱ्या अनुशेषाच्या भोगाने पिडीत" असलेल्या प्रदेशातील लोकप्रतिनिधींच्या मनात अशा चर्चेच्या वेळी कालवाकालव झाली तर ते स्वाभाविकच नव्हे काय?

६३. ९ **ऑगस्ट १९९५** रोजीच्या विधानपरिषदेच्या बैठकीकडे आपण पुन्हा येऊ. सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेवर २८ जुलै १९९५ रोजी शासनाने केलेले निवेदन जसेच्या तसे पुन्हा प्रसृत करण्यात आले होते मात्र त्यामध्ये एक जादाचा लहानसा परिच्छेद शेवटी जोडण्यात आला होता तो पुढील प्रमाणे :-

**"राज्यातील वेगवेगळ्या विद्यापीठक्षेत्रातील प्रवेश जागांच्या वाटपातील असमतोलाबाबत सर्वांगीण विचार करून समन्यायी वाटपाबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल."** निवेदनानंतर सुरू झालेल्या चर्चेमध्ये जुन्या सर्व आश्वासनांची आठवण करून देऊन प्रा. बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या "माझे म्हणणे असे आहे की, लोकसंख्येच्या आधारावर इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशनचा फॉर्म्युला केंव्हा सादर कराल?" या उपप्रश्नाला मा. वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांनी "**अध्यक्ष महाराज, या शासनाची भूमिका एकदम पारदर्शक आहे. स्वच्छ आहे. आम्हाला काहीही लपवून ठेवावयाचे नाही. आम्हाला पुढच्या वर्षापासून लोकसंख्येच्या बेसीसवर इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करावयाचे आहे.**" असे उत्तर दिले.

६४. **"समन्यायी वाटप" हा तसा मोठा मोघम शब्दप्रयोग आहे. या समन्यायी वाटपाचा आधार काय राहील हे जोपर्यंत निश्चित होत नाही तोपर्यंत "समन्यायी वाटप" ही संकल्पनाच स्पष्ट होत नाही.** घटनेच्या कलम ३७१ मध्ये, मा. राष्ट्रपतींच्या ९ मार्च १९९४ च्या आदेशामध्ये व ३० एप्रिल १९९४ च्या मा. राज्यपालांच्या आदेशामध्ये हा शब्द अशारीतीने मोघम अर्थानेच वापरण्यात आला आहे. "बारावी सायन्सच्या परीक्षेला बसणाऱ्या तसेच मेडीकलसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या" हा आधार घेऊ असा शब्दप्रयोग त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी ३० नोव्हेंबर १९९४ रोजीच्या चर्चेमध्ये केला होता. पुढे पुढे आधाराचा उल्लेख न करता समन्यायी वाटपाची चर्चा होत राहिली त्यामुळेच २१ जून १९९५ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर शासनाने जे शपथपत्र **(सहपत्र : पांच,** *पृष्ठ ७० पहा)* दाखल केले त्यामध्येसुद्धा समन्यायी वाटपाचा पुरस्कार केलेला असला तरी त्याचा आधार काय राहील हे स्पष्ट केलेले नव्हते. उलट "The principle to be adopted for equitable distribution would require the detailed study of various factors. Since the matter is of complex nature involving several factors as well as regions and universities, the Govt, would be required to comprehensively apply its mind to this issue." असे म्हटलेले होते. परिणामी १३ जुलै १९९५ रोजी मा. खंडपीठाने दिलेल्या निर्णयात सुद्धा समन्यायी वाटपाचा आधार काय राहील याचा उल्लेख नाही. यापूर्वी लोकसंख्येबाबतचे उल्लेख ठिसूळपणे चर्चेत आले होते, पण **आजच्या या चर्चेमध्ये लोकसंख्या हा समन्यायी वाटपाचा आधार राहील ही गोष्ट शासनातर्फे स्पष्टपणे व ठामपणे पुढे आली होती. ही या चर्चेची फार मोठीच उपलब्धी म्हटली पाहिजे.**

"समन्यायी वाटप" तत्त्व म्हणून शासनाने मान्य केले होते. त्या आधारावर मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर अनुकूल निर्णय १३ जुलै १९९५ रोजी लागला होता. आता "लोकसंख्या" हा अशा वाटपाचा आधार राहील असे आश्वासन स्पष्ट शब्दात सभागृहामध्ये देण्यात आले होते. हे सर्व किती मुदतीत करणार हे मात्र स्पष्ट होत नव्हते त्यासाठी काही प्रयत्न करावा म्हणून प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या " अध्यक्ष महाराज मागच्या वेळेला असे सांगितले होते की, १९९५-९६ पासून करतो. पण ते झाले नाही. आमच्या संपूर्ण भागामध्ये यासंबंधात तीव्र असंतोष आहे. आपण येथे अगोदर सांगितले आणि ते केले नाही. आता पुढच्या वर्षी करतो असे सांगत आहात. **माझे म्हणणे असे आहे की, एक महिन्यामध्ये याबाबतची पूर्ण योजना सादर कराल काय?**" या प्रश्नाला मा. मंत्रिमहोदयांनी "अध्यक्ष महाराज, प्रयत्न करू." असे उत्तर दिले. "प्रयत्न करू" हे अतिशय निसरडे उत्तर आहे म्हणून प्रा.बी.टी.देशमुख यांनी पुन्हा "अध्यक्ष महाराज, "प्रयत्न करू" हे म्हणणे बरोबर नाही. माझे म्हणणे अतिशय स्पष्ट आहे. मंत्री महोदयांनी ६ एप्रिल

*वैद्यकीय प्रवेशासंबंधी जिव्हाळ्याच्या प्रश्नाचे स्वरूप उलगडून*

*दाखविणाऱ्या आपल्या विशेषांकास शुभेच्छा.*

बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी, अकोला.

रोजी सांगितले की, "रूल्स रेग्युलेशन तयार करण्याच्या दृष्टिकोनातून तीन लोकांची समिती गठीत करीत आहोत. हे नियम मे महिन्यापर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून ते अंमलात येतील." पण तसे केले नाही. काय केले तर जुन्याच नियमांचे प्रॉस्पेक्टस छापले आणि त्याच्याखाली एक ओळ दिली की "हायकोर्टाचा निर्णय होईल.... सबजेक्ट टू दॅट." माझे असे म्हणणे आहे की, हा अत्यंत वाईट असा जुना अनुभव लक्षात घेऊन आता **एक महिन्यामध्ये ही योजना तयार करून सादर केली जाईल काय?** माननीय मंत्री महोदयांनी एक महिन्याच्या ऐवजी दीड महिना म्हटले तरी मला चालेल पण प्रयत्न करू असे उत्तर अजिबात नको. याविषयी माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगावे." असा प्रश्न विचारला तर मा. मंत्रिमहोदयांनी "अध्यक्ष महाराज, मघाशी शासनाची भूमिका मी सदनापुढे मांडली आहे. **एकदम पारदर्शक आहे.**" असे उत्तर दिले.

६५. हायकोर्टाचा निर्णय झालेला, अगोदरच ९५-९६ वर्ष हातून गेलेले, ते सुद्धा कबूल करून शासनाने वेळेवर शपथपत्र दाखल न केल्यामुळे. ९ ऑगस्ट १९९५ ला चर्चा सुरू असतांना पुढच्या वर्षीच समन्यायी वाटपाचा काय लाभ मिळायचा असेल तो मिळेल अशी स्थिती असतांना सुद्धा मा. मंत्रिमहोदय कृतिपूर्तीची मुदत नमूद करण्याचे टाळत होते. त्यांनी "**अध्यक्ष महाराज, मघाशी शासनाची भूमिका मी सदनापुढे मांडली आहे. एकदम पारदर्शक आहे.**" असे उद्गार काढल्याबरोबर श्री. व्यंकप्पा पत्की यांनी "**म्हणजे किती पारदर्शकता? लज्जा रक्षणासाठी थोडी कमी करा.**" असा शेरा मारला तर मंत्रिमहोदयांनी "यांना फार लाज वाटायला लागली आहे. अध्यक्ष महाराज, मी आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की, महाराष्ट्र राज्यात ८ विद्यापीठे आहेत ..." असा प्रतिशेरा दिला. मंत्रिमहोदय मुद्याचे बोलणे सोडून "महाराष्ट्र राज्यात ८ विद्यापीठे आहेत" हे ज्यावेळी सांगायला लागले त्यावेळी ते कृतिपूर्तीची मुदत सांगण्याचे टाळत आहेत ही गोष्ट मा. सभापतींच्या नजरेतून सुटली नाही. चर्चेत हस्तक्षेप करून मा. सभापतींनी जेव्हा "**माननीय मंत्रिमहोदय, एक साधी गोष्ट आहे. आपण मघाशी सांगितले की, पुढच्या वर्षी आम्ही हे नक्की करतो. माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, हे नक्की करतो, याबाबतचा निर्णय करा, महिन्याने करा, दीड महिन्याने करा, दोन महिन्याने करा. तुम्हाला जेंव्हा करता येणार असेल तेंव्हा करा.**" असे उद्गार काढले तेव्हा त्यावर सुद्धा मा. मंत्रिमहोदयांनी जेंव्हा "अध्यक्ष महाराज, मी तोच खुलासा करण्याचा प्रयत्न करीत आहे." असे उद्गार काढले, तेव्हा प्रा.बी.टी.देशमुख यांनी "**खुलासा नको आहे. लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटपाची योजना केव्हा सादर करणार आहात ते सांगा.**" अशी विचारणा केली. उत्तर देतांना मंत्रिमहोदयांनी थोडीशी इतर माहिती दिली पण स्पष्ट शब्दात ".... **हे सगळे करीत असताना मी शासनाच्या वतीने शब्द देतो की, दीड ते दोन महिन्यामध्ये पाप्युलेशनच्या बेसीसवर समन्यायी वाटपाच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.** " असेही सांगितले. एवढ्यावर ते थांबले असते तर प्रश्न संपला असता, पण लगोलग त्यांनी "परंतु हे सगळे करीत असतांना मागच्या शासनाने जे केले ते या शासनाला करायचे नाही....." असे शब्द वापरले आणि त्यामुळे एकाच वेळी अनेक सदस्य उभे राहून बोलायला लागले.

६६. "सर्व सदस्यांनी खाली बसावे" अशी विनंती मा. सभापती करीत असतांनाच श्री. पी.जी.दस्तुरकर यांनी या गडबडीतच पुढील उपप्रश्न विचारला :-

"हा विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न आहे. यावर्षी विदर्भातील आणि मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकला नाही म्हणून प्रश्न निर्माण झालेला आहे. पुढच्या वर्षीच्या प्रवेशावर परिणाम होऊ नये म्हणून माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबतची मुदत सांगावी. निदान दोन महिन्यात ते करण्यात येईल का?" श्री. दस्तुरकर यांच्या उपप्रश्नाला उत्तर देतांना मा. मंत्रिमहोदयांनी इकडची तिकडची बरीच माहिती दिली पण आपल्या उत्तराचा शेवट पुढील ठाम (आश्वासनाने) शब्दाने केला :- "**पॉप्युलेशन बेसीसवर हा रिजनल इम्बॅलन्स काढण्याच्या दृष्टिकोनातून शासन दोन महिन्यामध्ये योजना तयार करून नागपूर खंडपीठाकडे सादर करील आणि त्यांच्याकडून जे आदेश येतील त्यानुसार पुढच्या वर्षापासून अंमलबजावणी करण्यात येईल.**" त्यांचे वाक्य संपल्याबरोबर मा. सभापतींनी "**माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख, तुमचे समाधान झाले आहे का?**" असे विचारले तेव्हा मी उभे राहून उत्तरामुळे झालेले माझे समाधान "**लोकसंख्येच्या आधारावर दोन महिन्यात सादर करतो असे माननीय मंत्रिमहोदयांनी म्हटले आहे, हे समाधानकारक आहे.**" या शब्दात व्यक्त केले व त्या दिवशीची चर्चा संपली.

६७. दिनांक ९ ऑगस्ट १९९५ रोजी या अनुपूरक चर्चेमध्ये मा. वैद्यकीय शिक्षणमंत्री श्री दौलतराव अहेर यांनी निःसंदिग्ध्द शब्दात दिलेली आश्वासने परिच्छेद ७४ च्या उपपरिच्छेद १५, १६ व १७ मध्ये नमुद केलेली आहेत :-

६८. हा प्रश्न १९९५ च्या तिसऱ्या अधिवेशनात शुक्रवार, दिनांक **२२ डिसेंबर १९९५** रोजी पुन्हा सभागृहामध्ये चर्चेसाठी आला तो सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, जयवंतराव ठाकरे, अजहर हुसेन, रमेश गुप्ता व सुधाकर देशमुख यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेमुळे. सूचनेत असे म्हटले होते की, "राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याच्या दृष्टीने "रुल्स आणि रेग्युलेशन तयार करण्याच्या दृष्टिकोनातून तीन लोकांची समिती गठीत करणार आहोत. हे नियम मे महिन्यापर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या ॲकेडेमिक वर्षापासून ते अमलात येतील" असे मा. वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सभागृहात सांगूनही त्याकामी शासनाला आलेले अपयश, त्यामुळे १९९५-९६ या वर्षामध्ये अमरावती विभागातील विद्यार्थ्यांवर समन्यायी वाटपापासून वंचित रहाण्याची पाळी येणे, तसेच "पाप्युलेशन बेसीसवर हा रिजनल इम्बॅलन्स काढण्याच्या दृष्टीकोनातून शासन दोन महिन्यामध्ये योजना तयार करून नागपूर खंडपीठाकडे सादर करील व त्यांच्याकडून जे आदेश येतील त्यानुसार पुढच्या वर्षापासून अम्मलबजावणी करण्यात येईल" **असे दिनांक ९ ऑगस्ट १९९५ रोजी सभागृहात सांगितल्यानंतरसुध्दा अशी योजना खंडपीठाकडे सादर करण्याबाबत यथोचित कारवाई न होणे परिणामी विद्यार्थी व जनमानसामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई"**

६९. मा. वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी या सूचनेवर पुढील प्रमाणे निवेदन केले :- "राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश नियम तयार करण्याकरिता दि. १९.५.९५ रोजी एक पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सन १९९५-९६ चे प्रवेश नियम तयार केले. सदर समितीने समन्यायी वाटपाच्या संदर्भातही विचारविनिमय केला. प्रवेश प्रक्रिया सुरू असतांना मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे शासनाने प्रवेश जागांचे समन्यायी वाटपाचे विविध पर्याय सादर केले. त्यावेळी मा. उच्च न्यायालयाने अमरावती विद्यापीठातील विद्यार्थ्यांना तळेगांव दाभाडे येथील वैद्यकीय महाविद्यालयातील ५० टक्के जागा १९९५-९६ या वर्षात देण्यात याव्यात असे सुचविले. समन्यायी वाटपाचे तत्त्व शासनाने मान्य केलेले असल्यामुळे याचिका दि. १३.७.९५ रोजी न्यायालयाने निकाली काढली. त्या निर्णयासंदर्भात नागरिक समिती, मलकापूर व इतर यांनी एस.एल.पी.क्र. १७८१० व १७८११/९५ दाखल केलेली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. दरम्यान "शासनाने विद्यापीठ क्षेत्रातील लोकसंख्या हा घटक समन्यायी वाटपासाठी निश्चित केला व त्यानुसार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विविध चिकित्सा पद्धतीच्या अभ्यासक्रमामध्येही याच निकषावर विद्यापीठनिहाय जागांचे समन्यायी वाटप करावे यासाठी एकूण प्रवेश जागा व लोकसंख्या विचारात घेऊन विद्यापीठनिहाय जागांचा असमतोल काढला आहे. सदरची विवरणपत्रे आता **मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करण्यात येतील व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार**

**With Best Compliments from**

## KALMEGH MARKETING

*Gopal Market, Badnera Road, Amravati.*

Phone. 77649 (O)

**: Authorised Dealer :**

ATALANTA Submersible Pump Sets ACE make computers

MERCK labortory chemicals

**Authorised Supplier** - Material required for M. C. V. C. material.

**विद्यापीठनिहाय प्रवेश जागांचे समन्यायी वाटप सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येईल याबाबत शासनाची भूमिका कायम आहे."**

७०. अनुपूरक चर्चेमध्ये प्रा.बी.टी.देशमुख यांनी सुरुवातीलाच असा प्रश्न विचारला की, "मागच्या वर्षी सुद्धा या विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. "दोन महिन्यात योजना सादर करतो" असे ९ ऑगस्ट १९९५ ला आपण सभागृहात सांगितले होते परंतु अजूनही ही योजना सादर करण्यात आलेली नाही. **या भूमिकेबद्दल शासन ठाम आहे ही चांगली गोष्ट आहे परंतु येत्या पंधरा दिवसामध्ये नागपूर खंडपीठाकडे योजना सादर करण्यात येईल काय?**" त्यावर मा. मंत्रिमहोदयांनी "म्हणून अध्यक्ष महाराज, सर्वोच्च न्यायालयामध्ये देखील आज हे मॅटर आहे आणि सुट्या संपल्यानंतर ताबडतोब ते पुढे येणार आहे. तेव्हा सुप्रीम कोर्टामध्ये देखील लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटपाचे तत्त्व जे आपण मान्य केलेले आहे त्याबाबत ॲफीडेव्हीट करता येईल आणि **नागपूर खंडपीठासमोर देखील १५ दिवसात हे न्याय्य वाटप करण्यासंबंधीचा मुद्दा सादर करण्यात येईल इतकेच मी या प्रसंगी आपल्याला सांगू इच्छितो.**" असे उत्तर दिले. अमरावती विभागामध्ये जागा वाढविण्याच्या प्रश्नावरही बरीच चर्चा झाली. शेवटी "सभापती महोदय, थोडेसे स्पष्ट व्हावे म्हणून मी प्रश्न विचारू इच्छितो की, या सीट जेंव्हा वाढतील तेंव्हा वाढतील परंतु असलेल्या सीटचे समन्यायी वाटपाचे प्रतिज्ञापत्र मा. उच्च न्यायालयासमोर आपण १५ दिवसात दाखल करणार ना?" या प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या प्रश्नाला मा. मंत्रिमहोदयांनी "**ते करणार आहोत. आणि त्यानंतर ९६-९७ पासून त्यांना न्याय देण्यात येईल.**" असे उत्तर दिले.

७१. १९९६ च्या पहिल्या अधिवेशनात गुरुवार, दिनांक **२१ मार्च १९९६** रोजी तारांकित प्रश्न क्रमांक ७६०८ च्या निमित्ताने हा प्रश्न पुन्हा सभागृहामध्ये चर्चेसाठी आला. "१. लोकसंख्येच्या प्रमाणात महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील एकूण प्रवेश जागा एकत्रित करून त्यांचे समन्यायी वाटप करण्याबाबतच्या सविस्तर माहितीचे विवरणपत्र मा. उच्च न्यायालयास सादर करण्याची कारवाई पूर्ण झालेली आहे काय? २. असल्यास, शासनाने उक्त विवरणपत्र केव्हा दाखल केलेले आहे, ३. अद्यापि, विवरणपत्र दाखल केले नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?" या प्रश्न भाग १, २ व ३ ला एकत्रित लेखी उत्तर मा. मंत्रिमहोदयांनी पुढील प्रमाणे दिले होते. "(१), (२) व (३) याबाबतची सद्यःस्थिती अशी आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक १७८१० व १७८११/९५ च्या अनुषंगाने अशाप्रकारे माहितीचे विवरणपत्र दिनांक ४ जानेवारी १९९६ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर करण्यात आलेले आहे."

हा प्रश्न ज्या दिवशी सभागृहामध्ये चर्चेसाठी होता त्याच्या एक दिवस अगोदर निवडणूक आयोगाने लोकसभेच्या निवडणुकीची घोषणा केली होती व त्यामुळे आचारसंहितेबाबतच्या संभ्रमाच्या वातावरणातच सभागृहामध्ये चर्चा चालू होत्या. प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला. या प्रश्नाचे लेखी उत्तर समोर होते. तो प्रश्न ८ व्या क्रमांकावर होता. त्यामुळे तो शेवटी शेवटी येणार. वैद्यकीय शिक्षणमंत्री श्री. दौलतराव आहेर यांनी सभागृहात बसल्याबसल्या मला एक चिठ्ठी पाठविली. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले होते की, "मा. देशमुख साहेब समन्यायी प्रश्न सोडविण्याबाबत आपण विश्वास ठेवावा. आचारसंहिता लक्षात घेता आपण याबाबतीत सहकार्य द्यावे." चिठ्ठी वाचून झाल्यावर जाग्यावर बसल्याबसल्या मी डॉ. आहेरांच्या कडे पाहिले व "मी काय सहकार्य देवू शकतो?" असे खुणेनेच त्यांना विचारले तेव्हा खुणेनेच "आपण लॉबीत बोलू" असे ते म्हणाले. आम्ही दोघेही लॉबीत गेलो. "मी नागपूर अधिवेशनांत कबूल केले होते त्याप्रमाणे शपथपत्र दाखल केले आहे. आम्ही हे करणार आहोत. आता आचारसंहिता लागू झाली आहे तेव्हा सहकार्य करा" असे ते म्हणाले. मी त्यांना म्हणालो "डॉक्टरसाहेब; आचारसंहिता ही काल आली. **माझ्या भागातील गुणवान मुलांचे गेली दोन वर्षे नुकसान झाले आहे. तुम्ही सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले हे खरे आहे. ते मी पाहिले आहे. त्यात तुम्ही आणखी जास्तीच्या काही बाबी टाकल्या आहेत व शिवाय नुसते शपथपत्र दाखल करून काय उपयोग होणार? जागांच्या वाटपाचा शासननिर्णयच दाखल केला असता तर हा प्रश्न संपुष्टात आला असता.**" त्यावर डॉ. आहेरांनी आचारसंहितेची अडचण सांगितली. मी म्हणालो "ही आश्वासने जुनी आहेत. आचारसंहिता काल आली. सर्वोच्च न्यायालयात ४ जानेवारी १९९४ ला शपथपत्र दाखल केल्याचे आपण लेखी उत्तरात नमूद केलेले आहे. सर्वोच्च न्यायालयांत पूर्वीच दाखल केलेल्या शपथपत्राची अंमलबजावणी करण्यासाठी आचारसंहितेची अडचण कोणत्याही तर्काने येत नाही". असे मी त्यांना सांगीतले, त्यावर त्यांनी व्यक्त केलेले सर्व विचार येथे नमूद करणे शक्यही नाही व योग्यही नाही पण या अनौपचारिक चर्चेमुळे माझा जो समज झाला तो नमूद करणे मला आवश्यक वाटते. "**जागावाटपाचा शासननिर्णय कोणत्याही परिस्थितीत लोकसभेच्या निवडणुकीपूर्वी निघत नाही. लोकसभेच्या निवडणूकी झाल्यानंतर सुद्धा समन्यायी वाटपामुळे विकसित भागांच्या जागा कमी करण्याचा दोष स्वतःकडे घ्यायला शासन कदाचित तयार रहाणार नाही. शक्यतो सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने झाले तर बरेच किंवा निदान राज्यपालाच्या आदेशाने झाले तर आणखीच चांगले. ही शासनाची भूमिका राहील.**" अशी माझी मनोमन खात्री पटली. ५-१० मिनिटे लॉबीमध्ये ही आमची चर्चा झाली. सभागृहात प्रश्नाचा क्रम येत असल्यामुळे घाईने आम्ही दोघेही सभागृहात आपापल्या जागेवर स्थानापन्न झालो.

प्रश्न चर्चेसाठी आला. या प्रश्नाचे लेखी उत्तर या परिच्छेदाच्या सुरुवातीलाच मी नमूद केले आहे. उपप्रश्नाला सुरुवात झाली. मी स्वतः पहिलाच उपप्रश्न असा विचारला की, "अध्यक्ष महाराज, या प्रश्नाच्या अनुषंगाने मला आपले संरक्षण मिळावयाला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयामध्ये शासनाकडून जे ॲफीडेव्हीट दाखल केले गेले आहे, त्याच्या अंमलबजावणीचा हा प्रश्न आहे. सुप्रिम कोर्टामध्ये यांनी ॲफीडेव्हीट दाखल केले आहे की, लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटप केले जाईल. अध्यक्ष महाराज गेली दोन वर्षे आमच्या भागातील या विद्यार्थ्यांची वाया गेलेली आहेत. जेंव्हा हे ॲफीडेव्हीट दाखल केले त्याच वेळेस शासनाने या संबंधीचे शासन आदेश निर्गमित केले नाही तर त्या प्रतिज्ञा पत्राचा काहीही उपयोग होत नाही. **आपण सभागृहामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे पंधरा दिवसांमध्ये किंवा त्याच्या एक दोन दिवस मागे पुढे लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटप करण्याचे जे प्रतिज्ञापत्र दाखल केले त्यानुसार शासननिर्णय निर्गमित झालेले आहेत काय? नसेल तर केंव्हा करणार आहात?**"

आचारसंहितेचे वातावरण सर्वत्र असल्यामुळे मंत्र्यांनी उत्तर देण्यापूर्वी मा. सभापतींनीच "ते ७ मे, नंतर होईल." असे सांगितले. मी पुन्हा जेव्हा " अध्यक्ष महाराज, यापूर्वी दोन तीन वेळा सांगितले परंतु त्याप्रमाणे केले नाही. ज्यावेळेस ॲफीडेव्हीट दाखल केले त्या वेळीच शासन निर्णय निर्गमित करावयाला पाहिजे होते. ते का केले नाही?" असा प्रश्न विचारला तेव्हा खात्याचे मा. राज्यमंत्री श्री. सुरेश नवले यांनी "अध्यक्ष महाराज, सभागृहात दिलेल्या आश्वासनाबाबत शासनाची बांधिलकी आहे." असे उत्तर दिले. त्यावर खुद्द मा. सभापतींनीच चर्चेत हस्तक्षेप करून "मा. सदस्यांचा प्रश्न असा आहे की, ते आपण कां केले नाही?" असे विचारले तेव्हा वैद्यकीय शिक्षणमंत्री श्री. दौलतराव आहेर यांनी "अध्यक्ष महाराज, साधारणतः जे प्रवेश दिले जातात त्या प्रवेशाच्या अगोदर एक महिन्याच्या कालावधीमध्ये कोठला प्रवेश कोठे द्यावयाचा आहे यासंबंधीची नियमावली तयार केली जाते. **ही नियमावली तयार करीत असतांना या ठिकाणी जून जुलैमध्ये ॲडमिशन होत आहे त्याच्या अगोदर ही नियमावली तयार करता येईल.** त्याप्रमाणे सुप्रिम कोर्टामध्ये ॲफीडेव्हीट दाखल केलेले आहे त्याप्रमाणे सगळे निर्णय घेण्यात येतील." असे उत्तर दिले. याच दरम्यान जेष्ठ सदस्य श्री. जवाहरलालजी दर्डा यांनी विचारणा केल्यावरून आचारसंहितेचा प्रश्न सुद्धा उपस्थित झाला. त्यावर मा. सभापतींनी "म्हणून मी आपल्याला सांगितले की, ही नवी परिस्थिती निवडणूक डिक्लेअर्ड झाल्यामुळे निर्माण झालेली आहे. .... खरा मुद्दा येथपासून आहे की, लेजिस्लेचर्सला

*विदर्भाच्या अनुशेष निर्मूलनाचे संदर्भात समन्यायी वाटप*
*तत्त्वाचे आग्रही प्रतिपादन करणाऱ्या आपल्या*
*विशेषांकास हार्दिक शुभेच्छा.*

**आमदार विजयराव पाटील चोंढीकर**, *अध्यक्ष*

***श्री. शिवाजी शिक्षण संस्था** पुसद, जि. यवतमाळ.*

हे लागू आहे की नाही? तेव्हा पुढचा जो प्रश्न आहे त्याचा विचार झाल्याशिवाय ते काही सांगू शकत नाही."  असे निवदेन केले. इथपर्यंत सारे ठीक चालू होते. पण .....

एक ढग इकडून आला, एक ढग तिकडून आला, त्यातच आणखी एक ढग समोरुन आला, सर्व वातावरण शांत असतांना अवचित आकाश भरून यावे आणि अकल्पितपणे एकदम विजेचा कडकडाट व्हावा तसा सभागृहाला अकस्मात विस्मयचकित करणारा पुढील प्रकार घडला. :-

प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या "या ठिकाणी दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी झालेली नाही. गेल्या वर्षीच्या मे मध्ये यासंबधीचे रूल्स तयार केले जातील असे सागंण्यात आलेले होते. पण त्यावेळी ते केले नाही. हे करीत असतांना इलेक्शनचे नोटीफीकेशन काल आले. तेव्हा त्याच्या अगोदर शासनाने निर्णय निर्गमित का केले नाही?" या प्रश्नाला उत्तर देतांना डॉ. आहेर यांनी "**अध्यक्ष महाराज, मी याचे उत्तर ऑलरेडी दिलेले आहे. गेल्या वेळेस नागपूर खंडपीठामध्ये सुद्धा आपण ॲफीडेव्हीट केलेले आहे.**" असे उत्तर दिले. वस्तुतः डॉ. आहेरांनी दिलेले हे उत्तर अजिबातच योग्य नव्हते. कारण दिलेल्या ॲफेडेव्हीटवर हायकोर्टाचा अनुकूल निकाल होवून गेलेला होता. त्या निकालाप्रमाणे जागावाटपाचा शासननिर्णय निर्गमित कां केला नाही? हा खरा प्रश्न होता. त्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे खुबीने टाळून "नागपूर खंडपीठामध्ये सुद्धा आपण ॲफेडेव्हीट केलेले आहे" असे जे उद्‌गार डॉ. आहेर यांनी काढले ते अनवधानाने काढले की सभागृहामध्ये बसलेल्या सदस्यांना एवढी बारीक माहिती कुठून असणार? या भावनेच्यापोटी काढले हे मला आजही ठामपणे सांगता येणार नाही परंतु हे उद्‌गार त्यांनी काढताच मी ताडकन उभा राहिलो आणि "**आपण ॲफीडेव्हीट काय सांगता? ते उच्च न्यायालयाचे ऑर्डर्स आहेत. हायकोर्टाचा त्यावर निर्णय झाला आहे?**" अशी माहिती सभागृहाला दिली.  ताबडतोब श्री.रामदास आठवले यांनी "अध्यक्ष महाराज, दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. उत्तर असमाधानकारक आहे. सभागृहाची दिशाभूल करण्यात आलेली आहे." असे उद्‌गार काढले. सभागृहात अनेक सदस्यांची अशी भावना झाली की आपली दिशाभूल केली जात आहे. अनेक सदस्य बोलायला लागले. या गडबडीत अनेक सदस्यांच्या बोलण्यातुन आपले बोलणे मा. सभापतींपर्यंत गेले पाहिजे या भावनेपोटी नेहमीच्या आवाजापेक्षा जरा मोठ्याने **मी पुन्हा एकदा "अध्यक्ष महाराज या संदर्भात मा. हायकोर्टाची ऑर्डर आहे." असे सांगितले.** अनेक सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत असतांना मा. सभापतींनी सर्व सदस्यांनी खाली बसावे अशी विनंती केली. सभागृहात शांतता प्रस्थापित झाली. **या शांत वातावरणांत मा. सभापती गंभीरपणे आपल्या धारदार आवाजात बोलायला लागले "सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. याबाबतीत हायकोर्टाची ऑर्डर असेल तर......**" टाचणी पडली तरी ऐकू येईल एवढी शांतता सभागृहात प्रस्थापित केलेल्या मा. सभापतींचे वाक्य पुरे होण्याच्या आतच मा. वैद्यकीय शिक्षणमंत्री श्री. दौलतराव आहेर यांनी आमच्याकडे पाहून आपल्या जागेवर बसल्या बसल्या " उभे राहून ओरडून काय होणार आहे?" असे उद्‌गार काढले आणि सभागृहात एकच गोंधळ उडाला. आरोग्यमंत्र्यांनी माफी मागितलीच पाहिजे. अशा घोषणा जोरात सुरू झाल्या, हा सारा प्रकार क्षणार्धात घडला. अनेक सदस्य वेलमध्ये जावून घोषणा द्यायला लागले. पूर्णपणे शांतता स्थापीत झालेल्या सभागृहात एकाएकी अनेक सदस्य वेलमध्ये आलेले पाहून सभापती व्यथित झाले. बराच वेळ सभागृहात घोषणा चालू होत्या पुन्हा एकदा सभापती उभे राहिले व त्यांनी "माननीय सदस्य जोपर्यंत जागेवर जाऊन बसत नाही तोपर्यंत मी काहीही सांगणार नाही. सन्माननीय सदस्यांनी आपआपल्या जागेवर जाऊन बसावे." असे सांगितले व आपला निर्णय पुढील शब्दात पूर्ण केला "माननीय मंत्रिमहोदयांना मी हे सांगू इच्छितो की, या ठिकाणी त्यांनी बसून काहीही बोलू नये. एखाद्या वेळी बसून बोलले तर माननीय सदस्यांवर त्यांनी कॉमेन्टस् करू नयेत. माननीय सदस्यांना जर ओरडावयाचे असेल तर ते ओरडतील तुम्ही कोण त्यांना सांगणार? अशा प्रकारे दोन वेळा झालेले आहे. आता आपण मंत्री झाला आहात तेव्हा पार्लमेंटरी पद्धतीने आपण वागले पाहिजे. पार्लमेंटरी पद्धतीने वागत असतांना आपल्याला फार त्रास झाला तर आपण बाहेर जाऊन या. परंतु अशा पद्धतीने बोलणे काही बरोबर नाही. **सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी जोरात प्रश्न मांडले म्हणूनच ते प्रश्न तडीस गेले आहेत.**"

७२. या प्रश्नावरील सभागृहातील चर्चा संपली. पण घडलेल्या प्रकारातून निर्माण झालेले कवित्व पुढील आठवडाभर मुंबईच्या वृत्तपत्रातून प्रकटत राहिले. दिनांक २२ मार्चच्या **सांज लोकसत्तामध्ये** "दौलतराव तुम्ही आता मंत्री झाला आहात" या मथळ्याखाली विधानपरिषदेच्या कामकाजाचे जे समालोचन श्री.सुरेंद्र हसमनीस यांनी दिले होते त्याच्या पहिल्याच परिच्छेदात असे नमूद केले होते की,

"विधिमंडळाचे अधिवेशन चार दिवसांचे असो की, चाळीस दिवसांचे, आरोग्यमंत्री डॉ. दौलतराव आहेर यांना सभापती जयंतरावजी टिळक यांनी कानपिचक्या दिल्या नाहीत, असे क्वचितच घडते. काल पुन्हा एकदा त्याचा प्रत्यय आला. टिळक यांनी अत्यंत खरमरीत शब्दात आहेरांना समज दिली. निमित्त होते वैद्यकीय जागांच्या समन्यायी वाटपाबाबतच्या प्रश्नांचे. वैद्यकीय जागांच्या वाटपात विदर्भावर अन्याय झाला असून त्याबद्दल विद्यार्थ्यातर्फे कोर्टबाजीही सुरू आहे. प्रत्येक अधिवेशनात विदर्भातील आमदार बी.टी.देशमुख हा प्रश्न अत्यंत तळमळीने मांडतात आणि आरोग्यमंत्री गोलमाल उत्तरे देऊन वेळ मारून नेतात, असा अनुभव आहे. कालही तेच घडले आणि बी.टीं.चा पारा चढला त्यावर 'ओरडून अन् उभं राहून काय होणार?' असा शेरा दौलतरावांनी मारला अन् विरोधी पक्षात संतापाची लाट उसळली. आरोग्यमंत्र्यांनी माफी मागितलीच पाहिजे. अशा घोषणा तारस्वरात सुरू झाल्या, हा गोंधळ खूपच टिपेला गेला तेव्हा दौलतरावांना समज देण्याखेरीज दुसरा पर्यायही सभापती जयंतराव टिळक यांच्यासमोर नव्हता. ते म्हणाले "दौलतराव, तुम्ही आता मंत्री आहात, तेव्हा मंत्र्यासारखे वागा आणि त्याबाबतच्या पद्धतीही पाळा ते जमत नसेल, त्रास होत असेल तर जरा बाहेर जाऊन येत चला" दौलतरावांनी आपला शेरा बसूनच मारला होता. त्याला उद्देशून टिळक म्हणाले बसून आधी बोलायचं नाही आणि दुसरी गोष्ट म्हणजे कॉमेंट कधी करायची नाही"  २५ मार्च १९९६ च्या **मुंबई सकाळमध्ये** "निवडणुकीच्या सावटाखाली झाकाळलेले अधिवेशन" या मथळ्याखाली श्री. विलास मोकदम यांनी दिलेल्या विधानपरिषद समालोचनातील पुढील मजकूर पहा :-

"दौलतराव आहेर हे एक वादग्रस्त मंत्री, त्यांची उत्तरे देण्याची वृत्तीही तशीच, त्यामुळे दर अधिवेशनात त्यांना सभापती जयंतराव टिळक यांच्याकडून कानपिचक्या मिळतात. चार दिवसीय अधिवेशनात ही आफत त्यांच्यावर ओढवलीच. वैद्यकीय महाविद्यालयातील समन्यायी जागांचा प्रश्न होता. विदर्भातील वैद्यकीय विद्यार्थी कोर्टबाजी करीत आहे विदर्भातील कुठलाही प्रश्न असो बी.टी.देशमुख तो अभ्यासूवृत्तीने पण पोटतिडकीने व तेवढ्याच आक्रमकतेने मांडत असतात. डॉ. आहेर यांच्या उत्तरावर ते टीपेच्या आवाजाने आक्षेप घेत होते. देशमुखांची तळमळ लक्षात न घेताच, 'ओरडून काय उपयोग होणार' असे शब्द डॉ. आहेर यांनी काढले. त्यावेळी विरोधक संतप्त झाले. मंत्र्यांनी माफी मागितलीच पाहिजे, अशा घोषणा पुन्हा पुन्हा होऊ लागल्या. सभापतींच्या लक्षात देशमुखांची तक्रार आली होतीच. शेवटी बेजबाबदारपणे उत्तरे देणाऱ्या डॉ. आहेर यांना श्री. टिळक यांनी कडक शब्दात खडसावलेच. "दौलतराव तुम्ही आता मंत्री आहात, मंत्र्यासारखे वागा" असा टोला सभापतींनी लगावलाच तरीही दौलतराव बसूनच प्रतिउत्तर करीत होते, तेव्हा सभापती म्हणाले, मंत्र्यासारखे वागता येत नसेल, तर जरा बाहेर जाऊन या. खाली बसून कॉमेंट करू नका".

२१ मार्च रोजीच्या वरील अनुपूरक चर्चेमध्ये शासनाच्या वतीने मा. मंत्रिमहोदयांनी दिलेली आश्वासने परिच्छेद ७४ च्या उपपरिच्छेद २०, २१, २२ मध्ये नमुद केलेली आहेत

७३. विधान परिषदेत १९ जुलै १९९४ रोजी सर्वप्रथम हा

The power Behind Your Computer :                : COMPUTER DIVISION

DCS

**SUNIL MISHRA**, Managing Director

Dynamite Computer Services

B-403, Utkarsha Gotmare Commercial Complex, WHC Road , Dharampeth, Nagpur- 10
**Tel.** 0712-539129,544041. **Fax :** 0712-539129 **Page Me on** 545868/ 293

प्रश्न सभागृहात चर्चेसाठी आला. त्यानंतर १९९४ च्या दुसऱ्या व तिसऱ्या, १९९५ च्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या नंतर १९९६ च्या पहिल्या अधिवेशनापर्यंत **निरनिराळ्या ११ वेळा हा प्रश्न (काही अधिवेशनांत दोनदा तर काही अधिवेशनात तिनदा सुद्धा) सभागृहामध्ये चर्चेसाठी/उत्तरासाठी आला.** या सर्व चर्चेचे शब्दशः इतिवृत्त **सहपत्र : सात** *(पृष्ठ ७३ पहा)* मध्ये क्रमशः नमूद करण्यात आले आहे.

७४. निरनिराळ्या अकरा वेळा सभागृहामध्ये जी चर्चा झाली त्या चर्चेच्या प्रतिवेदनांचे काळजीपूर्वक अवलोकन केले असतांना शासनातर्फे अनेक महत्वपूर्ण व मुदतबंद आश्वासने काटेकोर शब्दात देण्यात आली. ही आश्वासने पुढील प्रमाणे आहेत :-

१. "राज्य सरकारने स्वतःहून पुढे येऊन यासंबंधी निर्णय घेतला पाहिजे होता. या तत्त्वाशी आम्ही सहमती दाखविली आहे. **दोन-तीन मार्ग त्यात आम्ही काढलेले आहेत. एक म्हणजे तळेगांव येथे एका नवीन महाविद्यालयास परवानगी देण्याचा निर्णय इंडियन मेडिकल कौन्सिलने घेतला आहे.त्या महाविद्यालयामध्ये ज्या जागा उपलब्ध होणार आहेत त्यातील ५० जागा या आम्ही अमरावतीच्या विद्यार्थ्यांसाठी यंदापासूनच राखून ठेवल्या आहेत** आणि ते अतिरिक्त विद्यार्थी तेथे सामावून घेण्यासंबंधीचा निर्णयही शासनाने घेतलेला आहे." - मा. मुख्यमंत्री ..... बुधवार, दिनांक ३०.११.१९९४

२. "याशिवाय हा प्रश्न कायमचा निकालात निघण्यासाठी **यवतमाळच्या महाविद्यालयामध्ये सिटस् वाढवण्यासंबंधीचा निर्णय राज्य सरकार घेत आहे." -** मा. मुख्यमंत्री ..... बुधवार, दिनांक ३०.११.१९९४

३. "नवीन वर्ष सुरू होण्याच्या मधल्या कालावधीत जास्त सीटस् वाढविण्यासाठी जी काही व्यवस्था करावी लागेल, टीचिंग स्टाफ वाढवावा लागेल किंवा अन्य सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील त्याबद्दलची कारवाई केली जाईल आणि त्या सिटस् तेथे वाढविल्या जातील" - मा. मुख्यमंत्री ..... बुधवार, दिनांक ३०.११.१९९४

४. "**या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये आणखी एखाद दुसऱ्या वैद्यकीय कॉलेजला परवानगी देण्यासंबंधी त्यासाठी आवश्यक ती शिफारसही इंडियन मेडिकल कौन्लिलकडे करण्याचा राज्य सरकारने विचार केलेला आहे." -** मा. मुख्यमंत्री ..... बुधवार, दिनांक ३०.११.१९९४

५. "राज्यातील एकंदर १२ वी सायन्सच्या परिक्षेला बसणाऱ्यासाठी तसेच मेडीकलसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी एकंदर विद्यापीठवाईज संख्या, **राज्यात उपलब्ध असलेल्या सगळ्या मेडीकलच्या सीटस् याचा एकत्रीत विचार करुन त्या पद्धतीने प्रत्येक विद्यापीठामध्ये समान प्रमाणात कोटा देण्याच्या संबधीचा निर्णय घेतला जाईल." -** मा. मुख्यमंत्री ..... बुधवार, दिनांक ३०.११.१९९४

**६. "सुप्रिम कोर्टाने हे सर्व मॅटर राज्यशासनाकडे पाठविले आहे आणि राज्य शासनाने नागपूर हायकोर्टाकडे रेफर केले आहे. समान वाटप कसे होईल याप्रकारे आदेश दिले आहेत. याबाबतीत लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल."** - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्यमंत्री ..... शुकवार, दिनांक ३१ मार्च १९९५

७. **"विद्यापीठनिहाय लोकसंख्या विचारात घेवून समन्यायी वाटप कसे करता येईल याचा विचार चालू आहे." ......** "सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे समप्रमाणांत कसे वाटप करता येईल या दृष्टीने शासनाचा प्रयत्न राहणार आहे आणि यंदाच्या वर्षापासून त्याची अंमलबजावणी शासन करण्याचा प्रयत्न करील." **-** मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्यमंत्री ..... शुकवार, दिनांक ३१ मार्च १९९५

**८. "रुल्स आणि रेग्युलेशन तयार करण्याच्या दृष्टिकोनातून तीन लोकांची समिती गठीत करणार आहोत. हे नियम मे महिन्यापर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या ॲकॅडेमिक वर्षापासून ते अंमलात येतील." -** मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... गुरुवार, दिनांक ६ एप्रिल १९९५

९. "पुढच्या ॲकॅडमिक वर्षापासून त्याप्रकारची महाविद्यालयांना परवानगी देण्यात येईल." - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... गुरुवार, दिनांक ६ एप्रिल १९९५

१०. "समिती गठीत करणार आहोत असे मी सांगितले," ...... "पुढच्या वर्षापासून समन्यायी वाटप करणार आहोत तेवढे शासनाच्या हातामध्ये आहे आणि तेवढे आम्ही करणार आहोत." - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... गुरुवार, दिनांक ६ एप्रिल १९९५

११. "सदनाच्या भावना लक्षात घेऊन इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे." - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... गुरुवार, दिनांक ६ एप्रिल १९९५

१२. "नागपूर खंडपीठाच्या या संदर्भात ऑर्डर मिळाल्याबरोबर या जागांचे समन्यायी वाटप करण्यात येईल." - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... सोमवार, दिनांक १० जुलै १९९५

१३. "एमआयटी संस्थेमध्ये ९५-९६ करिता अमरावती च्या ५० विद्यार्थ्यांना ॲडमिशन दिली जाईल. त्यामुळे त्यांच्यावर झालेला अन्याय दूर होईल." - मा. उपमुख्यमंत्री ....... शुक्रवार, दिनांक २८.७.१९९५

१४. **"ईक्विटेबल डिस्ट्रिब्युशन करायला शासन कटिबद्ध आहे."** - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... शुक्रवार, दिनांक २८.७.१९९५

१५. **"अध्यक्ष महाराज, या शासनाची भूमिका एकदम पारदर्शक आहे. स्वच्छ आहे. आम्हाला काहीही लपवून ठेवावयाचे नाही. आम्हाला पुढच्या वर्षापासून लोकसंख्येच्या बेसीसवर इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करावयाचे आहे."** - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... बुधवार दिनांक ९.८.१९९५

१६. **"हे सगळे करीत असताना मी शासनाच्या वतीने शब्द देतो की, दीड ते दोन महिन्यामध्ये पाप्युलेशनच्या बेसीसवर समन्यायी वाटपाच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येईल."** - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... बुधवार दिनांक ९.८.१९९५

**१७. पॉप्युलेशन बेसीसवर हा रिजनल इंम्ब्येलन्स काढण्याच्या दृष्टिकोनातून शासन दोन महिन्यांमध्ये योजना तयार करून नागपूर खंडपीठाकडे सादर करील आणि त्यांच्याकडून जे आदेश येतील त्यानुसार पुढच्या वर्षापासून अंमलबजावणी करण्यात येईल."** - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... बुधवार दिनांक ९.८.१९९५

१८. "समन्यायी वाटप ९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून केले जाईल." - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... मंगळवार दिनांक ५ डिसेंबर १९९५

१९. "विद्यापीठनिहाय प्रवेश जागांचे समन्यायी वाटप सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येईल याबाबत शासनाची भूमिका कायम आहे." - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... मंगळवार दिनांक ५ डिसेंबर १९९५

२०. **"ही नियमावली तयार करीत असतांना या ठिकाणी जून जुलैमध्ये ॲडमिशन होत आहे त्याच्या अगोदर ही नियमावली तयार करता येईल."** - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... गुरुवार दिनांक २१ मार्च १९९६

२१. **"महाराष्ट्र राज्यात पुढील वर्षात नियम करणार आहोत. प्रवेश देण्यापूर्वी याबाबतची कार्यवाही एक महिन्यात करण्यात येईल त्यामुळे हा प्रश्न आता आम्ही निकाली काढीत आहोत."** - मा. वैद्यकिय शिक्षण व


## वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. सांगली.

**तार** - ' साखर ' सांगली **फोन नं.** ७२६११ ते ७२६१५ **टेलेक्स** - ०१९३-२३२ एमएसएसके **पो. बॉक्स नं.** १६६ **फॅक्स** - ०२३३ - ७२६१९ पी. को. न. सांगली ४१६ ४१६

***सहकारातील संकल्पसिद्धी :*** *महाराष्ट्राचे व देशाचे थोर नेते डॉ. पद्मभूषण वसंतदादा पाटील यांच्या प्रयत्नाने व मार्गदर्शनाने शेतकरी एकत्र येऊन दृढ निश्चयाने व कठोर परिश्रमाने सहकारी क्षेत्रामध्ये यशस्वी कारखानदारी उभी करून साखर व उपपदार्थांचे उत्पादन करणारा सर्वात मोठा कारखाना उभा करु शकतात हे सांगली कारख्याने सर्व प्रथम सिद्ध करून दाखविले आहे.*

**उत्पादने :** १. शुभ्र दाणेदार साखर. २.अॅसिटाल्डिहाईड अॅसेटिक अॅसिड व अॅसेटिक अनहैड्राईड ही रसायने. ३.पशुपक्षी यांचेसाठी समतोल आहार - खुराक ४. सर्व प्रकारची अल्कोहोल. ५. देशी व विदेशी मद्ये. ६. वनीकरणासाठी नर्सरीमधून दरवर्षी सातत्याने विविध फळझाडे व इतर नगदी उत्पन्न देणा-या दहा लाख रोपांची निर्मिती.

**ठळक वैशिष्ट्ये :** १.कारखन्यामार्फत कार्यक्षेत्रात ८५ उपसा जलसिंचन योजना यशस्वीपणे चालविल्या जात असून त्यामुळे ७२,१५७ एकर जमीन ओलिताखाली. २.कार्यक्षेत्रातील अनेक शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व विकासाच्या कामामध्ये कारखान्याचा सक्रीय सहभाग असतो. ३. शासनाच्या २० कलमी कार्यक्रम राबविण्यात कारखाना अग्रेसर आहे. ४.दररोज पाच हजार मे. टन ऊस गाळपशक्तीचा हा भारतातील पहिला कारखाना असून गळीत व साखर उत्पादनात सतत आघाडीवर आहे. ५. पद्भूषण डॉ. वसंतरावदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सांगली या इंजिनिअरिंग कॉलेजची व पॉलिटेक्निकची स्थापना १९८३ ६. क्षारवड/चिबड जमीन सुधारणा प्रकल्प राबवणारा पहिला कारखाना.

औषधी द्रव्येमंत्री ..... गुरुवार दिनांक २१ मार्च १९९६

२२. **"ही बाब आम्ही निकाली काढणार आहोत. समन्यायी वाटप आम्ही करणार आहोत."** - मा. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्येमंत्री ..... गुरुवार दिनांक २१ मार्च १९९६

**७५.** सभागृहामध्ये देण्यात आलेल्या प्रत्येक आश्वासनाला क्रमांक दिले जातात. या प्रत्येक आश्वासनाच्या अंमलबजावणीची काय स्थिती आहे याची छाननी करण्याचे काम सभागृहाची आश्वासन समिती करीत असते. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आश्वासन समितीने प्रादेशिक असमतोलावर प्रभावी उपाय योजना करणारी महत्वपूर्ण आश्वासने उक्त विषयावर देण्यात आलेली असल्याने या आश्वासनांच्या पूर्तीसाठी शासनाने केलेल्या कारवाईची तपशीलवार छाननी केल्याचे दिसून येते. देण्यात आलेल्या सर्व आश्वासनांची तपशीलवार छाननी करून "राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप" या एका विषयावर या समितीने एक स्वतंत्र अहवाल (एकशे बाविसावा) दिनांक ९ जुलै १९९६ रोजी सभागृहाला सादर केल्याचे दिसून येते. सामान्यपणे या समितीचा अहवाल एका अधिवेशनात देण्यात आलेल्या सर्व आश्वासनांशी संबधित असतो. पण हा संपूर्ण एकशे बाविसावा अहवाल या एकाच विषयावर समितीने सादर केलेला आहे. **महाराष्ट्र विधानपरिषदेच्या इतिहासामध्ये सभागृहाच्या आश्वासन समितीने एकाच विषयावर एक स्वतंत्र अहवाल सादर केल्याचे हे पहिले आणि एकमेव उदाहरण आहे.** यावरून या समितीने हा विषय व त्यावरील आश्वासने किती गंभीरपणे घेतली होती हे सहज लक्षात येते. ९ सदस्यांची मिळून बनलेल्या विधानपरिषदेच्या या आश्वासन समितीचा हा अहवाल व त्यातील शिफारसी एकमताच्या असून ज्या निरनिराळ्या सात बैठकीमध्ये या विषयावरील निर्णय समितीने घेतले त्या प्रत्येक बैठकीमध्ये उपस्थितीसुद्धा खूपच चांगली होती असे या अहवालाचे अवलोकन केल्यास सहज लक्षात येते. समितीच्या या अहवालाची ही वैशिष्ट्ये समितीप्रमुख श्री अरुण मेहता यांनी दिनांक ९ जुलै १९९६ रोजी अहवाल सादर करतांना प्रामुख्याने सभागृहाच्या लक्षात आणून दिली ती पुढील शब्दात :-

"लोकसंख्येच्या आधारावर वैद्यकीय महाविद्यालयांच्या जागा भरण्यात याव्यात हा निकष लावण्यात आला होता. या निकषाच्या संदर्भात या सदनात वेळोवेळी २२ वेळा आश्वासने दिली. मुलांचे नुकसान होऊ नये म्हणून. परंतु सरकारने ही आश्वासने अंमलात आणली नाहीत. म्हणून सुप्रिम कोर्टाने गेल्याच महिन्यात जे हिअरिंग झाले त्याच्यात असे म्हटले की, चार आठवड्यात हायकोर्टाचा निर्णय अंमलात आणा. Otherwise, it will amount to contempt of the court. ही गोष्ट सर्वोच्च न्यायालयाने सांगितली. एवढे होऊन सुद्धा सरकारने आपले धोरण जाहीर न केल्यामुळे आम्ही आश्वासन समितीच्या सर्व सदस्यांनी एकमताने निर्णय घेऊन मुलांचे वर्ष फुकट जाऊ नये, आणखी दिरंगाई होऊ नये म्हणून आणि हा अहवाल उपयोगी पडावा म्हणून दिलेला आहे. याकरिता समितीच्या ६-७ बैठका झाल्या. त्यामध्ये सचिवांच्या साक्षी झाल्या. आम्ही या समितीवर ९ सदस्य आहोत. त्यातील बहुतांशी म्हणजे ७-८ सदस्य या संपूर्ण चर्चेच्यावेळी उपस्थित होते आणि त्यांनी एकमताने हा अहवाल दिलेला आहे. हा महत्त्वाचा अहवाल आहे." अहवाल सादर करतांना सभागृहात केलेल्या या भाषणामध्ये समितीप्रमुख श्री. अरुण मेहता यांनी प्रा.बी.टी.देशमुख यांनी सुरुवातीपासून या प्रश्नाचा जो पाठपुरावा केला त्याबाबतचा पुढील प्रमाणे उल्लेख केला. :-"दुसरी एक गोष्ट मला याठिकाणी उधृत करायला हवी ज्याचे श्रेय त्यांच्या पदरात टाकले नाही तर मला वाटते की या सदनाच्या कारभारात कुठे तरी मी चुकलो असे होईल. याबाबतीत या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी जो पुढाकार घेतला, विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सातत्याने या प्रश्नाची तड लावण्याचा प्रयत्न केला याचा उल्लेख मी याठिकाणी प्रकर्षाने करतो."

**७६.** विधानपरिषद आश्वासन समितीचा हा एकशे बाविसावा अहवाल एकूण ६८ मुद्रित पृष्ठांचा आहे. त्यातील पहिल्या ६ पृष्ठामध्ये समितीचे अभिप्राय व शिफारसी समाविष्ट करण्यात आल्या असून या अहवालासोबत निरनिराळी सात परिशिष्टे सुद्धा जोडण्यात आलेली आहेत. पहिल्या परिशिष्टामध्ये "राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयांतील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप" या विषयावर सभागृहात दिलेल्या आश्वासनावर समितीने ज्या ज्या तारखेला विचार केला त्या बैठकीचे कार्यवृत्त समाविष्ट आहे.

**७७.** दिनांक १९ सप्टेंबर १९९५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये समितीने वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाकडून माहिती मागवावयाचे मुद्दे निश्चित केले. ६ फेब्रुवारी १९९६ च्या बैठकीमध्ये विभागाकडून माहिती मागवावयाचे मुद्दे समितीने पुनर्निश्चित केले. याच बैठकीमध्ये दिनांक २० फेब्रुवारी १९९६ रोजी सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये यांची साक्ष घ्यावी असेही ठरले. दिनांक २० फेब्रुवारी १९९६ च्या बैठकीत सचिवाची साक्ष झाली. दिनांक ६ मार्च १९९६ रोजी समितीसमोर पुन्हा सचिवांची साक्ष झाली. १२ मार्च १९९६ रोजीच्या बैठकीत समितीने या विषयावर विशेष अहवाल सादर करण्याबाबत चर्चा केली. १२ जून १९९६ रोजी पुन्हा सचिवांची साक्ष घेण्यात आली. २६ जून १९९६ च्या बैठकीमध्ये समितीने एकशे बाविसाव्या अहवालाचे प्रारूप विचारात घेतले व संमत केले.

**७८.** अहवालाच्या परिशिष्ट दोन मध्ये *(१)* विधानपरिषदेच्या १९९४ च्या दुसऱ्या अधिवेशनात (लक्षवेधी सूचना) मंगळवार, दिनांक १९ जुलै १९९४ रोजी, (२) १९९४च्या तिसऱ्या अधिवेशनांत (लक्षवेधी सूचना) बुधवार, दिनांक ३० नोव्हेंबर १९९४ रोजी, (३) १९९५ च्या पहिल्या अधिवेशनांत (ता.प्र.क्रमांक ५६) शुक्रवार, दिनांक ३१ मार्च १९९५ रोजी, (४) त्याच अधिवेशनांत (लक्षवेधी सूचना) गुरुवार, दिनांक ६ एप्रिल १९९५ रोजी, (५) पुन्हा त्याच अधिवेशनांत (ता.प्र.क्रमांक ५७) शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल १९९५ रोजी, (६) १९९५ च्या दुसऱ्या अधिवेशनांत (ता.प्र.क्रमांक १३४५) सोमवार, दिनांक १० जुलै १९९५ रोजी, (७) त्याच अधिवेशनांत (लक्षवेधी सूचना) शुक्रवार, दिनांक २८ जुलै १९९५ रोजी, (८) पुन्हा त्याच अधिवेशनांत (लक्षवेधी सूचना) बुधवार, दिनांक ९ ऑगस्ट १९९५ रोजी, (९) १९९५ च्या तिसऱ्या अधिवेशनांत (तारांकित प्रश्न क्रमांक ४५१३) मंगळवार, दिनांक ५ डिसेंबर १९९५ रोजी, (१०) त्याच अधिवेशनात (लक्षवेधी सूचना) शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर १९९५ रोजी, (११) १९९६ च्या पहिल्या अधिवेशनांत (ता.प्र.क्रमांक ७६०८) गुरुवार, दिनांक २१ मार्च १९९६ रोजी या प्रश्नावर झालेल्या चर्चेचे इतिवृत्त समाविष्ट करण्यात आलेले आहे. हे इतिवृत्त या अंकाच्या **सहपत्र : सात** *(पृष्ठ ७३ पहा)* मध्ये समाविष्ट केलेले आहे. या अहवालाच्या परिशिष्ट तीन मध्ये २० फेब्रुवारी १९९६ रोजी वैद्यकीय शिक्षण व औषधी खात्याचे सचिव श्री. के.एस.बारोई यांची जी साक्ष झाली. त्या साक्षीच्या वेळी सचिवांनी "राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांचे समन्यायी वाटप" या विषयावर समितीसमोर सात परिच्छेदांचे एक लेखी निवेदन सादर केले. हे निवेदन या अंकात **सहपत्र : आठ** *(पृष्ठ ९४ पहा)* म्हणून प्रसृत केलेले आहे. अहवालाच्या परिशिष्ट चारमध्ये सर्वोच्च न्यायालयामध्ये राज्यशासनाच्या वतीने ६ जानेवारी १९९६ ला सादर केलेले शपथपत्र जोडण्यात आले आहे. **अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना १३४, मराठवाड्याला ८७, कोल्हापूर विद्यापीठक्षेत्राला ३४ व जळगाव विद्यापीठ क्षेत्राला ५३ जागा कमी देण्यात आल्या असे शासनाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या या शपथपत्रातच कबुल करण्यात आले आहे.** अहवालाच्या पाचव्या परिशिष्टामध्ये समितीने सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांच्या दिनांक २० फेब्रुवारी १९९६, दिनांक ६ मार्च १९९६ व दिनांक १२ जून १९९६ रोजी झालेल्या साक्षीचे शब्दशः प्रतिवेदन या परिशिष्टात समाविष्ट केलेले आहे. हे प्रतिवेदन या अंकात **सहपत्र : दहा** *(पृष्ठ ९६ पहा)* म्हणून जोडलेले आहे. १० जुलै १९९५ रोजी सभागृहात कबूल केल्याप्रमाणे "वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यापीठनिहाय जागांच्या समन्यायी वाटपाबाबत मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे शासनाने सादर केलेले शपथपत्र" अधिक माहितीच्या स्वरूपात ९ ऑगस्ट १९९५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात

**वैद्यकीय प्रवेश धोरणाचे विश्लेषण करणाऱ्या आपल्या विशेषांकास हार्दिक शुभेच्छा.**

*A With Best Compliments From*

**NAGAR VACHANALAYA,**
***YAVATMAL.***

*A With Best Compliments From*

*अध्यक्ष,*

**इंडियन मेडिकल असोसिएशन,**
***यवतमाळ.***

आले. ते शपथपत्र या अहवालाच्या सहाव्या परिशिष्टामध्ये समाविष्ट केलेले आहे. या अंकामध्ये ते **सहपत्र : पांच** *(पृष्ठ ७० पहा)* म्हणून दिले आहे. परिशिष्ट सातमध्ये "विभागाच्या सचिवांनी दिनांक १२ जून १९९६ रोजी साक्षीच्या वेळी सादर केलेली माहिती व पत्र" समाविष्ट केलेले आहे. **(सहपत्र : अकरा,** *पृष्ठ ९५ पहा)*

७९. **२० फेब्रुवारी १९९६ रोजी वैद्यकीय शिक्षण व औषधी खात्याचे सचिव यांनी साक्षीच्या वेळी** "राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांचे समन्यायी वाटप" या विषयावर समितीसमोर सात परिच्छेदाचे एक लेखी निवेदन **(सहपत्र : आठ,** *पृष्ठ ९४ पहा)* सादर केले. या निवेदनातील परिच्छेद ४, ५ व ६ पुढील प्रमाणे आहे :-

"४. सर्वोच्च न्यायालयात वरीलप्रमाणे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिकेच्या संदर्भात, शासनाने शपथपत्र दाखल केलेले असून सदर शपथपत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या असेही निदर्शनास आणण्यांत आले आहे की, मा. राष्ट्रपती यांनी भारतीय संविधानाअन्वये वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली असून राज्यातील शैक्षणिक सुविधांची समन्यायी संधी जनतेला उपलब्ध करून देण्याबाबत योग्य त्या शिफारसी करण्यासाठी **मा. राज्यपाल यांनी त्या अनुषंगाने दिनांक २९.७.१९९५ रोजी समिती गठीत केली आहे.** सदर समितीच्या अद्यापपर्यंन्त दिनांक १३ सप्टेंबर १९९५, दिनांक १०.१०.१९९५ व दिनांक ३ जानेवारी १९९६ रोजी बैठका झाल्या असून समितीच्या शिफारशी फेब्रुवारी अखेरपर्यंत अपेक्षित आहेत.

५. वरीलप्रमाणे समन्यायी जागा वाटपासंबधी मा. राज्यपाल यांचेकडून समिती नियुक्त करण्यात आलेली असल्यामुळे व समितीच्या शिफारशी फेब्रुवारी अखेर उपलब्ध होणार असल्यामुळे **मा. सर्वोच्च न्यायालयाने वरील याचिकेच्या संदर्भात सुनावणी फेब्रुवारी अखेर पर्यन्त स्थगित ठेवली आहे.**

६. वरील विवेचनावरून असे दिसून येईल की, राज्यातील वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेश जागाचे समन्यायी वाटप करण्याबाबत राज्यपालांनी गठीत केलेल्या समितीच्या शिफारशी व **मा. राज्यपाल यांचा निर्णय शासनाला प्राप्त होऊन असा निर्णय सर्वोच्च न्यायालयापुढे सादर झाल्यानंतर व त्याला सर्वोच्च न्यायालयाची मान्यता प्राप्त झाल्यावर राज्य शासनाला समन्यायी वाटपाबाबतच्या अशा निर्णयाची अंमलबजावणी शक्य होईल.**"

८०. सचिवांनी समितीसमोर दिलेल्या साक्षीच्या प्रतिवेदनाचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येते की लेखी निवेदनात मांडलेले विचारच ते पुन्हा पुन्हा सांगत होते. समन्यायी वाटपाची व्यवस्था लागू करणारा शासननिर्णय अजून निर्गमित करण्यात आलेला नाही हे जसे त्यातून स्पष्ट होत होते तसेच **एका बाजूला सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाला तर बरे होईल हे एक व दुसऱ्या बाजूला मा. राज्यपालांनी** २९ जुलै १९९५ रोजी या कामासाठी **नेमलेल्या समितीचा अहवाल आला तर बरे होईल अशा प्रकारची भूमिका सचिवांनी समितीसमोर मांडली.** "मा.राज्यपालांच्या समितीच्या शिफारशी फेब्रुवारी अखेर उपलब्ध होणार असल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने वरील याचिकेच्या संदर्भात सुनावणी फेब्रुवारी अखेरपर्यंत स्थगित ठेवली आहे" अशी माहिती यावेळी समिती समोर आली.

८१. "समन्यायी जागा वाटप करण्याचे शासनाचे धोरण आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय पहावा लागेल" असे साक्षीच्यावेळी सचिवांनी समितीला सांगितले, तेंव्हा समितीप्रमुखांनी त्यांना "सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय समजा २ वर्षे झाला नाही म्हणून मुलांना तुम्ही असेच टांगत ठेवणार आहात काय?" असे विचारले असता सचिवांनी "फेब्रुवारी एन्ड पर्यंत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालासाठी थांबणार आहोत. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करून सांगणार की, आमची पॉलीसी क्लिअर आहे आणि त्याप्रमाणे आम्ही पुढे जात आहोत." विभागीय सचिवांच्या उक्त निवेदनानंतर ६ मार्च १९९६ पावेतो शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी शासनाला वेळ देण्याचा समितीने याच बैठकीत निर्णय घेतला. **दिनांक ६ मार्च १९९६ रोजी पुन्हा सचिवांची समितीसमोर साक्ष झाली.**

८२. एका बाजूला मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने समन्यायी वाटपाबाबत निर्णय दिलेला, दुसऱ्या बाजूला समन्यायी वाटपाबाबत सभागृहात शासनाने वारंवार मुदतबंद व निश्चित स्वरूपाची आश्वासने दिलेली, सर्वोच्च न्यायालयाने समन्यायी वाटपास मनाई हुकूम दिलेला नाही. अशा स्थितीत समन्यायी वाटपाचा शासन निर्णय निर्गमित होण्यास उशीर लागण्याची कारणे नमूद करणारा सचिवांच्या साक्षीतील पुढील भाग लक्षात घेण्यासारखा आहे :-

"**श्री.बी.टी.देशमुख :** तो मुद्दा आपल्यासमोर नाही. हायकोर्टाचे लोकसंख्येच्या आधारावर जजमेंट झालेले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे यासंबंधात रिस्ट्रेन करणारे आदेश निर्गमित झालेले नाहीत. तसेच राज्यपालांचेही काही आदेश निर्गमित झालेले नाहीत. असे असतांना सुध्दा शासन निर्णय निर्गमित झालेला नाही याचे कारण आपल्याला सांगता आले तर ते नेमक्या शब्दात सांगा.

**श्री.के.एस.बरोई :** गव्हर्नमेंटकडे प्रपोजल सबमिट केलेले आहे. गव्हर्नमेंटची मान्यता मिळाल्यानंतर ऑर्डर इश्यु करतो.

**श्री.बी.टी.देशमुख :** गव्हर्नमेंट म्हणजे नेमके कोणाकडे?

**श्री. के.एस.बरोई :** मुख्य सचिव, राज्य मंत्री, मंत्री आणि मुख्यमंत्र्यांकडे हे जाते.

**समिती प्रमुख श्री अरूण मेहता :** हे प्रपोजल आता कुठल्या लेव्हलवर आहे? ते पुढच्या पायरीवर थांबू नये म्हणजे झाले.

**श्री.के.एस.बरोई :** मुख्यमंत्री स्तरापासून राज्यमंत्री स्तरापर्यंत ते कुठे तरी आहे.

**श्री.पी.जी.दस्तुरकर :** हे प्रपोजल शासनाकडे कधी सबमिट केले आहे?

**श्री. के.एस.बरोई :** ३ तारखेला सबमिट केलेले आहे."

समन्यायी वाटपाबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यासाठी प्रस्ताव, साक्षीच्या २-४ दिवस अगोदर म्हणजे ३ मार्च १९९६ ला सबमिट केलेला आहे असे सचिवांनी समितीला सांगितल्याचे या प्रतिवेदनावरून दिसून येते.

८३. दिनांक २० फेब्रुवारीच्या बैठकीचे या अहवालामध्ये नमूद असलेले आश्वासन समितीचे कार्यवृत्त **(सहपत्र : दहा,** *पृष्ठ ९६ पहा)* काळजीपूर्वक पाहिले असता त्यात पुढील निर्णय दिसून येतो. "आणि म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या स्तरावर किंवा नागपूर खंडपीठाच्या स्तरावर सभागृहात दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करण्यास विभागाला कोणतीही अडचण नाही, असे चर्चेमधून निष्पन्न झाले. त्यामुळे समन्यायी वाटप लोकसंख्येच्या आधारावर करणारा शासन निर्णय निर्गमित होण्यास विलंब होण्याचे कोणतेही वाजवी कारण नाही. म्हणून समिती अशी शिफारस करते की, या संबंधातील शासन निर्णय ६ मार्च, १९९६ पर्यंत निर्गमित करावा."

६ मार्च १९९६ पर्यंत वाट पाहून **समितीने सचिवांना पुन्हा १२ जून १९९६ रोजी साक्षीसाठी बोलाविल्याचे या अहवालावरून दिसून येते.** १२ जूनच्या साक्षीपूर्वी सचिवांकडून समितीने जी माहिती मागवली होती त्याला उत्तर म्हणून सचिवांनी एकएका वाक्याचे दोन परिच्छेद असलेले एक "अत्यंत संक्षिप्त" निवेदन समितीकडे सादर केल्याचे दिसून येते. हे निवेदन (समितीच्या अहवालाच्या पृष्ठ ६६ वर प्रसृत) दोनच परिच्छेदांचे आहे **(सहपत्र : अकरा,** *पृष्ठ ९५ पहा)* त्यातील प्रत्येक परिच्छेद एकाच वाक्याचा आहे हे खरे असले तरी ही दोनही वाक्ये समन्यायी वाटपाच्या आश्वासनाची प्रगती योग्य दिशेने चालू आहे हे नमुद करणारीच होती, ही त्यातील आशादायक बाब होती. मात्र प्रस्तावाला अजून शासनाची मान्यता मिळालेली नाही हे या निवेदनावरून स्पष्ट दिसून येत होते, ही त्याची निराशाजनक बाजू म्हणून सांगता येईल.

८४. दिनांक १२ जुन १९९६ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी

*We Worship the " Iron Man ", We build the Iron Man.*

*सरदार पटेल विद्यामंदिर, यवतमाल, संचालीत*

डायाभाई पटेल शारीरिक शिक्षण महाविद्यालय,यवतमाळ.

शुभेच्छुक !

**राजन टोंगो** सचिव

**महेश पटेल** अध्यक्ष

*न्याय मिळवून देण्यासाठी सजग व न्याय मिळवून घेण्याऱ्यांना सदैव समर्थन आणि*

**हार्दिक शुभेच्छा !**

***यवतमाळ जिल्हा औषधी विक्रेता संघ***

*केमिस्ट भवन, जाजू चौक, यवतमाळ.*

सर्वोच्च न्यायालयामध्ये चालू असलेल्या घडामोडी विषयीची माहिती समितीला मिळाली, ती दिल्ली येथील महाराष्ट्र शासनाच्या वकिलाने ६ मे १९९६ रोजी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकाऱ्याला पाठविलेल्या एका पत्रामुळे. हे पत्र समितीसमोर सादर करण्यात आले असून ते अहवालाच्या पृष्ठ ६७ वर नमूद करण्यात आले आहे. (पत्राची प्रत **सहपत्र : बारा,** *पृष्ठ ४४ पहा.)* या पत्रात शासनाच्या वकिलाने शासनाला स्पष्टपणे असे कळविलेले होते की, "The aforesaid matter was listed for hearing on 30th April 1996 before court No. 1 as item No 46 when I appeared in the matter on behalf of the state. The Court has directed the government to pass appropriate orders within 4 weeks. It was pointed out to the Court that the report is not yet submitted to the Governor in view of the elections. The Court has therefore, stated in its order that this decision should be taken wihtin 4 weeks, as this policy of the Government of equitable distribution should be implemented in the next acadernic year. If the decision is not taken within 4 weeks it might amount to contempt of Court. " दिनांक ५ मे, रोजी शासनाने आपल्या वकिलाला पत्र पाठवून वेळ वाढवून घेण्याची विनंती केल्याचे दिसून येते. (५ मे, १९९६ चे पत्रासाठी **सहपत्र : तेरा,** *पृष्ठ १०३ पहा*)

तदुपरांत २६ जून १९९६ च्या बैठकीमध्ये समितीने अहवालाचे प्रारूप विचारात घेतले व अहवाल (विधानपरिषद आश्वासन समितीचा एकशेबाविसावा) संमत केला हा अहवाल समितीप्रमुख श्री. अरुण मेहता यांनी दिनांक ९ जुलै १९९६ रोजी सभागृहाला सादर केला.

८५. एका बाजूला लोकमताचा रेटा वाढत असतांना बिनचुक आयुधांचा वापर करून १९९४ च्या दुसऱ्या अधिवेशनापासून तर १९९६ च्या पहिल्या अधिवेशनापर्यंत (अकरा वेळा) सभागृहात कडाक्याची चर्चा होत राहिली. या चर्चेमध्ये मुदतबंद व मजबूत आश्वासने मिळत राहिली. मिळालेल्या आश्वासनांप्रमाणे उच्च न्यायालयांत शपथपत्र शासनाला दाखल करावे लागले. मा. उच्च न्यायालयाचा निर्णयही समन्यायी वाटपाला अनुकूल असा झाला. हे सर्व होत असतांना "नागरिक समिती, मलकापूर" या पंजीबध्द संस्थेने व विशेषतः या संस्थेचे सचिव डॉ. अशोक काबरा यांनी खुपच मोलाची कामगीरी बजावली. २७ सप्टेबर १९९४ रोजी नागपूर खंडपीठाने या प्रकरणात (१५९ ऑफ १९९४) "समन्यायी वाटपाचा मुद्दा खुला ठेवला" तेव्हा त्याविरूध्द अपिल करून डॉ काबरा यांनी सर्वोच्च न्यायालयातून उच्च न्यायालयाच्या आदेशाचा तेवढा भाग रद्दबादल करून घेण्यात यश मिळविले. सर्वोच्च न्यायालयाने याच प्रकरणात (SLP(C)No.23274 of 1994) दिनांक २७ मार्च १९९५ रोजी "**It would be desirable to put an end to the contention rather than keeping the question open as the High Court has done.** we, therfore, set aside that part of the High Court order and remit the matter back to the High Court decision on the question regarding equitable distribution of seats as raised before it. " असा निर्णय दिला **(सहपत्र : चार,** *पृष्ठ ६८ पहा)* व ही बाब नागपूर खंडपीठाकडे निर्णयार्थ परत पाठविली व त्या प्रकरणामध्येच १३ जुलै १९९५ रोजी नागपूर खंडपीठाने समन्यायी वाटपाच्या बाजूने निर्णय **(सहपत्र : सहा,** *पृष्ठ ७१ पहा)* दिला. समन्यायी वाटप हे तत्व म्हणून एकदा शासनाने मान्य केल्यानंतर व उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने तदनुकूल निर्णय दिल्यानंतर अर्जदारांना व तत्सम विद्यार्थ्यांना त्याचा लाभ न दिल्यामुळे पुन्हा उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले आहे. (SPL (C) No. 17810/11/95) या प्रकरणात "१९९४-९५ मध्ये प्रवेशासाठी इच्छूक असलेले अर्जदार व तत्सम विद्यार्थी यांना समन्यायी वाटपाचे तत्व मान्य झाल्यावरही १९९५-९६ मध्ये सुद्धा न्याय न देण्याच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या बिनचुकतेला सर्वोच्च न्यायालयामध्ये त्यांनी आव्हानित केलेले आहे. याच प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ३० एप्रिल १९९६ रोजी दिलेले आदेश ६ मे १९९६ च्या पत्रान्वये **(सहपत्र : बारा,** *पृष्ठ १४ पहा)* दिल्लीच्या वकिलांनी शासनाला कळविले आहेत.

८६. १९९६ च्या पहिल्या अधिवेशनापर्यंत विधानपरिषदेत या प्रश्नावर झालेले वादविवाद व देण्यात आलेली आश्वासने याबाबतचे तपशील यापूर्वीच्या परिच्छेदांतून नमूद केले आहेत. जुलै १९९६ मध्ये या प्रश्नावर विधानपरिषदेत झालेल्या चर्चेचे तपशील सुद्धा समजून घेणे आवश्यक आहे. **"विद्यापीठनिहाय वैद्यकिय व दंत महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप"** या विषयावरील सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील, अजहर हूसेन यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ८७३३ हा **शुक्रवार, दिनांक १२.७.१९९६** रोजी उत्तरासाठी होता. तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत तो तेराव्या क्रमांकावर होता व त्यामुळे तो चर्चेला येण्याची शक्यता कमी होती. नव्हतीच म्हटली तरी चालेल. प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला, तेव्हा प्रा.बी.टी.देशमुख यांनी मा. सभापतींना अशी विनंती केली की "अध्यक्ष महोदय तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील क्रमांक १३ हा शेवटच्या दहा मिनिटात घेण्यात यावा कारण याचा विद्यार्थ्यांच्या ॲडमिशनशी संबंध असल्याने तो महत्त्वाचा प्रश्न आहे." प्रश्नाचे क्रम बॅलेट पद्धतीने लागत असल्यामुळे व एखादा प्रश्न सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्यास व तो चर्चेला येण्याची शक्यता नसल्यास मा. सभापतींनी विनंती मान्य केल्यास प्रश्नोत्तराच्या तासात शेवटच्या ५-१० मिनिटात असा प्रश्न उत्तरासाठी घेण्याची पद्धती आहे. उक्त विनंतीबाबत मा. सभापतींनी दिलेल्या "प्रश्न क्रमांक ८७३३ हा शेवटच्या दहा मिनिटात घेण्यात येईल" या निर्णयामुळे हा प्रश्न चर्चेसाठी येणार हे निश्चित झाले होते व शेवटच्या १० मिनिटात तसा तो आलाही.

८७. "लोकसंख्येच्या प्रमाणात महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या वैद्यकिय व दंत महाविद्यालयातील एकूण प्रवेश जागा एकत्रित करून त्यांचे **समन्यायी वाटप करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची कारवाई पूर्ण झालेली आहे काय?"** या प्रश्न भाग एकला देण्यात आलेल्या लेखी उत्तरामध्ये **"शासन निर्णय निर्गमित करण्याची कारवाई अजून पूर्ण झालेली नाही."** असे नमूद करण्यात आले होते. शासननिर्णय "निर्गमित झालेला नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?" या प्रश्न भाग तीनला **"प्रवेश जागांच्या समन्यायी वाटपाबाबत मा. राज्यपालांकडून अद्यापही आदेश प्राप्त झालेले नाहीत. प्रवेश जागांचा मोठ्या प्रमाणात असलेला असमतोल कमी करण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील जागा वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत."** असे लेखी उत्तर देण्यात आले होते. सुरुवातीलाच जुन्या आश्वासनांची आठवण करून देवून व सर्वोच्च न्यायालयातील घडामोडींचा संदर्भ देऊन व प्रॉस्पेक्टसमध्ये जागांचे वाटप देण्यात आलेले नाही हे लक्षात घेता मी असा उपप्रश्न विचारला की "आता प्रॉस्पेक्टस मात्र विना वाटपाचे प्रसिध्द केलेले आहे. तेव्हा याबाबतीमध्ये आपण या जागांच्या समन्यायी वाटपाचे काय करणार आहात?" त्यावर मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. दौलतराव आहेर यांनी सद्यःस्थितीची तपशीलवार माहिती दिली. त्यातून कांही नवीन व महत्वपूर्ण मुद्दे बाहेर आले. त्यांनी दिलेल्या उत्तराचा महत्वपूर्ण भाग पुढील प्रमाणे "विद्यार्थ्यांची संख्या वाढवून हा असमतोल दूर करता येईल असे लक्षात आल्यानंतर मेडिकल कौन्सील ऑफ इंडियाकडे अर्ज केला. हा अर्ज करीत असतांना सेंट्रल गव्हर्नमेंटने मान्यता द्यावयाची असते. मधल्या काळानंतर सेंट्रल गव्हर्नमेंटने मान्यता दिली आणि हा प्रस्ताव मान्य होवून मेडिकल कौन्सीलकडे गेला .... त्यांची टीम इन्स्पेक्शनसाठी आता येणार आहे. यासंबंधी महाराष्ट्र सरकारने कालच निर्णय घेतला आहे. या ज्या वाढीव जागा निर्माण होत आहे त्यासाठी स्टाफची काय पूर्तता केली आहे, इन्फ्रॉस्ट्रक्चर काय आहे हे बघण्यासाठी त्यांची कमिटी येणार आहे. म्हणून या २९० जागा ज्या वाढणार आहे त्यासाठी स्टाफ वाढविण्याचा प्रस्ताव कालच्याच रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्य करण्यात आला. ही मान्यता दिल्यामुळे आता मेडिकल कौन्सीलची


शिक्षण प्रसारक मंडळ, वणी

(जिल्हा यवतमाळ)

**१. लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी.**
**२. औषधी निर्माणशास्त्र संस्था, वणी.**
**३. शिक्षण प्रसारक मंडळ विद्यालय, वणी.**

**विजय मुकेवार** — अध्यक्ष
**अनंत देशपांडे** — सचिव
**सुभाष देशमुख** — उपाध्यक्ष
**रामदास बलका** — सहसचिव

हार्दिक शुभेच्छा

*स्व. संजय शिक्षण संस्था, गुंज, ता. महागाव द्वारा संचालित*

**शारीरिक शिक्षण महाविद्यालय,**

*उमरखेड, जि. यवतमाळ.*

कमिटी ज्यावेळेला इन्स्पेक्शनला येईल त्यावेळेला आमचे सगळे इन्फ्रॉस्ट्रक्चर तयार असेल तर त्यांनी हा प्रस्ताव अमान्य करण्याचा प्रश्न येणार नाही असे मला वाटते. ही प्रक्रिया पूर्ण केली जाईल आणि सर्व विद्यापीठाच्या कक्षेतील विद्यार्थ्यांना न्याय दिला जाईल." आपल्या उत्तराच्या शेवटी त्यांनी स्पष्ट शब्दात असे आश्वासन दिले की "**समन्यायी वाटपाबाबत शासनाने जे आश्वासन दिलेले आहे त्याची पूर्तता या वर्षापासून होणार आहे एवढेच मला या ठिकाणी सांगावयाचे आहे.**" समन्यायी वाटपाबाबतची शासनाच्या भूमिकेची ठामपणे नोंद व्हावी या हेतूने प्रा.बी.टी. देशमुख यांनी विचारलेल्या "मा. मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर योग्य दिशेने आहे. जागा वाढवून समन्यायी वाटप करण्याचा त्यांचा निर्णय आहे. जागा वाढवून मिळाल्या तर ती आनंदाची गोष्ट आहे. मला या ठिकाणी एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, **जागा वाढवून मिळाल्या तर ठिकच. समजा त्या वाढवून मिळाल्या नाही तरी समन्यायी वाटप या वर्षापासून केले जाईल हे मान्य आहे का?**" या प्रश्नाला मा. मंत्रिमहोदयांनी "मान्य आहे" असे उत्तर दिले व वेळ संपली व त्यामुळे प्रश्नोत्तराचा तासही येथे संपला.

८८. समन्यायी वाटपाचा हा निर्णय होत असतांना "एकूण जागांच्या पूल" मधून बाहेर उडी मारण्याचा, बाहेर पडण्याचा प्रकार/ पडण्याचे प्रकार महाराष्ट्रामध्ये सुरू झालेले आहेत. पुण्याच्या भारती विद्यापीठ या संस्थेने याबाबत तात्पुरते का होईना, यावर्षापुरते याबाबतीत यश मिळविलेले दिसते. दिनांक १९ जुलै १९९६ रोजी विधानपरिषदेत सर्वश्री व्यंकप्पा पतकी, कीसन राठोड, अरुण मेहता, रमेश गुप्ता, दि.बा.पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम ९३ च्या सूचनेवर शासनातर्फे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी केलेल्या निवेदनांतून ही गोष्ट पुढे आली. सभागृहामध्ये शासनाने केलेल्या या निवेदनातील परिच्छेद २ पुढे जसाच्या तसा देत आहे :- "केंद्र शासनाच्या २६ एप्रील १९९६ च्या अधिसूचनेअन्वये भारती विद्यापीठ, पुणे यांच्या वर नमुद केलेल्या महाविद्यालयांना अभिमत विद्यापीठाचा दर्जा देण्यात आला आहे. अभिमत विद्यापीठाचा दर्जा असलेल्या शिक्षण संस्थांमधील प्रवेश हे राज्य शासनामार्फत सक्षम प्राधिकाऱ्याकडून करावेत की संबंधित संस्था असे प्रवेश करण्यास सक्षम आहे यासंबंधीचा मुद्दा अशाच अन्य प्रकरणामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. यासंबंधी शासनाने भारती विद्यापीठ संचालित वरील महाविद्यालयातील प्रवेश, नियमाप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याकडूनच करणे आवश्यक आहे, अशी भूमिका घेतली होती. तथापि, भारती विद्यापीठ संस्थेने याबाबत मुंबई उच्च न्यायालय याचिका क्र. ३२३८/९६ दाखल केली व या याचिकेची सुनावणी होउन मा. उच्च न्यायालयाने अंतरिम आदेशान्वये भारती विद्यापीठास अखिल भारतीय विद्यापीठ स्तरावर प्रवेश परीक्षा घेवून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास अनुमती दिलेली आहे. तथापि, अशा प्रकारे विद्यार्थ्यांना दिलेले प्रवेश हे यासंबंधी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या वरील प्रकरणाच्या निकालाच्या अधिन असतील असेही मा. उच्च न्यायालयाने सदर आदेशात स्पष्ट केले आहे." भारती विद्यापीठातील जागांची सद्यस्थिती लक्षात येण्यासाठी हा परिच्छेद पुरेसा बोलका आहे.

८९. १९९६ च्या दुसऱ्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न पुन्हा २३ जुलै १९९६ रोजी चर्चेला आला तो **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु. डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे, अरुण मेहता, नरेंद्र बोरगांवकर, अजहर हुसेन** यांनी दिलेल्या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने. लक्षवेधी सूचना देणाऱ्या सदस्यांनी आपल्या सूचनेमध्ये असे आरोपीत केले होते की "गेल्या वर्षी ज्यांचे कोड नंबर नमुद करण्यात आले होते अशा सेठ जी.ई.एस. कॉलेज, मुंबई, लोकमान्य मेडीकल कॉलेज, मुंबई, टी.एन.मेडीकल कॉलेज, मुंबई, व महात्मा गांधी इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायन्सेस, वर्धा या वैद्यकीय महाविद्यालयाचे कोड नंबर ६ जून,१९९६ च्या शासन निर्णयात नमुद नाहीत डी.वाय. कॉलेज, पिंपरीचा कोडनंबर मागाहून पत्राव्दारे २९ जून,१९९६ ला रवाना करण्यात आला आहे, परिणामी या सर्व महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असलेल्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे, हे सर्व कोडनंबर देउन प्रवेशासाठी सर्व विद्यार्थ्यांना प्राथम्य नमुद करण्याची संधी देण्याची गरज आहे." याबाबत मा. मंत्रिमहोदयांच्या निवेदनाच्या परिच्छेद ३ मध्ये पुढील प्रमाणे उत्तरादाखल उल्लेख आहे. :- "सन १९९५-९६ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश नियमावलीमध्ये शासनामार्फत प्रवेश केल्या जाणाऱ्या महाविद्यालयाच्या यादीमध्ये बृहन्मुंबई महानगरपालीकेअंतर्गत असलेल्या तीन महाविद्यालायांचा तसेच महात्मा गांधी इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायंसेस सेवाग्राम, वर्धा या वैद्यकीय महाविद्यालयांचा समावेश केलेला होता. तथापी, बृहन्मुंबई महानगरपालीकेने या प्रकरणी रिट याचिका क्रमांक ८३०/९५ दाखल करुन उच्च न्यायालयाकडून शासनाने प्रवेश करण्यास स्थगिती प्राप्त केली आहे. तसेच म. गांधी इन्स्टिट्युट ऑफ मेडीकल सायंसेस, सेवाग्राम, वर्धा या महाविद्यालयाचे प्रवेश संस्थेस करण्यास मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपिठाने दिनांक १९.७.९५ च्या आदेशान्वये अनुमती दिली. त्यावर शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये केलेली विशेष अनुमती याचिका फेटाळली आहे. न्यायालयाच्या सदरहू आदेशामुळे या महाविद्यालयाचा समावेश सन १९९६-९७ च्या प्रवेश नियमावलीमध्ये करण्यात आलेला नाही."

**90.** अनुपुरक चर्चेमध्ये प्रा.बी.टी.देशमुख यांनी जेंव्हा "अध्यक्ष महाराज, याबाबतचा मुद्दा असा आहे की, त्या मुलांना कोडनंबर देता आला नाही. .... तरी आठ दिवसांमध्ये कोड नंबर देणार आहात काय?" असा प्रश्न विचारला. तेंव्हा मा. सभापतींनी चर्चेत हस्तक्षेप करून "कोडनंबर देण्यामध्ये काही अडचण आहे काय? " असे विचारले, यावर वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांनी "**कोडनंबर देण्यामध्ये अडचण नाही.** औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निर्णय दिला आहे. तरी सन्माननिय सदस्यांच्या मनामध्ये काही किंतु असेल तर प्रत्येक विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील एक आमदार घेउन एक समिती स्थापन करु." असे उद्गार काढले. त्यावर ताबडतोब मा. सभापतींनी "समिती स्थापन करण्याची गरज नाही. महाविद्यालयांना कोड नंबर पाहीजे तो आपण द्या." असे उद्गार काढले, असता मंत्रिमहोदयांनी "तो आम्ही द्यावयाला [illegible] जे सुरुवातीचे वाक्य आहे, त्यावरुन असे दिसत आहे की, शासन दिलेल्या समन्यायी वाटपाच्या आश्वासनाशी ठाम राहीले आहे. त्यामुळे या संदर्भात मी सुरुवातीलाच अभिनंदन केले आहे. तरी ज्या कॉलेजचा कोडनंबर कळविलेला नाही तो आपण ८ दिवसांमध्ये कळविणार आहात काय?' ' [illegible] ""औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या जजमेंटचा काही भाग मला मिळाला. पुर्ण जजमेंट मला मिळालेले नाही. पुर्ण जजमेंट मला मिळाल्यावर कोडनंबर देण्याबाबत विचार करता' ' [illegible] आपण मंत्री महोदयांना असे विचारले होते की, कोडनंबर देण्यामध्ये आपली काही अडचण आहे काय? त्यावेळेस अडचण नाही असे त्यांनी सांगितले. आता कोडनंबर देण्याबाबत विचार करतो असे मंत्री महोदय सांगत आहेत.' ' [illegible] ""औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या जजमेंटची पुर्ण प्रत मिळालेली नाही. ती मिळाल्यावर कोडनंबर देण्याबाबत विचार करतो असे त्यांनी सांगितले आहे.' '

९१. महाराष्ट्राच्या एखाद्या भागात जास्त वैद्यकीय महाविद्यालये आहेत व एखाद्या भागात कमी महाविद्यालये असल्यामुळे जागा कमी आहेत हा त्या विभागातील विद्यार्थ्यांचा दोष कसा काय समजल्या जावू शकतो? म्हणूनच वैद्यकीय जागांचे समन्यायी वाटप करण्यात यावे अशा प्रकारची मागणी सातत्याने केली जात आहे. जनतेच्या जिव्हाळ्याच्या मागणीबाबत लोकमानसामध्ये असलेली प्रखर व अनावर इच्छा ही खरी त्या मागणी मागची शक्ती असते. त्या

*महाराष्ट्रातील अविकसित भागाच्या अनुशेषासंबंधीच्या सत्यशोधनाची दिशा दर्शविणाऱ्या आपल्या विशेषांकास शुभेच्छा.*

**हार्दिक शुभेच्छा**
एक हितचिंतक,
*पुसद.*

श्री. गजानन महाराज संस्थान संचालित
आयुर्वेद महाविद्यालय, पुसद.
**डॉ. के. जी. बेलोरकर**
*( अध्यक्ष )*

मागणीच्या पूर्ततेसाठी सभागृहात जसे प्रयत्न होत असतात तसे सभागृहाबाहेरसुद्धा कितीतरी प्रयत्न होत असतात. त्या प्रयत्नांचे प्रतिबिंब सभागृहाच्या चर्चेमध्ये उमटले पाहिजे व त्याबाबतच्या शासकीय भूमिकांची नोंद सभागृहाच्या कामकाजामध्ये झाली पाहिजे याची तळमळ सातत्याने त्या लोकभावनांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या विधानमंडळ सदस्यांना लागलेली असते, नव्हे तेच त्यांचे प्रमुख कार्य असते. **एखादी न्याय्य मागणी अंतिम स्वरूपामध्ये मान्य होण्यास काही वर्षांचा कालावधी लागतो आहे, लागणार आहे याची जाणीव असूनसुद्धा अनेक वर्षे अनेक सदस्य विविध सांसदिय आयुधांचा वापर करून त्या मागणीचा सभागृहामध्ये सतत पाठपुरावा करीत असतात व तसे करीत असतांना अंतिम निर्णय पदरात पाडून घेण्यापूर्वी शासनाला एक एक पाऊल पुढे टाकायला लावण्यात त्यांनी मिळविलेल्या यशाचा प्रवास निश्चितच विलोभनीय असतो. मागे फिरता येणार नाही अशा धोरण विषयक पुढच्या पुढच्या रेषेवर शासनाला आणून उभे करतांना सदस्यांनी केलेल्या कामगिरीचा आढावा घेणाराला, शब्दांच्या या चढाईला सांसदिय लढाई असे का म्हटले जाते हे लक्षात येण्यास वेळ लागत नाही.**

९२. सभागृहातील समन्यायी वाटपाच्या प्रश्नावर लोकप्रतिनिधींनी केलेल्या सांसदिय लढाईचे तपशिलवार विवेचन वर केलेले आहे. "राजकीय नेतृत्व" सातत्याने पक्षपात करीत असल्यामुळे असमतोल सतत वाढत गेला, म्हणून घटनेतील ३७१ कलमाला अभिप्रेत असलेली व्यवस्था स्थापित करून राज्यपालांवर विशेष जबाबदारी टाकण्यात आली. **या प्रकरणामध्ये राजकिय नेतृत्वाने समन्यायी वाटपाची व्यवस्था मान्य केली पण मा. राज्यपालांनी यथोचित आदेश अजूनही न काढल्यामुळे ही व्यवस्था स्थापित होण्यात मोठीच बाधा निर्माण झालेली दिसून येते.** खरे म्हणजे ३०-११-१९९४ रोजी सभागृहामध्ये लक्षवेधी सुचनेवरील लेखी निवेदनामध्ये मुळात शासनाने स्पष्टपणे पुढील प्रमाणे भुमिका घेतली होती :-

"१९९४ च्या विदर्भ मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ आदेशाच्या परिच्छेद-१० प्रमाणे विशेष जबाबदारी अंतर्गत जे वाटप विभागनिहाय करावयाचे आहे **त्या बाबतच्या सूचना मा. राज्यपाल यांचेकडून शासनास अद्यापि प्राप्त झालेल्या नाहीत. सदरहू सूचना प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने योग्य तो निर्णय घेण्यात येईल.**"

९३. शासनाच्या या निवेदनानंतर अनुपूरक चर्चेमध्ये मी स्वतः असा प्रश्न विचारला होता की :-

"कोणत्या विद्यापीठाच्या परिक्षेत्रामध्ये किती जागा निर्माण झालेल्या आहेत व त्या कशा निर्माण झाल्या आहेत याचा इतिहास शासनाला माहीत नाही काय? याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन करण्याकरता माननीय राज्यपालांनी तुम्हाला कळविलेले नाही हे मला समजले. त्याबाबतीत निवेदनामध्ये खुलासा करण्यात आलेला आहे. त्या संदर्भात मला काहीही म्हणावयाचे नाही, परंतु इक्विटेबल डिस्ट्रिब्युशन करण्यास तुम्हाला कोणी मनाई केली होती काय ? ....समजा राज्यपालांच्या सूचना याबाबत आल्याच नाहीत तर आपण तोवर हे असेच चालू ठेवणार आहात काय?"

अनुपुरक चर्चेमध्ये मा. मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी स्वतः हस्तक्षेप केला व "हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी राज्यपालांकडून काही मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता आज वाटली असली तरी राज्य सरकारने स्वतःहून पुढे येऊन यासंबंधी निर्णय घेतला पाहिजे होता या तत्त्वाशी आम्ही सहमती दाखविली आहे. " अशी माहिती देवून स्पष्टपणे "राज्यातील एकंदर १२ वी सायन्सच्या परिक्षेला बसणाऱ्यासाठी तसेच मेडीकलसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी एकंदर विद्यापीठवाईज संख्या, **राज्यात उपलब्ध असलेल्या सगळ्या मेडीकलच्या सीटस् याचा एकत्रीत विचार करुन त्या पद्धतीने प्रत्येक विद्यापीठामध्ये समान प्रमाणात कोटा देण्याच्या संबधीचा निर्णय घेतला जाईल.**" असे आश्वासन दिले. या जागांचा असमतोल संपुष्टात आणण्याच्या दृष्टीने हे अत्यंत महत्वपूर्ण आश्वासन म्हणावे लागेल. कारण होणारा अन्याय इतका तीव्र व त्यातून होणारी प्रादेशिक असमतोलाची जखम इतकी खोल होती की पुढे शासन बदलले तरी हे आश्वासन बदललेल्या शासनाला बदलविता आले नाही. त्याची आम्ही अंमलबजावणी करणार नाही असे म्हणता आले नाही. त्या आश्वासनाच्या मागे जाता आले नाही तर नव्या शासनाला सुद्धा त्यापुढेच जावे लागले.

९४. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जावू इच्छिणाऱ्या १२ वीच्या काही विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे हे आंदोलन आहे असे म्हणणाऱ्यांना अमरावती विभागातील या आंदोलनाचे खरे स्वरूप कळलेले नाही. घटनेच्या कलम ३७१ अन्वये समन्यायी वाटपाचा मुद्दा या आंदोलनात महत्वाचा मुद्दा आहे. ऑगस्ट १९९६ पावेतो न्यायालयात, विधिमंडळात किंवा शासनात हा मुद्दा मागे हटलेला नव्हता. या मुद्याच्या अंतिम यशामध्ये महाराष्ट्राच्या अविकसित भागांच्या विकासाची किरणे सामावलेली आहेत. अंतिम यश मिळाले तर या जागांबरोबर नोकऱ्यांमध्ये समन्यायी वाटपाची दारे खुली होतील व विकासाच्या कामासाठी निधीचे वाटप सुद्धा समन्यायी पद्धतीने करावे लागेल. गेली दोन वर्षे सातत्याने या अन्यायाविरूध्दची लढाई विद्यार्थी, पालक व नागरिकांची कृती समिति मैदानात व न्यायालयात तसेच लोकप्रतिनिधी विधानमंडळात लढवित आहेत. लोकसंख्येच्या आधारावर या जागांचे समन्यायी वाटप मान्य करणारी अनेक आश्वासने शासनाने सभागृहात दिली. त्यातील कांही महत्त्वाची आश्वासने मी परिच्छेद ७३ मध्ये नमूद केलेली आहेत. जानेवारी १९९६ मध्ये सर्वोच्च न्यायालयामध्ये त्याप्रमाणे शपथपत्रहि शासनाने दाखल केले. या आश्वासनाच्या अंमलबजावणीची मुख्य कृती मात्र शासनाने पार पाडली नाही व ती म्हणजे "तपशील नमूद करणारा शासननिर्णय" निर्गमित करण्याची. २१ मार्च १९९६ रोजी सभागृहामध्ये मा. आरोग्यमंत्र्यांना मी नेमका प्रश्न याबाबतीत विचारला होता तो पुढील प्रमाणे :-

"जेंव्हा हे ॲफीडेव्हीट दाखल केले त्याच वेळेस शासनाने या संबंधीचे शासन आदेश निर्गमित केले नाही तर त्या प्रतिज्ञा पत्राचा काहीही उपयोग होत नाही. **आपण सभागृहामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे पंधरा दिवसांमध्ये किंवा त्याच्या एक दोन दिवस मागे पुढे लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटप करण्याचे जे प्रतिज्ञापत्र दाखल केले त्यानुसार शासननिर्णय निर्गमित झालेले आहेत काय? नसेल तर केंव्हा करणार आहात?**"

सभागृहातील चर्चेपूर्वी लॉबीमध्ये झालेल्या खाजगी बोलण्यात सुद्धा मी मा. आरोग्य मंत्र्यांना "**नुसते शपथपत्र दाखल करून काय उपयोग होणार? जागांच्या वाटपाचा शासननिर्णयच दाखल केला असता तर हा प्रश्न संपुष्टात आला असता.**" हे माझे मत सांगितले होते. शासनाने ६ जून १९९६ रोजी याबाबतचा शासननिर्णय निर्गमित केला. इतर साऱ्या बाबी या शासननिर्णयामध्ये असल्या तरी लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटप या मुद्याचे कोणतेही तपशील या शासननिर्णयामध्ये दिलेले नव्हते. एक फक्त लहानसा नियम ४.१.२.१. या क्रमावर या शासननिर्णयामध्ये दाखल होता तो पुढील शब्दात :-

"4.1.2.1. The Seats of 70 per cent open category and the seats reserved for backward classes available in the state will be pooled together and will be equitably distributed amongst all the University regions in the state in the proportion of population. In the process of distribution of seats the percentage of constitutional reservation will be maintained as scrupulously as possible."

अत्यंत "भोंगळ अशा प्रकारची ही सेवा" शासनाने अनुशेषग्रस्त भागाला दिलेली होती. कोणत्या भागाला किती जागा राहतील? लोकसंख्या कोणत्या वर्षाची धरली आहे? ती विद्यापीठ क्षेत्रनिहाय धरली आहे की विभागनिहाय धरलेली आहे? याचे कोणतेही तपशील या शासननिर्णयामध्ये दिलेले नव्हते आणि त्यामुळेच सभागृहांत १३४ जागा अमरावती विभागाला जास्त मिळतील असे सांगत असतांना अमरावतीच्या विश्रामगृहावर मात्र

ऑर्किड्स एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित

**कला व वाणिज्य महाविद्यालय, राळेगाव.**
**तर्फे हार्दिक शुभेच्छा.**

**नितीन सरदार** अध्यक्ष
**आर. पी. चौधरी** प्र. प्राचार्य
**सिद्धार्थ सोनटक्के** सचिव

**शुभेच्छासह...**
***रोटरी क्लब, यवतमाळ.***

१. **दिपक निलावार** - *अध्यक्ष*
२. **डॉ. सुरेंद्र पद्मावार**- *माजी अध्यक्ष*
३. **जवाहर जाजू** - *संचालक*
४. **शौकतभाई जिवाणी** - *सचिव*

आम्ही तुम्हाला १४० जागा जास्त देणार आहोत असे आंदोलकांना सांगण्याचा मा. आरोग्यमंत्र्यांचा मार्ग मोकळा होता. जागाचे हे आकडे पत्रपरिषदेतून व शिष्टमंडळांशी होणाऱ्या बोलण्यातून रोज बदलत होते. गेल्या वर्षी प्रवेश पुस्तिकेमध्ये असलेल्या मुंबईच्या तीन महाविद्यालयाचे कोडनंबर यावर्षी गायब करण्याच्या कृतिला मराठवाड्यातील जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी श्री.गोविंदभाई श्राफ यांनी औरंगाबाद खंडपीठासमोर आव्हानीत केले व खंडपीठाने जागा भरण्याची कारवाई स्थगित करणारा अंतरिम आदेश दिला होता. पुढे ही बाब मा. मुख्य न्यायाधिशांच्या मुंबई येथील पूर्ण खंडपीठाकडे वर्ग झाली. शासनाचा हा गलथानपणा व भोंगळपणा मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाच्या नजरेतून सुटला असता तरच नवल. मा. खंडपीठाने शासनाच्या या भोंगळपणावर ताशेरे ओढतांना असे मत व्यक्त केले की, "एम.बी.बी.एस.च्या प्रवेशाकरिता करण्यात आलेल्या नियमातील नियम ४.१.२.१ हा मोघम किंवा अस्पष्ट (vague) आहे हे अर्जदाराच्या वकिलाचे मत मान्य करावे लागेल असे आम्हाला वाटते. राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात विद्यापीठनिहाय मेडिकल प्रवेशांच्या जागांचे वाटप कसे करावे यांचे स्पष्ट मार्गदर्शन कार्यवाही करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यासाठी त्यात दिसून येत नाही. विद्यापीठ क्षेत्रनिहाय लोकसंख्या विचारात घ्यावी की मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र या तीनची प्रदेशनिहाय लोकसंख्या विचारात घ्यावी याबाबतचा कोणताही उल्लेख या नियमात नाही. कोणत्या वर्षाची लोकसंख्या लक्षात घ्यावी याबाबतसुद्धा कोणताही उल्लेख या नियमात नाही. कार्यवाही करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांना स्पष्ट मार्गदर्शनाशिवाय स्वविवेक वापरण्याची ही जी अनुचित मोकळीक देण्यात आलेली आहे त्यामुळे हा नियम उचित रीतीने अमलात येण्यास बाधा आली आहे."

मा. पूर्ण खंडपीठाचे याबाबतचे अभिप्राय बिनचुकपणे लक्षात यावे म्हणून २९ ऑगस्ट १९९६ च्या त्यांच्या निर्णयातील परिच्छेद ९ मी पुढे जसाच्या तसा देत आहे :-

"9. In our view, the contention of the learned counsel for the petitioners that Rule 4.1.2.1 of the Rules for selection to M.B.B.S./B.D.S./B.A.M.S./B.H.M.S. Courses, 1996-97 is vague is required to be accepted. There is no clear guidelines to the competent authority for distributing medical seats on the basis of University regions in the State in the proportion of population. Nothing is mentioned as to whether the population of University area is to be taken into consideration or whether the population of the three different regions of the State i.e. Marathwada, Vidarbha and Western Maharashtra is to be taken into consideration. Further, nothing is mentioned as to whether the population of which year is to be taken into consideration. The competent Authority has been left with unguided discretion which renders the said Rule as unfair for its operation."

**परिणामी समन्यायी वाटपाचा नियम ४.१.२.१, जो १९९६-९७ च्या प्रवेश पुस्तिकेमध्ये समाविष्ट करण्यात आला होता तो, २९ ऑगस्ट १९९६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने १९९६ च्या रिट पिटीशन क्रमांक ४२५२ या प्रकरणात रद्दबादल ठरविला.** आपल्या देशातील घटनात्मक व्यवस्थेप्रमाणे मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे कुणाला आपणावर अन्याय झाला असे वाटत असेल तर सर्वोच्च न्यायालयाकडे अपिल करणे एवढाच उपाय शिल्लक असतो, समन्यायी वाटपाबाबतचा जो नियम मुंबई उच्च न्यायालयाने **२९ ऑगस्ट १९९६** रोजी रद्दबादल ठरविला, त्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयामध्ये निरनिराळ्या ७ विशेष याचिका दाखल झाल्या होत्या. त्यात खुद्द महाराष्ट्र शासनानेही सर्वोच्च न्यायालयांत विशेष याचिका दाखल केली होती. या सर्व याचिका दिनांक **२६ सप्टेंबर १९९६** रोजी मा. सरन्यायाधीश ए.एम. अहमदी व न्या. सुजाता मनोहर यांच्या खंडपीठापुढे सुनावणीस आल्या.

विदर्भ व मराठवाड्यातील अनुशेषग्रस्त विद्यार्थ्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सुनावणीसाठी असल्यामुळे मी स्वतः व विधानपरिषदेतील माझे सहकारी मराठवाड्याचे शिक्षक आमदार श्री.पी.जी.दस्तुरकर असे आम्ही दोघेहि त्यादिवशी उत्सुकतेपोटी ही सुनावणी प्रत्यक्ष ऐकण्यासाठी गेलो होतो.

ही बाब सुनावणीसाठी आली तेंव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या मा. खंडपीठाने "मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद केलेल्या कारणांसाठी वैद्यकीय प्रवेशाबाबतचा जो नियम ४.१.२.१. रद्दबादल ठरविला. त्या नियमाची पुनर्रचना करणे हे राज्य शासनासाठी जास्त योग्य ठरेल" असे सॉलीसिटर जनरल यांना सुचविले.

"हे प्रकरण या न्यायालयाने निकालात काढेपर्यंत विद्यार्थ्यांचे भवितव्य अधांतरी टांगून राहू नये म्हणून राज्य शासनाने याबाबत येणाऱ्या अडचणीमध्ये लक्ष घातल्यास जास्त बरे होईल" असे मत खंडपीठाने व्यक्त केले व "महाराष्ट्र शासनाच्याच आवारात चेंडू असल्यामुळे आपल्याजवळ उपलब्ध असलेल्या सांख्यीकिय पुराव्यांच्या आधारे हा नियम तयार केल्यानंतर जे प्रश्न निर्माण झाले आहेत, त्यांच्याकडे लक्ष देवून महाराष्ट्र शासनानेच या नियमाची, जेणेकरून न्याय्य व वाजवी पद्धतीने त्यांचा वापर करता येईल अशी, पुनर्रचना करावी हे अत्यंत योग्य होईल" असेहि मा. खंडपीठाने सॉलीसिटर जनरल यांना सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्टपणे असे म्हटले आहे की, "आमच्या या सांगण्याला सॉलीसिटर जनरल यांचा प्रतिसाद अनुकूल होता, मात्र त्यांचे म्हणणे असे होते की 'मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय (२९ ऑगस्टचा) तातडीने अमलांत आणण्याचे बंधन त्या निर्णयानेच राज्यशासनावर घातले असून होणाऱ्या विलंबातून न्यायालयाच्या अवमानाचे प्रकरण ओढविण्याची धास्ती आहे. तेंव्हा या न्यायालयाने नियमाची पुनर्रचना करण्यासाठी राज्य शासनाला कांही वेळ द्यावा.' ही भूमिका आम्ही समजू शकतो व योग्य ती कारवाई पार पाडण्यासाठी राज्यशासनाला दोन आठवड्याची मुदत मंजूर करीत आहोत"

मा. सर्वोच्च न्यायालयासमोर वैद्यकीय जागांच्या समन्यायी वाटपाचा हा मुद्दा गेल्या ३ वर्षात निदान ३-४ वेळा तरी उपस्थित झाला. "समन्यायी वाटपाचा नियम" मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने रद्दबादल ठरविला असतांना सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा तो निर्णय कायम केला नाही तर शासनाने ज्या भोंगळपणे तो नियम केला होता तो भोंगळपणा काढून टाकून नियमाची पुनर्रचना करण्याची संधी शासनाला दिली, एवढेच नव्हे तर त्यासाठी दोन आठवड्याची मुदत सुद्धा दिली व त्यामुळे आपल्या या निर्णयाने अनुशेषग्रस्त भागांना न्याय देण्याची उत्तम संधी सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनाला उपलब्ध करून दिली. सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश (Order) **सहपत्र : नऊ** *(पृष्ठ ७५ पहा)* म्हणून सोबत दिला आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे शासनाने समन्यायी वाटपाबाबत घेतलेल्या भुमिकेशी सुसंगत अशी नियमांची पुनर्रचना १४ दिवसात पूर्ण करणे हा पर्याय शासनाला उपलब्ध होता. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची "प्रमाणित प्रत" मिळाली नसल्याचे (किंवा दुसरे काही) निमित्त सांगून ३० सप्टेंबर १९९६ रोजी प्रवेशार्थीना अनायसे वेगवेगळ्या केंद्रावर पूर्वीच बोलाविले असल्यामुळे प्रवेश उरकून टाकणे हा अविकसित भागाच्या विश्वासघाताचा दुसरा पर्याय शासनाला उपलब्ध होता.

३० तारखेच्या प्रवेशाबाबतच्या ज्या बातम्या सर्व केंद्रावरून येत आहेत त्यावरून शासनाने दुसऱ्या पर्यायाचा स्वीकार केलेला आहे ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या याचिकेमध्ये **"वाढवून मागितलेल्या २९० जागा मिळाल्या तर अविकसित भागांना त्या वाटून विद्यमान मागासलेपणा शक्य त्या मर्यादेपर्यंत दूर केला जाईल"** असे म्हणत असतांना २९० जागा जर मिळाल्या नाही तर महाराष्ट्र शासनाचे काय


**पांढरकवडा नगरपरिषदेतर्फे हार्दिक शुभेच्छा**

१. न. प.चे सर्व प्रकारचे कर नियमित वेळी भरुन सहकार्य करावे. २. नळाच्या पाण्याचा अपव्यय टाळावा. ३. शहरात विनापरवानगी बांधकाम करू नये . ४. रस्त्यावर अतिक्रमणे करू नये. ५. शहर स्वच्छ ठेवण्यास सहकार्य करावे. ६. जन्म मृत्यूची नोंद न. प. कडे मुदतीच्या आत करावी. ७. घरासमोर एक झाड लावून त्याची जोपासना करावी. ८. संपूर्ण साक्षरता अभियानात सहभागी व्हावे. ९. लायक जोडप्यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून राष्ट्रीय कार्यास मदत करावी. १०. अल्पबचतीमध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक करून शासनाच्या योजनेस सहकार्य करावे.

**दादाराव रोडे** *अध्यक्ष, नगरपरिषद पांढरकवडा*

**With the Best Compliments From**

**NUTEK**

**EQU - TS**

Chavan Market, Shyam Chowk, Amravati.

*Phone . ( O ) 78052, 670432 ( R ) 675683*

**Dealing In Engg. Scientific, Medical Equipments and Office Automation.**

धोरण राहील याबाबतचा स्पष्ट उल्लेख याच याचिकेमध्ये पुढील शब्दात आहे. :- **"It may not be desirable to withdraw the seats which were available to the students from the surplus university area this year"**

एका बाजूला १२ जुलै १९९६ रोजी सभागृहामध्ये "जागा वाढवून मिळाल्या तर ठीकच. **समजा त्या वाढवून मिळाल्या नाही तरी समन्यायी वाटप या वर्षापासून केले जाईल हे मान्य आहे का?" या प्रश्नाला मा. मंत्रिमहोदयांनी "मान्य आहे"** असे उत्तर द्यावयाचे व दुसऱ्या बाजूला सर्वोच्च न्यायालयामध्ये १२ सप्टेंबर १९९६ रोजी दाखल केलेल्या याचिकेमध्ये वरील प्रमाणे भूमिका घ्यावयाची व सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय कायम केलेला नसतांना व नियमाच्या पुनर्रचनेची संधी दिली असतांना शासनाने प्रवेश उरकून टाकावयाचे **या प्रकाराचे वर्णन "अविकसित भागाचा विश्वासघात" यापेक्षा वेगळ्या शब्दाने करता येणे शक्य नाही.**

भारताच्या मा. राष्ट्रपतींनी राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविणारे आदेश ९ मार्च १९९४ रोजी काढले असले तरी समन्यायी वाटपाबाबतचे आदेश महाराष्ट्राच्या राज्यपालांनी अजूनही काढले नाहीत व त्यामुळे सुद्धा अनुशेषग्रस्त भागातील लोकांवर फार मोठा अन्याय होत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने याच प्रकरणात दिलेल्या या निर्णयाच्या परिच्छेद ५ मध्ये असलेला पुढील उल्लेख लक्षात घेण्यासारखा आहे.

"Admittedly in the present case, the power conferred under article 371 (2) (c) of the Constitution i.e. an equitable arrangement providing adequate facilities for medical education, is not exercised"

समन्यायी वाटपाबाबतचे मा. राज्यपालांचे औपचारिक आदेश निर्गमित झाले असते तर कदाचित मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय वेगळा लागू शकला असता. **आजही मा. राज्यपालांकडे तशी मागणी आपणाला करता येते. नव्हे मा. राज्यपालांनी तशा प्रकारचे आदेश पारित करावे अशी मागणी मी जाहिरपणे करीत आहे.** वैद्यकीय (व यासारख्या इतर तांत्रिक अभ्यासक्रमात) जागा हे एक, नोकऱ्यांतील जागांमध्ये समन्यायी वाटप हे दोन व विकासकामावरील निधीचे समन्यायी वाटप या तीन क्षेत्रामध्ये घटनेच्या कलम ३७१ अन्वये मा. राज्यपालांना विशेष अधिकार प्राप्त झाले आहेत. आज भारतातील इतर कोणत्याहि राज्याच्या राज्यपालांना असे अधिकार नाहीत व महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांनासुद्धा ९ मार्च १९९४ पूर्वी असे अधिकार नव्हते. भारताच्या घटनेमध्ये महाराष्ट्रापुरता झालेला हा बदल मृतवत राहता कामा नये. "१९९६-९७ या वर्षासाठी वैद्यकिय जागांच्या समन्यायी वाटपाच्या शासनाने तयार केलेल्या प्रस्तावाशी राज्यपाल सहमत आहेत" असे नमुद करणारे राज्यपालांच्या उपसचिवांचे २० जुलै १९९६ चे पत्र **(सहपत्र : चौदा,** *पृष्ठ ९५ पहा)* शासनाने शपथपत्रावर औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये दाखल केले होते. त्या पत्राच्या पहिल्याच परिच्छेदात असे म्हटले आहे की :-

" The Governor of Maharashtra has agreed to the proposal of the State Government made in compliance of the directives of the Supreme Court, to distribute the seats in M.B.B.S. courses in medical colleges in the State among the students from different University regions in the State in proportion to the population of the respective University regions for the year 1996-97."

मा. राज्यपालांनी शपथपत्रावर औरंगाबाद उच्च न्यायालयासमोर हे जे विधान केले त्याला "कलम ३७१ च्या अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून काढलेल्या आदेशाचा" दर्जा नाही ही गोष्ट मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाने स्पष्ट झाली आहे. आंदोलनाची वाट न पहाता **मा. राज्यपालांनी समन्यायी वाटपाबाबतचे कलम ३७१ नुसारचे आदेश काढले (असते) तर निदान समन्याय स्थापन करण्यासाठी त्या कलमान्वये स्थापन केलेली ही व्यवस्था किती भरीव आहे किंवा पोकळ आहे हे तरी एकदा उच्च व सर्वोच्च न्यायालयामध्ये कसोटीला लागून जाईल. मा. राष्ट्रपतींच्या आदेशान्वये स्थापन केलेली ही व्यवस्था फक्त ५ वर्षासाठी असून त्यातील जवळ जवळ तीन वर्षे संपत आलेली आहेत.**

**जितक्या जागा आमच्या विभागात कमी आहेत तितक्या जागा उपलब्ध करून देणारी वैद्यकिय महाविद्यालये त्या विभागात काढली जावी अशी मागणी करण्याचा आणखी एक पर्याय अनुशेष ग्रस्त भागातील लोकांना उपलब्ध आहे.**

९५. वैद्यकीय जागाच्या समन्यायी वाटपाबाबत मा. राज्यपालांनी कलम ३७१ नुसार दिलेल्या अधिकारांचा वापर करून औपचारिक आदेश काढलेले नाहीत हे जसे खरे आहे तसेच विकासकामावरील निधीच्या समन्यायी वाटपाचे व शासकीय नोकऱ्यांमध्ये समन्यायी जागा वाटपाचे आदेशसुद्धा अजून पावेतो निघालेले नाही हेहि खरे आहे. जलसिंचनाच्या बाबतीत प्रचंड वाढत असलेला अनुशेष कमी झाला नाही तरी निदान तो आणखी वाढणार नाही याची काळजी घेण्याविषयी वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाल्यानंतर ३० ऑक्टोबर १९९४ रोजी मा. राज्यपालांना मी एक पत्र **(सहपत्र : पंधरा,** *पृष्ठ १०४ पहा)* लिहिले होते. या पत्राच्या परिच्छेद ७ व ८ मध्ये जलसिंचन या विकासक्षेत्रातील ८२ ची सरासरी व १९९२ ची सरासरी यांची अधिकृत आकडेवारी मी पुढील शब्दात मा. राज्यपालांच्या लक्षात आणून दिली होती :- "सत्यशोधन समितीने निश्चित केलेला अनुशेष हा जून १९८२ च्या स्तरावर प्रत्येक जिल्ह्याने पदरात पाडून घेतलेल्या सिंचन क्षमतेवर (प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये) मोजलेला होता. आता जून १९९२ पर्यंत प्रत्येक जिल्ह्याने पदरात पाडून घेतलेले सिंचन क्षमतेचे हेक्टरी परिमाण अधिकृतपणे उपलब्ध झालेले आहे. (गुरुवार दिनांक ३० डिसेंबर १९९३ रोजी विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या सातव्या यादीतील प्रश्न क्रमांक ३०९८१ च्या उत्तरामध्ये ही आकडेवारी समाविष्ट आहे). १९८२ च्या जून मध्ये २२.५५ टक्के असलेली राज्य सरासरी जून १९९२ मध्ये ३२.०१ झाली असल्याचे या अधिकृत शासकीय आकडेवारीमध्ये स्पष्टपणे दिसून येते. **अमरावती, अकोला, औरंगाबाद, बुलढाणा, उस्मानाबाद, यवतमाळ, जालना, लातुर, धुळे, रत्नागिरी, चंद्रपूर, वर्धा, सिंधुदुर्ग, ठाणे, बीड, नाशिक, रायगड हे सतरा जिल्हे राज्यसरासरीच्या काही हजार हेक्टरने खाली असल्यामूळे अनुशेषात असलेले जिल्हे म्हणून स्पष्टपणे दिसून येतात.** इतर १३ जिल्हे हे जिल्हा या नात्याने राज्यसरासरीच्या बरेच वर असल्याने बिगर अनुशेष जिल्हे आहेत."

९६. याच पत्राच्या परिच्छेद ११ मध्ये "वैधानिक विकास मंडळाच्या स्थापनेचे आदेश ३० एप्रिल १९९४ रोजी निघाल्यामुळे १९९४-९५ च्या अंदाजपत्रकामध्ये अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने कोणतीही उपाय योजना करता आली नाही याची आपणास जाणीव आहेच. १९९५-९६ चे अंदाजपत्रक सुद्धा या प्रयोजनासाठी निरुपयोगी ठरू नये यासाठी तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. संदर्भ २ वर नमूद केलेल्या आदेशाच्या परिच्छेद ७ मध्ये विकास खर्चासाठी निधीचे वाटप करण्याचे अधिकार विशेष जबाबदारी म्हणून राज्यपाल या नात्याने आपणाकडे सोपविण्यात आलेले आहेत. याच आदेशाच्या परिच्छेद ८ मध्ये स्पष्टपणे असेही नमूद केलेले आहे की, "The allocation of funds or outlays made by the Governor shall be effected in the Annual Financial Statement to be placed before the State Legislature and the developmental activities with regard to the outlays as aforesaid shall be carried out or caused to be carried out by the State

*वैद्यकीय प्रवेश आंदोलनाच्या सर्व पैलूंचे, घटकांचे आणि घटनांचे संकलन करणाऱ्या आपल्या विशेषांकास शुभकामना व*

हार्दिक शुभेच्छा
**डॉ.आर.एम बेंदरे**

हार्दिक शुभेच्छा
**डॉ. सुधाताई देशमुख.**

Government and the funds so allocated shall be non divertible from the area of one Board to that of another Board." ही बाब त्यांच्या लक्षात आणून शेवटी मी त्यांना " जून १९९२ च्या राज्यसरासरीच्या अनुषंगाने १३ जिल्हे बिगर अनुशेष जिल्हे व १७ जिल्हे अनुशेष जिल्हे म्हणून निश्चित झालेले आहेत. संदर्भ दोनवर नमूद केलेल्या आदेशाच्या परिच्छेद ७ व ८ अन्वये आपणास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आपण **जलसिंचनाच्या विकासक्षेत्रामध्ये जिल्हा या नात्याने राज्यसरासरीच्या वर असलेल्या १३ जिल्ह्यांना १५ टक्के व सरासरीच्या खाली असलेल्या १७ जिल्ह्यांना ८५ टक्के या प्रमाणात ९५-९६ च्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निधीचे वाटप करण्याबाबत तत्परतेने निर्देश द्यावे.** इतर विकास क्षेत्रामध्ये सुद्धा हेच १५/८५ चे निधी वाटपाचे सूत्र लागू करावे अशी आपणास विनंती आहे." अशी विनंती केली होती. माझे हे पत्र मा. राज्यपालांच्या कार्यालयात पोचल्याची रजिस्टर्ड पत्रासोबतची पोस्टाची पोचपावती मला परत आलेली असली तरी याबाबत खरोखरच काही कारवाई झालेली आहे किंवा कसे हे काही कळलेले नाही. **या पत्राची प्रत मी त्याचवेळी विदर्भ वैधानिक विकासमंडळाच्या अध्यक्षांनासुध्दा पाठविली होती.**

९७. अमरावती प्रादेशिक विभागांतर्गत चार जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पाबाबत चर्चा करण्यासाठी मा. पाटबंधारे मंत्री यांनी २४.४.१९९५ रोजी अमरावती येथे विभागीय आयुक्तांच्या कार्यालयामध्ये बैठक बोलाविलेली होती. अशा बैठकीमध्ये फक्त तोंडी काही बोलून समाधान मानण्याच्या प्रकारातून काहीही फायदा होत नाही. लेखी निवेदन देवून त्यावर चर्चा केली तर काही थोडीफार तरी हालचाल होते, असा अनुभव असल्यामुळे मी या बैठकीच्या पूर्वी मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती. यांच्यामार्फत एक लेखी निवेदन **(सहपत्र : सोळा,** *पृष्ठ १०६ पहा*) " जलसिंचनाच्या विकासक्षेत्रामध्ये जिल्हा या नात्याने राज्यसरासरीच्या वर असलेल्या सर्व जिल्ह्यांना १५ टक्के व सरासरीच्या खाली असलेल्या जिल्ह्यांना ८५ टक्के या प्रमाणात ९५-९६ च्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निधीचे वाटप करण्याबाबत." या विषयावर मा. पाटबंधारे मंत्र्यांना सादर केले होते. मा. राज्यपालांच्या पत्रात नमूद केलेल्या सर्व बाबी मा. पाटबंधारे मंत्र्यांच्या या निवेदनाद्वारे मी लक्षात आणून दिल्या होत्या व त्याशिवाय माझ्या या निवेदनाच्या परिच्छेद ११ मध्ये कृष्णा खोऱ्याबाबत मी असे नमूद केले होते की :-

"जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रातील विकसित भागांनी सत्यशोधन समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतरसुद्धा दुष्काळी तालुक्यांच्या नावाखाली खूप मोठ्या प्रमाणात निधी पळविला व अविकसित भागांची मोठीच पिळवणूक केली. आज महाराष्ट्रातील **हे विकसित भाग "कृष्णा खोरे पाणी तंटा लवादाचे" निमित्त करून मोठ्या प्रमाणावर निधी पळवू मागत आहेत. "महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले पाणी सन २००० हजार पर्यंत वापरले नाहीतर त्या पाण्यावरील महाराष्ट्राचा हक्क गमवला जाईल" असा धडधडीत असत्य प्रचार मोठ्या गाजावाजाने गेली काही वर्षे महाराष्ट्रात चालू आहे.** व मोठ्या प्रमाणात निधी पळविणे हाच या असत्य प्रचारामागील हेतू आहे, हे उघड आहे. वस्तुतः कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत लवादाने जो निर्णय दिलेला आहे त्याच्या आठव्या प्रकरणात असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की :-

"Failure of any state to make use of any portion of the water allocated to it during any water year shall not constitute forfeiture or abandonment of its share of water in any subsequent water year nor shall it increase the share of any other state in any subsequent water year even if such state may have used such water" -*Clause VIII (B) of chapter 7*

इतकेच नव्हे तर इ.स.२००० नंतर पुनर्विलोकनाची तरतूदसुद्धा या निर्णयात पुढील शब्दात नमूद आहे :-"At any time after the 31st May 2000 this order may be reviewed or revised by a competent authority or Tribunal" - *Clause XIV (A) of chapter 7*

गेली दोन तीन वर्षे सभागृहामध्ये मी हे सातत्याने सांगत आहे. असत्य प्रचाराच्या आधारावरसुद्धा राजकीय लूटमारीचे स्वरूप यावे एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी पळविण्याच्या या प्रकाराला पाटबंधारे विभागाला प्रतिबंध करता आला नाही. **बीड व उस्मानाबाद जिल्ह्याचा काही भाग कृष्णा खोऱ्यात येतो एवढा अपवाद सोडला तर कृष्णा खोऱ्यातील सर्व जिल्हे, जिल्हा या नात्याने सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार राज्यसरासरीच्या बरेच वर होते व १९९२ मध्ये ते आणखी वर गेलेले आहेत हेही नमूद करणे आवश्यक वाटते.**"

१९८२ ची राज्यसरासरी व १९९२ ची राज्यसरासरी याबाबतच्या अधिकृत आकडेवारी विषयी मी माझ्या निवेदनाच्या परिच्छेद १२ मध्ये "सत्यशोधन समितीने निश्चित केलेला अनुशेष हा जून १९८२ च्या स्तरावर प्रत्येक जिल्ह्याने पदरात पाडून घेतलेल्या सिंचन क्षमतेवर (प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये) मोजलेला होता. **आता जून १९९२ पर्यंत प्रत्येक जिल्ह्याने पदरात पाडून घेतलेले सिंचन क्षमतेचे हेक्टरी परिमाण अधिकृतपणे उपलब्ध झालेले आहे.** (गुरुवार दिनांक ३० डिसेंबर १९९३ रोजी विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या सातव्या यादीतील प्रश्न क्रमांक ३०९८१ च्या उत्तरामध्ये ही आकडेवारी समाविष्ट आहे)." असा उल्लेख करून "अनुशेष दूर करण्यासाठी राज्यस्तरीय निधीचे वाटप करण्यासाठीची एक निश्चित पद्धती सत्यशोधन समितीने सुचविली होती. "आमच्या या पद्धतीमध्ये प्रत्येक वार्षिक योजनेमध्ये विवक्षित क्षेत्र, योजना, उपक्षेत्र, कार्यक्रम यांच्यासाठी तरतूद किती आहे हे पाहणे, यापैकी १५ टक्के रक्कम ही अनुशेषाशी संबधित नसलेली चालू कामे पूर्ण करण्याकरिता व नैसर्गिक वाढविस्ताराच्या सर्व जिल्ह्यांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता राखून ठेवणे, आणि उरलेल्या **८५ टक्के निधीचे वाटप अनुशेष असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये त्यांच्या आजच्या राज्यसरासरीपासून काढलेल्या अनुशेषाच्या प्रमाणात वाटून देणे** या तीन गोष्टींचा समावेश आहे" अशा प्रकारची शिफारस समितीने परिच्छेद १७.३३ मध्ये केलेली आहे." याची आठवण करून दिली होती व शेवटी "जून १९९२ च्या राज्यसरासरीच्या अनुषंगाने १३ जिल्हे बिगर अनुशेष जिल्हे व १७ जिल्हे अनुशेष जिल्हे म्हणून निश्चित झालेले आहेत. जुलै १९९५ मध्ये अंदाजपत्रक सादर करतांना जलसिंचनाच्या विकासक्षेत्रामध्ये **जिल्हा या नात्याने राज्यसरासरीच्या वर असलेल्या १३ जिल्ह्यांना १५ टक्के व सरासरीच्या खाली असलेल्या १७ जिल्ह्यांना ८५ टक्के या प्रमाणात ९५-९६ च्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निधीचे वाटप करण्याबाबत पाटबंधारे विभागाने काळजी घ्यावी अशी आपणास विनंती आहे.**" अशी विनंती केली होती.

९८. दिनांक २४ एप्रिल १९९५ रोजी मा. पाटबंधारे मंत्री यांना मी सादर केलेल्या उपरोक्त निवेदनात जे मुद्दे उपस्थित केले होते, त्याबाबत १२ ऑगस्ट १९९६ रोजी मला एक पत्र **(सहपत्र : सतरा,** *पृष्ठ ९५ पहा*) पाठवून त्या मुद्यांबाबतचे आपले अभिप्राय त्यांनी कळविलेले आहेत. **अनुशेष दूर न करण्याच्या संदर्भात गेली अनेक वर्षे जी पोथीनिष्ठ कारणे सांगितले जातात, तीच कारणे या पत्रात त्यांनी पुन्हा नमूद केलेली आहेत.** ही कारणे नमूद करतांना आपल्या पत्रात ते म्हणतात "वार्षिक योजनेतून पाटबंधारे प्रकल्पांना तरतुदी वितरित करतांना प्रगतावस्थेतील व सिंचनक्षम प्रकल्पांना केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्राधान्य द्यावे लागते. **बाह्य सहाय्यित प्रकल्पांच्या बाबतीत कर्जसहाय्य देणाऱ्या संस्थेबरोबर झालेल्या करारातील तरतुदीनुसार निधी उपलब्ध करून द्यावा लागतो.** पाणी वाटप लवाद निर्णयातील तरतुदीनुसार राज्याच्या वाट्याला आलेल्या अनुज्ञेय पाणीवापराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संबंधित पाटबंधारे प्रकल्पांचा प्राधान्याने विचार करावा लागतो. प्राधान्यक्रमात सिंचन विकासात अनुशेष दूर करण्याच्या


**NISHANT ELECT.**

**MORSHI ROAD, AMRAVATI.**

Ph. No. 77177

**Authorised Dealer.**

**BPL Refrigeration Ltd.**

**अमरावती विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघ, अमरावती.** *(र.नं.एन.जी.पी. ३०२५)* च्या वतीने

***नुटा बुलेटीनला शुभेच्छा.***

**प्रवीण राठोड** अध्यक्ष | **अशोक वानखडे** महासचिव | **कैलाश पाटील** सहसचिव

**योगेश कांत,** कोषाध्यक्ष : : **गजानन वनस्कर,** सहसचिव

कु. आर. व्ही. पटके, धनंजय पाटील, एन. ओ. घाटोळे, जी. बी. शिरसाट, एम. व्ही. चिलूरकर,डी. एस. सरोदे सदस्य

सौजन्य :- विद्या ग्रॉफिक्स, नागपूर

मुद्याबरोबरच उपरोक्त अन्य घटकांचा विचार होणे अपरिहार्य आहे." "**त्यामुळे आपण आपल्या निवेदनात सुचविल्यानुसार अनुशेष जिल्ह्यांसाठी ८५ टक्के व इतर जिल्ह्यासाठी १५ टक्के याप्रमाणे अर्थसंकल्पात तरतुदी करणे शक्य होत नाही.** " असे त्यांनी आपल्या पत्रात स्पष्टच नमूद केलेले आहे. "सत्यशोधन समितीच्या शिफारसींवर विचार करण्यासाठी शासनाने शक्तीप्रदत्त समिती नियुक्त केली होती. **या समितीनेही आपल्या अहवालात १५ टक्के ८५ टक्के सूत्र अवलंबणे व्यवहार्य नसल्याचे मत व्यक्त केले आहे.**" अशीही माहिती पाटबंधारे मंत्र्यांनी मला लिहिलेल्या या पत्रात दिली आहे. पूर्वीचे सत्ताधारक पत्राची नुसती पोच देत असत. लूटमारीची कारणे पत्रोत्तराद्वारे नमूद करीत नसत. **अनुशेष कां वाढत आहे व तो कमी कां होत नाही व तो कमी कसा होवू शकणार नाही याची कारणे स्पष्ट शब्दात नमूद करणाऱ्या विद्यमान पाटबंधारे मंत्र्यांचे अनुशेषग्रस्त भागाने आभारच मानले पाहिजेत.**

९९. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर तिसऱ्या योजनेपासून तर सातव्या योजनेच्या अखेरपर्यंत म्हणजे १९६१ ते १९९० या ३० वर्षाच्या कालखंडात शासनाने मोठ्या, मध्यम व लघुपाटबंधाऱ्यांच्या राज्यस्तरीय प्रकल्पावर एकूण ४२४२.२५ कोटी रुपयाची गुंतवणूक केली, त्यापैकी फक्त (२१.९० टक्के) ९२९.०४ कोटी रुपये विदर्भाच्या वाट्याला आले. मराठवाड्याला (२७.५४ टक्के) ११६८.३६ कोटी रुपये मिळाले व २१४४.८५ कोटी रुपये म्हणजे निम्म्याहून जास्त रक्कम (५०.५६ टक्के) उर्वरित महाराष्ट्राला मिळाली. त्याचा परिणाम विदर्भ व मराठवाड्याचा जलसिंचनाचा अनुशेष वाढण्यामध्ये झाला. सत्यशोधन समितीच्या अहवालाप्रमाणे त्यावेळच्या सरासरीवर अनुशेष किती होता, १९९० च्या व १९९२ च्या सरासरीवर तो किती झाला याची तपशीलवार माहिती **सहपत्र : पंधरा व सोळा** *(पृष्ठ १०४ व १०६ पहा)* मध्ये दिलेली आहे. त्याची पुनरावृत्ती करीत नाही. विदर्भ व मराठवाड्याचा अनुशेष फार मोठ्या प्रमाणात वाढविण्यास पुढे कारणीभूत ठरणाऱ्या एका अत्यंत महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष वेधणे मला आवश्यक वाटते. खर्चाच्या पूरक मागण्यांचा समावेश असलेले "**१९९६-९७ चे खर्चाचे पूरक विवरणपत्र**" दिनांक ३० जुलै १९९६ रोजी सभागृहाला सादर झाले. त्या विवरण पत्राच्या पृष्ठ ६३ वर पाटबंधारे विभागाची एक "लहानशी" मागणी (बाब क्रमांक ८४) नमुद आहे. या मागणीच्या स्पष्टीकरणात्मक शासकिय निवेदनामध्ये पाटबंधारे मंत्र्यांनी असे नमूद आहे की :-

"कृष्णा पाणी तंटा न्यायाधिकरण निवाड्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. कृष्णा नदीचे पाणी उपयोगात आणणे या मुख्य उद्दिष्टासह या प्रदेशाच्या पाटबंधारे प्रकल्पाचे (मोठे, मध्यम, लहान व जलविद्युत) प्रचालन व प्रवर्तन त्याचप्रमाणे लाभक्षेत्रविकास प्राधिकरण व पूर नियंत्रण यासारखे इतर संलग्न कार्यक्रम महामंडळामार्फत हाती घेण्यात येतील. **उद्दिष्टांच्या पूर्ततेबाबत खात्री करून घेण्यासाठी रु. ७,१०० कोटीच्या वित्तीय सहाय्याचा लाभ करून घेणे महामंडळाच्या दृष्टीने आवश्यक असेल. यापैकी राज्य शासन, पाच वर्षाच्या कालावधीमध्ये रु. ३,५०० कोटी एवढ्या रकमेची तरतूद करील. भाग भांडवली अंशदान म्हणून राज्य शासनाने ही रक्कम मंजूर करण्याचे ठरविण्यात आले आहे.** महामंडळाच्या उर्वरित वित्तीय गरजा खुल्या बाजारातील कर्जे उभारून भागविण्यात येतील. आस्थापना, कामकाज, परतफेड दायीत्व आणि इतर अनुषंगिक खर्च यामुळे होणारा महामंडळाचा एकूण खर्च राज्य शासन करील"

**१००.** पाटबंधारे विभागाच्या या मागण्या दिनांक ६ ऑगस्ट १९९६ रोजी सभागृहापुढे चर्चेसाठी होत्या. रमेश किणी प्रकरणामुळे झालेल्या गोंधळामुळे कोणतीही चर्चा न होता अर्ध्या मिनिटात या मागण्या मंजूर झाल्या. बाब क्रमांक ८४ वर मंजूर झालेल्या **पाटबंधारे विभागाच्या या एका मागणीमध्ये महत्तम अनुशेष असलेल्या जलसिंचन या विकासक्षेत्राचा विद्यमान अनुशेष आणखी वाढविण्याचे जे प्रचंड सामर्थ्य आहे ते लक्षात घेतले म्हणजे अनुशेषग्रस्त भागावर भविष्यात जो वरवंटा फिरविला जाणार आहे त्यांचा अंदाज येण्यास वेळ लागत नाही.** आता पुढच्या ४-५ वर्षात ७१०० कोटी रुपये जलसिंचनासाठी कृष्णा खोऱ्यामध्ये ओतणार. त्यापैकी ३५०० कोटी रुपये सरळ सरळ कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या भाग भांडवलामध्ये शासनाचे अंशदान असेल व ३६०० कोटी रुपये खुल्या बाजारातून कर्जरूपाने या महामंडळासाठी उभारण्यात येईल. या कर्जाच्या परतफेडीचे दायीत्व सुद्धा शासनाने स्वीकारले आहे. याशिवाय या महामंडळाची आस्थापना, कामकाज आणि परतफेडीच्या दायीत्वासह इतर अनुषंगिक खर्चसुद्धा राज्य शासन करील.

१०१. पुरवणी मागणीचे शासनाने नमूद केलेले उपरोक्त स्पष्टीकरणात्मक निवेदन ज्यावेळी मी वाचले त्यावेळी दादाभाई नौरोजी यांनी विलायतेत केलेल्या एका अविस्मरणीय भाषणामधील ते प्रसिद्ध वाक्य मला आठवले. इंग्रज राज्यकर्त्यांना उद्देशून ते म्हणतात "**महम्मद गझनीने १८ स्वाऱ्या करून हिंदुस्थान लुटला असे इतिहासकार सांगतात, पण त्याने या सर्व स्वाऱ्यात लुटून नेलेली संपत्ती ही तुम्ही एका वर्षात लुटून नेता तितकी होवू शकली नाही**"

यापूर्वीच्या महाराष्ट्राच्या सत्ताधाऱ्यांनी गेल्या ३० वर्षात निर्माण केलेल्या अनुशेषाएवढा (जलसिंचन या विकासक्षेत्रात) अनुशेष निर्माण करण्याचे सामर्थ्य या एका पुरवणी मागणीमध्ये आहे. **यापूर्वीच्या ३० वर्षातील ४२४२ कोटी रुपयापैकी निदान ९२९ कोटी रुपये विदर्भाला व ११६८ कोटी रुपये मराठवाड्याला मिळाले तरी होते; यापुढे आम्ही मेलो काय किंवा जगलो काय? या ७१०० कोटी रुपयापैकी एक छदामसुद्धा विदर्भाला किंवा मराठवाड्याला मिळणार नाही.** मात्र ३६०० कोटी रुपयाच्या कर्ज फेडीचे जे उत्तरदायीत्व महाराष्ट्र शासनाने स्वीकारले आहे, त्यात आमचा सहभाग सक्तीचा असेल. आमच्या या पिढीची शक्ती कृष्णा खोऱ्यासाठी ३५०० कोटीचे भागभांडवल उभारून देण्यामध्ये व ३६०० कोटी रुपयाच्या कर्जाच्या उभारणीसाठी सहभागी होण्यात खर्ची पडेल. उभारलेल्या या द्रव्यबळातून बिगर अनुशेष जिल्ह्यांमध्ये निर्माण होणाऱ्या अतिरिक्त सिंचनक्षमतेचा थंडगार वारा त्या जिल्ह्यात सुटत असतांना मागास जिल्ह्यामध्ये वाढलेल्या अनुशेषाचा रखरखीत व दाहक असा प्रचंड डोंगर शिरावर घेवून आमच्या पुढच्या पिढ्या व्याज व मुद्दलाचे हप्ते फेडण्यात सहभागी व समभागी झालेल्या असतील.

**१०२.** अनुशेषाचा डोंगर वाढविण्याचा हा सारा प्रकार ज्या पाटबंधारे खात्याच्या मंत्र्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून सुरू आहे ते विदर्भातीलच आहेत हे विशेष. "तुमच्या भागातील मंत्री काय करीत होते?" अशी बोलणी खात या भागातील लोक व्याजाचे हप्ते फेडत असतांना सत्तेतुन बाहेर पडल्यानंतर मंत्र्यांना मात्र अनुशेष वाढल्यामुळे वेगळ्या विदर्भाची मागणी करण्याचा मार्ग मोकळा असेल. **सत्ताधारक राजकिय पक्षाने सत्ताधारी असतांना भरभरून अनुशेष वाढविण्याचे काम करावयाचे व त्याच पक्षाने नंतर विरोधी पक्ष या नात्याने विदर्भावर सतत अन्याय होतो म्हणून वेगळ्या विदर्भाची मागणी करावयाची; दुसऱ्या बाजूला कालपर्यंत विदर्भाच्या अनुशेषामुळे संतप्त होत असलेल्या विरोधी पक्षाने सत्ताधारक होताच तो अनुशेष वाढविण्याचे काम दुप्पट जोमाने सुरू करावयाचे हा "विदर्भ विकासाचा सर्वपक्षीय कार्यक्रम" आणखी ५-१० वर्षे असाच सुरू राहीला तर निर्माण झालेल्या अनुशेषाचा प्रचंड डोंगर पाहून "विदर्भ वेगळा काढून द्या" म्हणणारी चळवळ उद्या पश्चिम महाराष्ट्रातुन सुरू झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.**

१०३. सर्वच विकास क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात अनुशेष वाढलेला आहे हे खरे असले तरी जलसिंचन, रस्तेविकास व पाणीपुरवठा ही तीन महत्तम अनुशेष असलेली प्रमुख विकासक्षेत्रे आहेत. **अनुशेष निर्मुलनासाठी प्रयत्न झाला तर तो अनुशेष प्रयत्नांच्या प्रमाणात दुर होवू शकतो.** सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये नागरी पाणी पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेला प्रदेश (Region) म्हणजे विदर्भ. २७३ दशलक्ष लिटर्स दरदिवशी म्हणजे सर्वात जास्त अनुशेष असलेल्या या प्रदेशातील सर्वात जास्त (६१ दशलक्ष लिटर्स दरदिवशीचा) अनुशेष असलेला क्रमांक एकचा जिल्हा म्हणजे अमरावती, त्यातील महत्तम अनुशेष असलेले क्रमांक

*पुढील मजकुर पृष्ठ १०९ वर .....*

*श्री. साधकाश्रम अर्धवन व्दारा संचालीत*

**श्री. संत गजानन महाराज महाविद्यालय,**

मुकुटबन जि. यवतमाळ.

**'नुटा' ने हाती घेतलेल्या कार्याला शुभेच्छा**

**लच्छारेडी चिंतलवार,** *अध्यक्ष*

**भोजोरेडी लच्छारेडी चिंतलवार,** *सचिव*

***श्री साधकाश्रम अर्धवन ता. झरी जामणी***

***शेतकरी शिक्षण संस्था मारेगांव ( रोड ) व्दारा संचालीत***

***कला महाविद्यालय मारेगांव ( रोड )***
***तथा कला वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय मारेगांव ( रोड)***

**हरीश सिडना** *अध्यक्ष*

**अँड. भास्कर ठवस** *उपाध्यक्ष*

**दिगांबर मस्की** *सचिव*

*सहपत्र दोन : परिच्छेद ११ पहा*

# विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, १९९४

**महाराष्ट्र शासन राजपत्र**

**असाधारण : प्राधिकृत प्रकाशन : रविवार, मे १ १९९४**

भाग चार पृष्ठ क्रमांक २३२ अ ते २३२ ड

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

महाराष्ट्राच्या राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय

राजभवन मुंबई ४०० ०३५, दिनांक ३० एप्रिल १९९४

**आदेश**

क्रमांक जीएस/जी/९४, डीबी/४३२ - भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१ व्दारे भारताच्या राष्ट्रपतींनी काढलेला महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश १९९४ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून मी पी.सी.अलेक्झांडर, महाराष्ट्राचा राज्यपाल, पुढीलप्रमाणे आदेश काढीत आहे :-

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ -** (१) या आदेशास विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, १९९४ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्यपालांनी, शासकीय राजपत्रातील आदेशाद्वारे नेमून दिलेल्या दिनांकास अंमलात येईल.

*सहपत्र एक : परिच्छेद ११ पहा*

**Copy of the Notification issued by the Government of India.**

**GOVERNMENT OF INDIA**
***Ministry of Home Affairs (Gruh Mantralaya)***
New Delhi, dated the 9th March 94.

G.S.R.E. 310 (E)
The following order made by the President of India on the 9th day of March, 1994
is published for general information.

**ORDER**

**Whereas** both Houses of the Maharashtra State Legislature passed unanimous resolutions on the 26th July 1984, requesting the President of India to make an order in exercise of the powers conferred by clause (2) of Article 371 of the Constitution of India, for establishment of Separate Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra.

**And Whereas** it is expedient to give effect to the resolutions passed by the Maharashtra State Legislature as aforesaid;

**Now Therefore**, in exercise of the powers conferred by clause (2) of Article 371 of the Constitution of India, the President of India hereby makes, with respect to the State of Maharashtra, the following order :-

**1) Short title, commencement and duration :**

(1) This order may be called the State of Maharashtra (Special Responsibility of Governor for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra) Order,

(2) It shall come into force on the day appointed by the President on this behalf.

(3) It shall remain in force for the period of five years from the date it comes into force or upto such date as the President may, by order made in this behalf, specify.

**2. Special responsibility of governor :**

The Governor of Maharashtra shall have special responsibility for the establishment of separate Development Boards for Vidarbha, Marathwada and the rest of Maharashtra and for matters specified in sub-clauses (b) and (c) of clause (2) of Article 371 of the constitution in respect of the area of each such Development Board.

New Delhi
Dated the 9th March, 1994

Sd/-**S.D.Sharma**
President of India

(F.No.20012/4/90-SR)
New Delhi
Dated the 9th March, 1994

Sd/-**(N.N.Vohra)**
Home Secretary

(३) जोपर्यंत महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश १९९४ अंमलात राहील त्या तारखेपर्यंत व ती तारीख धरून तो अंमलात राहील.

**२ विकास मंडळाची स्थापना -** महाराष्ट्राचे राज्यपाल या बाबतीत काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे, महाराष्ट्र राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी प्रत्येकी एक स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करतील ही मंडळे अनुक्रमे पुढीलप्रमाणे ओळखली जातील :-

*(अ)* विदर्भ विकास मंडळ

*(ब)* मराठवाडा विकास मंडळ

*(क)* उर्वरित महाराष्ट्राकरिता विकास मंडळ

**३. विकास मंडळाची कार्यक्षेत्रे -** या मंडळाची कार्यक्षेत्रे यात पुढे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील -

*(अ)* विदर्भ विकास मंडळाच्या अधिकाराखाली नागपूर आणि अमरावती महसूल विभागाचा समावेश असेल.

*(ब)* मराठवाडा विकास मंडळाच्या अधिकाराखाली औरंगाबाद महसूल विभागाचे क्षेत्र राहील.

*(क)* उर्वरित महाराष्ट्रासाठीच्या विकास मंडळाच्या अधिकाराखाली कोंकण, पुणे आणि नाशिक महसूल विभागाचे क्षेत्र राहील.

**४ विकास मंडळाची रचना - (१)** प्रत्येक विकास मंडळामध्ये अध्यक्ष धरून जास्तीत जास्त ७ सदस्य असतील आणि त्यांची नियुक्ती राज्यपालांकडून करण्यात येईल.

*(अ)* संबंधित विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रामधून महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील एक सदस्य,

*(ब)* संबंधित विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक प्राधिकरणामधून एक सदस्य,

*(क)* ज्यांना -

*(एक)* नियोजन प्रक्रिया, अशासकीय वित्त व्यवस्था व **लेखे यामधील** विशेष ज्ञान असेल किंवा

*(दोन)* वित्तीय व प्रशासकीय बाबींचा व्यापक अनुभव असेल किंवा

*(तीन)* पाटबंधारे, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, उद्योग, कृषी, शिक्षण किंवा सेवायोजन यासारख्या विविध क्षेत्रातील विशेष ज्ञान असेल अशा व्यक्तींमधील तीन तज्ञ व्यक्ती,

*(ड)* संबंधित विकास मंडळाच्या क्षेत्रातील महसूल विभागाचा आयुक्त,

*(इ)* संबंधित विकास मंडळाच्या क्षेत्रातील महसूल विभागाच्या अतिरिक्त आयुक्तांच्या कमी दर्जाचा नसेल असा, राज्य शासनाचा अधिकारी

(२) खंड (१) च्या उपखंड (इ) मध्ये निर्दिष्ट केलेला अधिकारी हा प्रत्येक संबंधित विकास मंडळाचा सदस्यसचिव असेल.

**५ अध्यक्ष आणि सदस्यांचा पदावधी आणि त्यांना देय असलेले भत्ते :-**

*(१)* अध्यक्ष आणि सदस्य यांचा पदावधी, त्यांच्या नियुक्तीच्या वेळी राज्यपाल विनिर्दिष्ट करतील त्याप्रमाणे राहील. राज्यपाल, अध्यक्षांसह कोणत्याही सदस्यांची नियुक्ती त्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी रद्द करू शकतील किंवा यथास्थिती, मंडळाची मुदत पूर्ण होण्यापूर्वी पुनर्रचना करू शकतील.

*(२)* अध्यक्ष आणि खंड ४ च्या उपखंड (१) मधील परिच्छेद (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संदस्यांव्यतीरिक्त इतर सदस्य हे सदस्य असतील आणि ज्या प्रवर्गामधून तो सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आला असेल त्या प्रवर्गाना सदस्य असल्यास तो रद्द झाल्याबरोबर तो असा सदस्य किंवा यथास्थिती, अध्यक्ष असण्याचे बंद होईल.

*(३)* खंड ४ च्या उपखंड (१) च्या परिच्छेद (ड) व (इ) मध्ये निर्देशिलेल्या सदस्याव्यतीरिक्त अध्यक्षांसह कोणत्याही सदस्यास कोणत्याही क्षणी आपल्या पदाचा लेखी राजीनामा स्वतःच्या सहीने राज्यपालांकडे देता येईल आणि ज्या दिवसापासून त्यांचा राजीनामा राज्यपालांकडून स्वीकृत करण्यात येईल त्या दिवसापासून तो पदमुक्त झाल्याचे मानण्यात येईल.

*जनशक्ती शिक्षण संस्था , पांढरकवडा*
*संचालित*

**श्री. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा.**
**स्व. पांडुरंग मोरे विद्यालय, उमरी कापेश्वर.**

**श्री. बाळासाहेब देशमुख पारवेकर** — *अध्यक्ष*
**श्री. अण्णासाहेब देशमुख पारवेकर** — *सचिव.*

*आमचे प्रेरणा - स्त्रोत : डॉ. पंजाबराव देशमुख*
**"सहकाराचे हजारो हात, पोहचले आहेत घराघरात"**
**दि. डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को. ऑप. बँक लि.**
*मुख्य कार्यालय : इर्विन चौक, अमरावती.*
* ठेवीदारांच्या विश्वासास पात्र बँक. * ठेवीदारांना आकर्षक व्याज. * सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था. * संपूर्ण जिल्ह्यात १४ शाखांद्वारे ग्राहकांची सेवा.

**प्रा. प्रमोद काळे** — *अध्यक्ष*
**सौ. ज्योती इंगोले** — *उपाध्यक्ष*
**वसंत बंडु पंत** — *कार्यकारी संचालक*

*(४)* अध्यक्षाला आणि सदस्यांना विकास मंडळाच्या बैठकींना हजर राहण्यासाठी आणि विकास मंडळाची इतर कोणतीही कामे करण्यासाठी राज्यपाल, वेळोवेळी ठरवून देतील अशी फी व भत्ते आणि खंड ४ च्या उप खंड (१) च्या परिच्छेद (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सदस्यांला फी व भत्ते याखेरीज राज्यपाल वेळोवेळी ठरवून देतील असे मानधन देण्यात येईल.

६. **विकास मंडळाची कार्ये** - विकास मंडळ वेळोवेळी

*(अ)* संपूर्ण राज्यातील विकासाच्या पातळ्याच्या तुलनेत योग्य निर्देशांकाच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध विकास क्षेत्रांची विकासाची सापेक्ष पातळी निश्चित करणे.

*(ब)* मंडळाच्या क्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने तसेच त्या भागातील विकासाचा अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामाचे मूल्यमापन करणे.

*(क)* वार्षिक, तसेच पंचवार्षिक योजनेच्या काळात विकास मंडळाच्या क्षेत्रावरील विकास खर्चाच्या पातळ्या सुचविणे; आणि

*(ड)* मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करणे व तो महाराष्ट्र राज्य विधान मंडळापुढे सादर करण्यासाठी प्रत्येकी वित्तीय वर्ष संपल्यावर व्यवहार्य असेल तेथवर ३ महिन्यांच्या कालावधीत राज्यपालांना सादर करणे.

७. **विकास खर्चासाठी निधीचे वाटप** - एकूण राज्याची गरज विचारात घेऊन विकास मंडळाच्या क्षेत्रावरील विकास खर्चासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल समन्यायाने निधीचे वाटप व्हावे याची खातर जमा करतील.

(२) निधीचे समन्यायाने वाटप होईल याची खातर जमा करताना राज्यपाल-

*(अ)* विकास मंडळाने कोणत्याही शिफारसी केल्या असल्यास त्या विचारात घेतील, आणि

*(ब)* निधीच्या वाटपाच्या बाबतीत, राज्यपाल त्यांना आवश्यक आणि योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीचा किंवा व्यक्तिसंघाचा सल्ला घेऊ शकतील.

८. **वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये, निधीच्या वाटपाचा निर्देश करणे :-** निधी किंवा नियतव्यय यांच्या, राज्यपालांनी ठरवून दिलेल्या वाटपाचा राज्य विधिमंडळापुढे सादर करावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निर्देश करण्यात येईल आणि उपरोक्त नियतव्ययाशी संबंधित विकास कार्ये राज्य शासनाकडून पूर्ण करण्यात येतील, वा पूर्ण करून घेण्यात येतील आणि अशा प्रकारे देण्यात आलेला निधी हा एका मंडळाच्या कार्यक्षेत्रामधून दुसऱ्या मंडळाच्या कार्यक्षेत्राकडे वळवता येणार नाही. परंतु -

*(अ)* एखाद्या मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये पुर्वोक्तानुसार हाती घेण्यात आलेल्या विकास कार्याच्या बाबतीत, अर्थसंकल्पीय नियम व कार्यपद्धतीला अनुरूप असे पुनर्विनियोजन करता येईल;

*(ब)* विकास कार्याची अंमलबजावणी करतांना सध्याचे मापदंडच लागू राहतील आणि

*(क)* विकास कार्यावर संबंधित प्रशासकीय विभागाचे प्रशासकीय व तांत्रिक पर्यवेक्षण, तसेच नियंत्रण सध्याप्रमाणे चालू राहील.

९. **राज्यपालांकडून निदेश** - विकास मंडळाच्या कार्यपद्धतीच्या संदर्भात राज्यपाल विकास मंडळाला वेळोवेळी आदेशाद्वारे निदेश देऊ शकतील.

**१०. शिक्षण, प्रशिक्षण आणि सेवायोजन यासाठी सुयोग्य व्यवस्था -** राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन प्रत्येक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी तंत्रशिक्षण व व्यावसायीक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवामध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्यायी व्यवस्था करण्याची राज्यपाल खातरजमा करतील आणि त्यासाठी राज्यपाल, वेळोवेळी, राज्य शासनास योग्य ते निदेश देतील; आणि असे करीत असतांना आवश्यक आणि योग्य वाटल्यास राज्यपाल कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा व्यक्तिसंघाचा या बाबतीत सल्ला घेऊ शकतील.

**११. नियम** - संविधानाच्या अनुच्छेद ३७१, खंड (२) खालील राज्यपालांच्या कर्तव्याच्या संबंधातील कामकाज योग्य रित्या पार पाडण्यासाठी आणि या आदेशातील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्यपाल, वेळोवेळी, त्यांना आवश्यक वाटतील असे नियम आदेशाद्वारे तयार करतील.

राजभवन, मलबार हिल — सही
मुंबई ४०० ०३५ — **पी.सी.अलेक्झांडर**
दिनांक ३० एप्रिल १९९४ — महाराष्ट्राचे राज्यपाल

*सहपत्र चार : परिच्छेद ४५ व ८५ पहा*

**IN THE SUPREME COURT OF INDIA**

*CIVIL APPELLATE JURISDICTION*

*CIVIL APPEAL NO OF 1995*

(Arising out of S.L.P. (C) No. 23276 of 1994)
588000

Mohd. Ansar & Ors .... Appellants

***Versus***

State of Maharashtra & Ors .... Respondents

***ORDER***

Sepcial leave granted. Heard counsel : on either side

Two questions were posed before us, the first relating to the adimission of the students and the second, refusal of the High Court to consider the question regarding equitable distribution of seats. As far as Question of adimission of students is concerned, having regard to the passage of time and the complications that may ensure we are not inclined to interfere with the order of the High Court. **So far as Question of equitable distribution is concerned,** which has been dealt with in paragraphs 99 and 99A & 99B, we are inclined to think that question is likely to raise its head year after year and therefore, **It would be desirable to put an end to the contention rather than keeping the question open as the High Court has done.** we, therfore, set aside that part of the High Court order and remit the matter back to the High Court decision on the question regarding equitable distribution of seats as raised before it. In Order that this question is settled at the earliest and before the question of admission to the next academic years begins it is desirable that the High Court gives priority to this matter and disposes it of as early as possible the question being of recurring nature. We therefore remit the matter for this limited purpose to the High Court with a request to the High Court to give priority to the question at issue and dispose it of as early as possible preferably before the next academic year commences. The appeal will stand disposed of accordingly with no order as to costs.

**New Delhi** — **K.S.Paripoornan**
**March 27, 1995** — **Sujata V.Manohar**

***राज्यपालांचे सचिवालय***

***राजभवन, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५***

**दिनांक ३० एप्रिल १९९४.**

**आदेश** : क्रमांकजीएसए/९४/डीबी/४३३- विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता विकास मंडळे **(विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता विकास मंडळे आदेश १९९४)** आदेश १९९४ याच्या खंड १, उपखंड (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याव्दारे दिनांक १ मे १९९४ हा दिनांक उक्त आदेश अंमलात येण्याचा दिनांक म्हणून नियत करीत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही : **सतीश त्रिपाठी**
राज्यपालांचे सचिव


वैद्यकीय क्षेत्रातील जिव्हाळ्याच्या समस्यांना योग्य तो न्याय मिळविण्यासाठी हाती घेतलेल्या चळवळीस

*हार्दिक शुभेच्छा*

**पांढरकवडा डॉक्टर्स संघटना.**

"राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप व या जागांच्या अनुशेषासंबंधी" च्या नुटा बुलेटीन विशेषांकास आमच्या

**हार्दिक शुभेच्छा.**

**इंडियन मेडिकल असोसिएशन, बुलढाणा.**

**डॉ. जे. के. लांडे** — **डॉ. जे. बी. राजपूत**
अध्यक्ष — सचिव

*सहपत्र तीन : परिच्छेद १४ व १७ पहा*

# वैद्यकीय महाविद्यालयीन प्रवेशासंबंधी अमरावती विभागावर झालेल्या अन्यायाविरुद्ध दिलेल्या लढ्याचा वृत्तांत

दरवर्षी प्रमाणेच मागील वर्षी १९९४ चे मे महिन्याचे शेवटच्या आठवड्यात वैद्यकीय व दंत महाविद्यालयाचे प्रॉस्पेक्टस् विद्यार्थ्यांचे हातात आले. अमरावती विभागाला नागपूर विभागापासून वेगळा केला. त्यामुळे अमरावती विभागाकरिता अमरावती येथील खाजगी वैद्यकीय महाविद्यालय व यवतमाळ येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालय यामध्ये फक्त एकूण १५० जागाच वैद्यकीय महाविद्यालय प्रवेशाकरिता उपलब्ध झाल्यात हे लक्षात आले, इतकेच नव्हे तर उत्तर महाराष्ट्राची सोय झाली. **पूर्ण महाराष्ट्रात अमरावती विभागाला तुटपुंज्या जागा मिळाल्या व पर्यायाने विदर्भावर घोर अन्याय झाला.**

अमरावती विभागावर झालेल्या या अन्यायाचे विरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर बेंचपुढे **कु. भक्ती रमेश गोडबोले व इतर यांनी या विभागातील नागरिकांचे वतीने २७.६.१९९४ ला अर्ज दाखल केला.**

मध्यंतरी सरकारचे नजरेस हा अन्याय आणून देण्याकरिता डॉ.रमेश गोडबोले व डॉ. उद्धव देशमुख यांनी तत्कालीन स्वास्थ मंत्री पुष्पाताई हिरे यांची भेट घेतली. त्यांनी डॉ. साठे, डायरेक्टर, वैद्यकीय शिक्षण यांची भेट घेण्यासंबंधी सूचना दिली. डायरेक्टरांची भेट झाल्यानंतर कळले की सत्र १९९३-९४ मध्ये वैद्यकीय प्रवेशाबाबत उच्च न्यायालयात त्यांनी प्रतिज्ञापत्र लिहून दिले होते की, १९९४-९५ पासून विभागीय म्हणजे विद्यापीठनिहाय जागांचे वाटप होईल. अमरावती विभागावर या पद्धतीने अन्याय होईल याकडे त्यांनी पूर्ण दुर्लक्ष केले. प्रतिज्ञापत्र लिहून दिलेले असल्यामुळे या बाबतीत काहीही मदत करण्यास ते इच्छुक नव्हते व त्याप्रमाणेच त्यांनी सरकारला सल्ला दिला. त्याची प्रचीती वेगवेगळ्या सत्ताधारी पुढाऱ्यांना भेटल्यावर स्पष्ट झाली. त्यामुळे न्यायालयाशिवाय पर्याय नाही हे स्पष्ट झाले.

**न्यायालयासंबंधी :-**

उच्च न्यायालयाने सरकारला वेळोवेळी सूचना देवूनसुध्दा सरकारने स्पष्टीकरण देण्यास तब्बल दीड महिना लावला. याच दरम्यान **आ.बी.टी.देशमुख यांनी जुलै ९४ मध्ये हा प्रश्न विधानपरिषदेसमोर मांडला. तसेच त्यांचेच सल्ल्याप्रमाणे व राष्ट्रपतीने काढलेल्या अध्यादेश ३७१/२ चा आधार घेऊन उच्च न्यायालयासमोर (Equitable distribution) समन्यायी जागावाटपाच्या मुद्यावर अर्ज सुधारून घेतला.**

उच्च न्यायालयाने यासंबंधातील सर्व अर्ज एकत्र करून ऑक्टो. ९४ मध्ये निर्णय दिला. अमरावती विभागाचे दुर्दैवाने न्यायालयाने समन्यायी जागावाटपाच्या मुद्यावर विचारविनिमय न करता तो मुद्या तसाच ठेवला तेव्हा **त्यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाकडे डिसेंबर ९४ मध्ये डॉ. काबरा मलकापूर यांनी केलेल्या अर्जावर ता. २७.३.९५ ला निर्णय झाला.** त्या निर्णयानुसार सर्वोच्च न्यायालयाने समन्यायी जागावाटपाच्या या मुद्यावर विचारविनिमय करून १९९५-९६ सत्र सुरू होण्यापूर्वी निर्णय देण्याकरिता उच्च न्यायालयाला आदेश दिलेले आहेत. तसेच यासंबंधात उच्च न्यायालयाकडे आपली योजना सादर करण्यास महाराष्ट्र सरकारलासुद्धा आदेश दिलेले आहेत.

मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी व स्वास्थमंत्री डॉ. दौलतराव आहेर यांचे भेटीत स्पष्ट झाले की सरकार शक्यतो लवकर यासंबंधी योजना उच्च न्यायालयापुढे सादर करेल व बहुधा त्याच अनुषंगाने उच्च न्यायालय याबाबतीत निर्णय घेण्याची शक्यता आहे.

**न्यायालयाबाहेरील लढा :-**

मध्यंतरी याच पार्श्वभूमीवर १३.१०.९४ रोजी कृती समितीच्या प्रयत्नामुळे नागपूर येथे दीक्षाभूमीवर श्री. रा.सु.गवई, श्री. रामभाऊ मेघे, डॉ. शरदराव काळे व श्री. हर्षवर्धन देशमुख यांनी माजी मुख्यमंत्री श्री.शरदराव पवार यांचेशी चर्चा केली व त्या चर्चेत माजी मुख्यमंत्री श्री पवार यांनी समानप्रवेशाचे वितरणासंबंधीचा मुद्दा मान्य केला. तसेच २२.१०.९४ रोजी माजी मुख्यमंत्री **श्री शरदराव पवार यांचेशी अमरावती भेटीत अमरावती विद्यापाठाच्या आवारात कृती समितीचे सदस्य व बरेच राजकीय पुढारी मंडळी यांची चर्चा झाली व त्यानंतर माजी मुख्यमंत्र्यांनी कृती समितीच्या मागणीला प्रतिसाद देऊन तशा सूचना माजी स्वास्थ राज्यमंत्री डॉ. शरदराव काळे यांना दिल्यात.** २७.१०.९५ रोजी मुंबई येथे माजी स्वास्थमंत्री श्रीमती पुष्पाताई हिरे यांचेकडे श्री.रा.सु.गवई, डॉ.मुरके, डॉ.गोडबोले, डॉ.शरद काळे, श्री.वडनेरे, श्री. साठे, डायरेक्टर वैद्यकीय शिक्षण, श्रीमती शंकरन, सचिव स्वास्थ विभाग यांचेशी त्यावेळेचे मुख्यमंत्र्यांचे सूचनेनुसार चर्चा घडली. तत्वतः वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशक्षमता वाढवून अमरावती विभागाच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देता येईल असा चर्चेचा सूर होता. या बैठकीत शासकीय यंत्रणेने केलेल्या चुकांमुळे असमतोल वाटणी अमरावती विभागाच्या वाट्याला आली ही बाब शासनाने कबूल केली.

**याच मागणीचा पाठपुरावा करण्याकरिता १.११.९४ रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर चारही जिल्ह्यातील नागरिकांनी मोर्चा नेला. राजकमल चौकात** ५.११.१९९४ पासून साखळी उपोषण सुरू करण्यात आले. यात प्रामुख्याने इंडियन मेडिकल असोसिएशनचे सदस्य, डॉ. काबरा मलकापूर, प्रा. रेड्डी अकोला, श्री.प्रभाकरराव वैद्य, डॉ. रमेश गोडबोले, डॉ.मुरके व डॉ. उद्धव देशमुख यांनी सहभाग दिला. विद्यार्थ्यांनी सक्रीय पाठिंबा दर्शविण्याकरीता ९.११.९४ ला अमरावती मधील सर्व महाविद्यालय बंद केली. "रस्ता रोको" व "चक्काजाम" आंदोलन ११.११.९४ रोजी छेडण्यात आले. सुमारे ६० कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक करून सध्यांकाळी सोडून दिले. श्री.गोपीनाथजी मुंडे यांनी विरोधी पक्ष नेता या नात्याने १६.११.९४ रोजी उपोषण मंडपास भेट दिली व कार्यकर्त्यांशी चर्चा करून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. **या संदर्भात दि. २४.११.९४ रोजी माजी मुख्यमंत्र्यांची श्री.रा.सु.गवई, श्री.रामभाऊ मेघे, डॉ.गोडबोले, डॉ.मुरके यांनी वर्षा बंगल्यावर मुंबई येथे भेट घेतली.** त्यानंतर त्यांचे सूचनेप्रमाणे ता. २४.११.९४ रोजी रामगीरी, नागपूर येथे कृती समितीचे सदस्य डॉ.गोडबोले, श्री.प्रभाकरराव वैद्य, डॉ.काबरा, प्रा.रेड्डी, डॉ. पोटोडे इ. तसेच या विभागातील राजकीय पुढाऱ्यांसोबत, संबंधित अधिकाऱ्यांना सोबत घेवून माजी मुख्यमंत्र्यांनी चर्चा केल्यानंतर **तळेगाव दाभाडे येथील वैद्यकीय महाविद्यालयात अमरावती विभागासाठी ५० जागा ताबडतोब राखून ठेवण्याचे आश्वासन दिले.** त्या आश्वासनाचा पाठपुरावा करण्याचा अनेकांनी व्यर्थ प्रयत्न केला. प्रत्यक्षात काहीही घडले नाही. तळेगाव येथील ५० जागा देण्यासंबंधी शासनाने १६.१.९५ रोजी न्यायालयाला विचारणा केली असता १७.१.९५ ला न्यायालयाने त्यासंबंधीचा अर्ज फेटाळून लावला. हे सत्य आमदार श्री बी.टी.देशमुख यांनी एप्रिल ९५ मध्ये मांडलेल्या सूचनेला उत्तर देतांना सरकारने स्पष्ट केले.

**नवीन मुख्यमंत्री मा. श्री.मनोहर जोशी यांचे अमरावती भेटीत दि. ६.५.९५ ला डॉ. रमेश गोडबोले यांनी भेट घेवून वैद्यकीय महाविद्यालयातील जागा वाटपाबाबत चर्चा केली. त्याच अनुषंगाने त्यांची परत ९.५.९५ ला मुंबई येथे डॉ.गोडबोले, डॉ.उद्धव देशमुख, डॉ.सौ.गोडबोले, डॉ.सौ.निलीमा विद्वंस व डॉ. काबरा यांनी भेट घेतली.** त्यांचे सूचनेनुसार स्वास्थमंत्री डॉ. दौलतराव आहेर यांच्याशी चर्चा केली. त्या चर्चेत समन्यायी वाटपाची भूमिका त्यांना मान्य असल्याचे निदर्शनास आले व त्याप्रमाणे त्यांनी पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तसेच मागील वर्षी ज्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता असूनसुद्धा वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशापासून वंचित रहावे लागले त्यांचेकरीता काय करता येणे शक्य आहे यावर चर्चा करून मार्ग काढण्याचा मनोदय व्यक्त केला. तेथे त्यांना कृती समितीने काही सूचना दिल्यात. त्यावर त्यांनी विचार करण्याचे आश्वासन दिले.

माजी स्वास्थ मंत्री श्रीमती प्रमिलाताई टोपले यांची तारीख १४.५.९५ ला अकोला येथे भेट घेवून हा प्रश्न त्यांचेसमोर मांडला. तसेच आ.बी.टी.देशमुख यांचे अध्यक्षतेखाली १७.५.९५ ला नागरिकांची सभा घेवून आंदोलन पुढे रेटण्याचे निकडीवर अमरावती येथे चर्चा झाली. श्री.अरूणभाऊ अडसड, अध्यक्ष, वैधानिक विकास महामंडळ यांची ता. १८.५.९५ ला धामणगाव येथे भेट घेवून त्यांना यात पुढाकार घेण्याकरिता विनंती केली व त्यांनी जातीने लक्ष घालण्याचे वचन दिले.

**आ.बी.टी.देशमुख यांनी विधान परिषदेमध्ये दिलेला लढा :-**

विधान परिषदेमध्ये दि. १९.७.९४ ला आ.बी.टी.देशमुख यांनी लक्षवेधी सूचना मांडून अमरावती विभागावर झालेल्या अन्यायाकडे शासनाचे लक्ष

*विदर्भ युवक विकास संस्था, बुलढाणा द्वारा संचालित*

**शारीरिक शिक्षण महाविद्यालय, बुलढाणा.**

**अभ्यासक्रम** : बी. पी.एड. ( १ वर्षीय अभ्यासक्रम )
बी. पी. ई. ( ३ वर्षीय अभ्यासक्रम )

**प्रा. संतोष आंबेकर** — सचिव
**बाळकृष्ण वासनिक** — अध्यक्ष

**दि बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँक म. बुलढाणा.**

**शेतक-यांच्या हितासाठी आमच्या योजना :** शेतक-यांना शेतीविषयक गरजानुसार कर्ज पुरवठा . उपसा जलसिंचन, इलेक्ट्रिक मोटर्स पाईप लाईन, ठिबक व तुषार सिंचन , ट्रॅक्टर, दुभती जनावरे, शेळी संगोपन, द्राक्ष व रेशीम उद्योग इ. साठी खास योजना, कृषी उद्योग वाढविण्यासाठी कर्ज पुरवठा .

**ठेवीदारांसाठी आकर्षक योजना :** १. एक लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण व रकमेची हमी. २. पाच वर्षात 'दाम दुप्पट' ठेवी योजना. ३. १२५ कोटींपेक्षा जादा ठेवी. ४. जिल्ह्यात १२० शाखा मधून विविध बँकींग सेवा उपलब्ध. ५. मौल्यवान वस्तू व महत्त्वाचे दस्तऐवजाच्या सुरक्षेसाठी मुख्यालयासह २८ शाखांमध्ये 'सेफ डिपॉझिट लॉकर' सुविधा उपलब्ध.

**आर. डी. काळे** — *सरव्यवस्थापक*
**गजाननदादा पाटील** — *उपाध्यक्ष*
**डॉ. राजेंद्र भा. शिंगणे, आमदार** — *अध्यक्ष*

*सहपत्र पाच : परिच्छेद ४६, ७८ पहा*

## वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग : अधिक माहिती

*दिनांक १०.७.१९९५ रोजी **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील, विजय सावंत, अजहर हुसेन** विधान परिषद सदस्य यांच्या विद्यापीठ निहाय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप या विषयी विचारलेल्या विधान परिषद तारांकित प्रश्न क्रमांक १३४५ वरील अनुपुरक प्रश्नांच्या वेळी आश्वासित केल्याप्रमाणे वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यापीठनिहाय जागांचे समन्यायी वाटपाबाबत मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे शासनाने सादर केलेले शपथपत्र अधिक माहितीचे स्वरूपात सोबत जोडलेले आहे. (९ ऑगस्ट १९९५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवले.)*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY**
**NAGPUR BENCH : NAGPUR**
***Writ Petition No. 1594 of 1994***

Petitioners :- Ku. Bhakti Godbole and others
Versus
Respondents :- State of Maharashtra and others

AFFIDAVIT

I, Dr. Smt. A.J.Mankeshwar Dean, Government Medical College, Nagpur, do hereby take oath and State on solemn affirmation as under-

2) I say and submit that I am conversant with the matter and on the basis of the instructions received from Department of Medical Education and Drugs, Mantralaya, Bombay, I am filing this affidavit on behalf of the State Government in this matter.

3) I say and submit that Hon'ble Supreme Court of India in Civil Appeal No. 4152/94 has remitted the matter of equitable distribution of seats available for admission to medical course. The Hon'ble Supreme Court of India was inclined to think that the question of equitable distribution was likely to raise its head year after year and therefore, it would be desirable to put an end to the contention, rather than keeping the question open, and therfore, their Lordships set aside that part of the Hon'ble High Court's order dt. 27.9.94. The Hon'ble Supreme Court also requested the Hon'ble High Court to give priority to the question and to dispose it of as early as possible, preferably before the commencement of the next academic year.

4) I say and submit that there are 11 Govt. Medical Colleges and 16 Private Medical Colleges in the State Besides these Colleges, there are 3 Medical Colleges run by Municipal Corporation of Greater Bombay and 1 Medical College run by the Thane Municipal Corporation. At present there are 10 Government Medical Colleges and 7 Private Medical Colleges recognised by Medical Council of India, and the admissions to private and Govt. Medical Colleges are made as per the "Scheme" laid down by the Hon'ble supreme Court of India in its judgement in Writ petition No. 607/92 i.e. Unnikrishnan's case. There are 3100 seats presently available in the State for Medical Course.

5) I say and submit that as per the judgment of Hon'ble Supreme Court of India in case of Nidamarti Maheshkumar Vs. State of Maharashtra, out of the total seats from the recognised Govt. Medical Colleges, 15 seats are given to the Govt. of India which are filled through all India Entrance Examination. The remaining seats from such colleges and the seats available in the other Govt. and private medical Colleges are only available in the competent authority for making admissions considered for constitutional reservations. After deducting the seats under constitutional reservation, the remaining seats are available for open category. These seats are then divided into 30% seats (which are filled by operating University areawise Merit List) as per the directions of the Hon'ble Court in the above stated case. The constitutional reservations are thus provided in the university area. As a result of this procedure the

70% seats of open category as stated above and the constitutional reservations are the seats which can become available for equitable distribution of seats in the State.

6) I say and submit that the Government considered the issue of equitable distribution of seats in the State and came to the conclusion that it is necessary to consider the various aspects relating to this issue before devising a principle for equitable distribution of seats. The Govt. also considered that the observations made by the Hon'ble Supreme Court in the case of Pradeep Jain Vs. the Union of India should also be taken into account for coming to a conclusion of this issue. The time available for this exercise is very limited, and it is not possible in this short period to make any recommendations on this issue. Therefore, any interim order of solution given by Hon'ble High Court may be accepted as stop gap arrangement for this year only. After making detailed study of the issue of equitable distribution of seats, a proposal may be prepared and submitted to Hon'ble High Court for its consideration well before the beginning of admissions for the year 1996-97

7) I say and submit that the State Government considered that unless full thought is given to this issue, it is not desirable to come out with a concrete proposal. The principle to be adopted for equitable distribution would require the detailed study of various factors. Since the matter is of complex nature involving several factors as well as regions and universities, the Govt, would be required to comprehensively apply its mind to this issue. This entire process would take some time and in any event would not be complete before the admissions to the current academic year. In the circumstances it is submitted that Hon'ble Court may kindly grant time to the State Govt. to study the matter in detail so as to come to a justifiable decision by the State Govt. in this respect. After arriving at such a decision, it would be necessary for the State Government to frame the rules accordingly. (The criteria for equitable distribution would therfore be available only for implementation from the next academic year i.e. 1996-97. Therefore, the rules which have been formulated by the State Government under the Government Resolution, M.E.& D.D.No. ADM/1094/CR/443/94/EDU, dated 31st May, 1995 may be applied for the admissions for the current year.)

8) I say and submit that only to give effect to the assurances given by the then Chief Minister, the State propose to allot 50% seats form the M.A.E.E. Rs. Medical College at Talegaon Dabhade district Poona to the students from Amravati area as was proposed in the civil applications No. 81/95 before this Hon'ble Court for this year. I repeat that the proposed allotment is by way of purely an adhoc arrangement for the academic year 1995-96 only.

9) I say and submit that the admissions for the current academic year would be made as per the above submissions subject to the approval of this Hon'ble Court.

Sd/- Deponent

VERIFICATION

Verified and signed at Nagpur on this 21st day of June, 1995 that the contents of above paras 1 to 9 are based on information received from the official record and believed to be true by me.

Sd/- Deponent
Sd/- L.K. Khamborkar

I know and identify the deponent

---

वेधले.

नागपूरला झालेल्या १९९४ च्या हिवाळी अधिवेशनात दि. ३०.११.९४ ला सरकारने कबूल केले की, वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशाबाबत अमरावती विभागावर अन्याय झाला आहे. तसेच तळेगाव दाभाडे येथील वैद्यकीय महाविद्यालयात या विभागाकरिता ५० जागा राखून ठेवण्याचे आश्वासन सरकारने कृती समितीला दिलेले आहे. इतकेच नव्हे तर पुढे वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश समन्यायी प्रमाणातच देण्यात येतील हे सुद्धा स्पष्ट केले. हीच भूमिका नवीन शासनाने विधानपरिषदेत एप्रिल ९५ ला सुद्धा जाहीर केली. परंतु महाराष्ट्र शासनाने १६.१.९५ रोजी तळेगाव दाभाडे येथील वैद्यकीय महाविद्यालयात देऊ घातलेल्या ५० जागेबद्दल मागितलेली परवानगी उच्च न्यायालयाने १७.१.९५ रोजी फेटाळली. ही माहिती प्रथम विधान परिषदेत एप्रिल ९५ ला आ.बी.टी.देशमुख यांनी मांडलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना स्पष्ट झाली.

**अपेक्षित कार्यवाही :-**

वरील सर्व बाबींचा विचार करता महाराष्ट्र शासनाकडून उच्च न्यायालयासमोर सादर होणार असलेल्या योजनेवर लक्ष ठेवणे व योजना अमरावती विभागाकरिता गैरसोयीची असल्यास परत न्यायालयात त्यासंबंधी आपली बाजू मांडण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यादृष्टीने कृती समितीने त्वरित नागपूरचे प्रसिद्ध विधीज्ञ कृष्णराव देशपांडे यांची नियुक्ती केली, तसेच शासन १९९४-९५ मध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाचे निवारण करण्याकरिता काय योजना करणार आहे हे सुद्धा स्पष्ट करून घेणे आवश्यक आहे. त्याकरिता सभा आयोजित केली आहे. या सभेत पुढील मुद्यावर विचार करावयाचा असून त्यासंबंधी ठराव घ्यावयाचा आहे.

**डॉ. रमेश गोडबोले**
**डॉ. उद्धव देशमुख**
कृती समिती अमरावती.

*टिप : कृति समितीच्या या छापील वृत्तांतावर तारीख टाकली नाही. पण तो जुलै १९९५ मध्ये प्रसिद्ध केला असावा असे दिसते.*

Praveen Packer

**Veena**

**Card Collection & Offset Printers.**
**Near Ice Factory , Rajapeth, Amravati.**
**Phone No. ( O )** 674856 **( F )** 675185 **( R )** 677552

**Deals in** * Multi Colour offset Printing. * Screen Printing. * Letter Press Printing. * Computerised Composing. * Lemination. * Card Board Boxes.

**THE THREE BROTHERS**

**merchants and manufactures**
Jawahar Road, Amravati. 444601 ( MS )
***S. T. D.*** *(0721)* ***Tel.*** *75740, 78740* ***( O )*** *76740* ***( R )***

*सहपत्र सहा : परिच्छेद ५४ पहा*

## *IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY BENCH AT NAGPUR*
## *Writ petition no. 1594 of 1994 With writ petition No. 1690 of 1994 and writ petition No 2031 of 1994.*

**(1) Writ petition No. 1594 of 1994.**

**Petitioners :**

**1.** Bhakti Ramesh Godbole, Minor through guardian father Ramesh Godbole. **2.** Ku. Vaishali Jugalkishor Jaju, Minor through Guardian father Jugalkishor Jaju. **3.** Ku. Sunita Ramkisan Agrawal, Minor Through guardian father Ramkisan Agrawal. **4.** Ku. Anita Madan Mundhada, minor through guardian father Madan Mundhada **5.** Ku. Sarika Vinayakumar Gupta, Minor through guardian father Vinayakumar Gupta **6.** Ku. Sonali Wasudeo Wankhade, minor through guardian father Wasudeo wankhade. **7.** Rohit Ravindra Chordiya, minor through guardian father Ravindra Choradiya **8.** Anuja Gopal Kashikar, minor through guardian father Gopal Kashikar **9.** Anagha Ashok Hoshangabadkar, minor through guardian father Ashok Hoshangabadkar **10.** Ku. Shilpa Shankarrao Deshmukh,minor through guardian father Shankarrao Deshmukh **11.** Ku. Mamta Ghanshyam Gandhi, minor through guardian father Ghanshyam Gandhi **12.** Ku. Shanti Balasaheb Bhende, minor through guardian father Babasaheb Bhende **13.** Ku. Rajashri Krishnarao Deshmukh, minor through guardian father Krishnarao Deshmukh **14.** Tapan Pralhad Rawat, minor through guardian father Pralhad Rawat All residents of Amravati Tahsil and District Amravati

***VERSUS***

**1**. State of Maharashtra, through Secretary Medical Education and Drugs Development Mantralaya Bombay-32 **2.** Director of Medical Education and Research Dental College Compound Bombay **3.** Amravati University, Amravati, Through its Vice Chancellor, Amravati.

***INTERVENER*** : Ku. Prajakta D/o Chandrakant Pangarkar, Aged About 17 years through her natural guardian father C. L. Pangarkar, aged about 47 Years R/o 49/1 civil lines, Nagpur.

*Shri K. H. Deshpande, D. K. Deshmukh, Advocates **for the Petitioners** Shri. S. C. Aney "A" panel counsel **for respondents** 1 and 2 shri L. K. Khamborkar A.G.P. **for the respondents** No .1 and 2 Shri A. C. Dharmadhikari Advocate **for the intervenor***

**2. Writ petition No 1690 of 1994**

**Petitioner :** Ku. Deepali D/o Purushottam Mohokar Minor through Mother Smt. Sheela Purushottam Mohokar, Resident of Akola Tahsil and District Akola.

***VERSUS***

**1.** The State of Maharashtra, through Secretary Medical Education and Drugs Development Mantralaya Bombay-32 **2**. Director of Medical Education and Research Dental College Compound Bombay **3**. Amravati University, Amravati Through its Vice Chancellor Amravati.

*Shri Sunil Manohar Advocate **for the petitioner** Shri. S. G. Aney "A" panel Counsel **for respondents** 1 and 2 Shri. L.K.Khamborkar A.G.P. **for respondents** 1 and 2*

**3. Writ petition No. 2031 of 1994**

**Petitioner :** Ku. Varsha D/o Ekanathrao Kathale aged 17 years minor by natural guardian father Ekanathrao S/o Haribhau Kathale aged 50 years R/o Nagpur

***VERSUS***

**1.** The State of Maharashtra, through Secretary Medical Education and Drugs Development Mantralaya Bombay-32 **2.** The competent Authority for Admission to Medical and Dental Courses, Maharashtra State i.e. the Director of Medical Education & Research, Bombay. **3.** Dean Medical College Nagpur.

*Shri A. M. Gordey and Mrs B.P. Maldhure Advocates for the petitioner. Shri. S. G. Aney "A" panel Counsel **for respondents** 1 and 2 Shri. L.K.Khamborkar A.G.P. **for respondents** 1 and 2*

***CORAM :***
**M. B. Ghodeswar & V. S. Sirpurkar JJ.**
Dated 13.7.1995
***Oral Judgement (per M. B. Ghodeswar J.)***

C.A. No. 1456 of 1995 for intervention and C.A. No. 1457 of 1995 for amendment of petition are allowed.

**2.** Rule in writ petition No. 2031 of 1994. heard alongwith writ petitions Nos. 1594 of 1994 and 1690 of 1994.

**3.** These writ petitions involve a common question of law and hence can be conveniently disposed of by this common judgment.

**4.** This court by judgement dated 27.9.1994 in writ petition No. 1594 of 1994 and other connected writ petitions dealt with the question of equitable distribution in paragraphs 99, 99A and 99B of its judgement and left the said question open. The students (petitioners/interveners) who had passed their qualifying examination in April 1994 from the colleges of Amravati University had filed these petitions for seeking admission to the first year M.B.B.S. courses in 70 per cent quota, since the establishment of Amravati University in the year 1983 to the year 1993, the qualifying students for admission to the First year M.B.B.S. were allowed to compete for the seats in Medical /Dental colleges in Nagpur University area as there was no recognised Medical/Dental college at Amravati. It was the contention of the petitioners that the students from Amravati University area should be allowed to compete for the seats in M.B.B.S./B.D.S. course in the Medical / Dental colleges in the Nagpur University area. This court rejected the said contention,

**5.** The petitioners had raised a contention that an injustice was caused to them as considering the number of students from the Amravati Board , The Seats available for medical admissions to the M.B.B.S. course were comparatively much lesser as compared to the seats available to the Bombay students, Pune students Marathawada students, and even Nagpur Students. They, therefore, contended that though the Amravati students scored much higher, since they had only 150 seats, the meritorious students from Amravati suffered in the process in not having been able to get the admissions to the medical courses, while students with much lesser percentages could be admitted to Nagpur. It is significant to note that in this petition, the petitioners had restricted their prayer for the admission to the Nagpur University only as was the practice, from the year 1983 to the year 1993, which was terminated, for the first time, in the year 1994-95, Relying upon the results of the three years prior to 1994-95 this Court pointed out that the new arrangement was, in fact, to the benefit of the Amravati students, as in all the three previous years when there was a common competition, the Nagpur students had got many more seats as compared to the Amravati students even in the medical colleges which were now in the area of Amravati University. Ultimately this court held that it was not possible to accede to the prayer made by the petitioners to allow them to compete with Nagpur University students and to permit them to be admitted in the Medical Colleges covered in the Nagpur University area. This court has dealt with this aspect in paragraph No. 87 onwards upto paragraph No 98 and had declined to grant leave to the petitioners on the basis of the statistics made available to it.

**6.** Thus insofar as the question of distribution inter se between the Amravati University and the Nagpur University was concerned, this court declined to grant any relief and negatived the case of the petitioners. However, the petitioners had sought such equal distribution in respect to the Universities generally, and **that challenge was based particularly on clause 10 of the "Development Board for Vidarbha, Marathwada and rest of the Maharashtra Order, 1994"** which obliged the Governor to ensure equitable arrangements providing inter alia adequate facilities for technical education and vocational training. Thus, the petitioners wanted to have an equitable distribution of medical seats not only inter se between Nagpur and Amravati but also in the whole state of Maharashtra. **This court in paragraph Nos. 99 99A an 99B had kept open only this question of the application of the principle of equitable distribution** generally and contradistinction with the prayer made in the petition for making this principle of equitable distribution applicable only in between the Amravati University and the Nagpur University which prayer was already rejected by the court. It is an admitted position that the students for Amravati University area did not get admission to M.B.B.S/B.D.S. course in the

*श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित,*
**कॉलेज ऑफ रुरल सर्व्हिसेस, अमरावती.**
**हार्दिक शुभेच्छा.**

**प्रा. वा. मो. उपाख्य दादासाहेब काळमेघ** — *अध्यक्ष*
**के. आर. जाधव** — *प्राचार्य*
*श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.*

**डॉ. यशवंत मोरेश्वर दोंदे सार्वजनिक शैक्षणिक ट्रस्ट,**
कळंब, जि. यवतमाळ
हार्दिक शुभेच्छा

Medical/Dental Colleges in Nagpur University for the academic session 1994-95. **This court has dealt with the general question of equitable distribution of seats in the whole of the state of Maharashtra in paragraph Nos. 99, 99A and 99B of the Judgement dated 27.9.1994, keeping the question open.**

**7.** The apex court in civil appeal No. 4153 of 1995 arising out of S.L.P.(C) No. 25276 of 1994, decided on March 27, 1995, declined to interfere with the order passed by this Court on the question of admissions of students. It is to be specifically noted that the apex court in its order had specifically refused to interfere with any other part of the High Court Judgement excepting paragraph No. 99, 99A and 99B. The Supreme Court observed,

"Two questions were posed before us, the first relating to the admission of the students and the second, refusal of the High Court to consider the question regarding equitable distribution of seats. As far as question of admission of students is concerned, having regard to the passage of time and the complications that may ensue, we are not inclined to interfere with the order of the High court, So far as question of equitable distribution is concerned, which has been dealt with in paragraphs 99, 99A & 99B, We are inclined to think that question is likely to raise its head year after year and therefore, it would be desirable to put an end to the contention rather than keeping the question open as the High Court has done, We therefore set aside that part of the High Courts order and remit the matter back to the High Court for a decision on the question regarding equitable distribution of seats as raised before it (Emphasis supplied)

**It is therefore, crystal clear that it is only a question of equitable distribution to the whole of the State of Maharashtra which has been sent back by the apex court to this court.**

**8.** The petitioners in first petition No. 1594 of 1994 have amended the writ petition by bringing on record the subsequent events and have also filed the affidavit of Dr. Kabra Ashok Shaligram, showing the number of student appearing in the state of Maharashtra for the qualifying examination in March 1995 in various regions of the state.

**9.** There was, however a significant development before these petitions were taken up for final disposal as per the apex court's directions and that is the state has filed the affdavit worn by the Dean, Government Medical College, Nagpur on 21.6.1993, It is stated in paragraph 4 of the said affidavit that there are 11 Government Medical Colleges and 16 private Medical Colleges in the State. Besides these Colleges, there are three Medical Colleges run by the Municipal Corporation of Greater Bombay and one Medical College run by the Thane Municipal corporation. At present, there are 10 Government Medical Colleges and 7 private Medical Colleges recognised by the Medical Council of India and the admissions to the private and government medical colleges are made as per the scheme laid down by the honourable supreme Court of India in its Judgment in Unnikrishnan case (1993 sc 645). There are 3100 seats presently available in the State for Medical Course. It is further stated that after deducting the seats under constitutional reservation, the remaining seats are available for open category, seventy per cent Seats of open category and the constitutional reservations are the seats which can become available for equitable distribution of seats in the State. In paragraph 6 of the affidavit, It is stated that the state **Government considered the issue of equitable distribution and came to the conclusion that it is necessary to consider the various aspects relating to this issue before devicing the principle for equitable distribution of seats.** The State Government also considered the observations made by the Supreme Court in the case of *Pradeep Jain V. The Union of India.* The time available for this exercise is very limited, and it is not possible in the short period to make any recommendation on this issue. It is also stated that , therefore, any interim order or solution given by this court may be accepted as a stopgap arrangement for this academic year only, i.e. 1995-96. After making a detailed study of the issue of equitable distribution a proposal came to be prepared and submitted to this court for its consideration well before the beginning of admissions for the year 1996-97. It is further stated that with the effect to the assurance given by the then Chief Minister, the state of Maharashtra proposed to allot 50% seats from the M. A. E. E. R's. Medical College at Talegaon Dabhade, District Pune, to the students from Amravati area for this year, this allotment is by way of an ad hoc arrangement for the academic year 1995-96 only.

**10.** Now, in view of the affidavit of the State, **once the state has accepted to employ the principle of equitable distribution in the matter of the admissions to the M.B.B.S. and B.D.S. courses, there really remains nothing in this petition for us to decide.** both, learned counsel for the petitioners as well as for the state, agreed unequivocally that insofar as the question of application of the principle of equitable distributions to the whole State was concerned, it stood settled because of the affidavit of the Dean Medical College, Nagpur, which was filed on behalf of the state of Maharashtra. According to the learned Assistant Government pleader, the application of the principle of equitable distribution of the medical seats in the State of Maharashtra was an accepted fate.

**11.** We have heard the learned counsel for the respective parties for a considerable time. **It is now an admitted position that the state of Maharashtra has accepted in principle the question of equitable distribution of seats for admission to M.B.B.S./ B.D.S.Course throughout the state**, As stated in the affidavit sworn by the Dean, Government Medical College, Nagpur , this exercise and the process cannot be completed within a short span of time and in any case, before the admissions to the current academic year 1995-96. The final list of admissions would be published on 17.7.1995. The learned counsel for the petitioners submitted that injustice is done to the students of 1995-96 by not granting admission to them to the M.B.B.S./ B.D.S. courses. The state has done the wrong and, therefore, on the basis of merit of the last academic year, viz, 1994-95 without any further test, the students should be straightway admitted to the said courses on the basis of the chart annexed with the affidavit dated 5.7.1995 of Dr. kabra, it is contended that there is a backlog of 118 students for the Amravati University area for the academic year 1994-95. The total number of seats available in the State is 2504 and after deducting central quota, the total number of seats available for distribution is 2175. The submission is that the basis for admission should be the number of students appearing in various universities. There is disparity and University areawise distribution would cause injustice to the petitioners. The learned counsel for the petitioners placed reliance upon a decision reported in A.I.R. 1993 S.C. 580 (Punjab engineering College Chandigarh V. Sanjay Gulati and other)

In para-6 of the said decision, it is observed as under :-

"It is strange that in all such cases the authorities who make admissions by ignoring the rules of admissions contend that the seats cannot correspondingly be increased since the State Government cannot meet the additional, expenditure which will be caused by increasing the number of students or that the institution will not be able to cope up with the additional influx of students. An additional plea available in regard to medical college is that the Indian Medical Council will not sanction additional seats. We cannot entertain this submission, Those who infringe the rules must pay for their lapse and the wrong done to the deserving students who sought to have been admitted, has to be rectified, The best solution under the circumstances is to ensure that the strength of seats is increased in proportion to the wrong admissions made.''

In this case, their lordship have directed that admission to the 16 additional vacancies for the academic year 1993-94 shall be made in accordance with merit on the basis of the list which was prepared in the academic year 1992-93. The question of admission of the students of 1994-95 cannot be gone into in view of the judgment of this court which is also affirmed by the apex Court. As regards the question of equitable distribution of Seats, **shri. S. C. Aney, learned 'A' panel counsel for the respondent No. 1 and 2, has submitted that twice the minister concerned has given an assurance and the state has accepted the principle of equitable distribution.** It is also admitted that injustice was done to the students of Amravati University area and, there, to remove the injustice, 50 per cent seats of M.A.E.E.R's. Medical College at Talegaon Dabhade District Pune, will have to be allotted to the student of Amravati University area we also agree that the exercise of the process of equitable distribution of seats through the state cannot be completed with a short span of time, therefore, we do not think it proper to keep these writ petitions pending in the circumstance, we feel that the interim arrangement made for the student of 1995-96 for the students of 1995-96 of providing additional 50 seats to them is quite satisfactory.

**12. As the state Government has accepted the principle of equitable distribution as the criteria for admission of students through out the State and therefore there is no contest any more in the positions, Hence, we propose to dispose of these writ petitions, giving time as prayed to the State Government to complete the exercise and process to formulate the principles of equitable distribution.** In the mean time the respondent No.1 is free to allot 50 percent seats of M.E.E.R's. Medical College Talegaon Dabhade, District Pune, to the students from Amravati University area as assured in the affidavit dated 21.6.1995 sworn by the Dean, Government Medical College Nagpur. It is further made clear that the petitioners and other qualified student of the academic year 1994-95 can also compete for the abovementioned 50 per cent seats. The instant writ petitions are disposed of in terms of the above order. Rule accordingly. No. costs.

********

"नुटा बुलेटीन" विशेषांकास हार्दिक शुभेच्छा
श्री. शिवाजी शिक्षण संस्था, वाशीम, जि. अकोला.
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

ज. शि. प्र. मंडळाचे कला व वाणिज्य महाविद्यालय,
रिसोड, जि. अकोला.
महाविद्यालयाची वैशिष्ट्ये : १. स्थापना सन १९८४. २. सुसज्ज ग्रंथालय. ३. आवश्यक खेळ व क्रीडांगणाच्या सोयी. ४. शासनाकडून तीन एकर जमीन संस्थेला अनुदानीत. ५. प्रशस्त प्रशासकीय इमारत व आवश्यक वर्ग खोल्यांची पूर्तता. ६. किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम. ७. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भरतीतील अनुशेष निरंक.
बाबासाहेब धाबेकर — *संस्थापक अध्यक्ष,* ज.शि. प्र. मंडळ, बार्शीटाकळी.
विष्णुपंत पाटील — *प्राचार्य*

*सहपत्र सात : परिच्छेद ७३ व ७८ पहा*

*(१) विधानपरिषदेच्या १९९४ च्या दुसऱ्या अधिवेशनात (लक्षवेधी सूचना) मंगळवार, दिनांक १९ जुलै १९९४ रोजी, (२) १९९४च्या तिसऱ्या अधिवेशनात (लक्षवेधी सूचना) बुधवार, दिनांक ३० नोव्हेंबर १९९४ रोजी, (३) १९९५ च्या पहिल्या अधिवेशनात ( ता.प्र.क्रमांक ५६ ) शुक्रवार, दिनांक ३१ मार्च १९९५ रोजी, (४) त्याच अधिवेशनात ( लक्षवेधी सूचना ) गुरुवार, दिनांक ६ एप्रिल १९९५ रोजी, (५) पुन्हा त्याच अधिवेशनात (ता.प्र.क्रमांक ५७) शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल १९९५ रोजी, (६) १९९५च्या दुसऱ्या अधिवेशनात (ता.प्र.क्रमांक १३४५) सोमवार, दिनांक १० जुलै १९९५ रोजी, (७) त्याच अधिवेशनात (लक्षवेधी सूचना) शुक्रवार, दिनांक २८ जुलै १९९५ रोजी, (८) पुन्हा त्याच अधिवेशनांत (लक्षवेधी सूचना) बुधवार, दिनांक ९ ऑगस्ट १९९५ रोजी, (९) १९९५ च्या तिसऱ्या अधिवेशनात (तारांकित प्रश्न क्रमांक ४५१३) मंगळवार, दिनांक ५ डिसेंबर १९९५ रोजी, (१०) त्याच अधिवेशनात (लक्षवेधी सूचना) शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर १९९५ रोजी, (११) १९९६ च्या पहिल्या अधिवेशनात (ता.प्र.क्रमांक ७६०८) गुरुवार, दिनांक २१ मार्च १९९६ रोजी या प्रश्नावर झालेल्या चर्चेची इतिवृत्ते*

## अमरावती व नागपूर विद्यापीठांतर्गत वैद्यकीय महाविद्यालयांतील प्रवेशासंबधी.

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९४*
*मंगळवार, दिनांक : १९.७.१९९४*

**अमरावती व नागपूर विद्यापीठांतर्गत वैद्यकीय महाविद्यालयांतील प्रवेशासंबधी सर्वश्री विजय पाटील, विष्णू अण्णा पाटील, रमेश गुप्ता, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**श्री.विजय पाटील :** अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"अमरावती व नागपूर या दोन्ही विभागीय मंडळाकडून बारावी परीक्षा पास गुणवत्ता पात्र विद्यार्थ्यांना नागपूर आणि अमरावती या दोन्ही विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेशपात्र समजण्याकरिता असलेल्या नियमांत शासनाने चालू वर्षी अचानक बदल करून नागपूर विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठ व अमरावती विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांना अमरावती विद्यापीठांतर्गत येणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयातच प्रवेशपात्र ठरविल्यामुळे अमरावती विभागीय मंडळाकडून १२ वी विज्ञान परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांवर होत असलेला घोर अन्याय त्यामुळे गुणवत्ता यादीत येऊनही वैद्यकीय शिक्षणापासून वंचित होण्याची त्यांच्यावर आलेली पाळी, परिणामी विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, त्यांनी आंदोलन करण्याचा घेतलेला पवित्रा, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

**श्रीमती पुष्पाताई हिरे** (वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये मंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

राज्यातील शासकीय व खाजगी महाविद्यालयातील ३०% जागा राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील व ७०% जागा विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांमधून भरण्यात येतात. अमरावती विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर सन १९९३ पर्यंत या विद्यापीठ क्षेत्रात भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता असलेले एकही वैद्यकीय महाविद्यालय अस्तित्वात नव्हते. तथापि सन १९९३ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यास भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता प्राप्त झाल्यावर अमरावती विद्यापीठापासून वैद्यकीय प्रवेशाच्या प्रयोजनासाठी वेगळे करण्यात आले. शासनाच्या सदरहू निर्णयास उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठात रिट याचिका क्रमांक १५९४/९४ व १५९७/९४ अन्वये आव्हान देण्यात आलेले असून ही बाब न्यायप्रविष्ट आहे.

यासंदर्भात असे निर्दशनास आणण्यात येते की, **सन १९९१ मध्ये अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील ७ विद्यार्थ्यांना सन १९९२ मध्ये २७ विद्यार्थ्यांना व सन १९९३ मध्ये २२ विद्यार्थ्यांना वैद्यकीय अभ्यासक्रमात प्रवेश प्राप्त झालेला आहे. अमरावती विद्यापीठ क्षेत्र नागपूर विद्यापीठ क्षेत्रापासून वेगळे करण्यात आल्यामुळे, अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांकरिता ८६ मुक्त जागा व ३२ मुल्याभारित जागा उपलब्ध झालेल्या आहेत. यावरून असे स्पष्ट होते की, अमरावती विद्यापीठ क्षेत्रातून इयत्ता १२ वी विज्ञान उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांवर कोणताही अन्याय झालेला नाही.**

**श्री.विजय पाटील :** अध्यक्ष महाराज, अमरावती विभागामध्ये २ वैद्यकीय महाविद्यालये असून नागपूर विभागामध्ये ५ वैद्यकीय महाविद्यालये आहेत. अमरावती विभागातील वैद्यकीय महाविद्यालयांतील जागांची संख्या १५० असून नागपूर विभागातील वैद्यकीय महाविद्यालयांतील जागांची संख्या ४६० आहे. या दोन्ही विभागांमधील बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या आपण पाहिली तर नागपूरमध्ये ११६८९ आहे आणि अमरावती विभागामध्ये १०,००० आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा विचार केला तर अमरावती विभागातील वैद्यकीय महाविद्यालयातील जागांची संख्या फारच कमी आहे. तरी या वर्षापुरता अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना नागपूर विभागातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश देण्यात येईल काय किंवा तसा प्रयत्न करण्यात येईल काय? या वर्षासाठी तशी व्यवस्था होणार नसेल तर अमरावती विभागामध्ये जी वैद्यकीय महाविद्यालये आहेत त्यामध्ये १०० जागा शासन वाढवून देणार आहे काय?

**बॅ.मर्झबान पात्रावाला :** सभापती महोदय, सबसे पहले मै सभागृह को बताना चाहता हुं कि यह मेटर सब्-ज्युडीस है. नागपूर हाईकोर्ट मे रिट पिटीशन की हीयरिंग कल से चालू हो गई है और आज भी हीयरिंग चालू है. इसलिए में इस बारे में ज्यादा नही बोल सकुंगा. अमरावती के विद्यार्थियों के उपर कोई भी अन्याय नही होगा. इसका कारण मै. बता रहा हूं. १९९१ मे अमरावती के ७ विद्यार्थियों को अॅडमिशन मिला, १९९२ मे अमरावती के २७ विद्यार्थियोंकों अॅडमिशन मिला और १९९३ मे अमरावती के २२ विद्यार्थियो को मेडिकल मे अॅडमिशन मिला. नागपूर और अमरावती युनिव्हर्सिटी को अलग करने के बाद अमरावती के ८६ विद्यार्थियो को फ्री सीटस् मिलेंगी और ३२ विद्यार्थियो को पेमेन्ट बेसीस पर सिटस् मिलेंगी. इस प्रकार से पिछले ३ साल से ज्यादा इस साल अमरावती के विद्यार्थियो को एम.बी.बी.एस कोर्स के अंन्दर अॅडमिशन मिलेगा और उनके उपर कोई अन्याय नहीं होंगा.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, मला प्रश्न विचारावयाचा आहे.

**सभापती :** हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे फॅक्टस् फक्त विचारा.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, मी वस्तुस्थितीविषयी केवळ दोन प्रश्न विचारतो. या संदर्भात कॉन्स्टीट्युशनल अरेंजमेंटच्या बाबतीत **गॅझेटमध्ये स्पेशल रिस्पॉन्सीब्लीटीचे नोटीफीकेशन ३० एप्रिलला पब्लीश झाले आहे. या जागांचे डिस्ट्रिब्युशन करण्यासाठी आता या ऑर्डरप्रमाणे ......**

**"Each development area should be the unit." असे त्यामध्ये म्हटलेले आहे आणि ते इक्वीटेबल झाले पाहिजे. समन्यायी प्रमाणामध्ये हे वाटप झाले पाहिजे असेही म्हटले आहे.** माननीय सदस्य श्री.विजय पाटील यांनी या ठिकाणी असे म्हटले की, १०० जागा वाढवून द्या पण तो काही ताबडतोबीचा उपाय नाही. याचे कारण असे की, १०० जागा एका दिवशी वाढविल्या तर आज

*श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती. द्वारा संचालित,*
**अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, अकोला.**
अभियांत्रिकी शिक्षण देणारी एक अग्रगण्य संस्था.
**अभ्यासक्रम** : आर्किटेक्चर , केमिकल टेक्नॉलॉजी , प्रॉडक्शन इंजिनिअरिंग, पॉलीमर टेक्नॉलॉजी, टेक्सटाईल इंजिनिअरिंग आणि सिव्हील इंजिनिअरिंग
**वा. मो. उपाख्य दादासाहेब काळमेघ** — *अध्यक्ष* — श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती.
**प्रा. डी. जी. काळे** — *प्राचार्य* — अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय अकोला.

**दि. इन्डस्ट्रीयल विव्हींग को- ऑप. सोसायटी लि.**
*अचलपूर. र. क्रं. ४२४*
**म. बा. कोल्हे** — *सचिव*
**पां. ब. खरड** — *अध्यक्ष*
मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास करणारे
**जगदंब महाविद्यालय, अचलपूर शहर.**
( कला , वाणिज्य व विज्ञान ) स्थापना १९६२
**शं. व्यं. शेरकार** — *उपाध्यक्ष*
**ला. हि. बोने.** — *उपप्राचार्य*
**प्र. के. देशमुख** — *प्राचार्य*
सदस्यगण स्थानिक व्यवस्थापन समिती तथा शिक्षक व शिक्षकेतर

असलेल्या १०० जागांची मान्यतासुद्धा काढली जाण्याची भिती निर्माण होते. त्यामुळे मी तो मुद्दा मांडत नाही. माझे म्हणणे असे आहे की, स्पेशल रिस्पॉन्सीबलीटीच्या कॉन्स्टीट्युशनल आर्डरप्रमाणे डेव्हलपमेंट बोर्ड एरीया धरून हे वाटप केले पाहिजे. मागच्या वर्षी जे नियम ठरविले त्याप्रमाणे मागच्या वर्षी प्रवेश देण्यात आला. अध्यक्ष महाराज, एखाद्या ठिकाणी निकाल कमी लागतात की जास्त लागतात हा प्रश्न त्या विभागाच्या कौतुकाचा आहे. त्या त्या विभागातील स्थितीचा हा प्रश्न आहे. एपीयर्ड विद्यार्थ्यांची संख्या घेऊन इक्विटेबल डिस्ट्रिब्युशन करणे हा दुसरा भाग. दुसरे म्हणजे वाटपाचे युनिट. कारण हे सारे युनिट कृत्रिम आहेत. जिल्हा युनिट कृत्रिम आहे. युनिव्हर्सिटीची एरियाही कृत्रिम आहे. **पण आता हायेस्ट ऑर्डरने डेव्हलपमेंट एरीया असे म्हटलेले आहे. तरी या दोन्ही गोष्टी आपण लक्षात घेतल्या आहेत काय व त्याप्रमाणे सुधारित आदेश काढणार काय?**

**बॅ. मर्झबान पात्रावाला** : अध्यक्ष महोदय, रिजनल बोर्ड तीन महिने पहले ही स्थापीत किए गए है और उसके संबंध मे आज सप्लीमेंटरी डिमांडस के अंतर्गत चर्चा होनेवाली है. उसमे राज्यपाल महोदय के कार्यालय में अतिरिक्त स्टाफ की नियुक्ती के संबंधमें डिमांड रखी है. इसके पहले काम के बटवारे के बारे में निर्णय नही लिया गया था, लेकीन विकास बोर्ड अब इस बारे में विचार करेगा. **खास तौर से मेडीकल कॉलेज में प्रवेश देने के संबंध में मा. देशमुख साहब जो बोल रहे है, उनकी यह बात सही है, लेकिन नियम १० के अनुसार........**

**सभापती :** यह बताने की आवश्यकता नही है, मामला न्यायप्रविष्ट है इसलिए इसकी चर्चा नही हो सकती है.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, यासंदर्भात मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की ......

**The Chairman :** You cannot say anything about it. You cannot discuss the issue. You should only ask the facts. you cannot suggest anything. You can state the facts.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज. मी फक्त फॅक्टसंबंधी प्रश्न विचारला आहे. हाटकोर्टमध्ये जो मुद्दा आहे त्यासंबंधी मी काहीही विचारत नाही.

**सभापती :** या पद्धतीने डिस्ट्रीब्युशन करावे असे आपण सजेस्ट केलेले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, याबाबतीत माझे म्हणणे असे आहे की....

**सभापती :** सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे परंतु ही मॅटर सबज्युडीस आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, ही मॅटर सबज्युडीस नाही. माननीय मंत्रीमहोदयांनी त्याबाबतीत कबूल केलेले आहे आणि त्यासंबंधीची ऑर्डर निघालेली आहे.

**बॅ. मर्झबान पात्रावाला :** अध्यक्ष महोदय, शासन के निर्णय को उच्च न्यायालय, नागपूर में रिट याचिका क्रमांक १५९४/९४ एवं १५९७/९४ द्वारा चॅलेंज किया गया है और **इस मामले की कल सुनवाई चालू हुई है. मा. सदस्य ने जो मुद्दा उपस्थित किया वह भी हाईकोर्ट मे डिसकस किया गया है.**

**श्री. अरूण मेहता :** अध्यक्ष महाराज, कोणती मॅटर सब-ज्युडीस आहे हे समजले पाहिजे. त्याप्रमाणे सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारता येतील.

**सभापती :** मी आताच सांगितले आहे की एज ॲ मॅटर ऑफ फॅक्ट मॅटर इज सब-ज्युडीस असे म्हटल्यानंतर तो विषय मी तेथे थांबवला असता परंतु त्यावेळी हे मॅटर सब-ज्युडीस नव्हते म्हणून तो विषय घेतला.

**श्री. अरूण मेहता :** अध्यक्ष महाराज, या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित झाला आहे की, एच.एस.सी. आणि एस.एस.सी. असे दोन बोर्ड आपण निर्माण केलेले आहेत. त्या विभागातील विद्यार्थ्यांना बरोबर प्रवेश मिळेल....

**सभापती :** इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन व्हावे असे मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे.

**श्री.अरुण मेहता :** अध्यक्ष महाराज, परंतु त्याकरिता शासनाने काही तरी तरतूद करण्याची गरज आहे.

**सभापती :** परंतु त्याबद्दल सजेशन करता येणार नाही. इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन व्हावे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे ते मान्य आहे.

**श्री. अरूण मेहता :** अध्यक्ष महाराज, असा प्रश्न निर्माण झालेला आहे की अमरावती विभागात विद्यार्थ्यांची संख्या किती आहे आणि त्या विभागात मेडीकल कॉलेजेस किती आहेत? नागपूर विभागामध्ये पाच मेडीकल कॉलेजेस आहेत तेव्हा नागपूर विभागात जेवढी विद्यार्थ्यांची संख्या आहे तेवढीच विद्यार्थ्यांची संख्या जर अमरावती विभागात असेल तर त्या विभागामध्ये सुद्धा पाच मेडीकल कॉलेजेस निर्माण करण्याची गरज आहे. अन्यथा त्या विभागातील विद्यार्थ्यांना मेडीकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळणार नाही.

**The Chairman** : You cannot discuss the issue this way.

**श्री. अरूण मेहता :** अध्यक्ष महाराज, विद्यार्थ्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने मी प्रश्न विचारलेला आहे.

**सभापती :** विद्यार्थ्यांना न्याय मिळाला पाहिजे त्याकरता इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करण्यात यावे असे सन्माननीय सदस्यांनी मघाशी सांगितले होते येथपर्यंन्त ठीक आहे. परंतु यापुढे त्यासबंधी काही डिसकस करता येणार नाही.

**श्री.विजय मोरे** : अध्यक्ष महाराज, अमरावती विभागातील किती विद्यार्थ्यांनी अर्ज केले आणि नागपूर विभागातील किती विद्यार्थ्यांनी अर्ज केले? त्यापैकी फ्री सिटस् किती आहेत आणि पेईंग सीटस् किती आहेत?

**श्रीमती पुष्पाताई हिरे :** अध्यक्ष महाराज, नागपूर विभागात एकूण १ हजार ३७७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते त्यापैकी मेडीकलला २७८ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आणि डेन्टलला ६५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. त्याचबरोबर अमरावती विभागात एकूण ८२५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते त्यापैकी ८६ विद्यार्थ्यांना मेडीकलला प्रवेश देण्यात आला आणि डेन्टलला ४२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. त्याचबरोबर ३२ पेईंग सीटस् असल्याबद्दल मघाशी सन्माननीय राज्यमंत्र्यांनी खुलासा केलेला आहे.

**श्री. पी.जी.दस्तुरकर :** अध्यक्ष महाराज, सब-ज्युडीस मॅटरशी संबंध नाही असे दोन प्रश्न मला या ठिकाणी विचारावयाचे आहेत. मराठवाडा विभागात असे झालेले आहे की ज्या विद्यार्थ्यांनी अगोदरच एम.बी.बी.एस. ला प्रवेश घेतला होता.....

**सभापती :** या विषयी आपल्याला प्रश्न विचारता येणार नाही. एखादी मॅटर सब-ज्युडीस असल्यामुळे दुसऱ्या विषयाच्या संदर्भात आपल्याला प्रश्न विचारता येणार नाही.

**श्री.पी.जी.दस्तुरकर :** अध्यक्ष महाराज, माझा प्रश्न असा आहे की मराठवाड्यात असे घडलेले आहे की ज्या विद्यार्थ्यांनी अगोदरच एम.बी.बी.एस. ला प्रवेश घेतलेला होता त्याच विद्यार्थ्यांनी पुन्हा या वर्षीसुध्दा प्रवेश घेतलेला आहे त्यामुळे दुसऱ्या विद्यार्थ्यांचा हक्क डावलला जात आहे. तेव्हा कायद्यामध्ये अशा प्रकारची तरतूद आहे काय? कायद्यात जर अशा प्रकारची तरतूद असेल तर मग त्या विद्यार्थ्यांची ॲडमिशन रद्द करण्यात येणार आहे काय? त्याचबरोबर जो प्रोफार्मा आहे त्यामध्ये प्रतीक्षा यादीत कॉलेजचा कोड दिलेला आहे त्यामध्ये एकच कॉलेज निवडता येते. दुसरे कॉलेज निवडण्यासंबधीची तरतूद तेथे नाही, तेव्हा त्या कॉलेजमध्ये जर जागा भरल्या असतील तर त्या कॉलेजच्या कोड ऐवजी दुसऱ्या कॉलेजचा कोड देण्यासंबंधीची तरतूद करण्यात येणार आहे काय?

**बॅ. मर्झबान पात्रावाला** : मैं सन्माननीय सदस्य को बडे दुःख के साथ यह बताना चाहता हू कि यह मामला भी सब-ज्युडीस है इसलिए इस बारे में मै अभी कोई जानकारी नही दे सकता.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, जी मॅटर कोर्टात सब-ज्युडीस आहे त्यासंबंधी मी प्रश्न विचारत नाही. परंतु ती मॅटर कोर्टात सब-ज्युडीस आहे किंवा नाही त्याबद्दल मला सन्माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे. त्यासंदर्भात अध्यक्ष महाराज, मला आपल्याकडून संरक्षण हवे आहे. जणू काही अमरावती आणि नागपूर असे या दोन विभागांमध्ये वाद आहे अशा संदर्भात लक्षवेधी सूचना विचारण्यात आलेली आहे. मी जी लक्षवेधी सूचना दिली होती त्यामध्ये दोन मुद्दे स्वायत्त मंडळाबाबत उपस्थित केलेले होते. ती माझी लक्षवेधी या लक्षवेधीला टॅग झाली. हे दोन मुद्दे जर कोर्टातील पीटीशनमध्ये चॅलेंज झाले असतील तर त्याबद्दल मी येथे काही प्रश्न विचारणार नाही. इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन झाले पाहिजे आणि डेव्हलपमेंट एरीयावाईज वाटप केले गेले पाहिजे असे माझे दोन मुद्दे होते. हे दोन मुद्दे जर न्यायालयासमोर आव्हानीत केले गेले असतील तर त्यासंबंधी मी काही प्रश्न विचारणार नाही. जर ते न्यायालयासमोर आव्हानीत झाले असतील तर मग न्यायालयामध्ये जो काही निर्णय व्हावयाचा असेल तो होईल. तेंव्हा असे झाले


वैद्यकीय प्रवेशांच्या बाबतीत झालेल्या, होत असलेल्या व होऊ घातलेल्या अन्यायाविरुद्ध सुरु असलेल्या आंदोलनाला
**पाठिंबा व शुभेच्छा.**

**ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.**

*( संचालक मंडळ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी )*

**Best Compliments From**

**G. R. Chhatralaya Samiti, Amravati.**

**Dr. M. M. Rathi.** *President*

**S. S. Ladha** *Secretary*

*सहपत्र नऊ : परिच्छेद १४ पहा*

ITEM NO. 2 COURT NO. 1 SECTION IX

# SUPREME COURT OF INDIA

## *Record of Proceedings*

*Petition(s) for Special leave to Appeal (Civil) No. 18789 18801/96 (From the judgement and order dated 29.08.96 in WP. 4257 53/96, 1631 and 1633/96 of the HIGH COURT OF BOMBAY)*

आहे काय हे मंत्रीमहोदयांनी सांगावे.

**बॅ. मर्झबान पात्रावाला** : अध्यक्ष महोदय, रिट याचिका के अंतर्गत काफी मुद्दे उपस्थित किए गए है और उनपर बहस चल रही है. सन्माननीय सदस्यने जो मुद्दे यहां उपस्थित किए है, उसकी जानकारी अभी मेरे पास नही है. अगर सन्माननीय सदस्य चाहेंगे तो मै वह जानकारी सभागृह के पटलपर रखने के लिए तैयार हूं.

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, हा मुद्दा जर चॅलेंज झाला नसेल तर त्याबाबत प्रश्न विचारता येतील मग त्याबद्दल मला आपल्याकडून संरक्षण हवे आहे.

**सभापती :** त्या संदर्भात आता माहिती नाही असे सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. याचा अर्थ तो मुद्दा कोर्टात चॅलेंज झाला नाही असा होत नाही.

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, आता थोड्या वेळापूर्वी मंत्रीमहोदयांनी असे सांगितले की हायकोर्टात तो मुद्दा चॅलेंज झालेला आहे.

**सभापती :** त्यांच्याकडे माहिती नाही असे सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, तो पर्यंन्त ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी, कारण विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जात आहे.

**The Chairman** : That will be discussed in the Court.

**श्री. बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, हा मुद्दा जर कोर्टात आव्हानीत नसेल तर मग आमचा डिव्हाईस वाया जाईल.

**सभापती :** त्यासंबंधीची माहिती सन्माननीय मंत्रिमहोदयांकडे नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, माननीय मंत्रीमहोदयांनी त्यासंबंधीची माहिती घ्यावी आणि नंतर सांगावी. तोपर्यंन्त ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

**सभापती :** ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येणार नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, माझा मुद्दा जर कोर्टात आव्हानीत असेल तर त्याबद्दल मी काही विचारणार नाही कोर्टात त्यासंबंधीचा निर्णय होईल.

**The Chairman :** Mr. Minister, the hon member, Shri. B.T.Deshmukh will see you. You give him information whatever he wants about the facts.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, मी आपला आभारी आहे. याबद्दल मला फक्त एवढेच म्हणावयाचे आहे की कोर्टात जर त्या मुद्याला आव्हान दिलेले असेल तर सन्माननीय मंत्रिमहोदय मला तशी माहिती देतील त्यामुळे तो प्रश्न तेथेच संपेल.

**सभापती :** त्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी सन्माननीय मंत्रिमहोदयांना भेटावे.

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, मी माननीय मंत्रिमहोदयांना भेटतो. परंतु....

**सभापती** : त्यासंबंधीची माहिती आता सन्माननीय मंत्रिमहोदयांकडे नाही जेव्हा ती माहिती सन्माननीय सदस्यांना नंतर माननीय मंत्रीमहोदय देतील.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, मी मंत्रिमहोदयांना भेटतो परंतु माझे १-२ मुद्दे जर आव्हानीत असतील तर तो प्रश्न संपेल परंतु **जर हे मुद्दे आव्हानीत नसतील तर त्यासंबंधीची सभागृहात चर्चा होऊन त्यासंबंधी शासनाचे धोरण आम्हाला समजले पाहिजे.**

**सभापती : कोर्टातून सब-ज्युडीस मॅटर संपल्यानंतर मी ही चर्चा करण्यास परवानगी देईन.**

******

STATE OF MAHARASHTRA & ORS... Petitioner(s)
Versus
GOVINDDAS MANNULAL SHROFF & ORS... Respondent(s)
(With Appln(s). for Ex-parte stay exemption from filing c/c of the impugned judgement) with
SLP (civil) No. 17810-17011/95, SLP (Civil) No. 18158/96, SLP (Civil) No. 18845/96

***Date : 26.09.96.***

***These petitions were called on for hearing today.***

***CORAM***

**Hon'ble the Chief Justice**
**Hon'ble Mrs. Justice Sujata V. Manohar**

***For Petitioner(s) State of Maharashtra :*** Mr. TR Andhyarujina, SG, Mr. DM Nargolkar, Adv.
***in SLP (C) Nos. 17810-811/95 and 18158/96 :*** Mr. VA Mohta, Sr.Adv. M/s AK Sanghi and SK Malviya, Advs,
***in SLP (C) 18845/96 :*** Mr. VA Mohta, Sr. Adv, M/s SV Deshpande and Pradeep Deshmukh, Advs.
***For Respondent(s) :*** Ms. Armin Wandrewala, Adv. Mr. Alok Krishna Agarwal, Advs for Mr. Bharat Sangal, Adv. Ms, Indu Malhotra, Adv.

**Upon hearing counsel the court made the following**

**ORDER**

When these matters were called on for hearing, we suggested to the learned Solicitor General Shri. T.R. Andhyarujina that it would be more appropriate for the State Government to restructure rule 4.1.2.1 which has been struck down by the Full Bench of the Bombay High Court for reasons stated in paragraph 9 of their order appended to the petition. We thought it would be better if the state Govt. looks into the difficulties so that the fate of the students does not hang in a balance for such time as this court may take to dispose of the matter. We impressed upon the Solicitor General that since the ball is in the court of the State of Maharashtra, it would be most appropriate that the State looks into all the problems that they have surfaced since the making of the rule and on the basis of statistical evidence available with it, it re-structures the rule so that it operates in a just and reasonable manner so far as the large body of students' population is concerned. The response of the Solicitor General was positive but he stated that as the impugned order of the Full Bench mandates the state Govt. to implement the order forthwith and there is an apprehension that any delay would entail contempt proceedings . He would like that this Court gives the state Govt. Some time to re-structure the rule. We appreciate this contention and we grant the state Govt. time of two weeks to do the needful in the matter.

In view of above, the learned Solicitor General seeks leave to withdraw the petitions Nos. 18798-18801/96. So also Mr. V.A. Mohta who appears for the petitioners in SLP(C) Nos. 16845/96 and 18158/96, seeks leave to withdraw the petitions.

These petitions will stand disposed of as withdrawn,

So far as SLP(C) Nos. 17810-17811/95 are concerned in view of the state Govt. Undertaking an exercise to re-structure the relevant rule, We do not see any reason to entertain these petitions but would only observe that while doing so, the grievance pointed out in these petitions may also be kept in view.

In view of the above, Mr. Mohta also seeks leave to withdraw these petitions. The petitions will stand disposed of as withdrawn.

******

उजाडले ! पण सूर्य कोठे आहे? ... या प्रश्नाचे ठाम उत्तर ' सहकारा' ला सापडले आहे.ग्रामीण कर्ज मुक्ती, आदिवासी व जंगल कामगार विकास योजना, भूमिहिनांना भूमिवाटप, बेघरांना घरे, शेतक-यांना खावटी कर्ज आदी योजनांमुळे खेडोपाडी ' सूर्य ' पोहचला आहे. अंधारातून प्रकाशाकडे... दुर्बलतेकडून स्वयंपूर्णतेकडे ... सहकारी चळवळीचा प्रवास चालू आहे. या प्रवासाचे नेतृत्त्व करणारी.......

**दि. महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटिव्ह बँक लि.**

( सम्मिलित दि विदर्भ को- ऑप. बँक लि. )
महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन,
९ , नगीनदास मास्टर रोड, विस्तार, फोर्ट , मुंबई.
**प्रादेशिक कार्यालय**
डॉ. धनंजयराव गाडगीळ मार्ग, टिळक पुतळा, महाल, नागपूर.२

**हार्दिक शुभेच्छा**
**दक्षेश मार्केटींग प्रा. लि.**
*चन्द्रशेखर आझाद मार्ग, खेमानी बस स्टॉप जवळ,*
*पो. बॉक्स नं. ३०,*
**उल्हासनगर- ४२१ ००२**

# विद्यापीठ निहाय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे केलेले अन्याय्य वाटप

*महाराष्ट्र विधानपरिषद : तिसरे अधिवेशन १९९४ : बुधवार, दिनांक : ३०.११.१९९४*

**श्री.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) :** अध्यक्ष महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"१० जून १९९४ च्या शासन निर्णयाने विद्यापीठनिहाय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे केलेले अन्याय्य वाटप, वस्तुतः १९९४ च्या विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ आदेशाच्या परिच्छेद १० प्रमाणे विशेष जबाबदारी अंतर्गत हे वाटप उक्त विभागनिहाय करण्याची गरज, बाराव्या वर्गाला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन समन्यायी वाटप करण्यात न आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, १ नोव्हेंबर १९९४ ला अमरावती येथे जिल्हाधिकाऱ्यांचे कार्यालयावर नेण्यात आलेला मोर्चा, ५ नोव्हेंबर १९९४ पासून शहीद स्मारकाजवळ चालू असलेले साखळी उपोषण,१९ नोव्हेंबर १९९४ रोजी शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याचा झालेला कार्यक्रम, आमरण उपोषणाचा कृती समितीने घोषित केलेला कार्यक्रम, मुख्यमंत्र्यांशी कृती समितीने वेळोवेळी केलेली चर्चा, वैधानिक विकास मंडळ आदेश १९९४ प्रमाणे विकास मंडळ प्रदेश घटक धरून जागांचे समन्यायी वाटप करण्यात शासनाला आलेले अपयश, त्यामुळे जनमानसामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई."

**डॉ. शरद काळे (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये राज्यमंत्री)** : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते दुरुस्त केलेले निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

**(निवेदन)**

राज्यातील शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील ३० % जागा राज्यस्तरीय गुणवत्तायादीतील व ७० % जागा विद्यापीठ स्तरीय गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांमधून भरण्यात येतात. अमरावती विद्यापीठ सन १९८३ साली स्थापन झाल्यानंतर सन १९९३ पर्यंत या विद्यापीठ क्षेत्रात भारतीय आर्युविज्ञान परिषदेची मान्यता असलेले एकही वैद्यकीय महाविद्यालय अस्तित्वात नव्हते. तथापि सन १९९३ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती यास भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता प्राप्त झाल्यावर अमरावती विद्यापीठ नागपूर विद्यापीठापासून वैद्यकीय प्रवेशासाठी वेगळे करण्यात आले आहे. वैद्यकीय प्रवेशाच्या सदरहू निर्णयास उच्च न्यायालय नागपूर खंडपीठात रिट याचिका क्र. १५९४/९४ व १५९७/९४ अन्वये आव्हान देण्यात आले व न्यायालयाने दि. २७.९.९४ रोजी दिलेल्या निकालात न्यायालयाने अमरावती व नागपूर विद्यापीठ क्षेत्रे वैद्यकीय प्रवेशासाठी वेगळी करण्याचा शासनाचा निर्णय वैध असल्याचा निर्वाळा दिला आहे.

२. **"१९९४ च्या विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ आदेशा" च्या परिच्छेद-१० प्रमाणे विशेष जबाबदारी अंतर्गत जे वाटप विभागनिहाय करावयाचे आहे त्या बाबतच्या सूचना मा. राज्यपाल यांचेकडून शासनास अद्यापि प्राप्त झालेल्या नाहीत.** सदरहू सूचना प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

निवेदनानंतर...

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदाकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो आणि हेही स्पष्ट करू इच्छितो की, नियमाप्रमाणे आपण माननीय राज्यपालांच्या कृती विषयी येथे चर्चा करीत नाही पण "१९९४ चा विदर्भ,मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ आदेश" निर्गमित झाला आहे आणि त्याला कायद्याचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्र शासनाच्या गॅझेटच्या भाग-४ मध्ये तो आदेश प्रसिद्ध झाला आहे आणि त्याच्या परिच्छेद १० मध्ये स्पष्टपणे असे म्हटले आहे की, यापुढे "या जागांचे इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन केले पाहिजे आणि त्याकरिता विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र हे तीन डेव्हलपमेंट रिजन वाटपाचे आधारभूत घटक मानले पाहिजे". माझा प्रश्न असा आहे की आपण हे जागांचे डिस्ट्रीब्युशन विद्यार्थ्यांची एकूण संख्या लक्षात घेवून केले आहे की ॲपिअर्ड विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात केले आहे? की पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात केले आहे? की ॲडमिशनसाठी उपलब्ध जागांच्या प्रमाणात केले आहे की, या पेक्षा वेगळा काही निकष लावण्यात आला आहे? **१० जून १९९४ चा जागा वाटपाचा शासननिर्णय काढतांना काय विचार करण्यात आला होता?**

**डॉ. शरद काळे :** अध्यक्ष महाराज, विद्यापीठ निहाय आपण व्यवस्था केलेली आहे.

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, विद्यापीठ निहाय व्यवस्था करण्यात आलेली आहे. **कोणत्या विद्यापीठाच्या परिक्षेत्रामध्ये किती जागा निर्माण झालेल्या आहेत व त्या कशा निर्माण झाल्या आहेत याचा इतिहास शासनाला माहीत नाही काय?** याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन करण्याकरता माननीय राज्यपालांनी तुम्हाला कळविलेले नाही हे मला समजले. त्याबाबतीत निवेदनामध्ये खुलासा करण्यात आलेला आहे. त्या संदर्भात मला काहीही म्हणावयाचे नाही, परंतु इक्विटेबल डिस्ट्रिब्युशन करण्यास तुम्हाला कोणी मनाई केली होती काय ?

**डॉ. शरद काळे** : अध्यक्ष महाराज, इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन देण्यास कोणीही मनाई केलेली नव्हती. **परंतु कोर्टाने निर्णय दिलेला होता की, विद्यापीठ निहाय ॲडमिशन्स देण्यात याव्यात आणि त्याप्रमाणे ॲडमिशन्स कराव्या लागल्या**

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, **ही गोष्ट किती लाजिरवाणी आहे. मी असे विचारले होते की, डिस्ट्रीब्युशन केले तेव्हा तुम्ही काय आधार घेतले होते? इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन केलेले होते काय? कोर्ट कचेरी नंतर आली. मुळात इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन केले नाही.** कोर्टाच्या निर्णयाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी उल्लेख केलेला आहे. कोर्टाच्या बाबतीत मी सांगतो.तुम्ही जरी ते वाचलेले नसले तरी सुद्धा तुमच्या दुर्देवाने मी ते वाचलेले आहे. अध्यक्ष महाराज, मुंबई विभागामध्ये २४ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि त्या ठिकाणी ६०० जागा देण्यात आल्या आहेत. त्यानंतर पुणे विभागामध्ये २६ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि त्याठिकाणी ५४० जागा देण्यात आल्या आहेत. अमरावती विभागामध्ये १८ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि त्याठिकाणी फक्त १५० जागाच देण्यात आल्या आहेत. **या संदर्भात मी आपल्याला असे विचारू इच्छितो की, इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनच्या संदर्भात कोर्टाने काय म्हटलेले आहे?**

**श्रीमती पुष्पाताई हिरे** : अध्यक्ष महाराज, १९७१ साली सुप्रीम कोर्टाने एका केसच्या बाबतीत निर्णय दिला होता. म्हैसूर राज्यामध्ये कु.चंचला विरुद्ध म्हैसूर राज्य अशी ती केस होती आणि त्याबाबतीत सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला होता त्या कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे सगळीकडे विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रात जी कॉलेजेस येतात त्याप्रमाणे ही वर्गवारी केलेली आहे. त्यामुळे काही याचिका नागपूर खंडपीठाकडे आलेल्या आहेत. त्यामध्ये अमरावती विद्यापीठात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा स्वतंत्रपणे विचार करावा असा निर्णय दिलेला आहे.


Sudhir Laddha
*B. Chem. ( Engg.)*

**SONALEE TRADERS**

Shop No. 8, Satidham Market,
Jawahar Road, **AMRAVATI.** 444 601
***Tel. No.*** *74650, 661969* ***Fax*** *0721 - 75694*

**हार्दिक शुभेच्छा**

*∗अर्चना एजन्सीज , अमरावती.
∗अनुराग कापड दुकान, सातेगाव.
∗आनंद इंजिनिअरिंग , चंद्रपूर.
∗कासट बंधू , अमरावती.*

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, ही गोष्ट लाजिरवाणी आहे. मी जे काही विचारले होते त्याबद्दल माननीय मंत्रीमहोदया उत्तर देत नाहीत. माननीय मंत्रीमहोदया सुप्रीम कोर्टाच्या निर्णयासंबधीची माहिती येथे देत आहेत. इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनसंबंधीची ऑर्डर मे १९९४ ची आहे. ही ऑर्डर झाल्यानंतर हायकोर्टामध्ये हे प्रकरण गेले असल्याचे सन्माननीय राज्यमंत्र्यांनी येथे सांगितले. त्यासंदर्भात मी प्रश्न विचारलेला होता. सुप्रीम कोर्टाच्या बाबतीत मी काही विचारलेले नव्हते. तेव्हा त्याबद्दल कशाला माहिती देत आहात? **सुप्रीम कोर्टाची गोष्ट सुद्धा आता खूप जुनी झालेली आहे. भारताच्या मा. राष्ट्रपतींनी ९ मार्च १९९४ ला कलम ३७१ अन्वये घटनात्मक आदेश काढला व मे १९९४ मध्ये मा.राज्यपालांचा विशेष जबाबदारीचा आदेश गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाला आहे. सुप्रीम कोर्टाची गोष्ट तर फार जुनी झाली. त्यानंतर पुष्कळ पाणी वाहून गेले आहे.** अध्यक्ष महाराज, माझे म्हणणे असे आहे की, हायकोर्टाच्या ज्या निर्णयाचा आपण येथे उल्लेख केलेला आहे त्या निर्णयामध्ये इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन बद्दल काय म्हटले आहे?

**श्रीमती पुष्पाताई हिरे** : अध्यक्ष महाराज, न्यायालयाने हा जो निर्णय दिलेला आहे त्याप्रमाणे अमरावती आणि नागपूर विद्यापीठामध्ये प्रवेशासाठी वेगळे प्रवेश नियम लावावेत असे कळविले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, न्यायालयाने जे कळविल्याचे आता नामदार मंत्री महोदया सांगत आहेत ते बरोबर आहे, **पण समन्यायी वाटपाबद्दल काय? अध्यक्ष महाराज, मी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शाळेतील एक विद्यार्थी या नात्याने त्यावेळी भाग घेतला आहे. मराठी भाषिकांचे राज्य झाले ही त्या पिढीने अनेक पीढ्यांना दिलेली देण आहे आणि हा सारा अनुशेष जो आहे तो आमच्या एका पिढीचे पाप आहे.**

**सभापती : महाराष्ट्र आता फुटण्याची वेळ आलेली आहे. मधल्या काळात बरेच पाणी वाहून गेलेले आहे.**

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, हे दुर्दैवी आहे. या अनुशेष वाढविणाऱ्या गोष्टीला पाठिंबा देणारे त्यासाठी जबाबदार आहेत, त्यासाठी आम्ही शेवटपर्यंत झगडू. अमरावती विभागातील विद्यार्थी महाराष्ट्रातच आहेत ना? या इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन बाबत कोर्टाने असे म्हटले आहे की, आता प्रवेशाच्या दृष्टीने या एकंदर प्रवेशाची घाई आहे. त्याबाबतीत अगोदरच उशीर झालेला आहे. **म्हणून हा विषय ओपन आहे. कोर्टाने याबाबत आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ९९ (अ) मध्ये असे म्हटले आहे की, "We, therefore, propose to keep the above question of equitable distribution of seats in the whole of the State open"** म्हणजेच इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनच्या प्रश्नावर हायकोर्टाने निर्णय दिलेला नाही पण तुम्ही जे केलेले होते त्याबद्दल कोर्टाने म्हटले आहे की, आता इतका विलंब झालेला आहे. की, आम्ही या इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनच्या प्रश्नामध्ये आता शिरणार नाही. तर ती गोष्ट ओपन ठेवलेली आहे. लोक कोर्टामध्ये जातील. अजूनही आपण काहीच करीत नाही असे दिसले तर, कारण हा प्रश्न ओपन आहे. परंतु आपण शासन म्हणून याबाबतीत काही करणार आहात की नाही? अध्यक्ष महाराज, यात दोन प्रश्न आहेत. या सत्रामध्ये आपण हे करू शकाल असे मलाही वाटत नाही. परंतु इक्विटेबल डिस्ट्रिस्ट्रब्युशन झाले पाहिजे व त्याचा आधार हा डेव्हलपमेंट रिजन असला पाहिजे असे माझे म्हणणे आहे. आणि दुसरे म्हणजे हे इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन त्या त्या विभागातून जे एकूण विद्यार्थी आहेत किंवा पात्र विद्यार्थी आहेत त्यांच्या संख्येवर आधारित असले पाहिजे. मुंबई व पुणे विभागाच्या २५ टक्के सुद्धा जागा आपण आम्हाला देणार नाही ही गोष्ट बरोबर आहे काय? **म्हणून माझा प्रश्न सरळ सरळ असा आहे की, एखाद्या भागामध्ये किती सीटस् उपलब्ध आहेत हा आधार याबाबत कसा काय होऊ शकतो?**

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण हे एवढे सारे सांगत आहात, पण या ठिकाणी निवेदनातच शेवटी असे म्हटले आहे की, याबाबतच्या सूचना माननीय राज्यपालांकडून अद्याप शासनास प्राप्त झालेल्या नाहीत. सदरहू सूचना प्राप्त झाल्यानंतर त्याअनुषंगाने योग्य तो निर्णय घेण्यात येईल. तरी आपण त्याकडे लक्ष द्यावे.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, त्यावरच माझा प्रश्न आहे की, समजा राज्यपालांच्या सूचना याबाबत आल्याच नाहीत तर आपण तोवर हे असेच चालू ठेवणार आहात काय?

**सभापती** : या निवेदनात तसे कोठे लिहिले आहे? आपण म्हणता तसे काहीही येथे लिहिलेले नाही....

**श्री.बी.टी.देशमुख** : म्हणूनच तर मी विचारतो आहे की, या निवेदनात शासनाने तसे कोठेही लिहिलेले नाही, ते वस्तुतः लिहिले पाहिजे होते. अन्यथा आपण हे आता आहे असेच चालू ठेवणार आहात काय?

**सभापती** : पण माननीय राज्यपालांकडून सूचना येणार नाहीत असे आपण कसे काय म्हणता? त्या सूचना आज नाही उद्या येतीलच.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, त्या आज आल्या नाहीत, त्यामुळे एक वर्षाची पिढी यात आजच गारद झाली आहे. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, ....

**सभापती** : मग त्या दृष्टीने आपण शासनास इतकेच विचारावे की राज्यपालांकडून शासनाने सूचना मागवाव्या...

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, प्रादेशिक असमतोलाची ही अगदी अत्यंत खोल अशी जखम आहे म्हणून मला हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा वाटतो आहे, त्यासाठी मुद्दाम मी काही मुद्दे देवून ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे ....त्यावर प्रश्न विचारण्यास आपण मला संधी द्यावी इतकीच विनंती आहे. आम्ही महाराष्ट्रात सामील झालो याबद्दल आम्हाला शिक्षा देताहेत काय? माझे या संदर्भात इतकेच म्हणणे आहे की, **१२ वी ला असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेवून सीटस् चे समन्यायी वाटप आपण केलेले नाही. १२ वी ला बसलेल्या विद्यार्थ्याची संख्या तरी आपण या वाटपासाठी पाहिली आहे काय व त्या आधारावर समन्यायी वाटप करणार काय?**

**डॉ. शरद काळे** : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी अमरावती विद्यापीठावर प्रवेशाच्या जागांच्या बाबतीत अन्याय होतो आहे अशी जी भावना सन्माननीय सदस्यांनी येथे व्यक्त केलेली आहे त्याबद्दल मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की याबाबतीत अमरावती आणि नागपूर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पालक व विद्यार्थी कोर्टामध्ये दोन्ही बाजूंनी गेले होते. त्यानंतरच विद्यापीठनिहाय प्रवेश करण्यात यावेत असा कोर्टाचा निर्णय लागल्यानंतर कोर्टाच्या जजमेंटमध्ये या प्रोसेसमध्ये विद्यापीठ निहाय जागा ३ पटीने जास्तीच्या मिळालेल्या आहेत या विद्यापीठाला. तेव्हा या विद्यापीठाच्याबाबतीत शासनाने जाणून बुजून काही अन्याय केलेला आहे अशी भूमिका या ठिकाणी नाही. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मी आणखी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अमरावती विद्यापीठाची निर्मिती ही नंतरची असल्यामुळे आणि त्या ठिकाणी एकच सरकारी महाविद्यालय आहे व दुसरे खाजगी महाविद्यालय आहे. तेथे जास्तीची महाविद्यालये नाहीत. आता त्यासाठी अर्ज आल्यानंतर तेथे नवीन महाविद्यालये देण्यासंबधात शासन जरूर विचार करणार आहे. तोवर आहे त्या महाविद्यालयांमध्ये जागा प्रवेश वाढवून देण्याचाही शासन प्रयत्न करणार आहे. त्यामुळे प्रसंगानुरुप या जागा वाढणार आहेत हे आपण लक्षात घ्यावे. अमरावती विद्यापीठ हे नवीन विद्यापीठ असल्याने **सकृतदर्शनी येथे जागा कमी दिसतात हे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे ते तसे खरे आहे. पण पूर्वीपेक्षा विद्यापीठ निहाय जागा देण्याचे सुरू झाल्यापासून आपल्याकडील विद्यार्थ्यांच्या तीन पटीने जागा जादा मिळाल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.**

**डॉ. ब.वा. हिरे** : अध्यक्ष महाराज, ज्या एडमिशन जून जुलै महिन्यात झाल्या पाहिजेत त्या आज नोव्हेंबर संपून डिसेंबर महिना उजाडला आहे तरी होत नाहीत. अशा पद्धतीने हा सारा या प्रवेशासंबंधीचा घोळ


शुभेच्छा

*अभय नगीनचंद बुच्चा*

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती. द्वारा संचालित

**औषधी शाळा , अमरावती.**

आमचे येथे शास्त्रोक्त पद्धतीने सर्व प्रकाराची आसवे, अरिष्टे, गुटीका, काढे, चूर्ण, च्यवनप्राश इत्यादी विविध विकारांवर उपयोगी उत्तम आयुर्वेदिक औषधींची निर्मिती केली जाते. यासाठी तज्ञ वैद्यांचे मार्गदर्शन घेतले जाते. आणि वाजवी दरात औषधी विक्री करिता उपलब्ध आहेत.

**स्थळ : औषधी विक्री केंद्र, फरशी स्टॉप जवळ, धन्वंतरी नगर, छत्री तलाव रोड, अमरावती.**

**प्रधान सचिव**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती.

घातला आहे. या मेडीकलच्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारे अॅडमिशन उशिरा मिळाल्या तर त्यांना आपली टर्म पूर्ण करता येत नाहीत. त्यामुळे विद्यार्थी जीवनामध्ये जो असंतोष आणि अस्थिरता निर्माण झाली आहे व होत आहे त्याला या वर्षी तरी शासनाकडून झालेली अक्षम्य दिरंगाई कारणीभूत आहे. तेंव्हा या दृष्टिकोनातून आपण मघाशी म्हटल्याप्रमाणे माननीय राज्यपालांकडून आदेश येण्याची वाट न पहाता, राज्यपालांचे याबाबत स्पष्टीकरण घेवून जून महिन्यातच हे प्रवेश देण्याची जबाबदारी ही या शासनाची होती ती शासनाने का पार पाडली नाही?

**डॉ. शरद काळे** : अध्यक्ष महाराज, ही सगळी प्रोसेस सबज्युडिस असल्यामुळे सप्टेंबरपर्यंत कोर्टाचे निकाल न लागल्यामुळे शासनाला याबाबतीत काहीही करता आलेले नाही.

**श्री. बबनराव चौधरी** : अध्यक्ष महाराज, या निवेदनात आपण म्हटले आहे की माननीय राज्यपालांकडून शासनास अद्याप सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. पण सर्वांना समान संधी हे या राज्याचे सूत्र आहे. तेंव्हा या विभागामध्ये विद्यापीठाच्या निर्मितीस उशीर झाला म्हणून अमरावती विभागातील विद्यार्थ्यांचा त्यात काही दोष नाही. हे लक्षात घेऊन त्यांना प्रवेशासाठी पुरेशा प्रमाणात संधी मिळाली पाहिजे होती ती मिळालेली नाही. ती देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन निर्णय घेईल काय ? तसेच या संदर्भात राज्यपालांकडून सूचना अद्याप यायच्या आहेत, पण त्यामुळे या वर्षीच्या विद्यार्थांचे जे नुकसान झालेले आहे ते शासन कसे काय भरून काढणार आहे.

**श्री. श.गो.पवार** : अध्यक्ष महाराज, या प्रश्नाच्या बाबतीत संबधित पालकांचे शिष्टमंडळ आणि काही लोकप्रतिनिधी तसेच विद्यापीठाचे कुलगुरू सुद्धा मला भेटले आहेत. संपूर्ण आकडेवारी आणि विद्यार्थ्यांचे एकंदर प्रमाण आणि मेडीकलच्या सिटस् यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर ही गोष्ट यातून स्पष्ट झालेली आहे की, अमरावती विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये एकच शासकीय महाविद्यालय आहे ते यवतमाळ येथे आणि दुसरे महाविद्यालय हे शिवाजी शिक्षण संस्थेचे आहे ते अमरावती मध्येच आहे. या दोन्ही महाविद्यालयांमध्ये जागा मर्यादित आहेत त्यामुळे त्यात विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असतांना अन्य विद्यापीठामध्ये शेवटच्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळविण्यासाठी जी गुणवत्ता प्राप्त करावी लागते त्यापेक्षा या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्ता प्राप्त करावी लागेल त्यापेक्षा या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तेची आवश्यकता होती आणि एका दृष्टिने तेथील विद्यार्थ्यांना अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांप्रमाणे न्याय मिळाला नाही ही गोष्ट सत्य आहे. कोर्ट-कचेऱ्या, हायकोर्ट आणि या सगळ्या गोष्टीमुळे यामध्ये आधीच विलंब झालेला आहे. आता त्यांना काही तरी गाईड लाईन्स दिलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे ही प्रवेशाची प्रक्रिया लौकरात लौकर पूर्ण करण्याशिवाय काही पर्याय राहिलेला नाही. परंतु हा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी राज्यपालांकडून काही मार्गदर्शन घेण्याची आवश्यकता आज वाटली असली तरी राज्य सरकारने स्वतःहून पुढे येऊन यासंबंधी निर्णय घेतला पाहिजे होता या तत्त्वाशी आम्ही सहमती दाखविली आहे. **दोन-तीन मार्ग त्यात आम्ही काढलेले आहेत. एक म्हणजे तळेगांव येथे एक नवीन महाविद्यालयास परवानगी देण्याचा निर्णय इंडियन मेडिकल कौन्सिलने घेतला आहे.त्या महाविद्यालयामध्ये ज्या जागा उपलब्ध होणार आहेत त्यातील ५० जागा या आम्ही अमरावतीच्या विद्यार्थ्यांसाठी यंदापासूनच राखून ठेवल्या आहेत** आणि ते अतिरिक्त विद्यार्थी तेथे सामावून घेण्यासंबंधीचा निर्णयही शासनाने घेतलेला आहे. तशा प्रकारच्या सूचनासुद्धा त्या मॅनेजमेंटला दिलेल्या आहेत, त्यांचेशी याबाबत बोलणे झालेले आहे. याशिवाय हा प्रश्न कायमचा निकालात निघण्यासाठी **यवतमाळच्या महाविद्यालयामध्ये सिटस् वाढविण्यासंबंधीचा निर्णय राज्य सरकार घेत आहे.** परंतु आज त्या महाविद्यालयात इंडियन मेडिकल कौन्सिलची मान्यता मिळायची स्टेज आहे. ती मान्यता मिळण्यासाठी जे इन्फ्रास्ट्रक्चर लागते ते आज तेथे उपलब्ध आहे. तेंव्हा आजच आम्ही त्या ठिकाणी आणखी जागा वाढविल्या आणि मग त्यासाठीच्या इन्फ्रास्ट्रक्चरची व्यवस्था जर केली गेली नाही तर कदाचित त्या महाविद्यालयाच्या मान्यतेचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि म्हणून आता नवीन वर्ष सुरू होण्याच्या मधल्या कालावधीत जास्त सीटस् वाढविण्यासाठी जी काही व्यवस्था करावी लागेल. टीचिंग स्टाफ वाढवावा लागेल किंवा अन्य सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील त्याबद्दलची कारवाई केली जाईल आणि त्या सिटस् तेथे वाढविल्या जातील आणि शक्य झाल्यास **या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये आणखी एखाद दुसऱ्या वैद्यकीय कॉलेजला परवानगी देण्यासंबंधी त्यासाठी आवश्यक ती शिफारसही इंडियन मेडिकल कौन्सिलकडे करण्याचा राज्य सरकारने विचार केलेला आहे.**

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, माननीय मुख्यमंत्र्यांनी तळेगांव दाभाडे येथील महाविद्यालयामध्ये अमरावती विभागातील विद्यार्थ्यांसाठी ५० जागा उपलब्ध करून दिल्याचे सांगितले आहे मग ते निवेदनांत कां आले नाही? त्यातल्या त्यात ताबडतोब काढता येण्यासारखे सोल्युशन म्हणून ती निश्चितपणे स्वागतार्ह अशी गोष्ट आहे. तसेच त्याबाबतच्या सूचना देखील निर्गमित झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे या वर्षाच्या या विभागातील विद्यार्थ्यांना थोडाफार रिलीफ मिळेलही. मी मूळ मुद्यासंबंधी विचारू इच्छितो म्हणजे विभागामध्ये किती जागा निर्माण झालेल्या आहेत, या आधारे या जागा आपण ठरविणार आहात काय? कारण स्टेट अॅज ए होल हे लक्षात घेऊन या जागांचे इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन व्हायला पाहिजे. त्या दृष्टीनेच मी मघापासून दोन मुद्यांचे उत्तर मागतो आहे. आता या वर्षी आपण तळेगांव दाभाडे येथे व्यवस्था केली ते ठीक आहे......

**सभापती** : पण इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन करण्यासाठी जागांची उपलब्धता असली पाहिजे आणि आज तरी ती उपलब्धता नाही हे सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावे. त्यामुळेच यवतमाळ वगैरे ठिकाणी जागा वाढविण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे हेही मुख्यमंत्र्यांनी येथे आता सांगितलेले आहे. तेंव्हा जो मूळ बेसिक प्रश्न आहे... येथील विद्यार्थ्यांवर अन्याय झालेला आहे तर ते शासनाने मान्य केलेले आहे. यासाठीच माननीय राज्यपालांच्या सूचनांसाठीसुद्धा सरकार आता थांबत नाही. तळेगांव येथे येथील विद्यार्थ्यांना जागा सरकार देत आहे आणि यवतमाळला सुद्धा व्यवस्था करणार आहे यापेक्षा आपल्याला आणखी काय पाहिजे?

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, मा. मुख्यमंत्री महोदयांनी तळेगांव दाभाडे येथे **५० जागा वाढवून देण्याबाबत सूचना दिल्या हे जे या ठिकाणी सांगितले ते स्वागतार्ह आहे. ही तात्पुरती उपाययोजना झाली परंतु त्या ठिकाणी जर काही विलंब झाला, कोर्ट कचेरी झाली तर प्रश्न निर्माण होणार आहेत.** अध्यक्ष महाराज, या भागामध्ये जागा वाढविणे किंवा एखाद्या चांगल्या संस्थेला महाविद्यालय देणे हा उपाय योग्य आहे पण त्याला वेळ लागेल. अध्यक्ष महाराज, या ठिकाणी **पुढच्या जूनमध्ये स्टेट अॅज ए होल उपलब्ध जागांचे इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशन हे झाले पाहिजे आणि त्याचा बेसीस डेव्हलपमेंट रिजन हे असले पाहिजे. या संबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांना काय सांगावयाचे आहे?**

**श्री. श.गो. पवार :** अमरावती कार्यक्षेत्रामध्ये मेडीकलच्या सीटस् वाढविण्याबाबतची जी खबरदारी घ्यावयाला पाहिजे ती घ्यावीच लागेल. ती खबरदारी घेण्याच्या दृष्टीने राज्य शासनाकडून पावले टाकली जातील. यामध्ये जर काही मर्यादा आल्या तर राज्यातील एकंदर १२ वी सायन्सच्या परीक्षेला बसणाऱ्यासाठी तसेच मेडीकलसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी एकंदर विद्यापीठवाइज संख्या, **राज्यात उपलब्ध असलेल्या सगळया मेडीकलच्या सीटस् याचा एकत्रित विचार करुन त्या पद्धतीने प्रत्येक विद्यापीठामध्ये समान प्रमाणात कोटा देण्याच्या संबंधीचा निर्णय घेतला जाईल.**

********

URDU EDUCATION SOCIETY' S
K.M.ASGHAR HUSAIN COLLEGE OF EDUCATION
Ratanlal Plot, Post Box No. 48, Akola.
*( Affiliated with Amravati Universtiy.)*
FEATURES OF OUR INSTITUTION.
*Established in the year 1990 *well furnished building. *Experienced and Dedicated Staff. *Excellent academic result. *Well equipped library. *Well equipped Science laboratory. *Psychology Laboratory. *Sports laboratory with Sports materials. *Various Extra curricular activities for students. * Indoor and outdoor sports facilities available.
K. M. AZHAR HUSAINDR. — PRESIDENT
IQBALULLAH KHAN — PRINCIPAL

हार्दिक शुभेच्छा
१.विद्याभारती महाविद्यालय, कँप, अमरावती.२.विद्याभारती इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड पोस्ट ग्रॅज्युएट स्टडीज इन सांयस अँड मॅनेजमेंट. ३.विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालय, कँप, अमरावती. ४.विद्याभारती कॉलेज ऑफ फार्मसी, कँप, अमरावती. ५.स्वा. से. मा. श्री. कन्हैयालालजी इन्नानी महाविद्यालय, कारंजा लाड,जि. अकोला. ६.विद्याभारती कनिष्ठ महाविद्यालय, कारंजा लाड, जि. अकोला. ७.संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय, एदलाबाद, जि. जळगाव. ८.विद्याभारती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, शेलुबाजार, जि. अकोला. ९.श्री. शिवचंदजी लढ्ढा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, शिवणगाव, जि. अमरावती.

# राज्यात १९९४-९५ यावर्षी वैद्यकीय व दंत महाविद्यालयांतील जागांचे समन्यायी वाटप करण्याबाबत.

*महाराष्ट्र विधानपरिषद : पहिले अधिवेशन १९९५ : शुक्रवार, दिनांक ३१ मार्च १९९५*

(२) * ५६ **सर्वश्री पी.जी.दस्तुरकर, व्ही.यु. डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील, दि.बा.पाटील** : सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १९९४-९५ या वर्षी वैद्यकीय शिक्षण महाविद्यालयांमध्ये भटक्या व विमुक्त जाती, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय आणि खुल्या जागांसाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त किती गुण होते व कमीत कमी किती गुण होते?

(२) यावर्षी बारावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या तीन प्रदेशामध्ये महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप करण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केलेली आहे?

(३) अशी उपाययोजना केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दौलतराव आहेर :** (१) माहिती सोबत जोडली आहे.

(२) अशा प्रकारे प्रदेशनिहाय जागा वाटपाबाबतचा कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नाही, तथापि राज्यातील वैद्यकीय व दंत महाविद्यालयांतील एकूण प्रवेश जागा एकत्रित करून त्यांचे विद्यापीठनिहाय समन्यायी वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

(३) या प्रस्तावाबाबतच्या कायदेशीर बाजू तपासण्यात येत आहेत.

**श्री.पी.जी.दस्तुरकर :** अध्यक्ष महाराज, ता.प्र.क्र. ५६.

**डॉ. दौलतराव आहेर :** (वैद्यकीय शिक्षणमंत्री) अध्यक्ष महाराज, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे. पान नं. २ वर "श्री.दौलतराव आहेर" असे नावे देण्यात आले आहे त्या ऐवजी "दौलतराव आहेर" असे नाव वाचण्यात यावे. तसेच पान नं. ४ वर मुंबई विद्यापीठ क्षेत्रातील वैद्यकीय महाविद्यालये यामध्ये अनु. क्र. ३ महात्मा गांधी मिशनचे वैद्यकीय महाविद्यालय, नवी मुंबई या समोरील तिसऱ्या कॉलममध्ये २८१ या आकड्याऐवजी २८४ हा आकडा वाचावा.

**श्री.पी.जी.दस्तुरकर :** अध्यक्ष महाराज, बारावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र या ठिकाणी वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप करण्यासंबंधी प्रश्न आहे. मागच्या वर्षी बऱ्याच मुलांचे नुकसान झालेले आहे. त्या मुलांना ॲडमिशन मिळालेली नाही. आता यावर्षीही मुलांचे नुकसान होऊ नये. याठिकाणी यासंदर्भात असे उत्तर दिले आहे की, विद्यापीठनिहाय समन्यायी वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव तपासण्यात येत आहे. अजूनही तेच उत्तर दिले जात आहे. मागे या संदर्भात चर्चाही झालेली होती. माझा प्रश्न असा आहे की, हा प्रस्ताव तपासण्यास एवढा विलंब का लागत आहे? किती दिवसांमध्ये हा प्रस्ताव तपासण्यात येईल?

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, पूर्वी नागपूर व अमरावती विद्यापीठ संलग्न होते. त्यानंतर नागपूरचे काही विद्यार्थी नागपूर हायकोर्टामध्ये गेले. त्यानंतर नागपूर व अमरावती विद्यापीठाचे बायफरकेशन झाले. त्यानंतर अमरावती विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. नागपूर हायकोर्टाचा निकाल लागल्यानंतर ही मंडळी सुप्रिम कोर्टामध्ये गेली. त्याठिकाणी मार्च १९९५ मध्ये याचा निकाल लागला आहे. **सुप्रिम कोर्टाने हे सर्व मॅटर राज्यशासनाकडे पाठविले आहे आणि राज्य शासनाने नागपूर हाय कोर्टाकडे रेफर केले आहे. समान वाटप कसे होईल याप्रकारे आदेश दिले आहेत. या बाबतीत लवकरात लवकर कारवाई करण्यात येईल.**

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, लोकांनी कोर्ट कचेऱ्या करावयाच्या आणि नंतर सुद्धा शासनाने याबाबतीत काही निर्णय घ्यावयाचा नाही असे हे चालू आहे. मागच्या वेळेला माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की - आपण तो निर्णय बदलणार असाल तर मागासलेल्या विभागांना न्याय मिळाला पाहिजे या दृष्टिकोनातून बदलावा. मागच्या वेळेला मा.मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, - अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांप्रमाणे न्याय मिळालेला नाही ही गोष्ट सत्य आहे. अनुसूचित जातीच्या २४२ मार्क असलेल्या विद्यार्थ्यांना इकडे ॲडमिशन मिळाली पण अमरावती विभागात २४९ मार्क मिळालेल्या विद्यार्थ्याला ॲडमिशन मिळाली नाही.याचे कारण जागांचे समन्यायी वाटप केलेले नाही. कोणत्या भागामध्ये किती जागा निर्माण झालेल्या आहेत हा प्रश्न नाही. महाराष्ट्रामध्ये उपलब्ध असलेल्या सर्व जागांचे समन्यायी वाटप करणार आहात की नाही हा खरा प्रश्न आहे. मागच्या वेळेला माननीय मुख्यमंत्र्यांनी जे उत्तर दिलेले आहे ते वाचून दाखवतो. त्यांनी असे म्हटले आहे की, "राज्यातील एकंदर १२ वी सायन्स परीक्षेला बसणाऱ्यांसाठी तसेच मेडिकलसाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी एकंदर विद्यापीठवाईज संख्या या राज्यामध्ये उपलब्ध असलेल्या सगळ्या मेडीकलच्या सीट यांचा एकत्र विचार करून त्यापध्दतीने प्रत्येक विद्यापीठामध्ये समान प्रमाणात कोटा देण्यासंबंधीचा निर्णय घेतला जाईल." अध्यक्ष महाराज, अशा प्रकारे तेंव्हा पॉझिटिव्ह निर्णय सांगितलेला आहे. **गेल्या वर्षी मुलांचे नुकसान झाले, मुलांनी आंदोलने केली, कोर्ट कचेऱ्या केल्या, महाराष्ट्रामध्ये असलेल्या सर्व जागांचे वाटप करीत असतांना विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील हे तीन युनिट धरून समन्यायी वाटप करणार आहात का नाही? यासंबंधी केंव्हा आदेश काढण्यात येतील?**

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी अत्यंत पोटतिडकीने हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. याबाबतीत त्यांना यापूर्वीच्या सरकारने न्याय दिलेला नाही, मी त्यांना......

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**उपसभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी यापूर्वी सभागृहामध्ये जी चर्चा झाली त्या चर्चेच्या वेळी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी जे सांगितले ते या ठिकाणी उधृत केले आहे. यासंदर्भात पुढे काय कारवाई झाली किंवा कारवाई होण्यास उशीर का होत आहे? यासंदर्भात उत्तर द्यावे.

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना युतीचे सरकार सत्तेवर येऊन फक्त १२ दिवस झालेले आहेत. त्यावेळच्या तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी जे आश्वासन दिलेले होते ते आश्वासन पाळण्याची जबाबदारी त्या सरकारची होती हे मला परत याठिकाणी नमूद करावयाचे आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**श्री.पी.जी.दस्तुरकर :** अध्यक्ष महाराज, हे बरोबर नाही.

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

(गोंधळ)

सर्व सदस्यांनी खाली बसावे. आता कोणीही उभे राहून बोलू नका.

**श्री. बबनराव चौधरी :** अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री महोदयांनी प्रश्नांचे उत्तर दिलेले नाही.

**उपसभापती :** सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. मी माननीय मंत्री महोदयांना प्रश्न समजावून सांगतो.

**श्री.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, मला प्रश्न पूर्णपणे समजलेला आहे. त्याच बरोबर सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मला याचे सविस्तरपणे उत्तर द्यावयाचे आहे. परंतु हे करीत असतांना सन्माननीय सदस्यांनी जर शांतता पाळली तर त्यांचे समाधान करण्याचा मी पूर्णपणे प्रयत्न करणार आहे. परंतु गेल्या शासनाने ज्या चुका केल्या–

(गोंधळ)

**श्री.बबनराव चौधरी :** अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

हार्दिक शुभेच्छा
दैनिक मातृभूमि
अकोला.

हार्दिक शुभेच्छा
नवलजी लीजिंग
एन्ड फायनान्स लि
कोठारी कॉम्पलेक्स, अकोला.

या ठिकाणी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावयास पाहिजे. हे काही राजकीय व्यासपीठ नाही. तुमच्या सरकारने हे केलेले नाही म्हणून आम्ही हे करीत नाही. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी मागच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी जे स्पष्टपणे या सदनामध्ये आश्वासन दिले होते ते सर्वांसमोर वाचून दाखविले आहे. पण आता केवळ राजकीय अभिनिवेष आणून माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत. आपण त्यांना समज द्यावी.

**उपसभापती :** हा हरकतीचा मुद्दा नाही.

**श्री.नितीन गडकरी :** अध्यक्ष महाराज. माझाही हरकतीचा मुद्दा आहे. दिनांक ३०.११.९४ रोजी या सभागृमध्ये महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. शरदचंद्र गोविंदराव पवार यांनी सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांनी उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर दिलेले आहे. दि. ३०.११.९४ ला उत्तर दिल्यावर या कालावधीत किती दिवस झाले हे आपल्याला सर्वांना माहिती आहे. डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च या महिन्यांमध्ये त्यांनी काही केले नाही असे असतांना आता माननीय मंत्री महोदयांना अडवणे बरोबर नाही. त्यावेळी जे केले आहे ते त्यांनी स्वीकारले पाहिजे. हे बरोबर नाही. आमच्यावर अन्याय केला आहे. आपण त्यांना ताकीद द्यावी.

(गोंधळ)

**उपसभापती :** हा हरकतीचा मुद्दा नाही. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर माननीय मंत्री महोदयांना जे उत्तर द्यावयाचे होते ते त्यांनी दिले आहे.

(गोंधळ)

माननीय मंत्रिमहोदयांनी अशाच प्रकारचे उत्तर दिले पाहिजे, अशा प्रकारची त्यांच्यावर कुठलीही सक्ती आपल्याला करता येणार नाही. तेंव्हा या संदर्भात माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले सगळे हरकतीचे मुद्दे मी बाजूला ठेवतो. त्यामध्ये हरकतीचा मुद्दा काहीही नाही.

**डॉ. ब.वा. हिरे :** सभापती महोदय,....

**श्री.वसंत चव्हाण :** सभापती महोदय, पॉईंट ऑफ प्रोप्रायटी..

**श्री.नितीन गडकरी** : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. जे सत्य आहे ते सुद्धा स्वीकारीत नाही.

**उपसभापती :** माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आपण कृपया खाली बसावे.

**श्री. वसंत चव्हाण :** सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोप्रायटी उपस्थित करीत आहे. या सदनामध्ये एकच तास प्रश्नोत्तरासाठी निश्चित वेळ आहे. प्रश्नोत्तराच्या बाबतीत आपला प्रिसिडंट असा राहिलेला आहे की, प्रश्न विचारल्यानंतर त्याला शासनाने उत्तर द्यावे थोडक्यात.

**उपसभापती :** प्रश्नही थोडक्यात.

**श्री. वसंत चव्हाण :** होय, प्रश्न देखील थोडक्यात विचारला पाहिजे. सभापती महोदय ज्यावेळेला अर्थसंकल्पावरील, राज्यपालांच्या अभिभाषणावरील अथवा एखाद्या विधेयकावरील भाषणे असतात त्यावेळेला आपण पॉलिटीकल कॉमेंट्री करतो, ती दोन्ही बाजूने होते. त्यावेळेला जे काही दोन हात करायचे असतील ते करतो. परंतु हा वाईट प्रघात या सदनात कधीही झालेला नाही. पॉलिटीकल कॉमेंट्री करण्याचा वाईट प्रघात या सदनामध्ये प्रश्नोत्तराच्या तासात कधीही झालेला नाही. माननीय मंत्रिमहोदयांना, आपल्या शासनाबद्दल काय सांगायचे असेल ते सांगावे.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. This is not a political commentary. हे सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे.

**उपसभापती :** माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

**श्री.नितीन गडकरी :** सत्य बोलणे हा या सभागृहात गुन्हा आहे का?

**उपसभापती :** माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी खाली बसावे. माननीय सदस्य श्री. वसंत चव्हाण यांना त्यांचे म्हणणे पूर्ण करू द्या.

**श्री. वसंत चव्हाण :** समजूतदारपणाने बोललो, थोडे ऐकून घ्या. मी आपल्यावर काही वैयक्तिक आरोप करीत नाही. सभापती महोदय मला असे म्हणावयाचे आहे की, या सदनाचे जे संकेत आहेत, परंपरा आहेत, जी पद्धती आहे त्याप्रमाणे आजपर्यंत आपण काम केले. आपणही या सदनामध्ये १०-१५ वर्षापासून काम करीत आहात. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सदस्यांच्या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरे द्यावीत. राजकीय शेरेबाजी झाली तर प्रश्नोत्तराचा तास वाया जाईल. त्यामध्ये अधिक वेळ जाईल. इतर वेळेला माननीय मंत्रिमहोदयांनी पॉलिटीकल कॉमेंट्री जरूर करावी.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी पॉलिटीकल कॉमेंट्री केल्याचा आरोप माननीय सदस्य करीत आहेत तो कामकाजातून काढून टाकला पाहिजे हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उपसभापती :** माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी, आपण कृपया खाली बसावे. एका मुद्यावरचा निर्णय झाल्याशिवाय दुसरा हरकतीचा मुद्दा माननीय सदस्यांना उपस्थित करता येणार नाही.

**श्री. अरुण मेहता :** सभापती महोदय, एखाद्या विद्यार्थ्याच्या जीवनाची दिशा ज्याच्यापासून ठरणार आहे अशा प्रश्नाला कृपया राजकीय व्यासपीठ बनविणे योग्य नाही. गेल्या अधिवेशनामध्ये हा मुद्दा प्रकर्षाने माननीय सदस्यांनी या सदनामध्ये उपस्थित केला होता आणि असे दाखवून दिले होते की, जवळपास सारखे मार्क्स असतांना देखील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गात प्रवेश न देता जातीप्रमाणे प्रवेश देवून...

**उपसभापती :** माननीय सदस्यांचा औचित्याचा मुद्दा आहे की प्रश्न विचारीत आहेत.

**श्री. अरुण मेहता :** मी औचित्याच्या मुद्याकडेच येत आहे. तत्पुर्वी थोडीशी पार्श्वभूमी सांगत आहे. ही बाब ज्यावेळेला निदर्शनास आणली त्यावेळेस नोव्हेंबरमध्ये त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी निश्चित घोषणा केली. त्या विद्यार्थ्यांना उपयोग व्हावा म्हणून ही घोषणा केली होती. त्यावर मागील सरकारने अमुक केले नाही, कृती केली नाही, असे न सांगता, मागील शासनाने जे आश्वासन दिले होते ते यावर्षी अंमलात आणावे हे सांगण्यासाठी म्हणून माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी हा मुद्दा मुद्दाम निदर्शनास आणला आहे. माझा औचित्याचा मुद्दा असा आहे की, मागील शासनाने जे वक्तव्य केलेले आहे, त्याच्याबाबतची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी/ Government is a continuous process ती येणाऱ्या शासनावर असते म्हणून त्यांच्यासंबंधी स्पष्ट उत्तर देणे योग्य ठरेल.

**श्री. प्रकाश जावडेकर :** अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उपसभापती :** माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यावर मला निर्णय द्यावयाचा आहे. तोपर्यंत कोणीही माननीय सदस्यांनी बोलू नये. प्रश्न हा अतिशय महत्त्वाचा आहे, त्या प्रश्नावर नेमकी नीटनेटकी चर्चा होण्याऐवजी हरकतीचा मुद्दा, औचित्याचा मुद्दा याच्यामध्येच जास्त वेळ खर्च होत आहे. ही गोष्ट बरोबर नाही. मी सर्व माननीय सदस्यांना सुचना करतो की, प्रश्न विचारणाऱ्या माननीय सदस्यांनी नेमके प्रश्न विचारावेत आणि त्याच्यामध्ये राजकीय खोच असू नये आणि त्याला माननीय मंत्रिमहोदयांनी सरळ उत्तर द्यावे, व्यवस्थित उत्तर द्यावे. प्रश्न विचारणाऱ्या सदस्याच्या प्रश्नामध्ये राजकीय खोच असेल तर उत्तरामध्ये ती थोडीशी आली तर माननीय सदस्यांनी राग मानू नये.

**डॉ.ब.वा.हिरे :** अध्यक्ष महाराज, आज मेडिकल ॲडमिशनची पद्धत सदोष असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना अन्याय झाला म्हणून कोर्टाकडे जावे लागले या प्रश्नाबाबत कायदेशीर बाजू तपासून घेण्यात येत आहे असे उत्तर याठिकाणी दिलेले आहे. सभापती महोदय, भाषावार प्रांतरचना व्हायच्या आधी मुंबई विद्यापीठामध्ये कर्नाटक राज्यातील काही जिल्हे महाराष्ट्र राज्यात होते. धारवाड, बेळगांव या जिल्ह्यांच्या विद्यार्थ्यांसाठी काही राखीव जागा होत्या. त्यावेळला विद्यापीठाची विभागाची अडचण येत नव्हती कोणीही विद्यार्थी न्यायालयात जात नव्हता म्हणून विद्यापीठनिहाय आणि विभागवार गुणवत्ता ठरवून त्या विभागातील लोकसंख्या लक्षात घेवून ॲडमिशनपद्धत आणि राखीव जागा ठेवल्या तर या सर्व बाबी निर्माण होणार नाहीत. तेव्हा या बाबींचा शासन विचार करील का?

**डॉ. दौलतराव आहेर** : सभापती महोदय, मेडीकलच्या ॲडमिशनबाबत सातत्याने विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे याबाबतीत विधानसभेचा सदस्य असतांना मी ऊहापोह करण्याचा प्रयत्न केला होता. मेडीकलच्या ॲडमिशनबाबत आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये वेगवेगळ्या विभागामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. एवढेच नव्हे तर ॲडमिशन देण्याची प्रोसीजर अत्यंत क्लिष्ट आहे. त्याच्यामुळे


**शुभेच्छांसह...**

**१. मेसर्स किसनलाल शर्मा, नागपूर.**

**२.श्री. रामन् जेन्न्या,श्री.मंजुनाथन कन्स्ट्रक्शन कंपनी, हैद्राबाद.**

**३. श्री. लक्ष्मी कन्स्ट्रक्शन कंपनी , हैद्राबाद.**

**४. एस. व्ही. उगले, अमरावती.**

पालक आणि पाल्यांची ससेहोलपट होते याची मला कल्पना आहे. सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे १५ टक्के जागा प्री मेडिकल टेस्ट् घेवून भरल्या जातात. त्यामुळे आपल्या राज्याला २३४ जागांना मुकावे लागते. याबाबतीत गांभीर्याने विचार चालू आहे. त्याप्रमाणे पूर्वी सुप्रिम कोर्टाने निर्णय दिला आहे. त्याची अंमलबजावणी करणे राज्यसरकारचे कर्तव्य आहे. त्यांनी मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली आहेत. **विद्यापीठनिहाय लोकसंख्या विचारात घेवून समन्यायी वाटप कसे करता येईल याचा विचार चालू आहे.** हेच मी मघाशी सांगत होतो परंतु त्याला माननीय सदस्यांनी राजकीय वळण दिले.

**श्री. लक्ष्मण माने** : माझा पहिला प्रश्न असा आहे की, मुंबई विद्यापीठामध्ये छप्परबंद समाजातील मुलांनी खोटी सर्टिफिकेट्स देवून प्रवेश घेतला ही गोष्ट? दुसरा प्रश्न असा आहे की समाज कल्याण खात्याच्या अधिकाऱ्यांनी या संदर्भात जी घोषणा केली होती तिचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय? असल्यास त्या संदर्भात काय कारवाई केली?

**डॉ. दौलतराव आहेर :** या संदर्भातील माहिती आता माझ्या जवळ उपलब्ध नाही. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात माहिती दिली तर ती तपासून घेवून योग्य ती कडक कारवाई करण्यात येईल एवढेच मी आश्वासन देतो.

**श्री.बी.टी.देशमुख** : मंत्र्यांचे उत्तर मी अतिशय काळजीपूर्वक ऐकत होतो परंतु त्याला राजकीय वळण लागले. या संदर्भात पूर्वीच्या शासनाने मान्य केलेला शासन निर्णय अजूनपर्यंत निघाला नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आता आपण शासन म्हणून आहात तेव्हा पुन्हा शासन या संदर्भात जो निर्णय घेईल तो केव्हा घेईल? अध्यक्ष महोदय, निश्चित उत्तर सदनामध्ये मिळावयास पाहिजे. नाहीतर या अन्यायाबाबत निषेध करून आम्ही सभागृहाबाहेर जावू शकतो. या जागांच्या बाबतीत इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशन झाले पाहिजे याबाबत राष्ट्रपतींनी ऑर्डर पास केलेल्या आहेत त्या गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या व राज्यपालांची ती विशेष जबाबदारी आहे. माननीय राज्यपालांच्या संदर्भात आपण येथे चर्चा करू शकत नाहीत हे मला माहीत आहे. मागच्या वेळेस मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात निश्चित असे आश्वासन दिलेले आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, **राज्यामध्ये असलेल्या सर्व जागा १२ वी च्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेवून त्या त्या विभागामध्ये वाटप करण्याविषयीचा निर्णय घेणार आहात की नाही?**

**डॉ. दौलतराव आहेर** : **मी या संदर्भात यापूर्वी स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे परंतु अशाप्रकारे सन्माननीय सदस्य दबाव टाकून.....**

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलतात)

**उपसभापती :** उभे असलेल्या सर्व माननीय सदस्यांनी खाली बसावे.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, मागच्या मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात काही केले नाही, असे बोलत मंत्रिमहोदय खाली बसले ही लाजिरवाणी गोष्ट आहे. आम्हाला याची लाज वाटते......

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलतात)

**उपसभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

**श्री.रामदास आठवले :** मंत्र्यांनी या ठिकाणी माफी मागितली पाहिजे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलतात)

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी एकाच वेळी बोलण्याचे थांबवावे. एक गोष्ट मला सदनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, विदर्भातील किंवा कोणत्याही भागातील अनुशेषाचा जेव्हा प्रश्न उपस्थित होतो त्यावेळेला तो प्रश्न मांडतांना सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख हे भावनावश होतात हे सर्वांना माहीत आहे. ते तो विषय पोटतिडकीने मांडतात तेव्हा ते आपल्यावर दबाव आणतात असे मंत्र्यांनी समजू नये. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांची बोलण्याची शैली नवीन आरोग्य मंत्र्यांना माहीत नाही. त्यामुळे माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्याबद्दल मंत्र्यांच्या मनात काही गैरसमज झाला असेल तर तो त्यांनी काढून टाकावा.

**अनेक सन्माननीय सदस्य :** मंत्र्यांनी माननीय सदस्य दबाव आणतात असे जे शब्द वापरले आहेत ते रेकॉर्डवरून काढून टाकावेत.

**उपसभापती :** सध्या त्याची काही आवश्यकता नाही. सन्माननीय सदस्य श्री धारकर यांनी प्रश्न विचारावा.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलतात)

**उपसभापती** : सर्व माननीय सदस्यांनी खाली बसावे. माननीय आरोग्य मंत्र्यांनी कोणते शब्द वापरलेले आहेत ते रेकॉर्डवरून तपासून घेवून त्यासंबंधीचा निर्णय मी नंतर करीन. प्रत्यक्षात माननीय मंत्री काय बोलले आहेत ते तपासून नंतर कार्यवाहीतून काढून टाकीन.

(घोषणा देण्यात आल्या)

**अनेक सन्माननीय सदस्य :** मंत्र्यांनी या ठिकाणी माफी मागितली पाहिजे.

**उपसभापती** : माननीय मंत्री काय बोलले आहेत ते शब्द रेकॉर्डवरून तपासून काढून टाकण्यात येतील. परंतु ते आताच रेकॉर्डवरून काढता देणार नाहीत. सन्माननीय सदस्य श्री धारकर यांनी प्रश्न विचारावा.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलतात)

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे माननीय मंत्र्यांनी कोणते शब्द वापरले आहेत ते रेकॉर्ड तपासून काढून टाकता येतील.

(घोषणा)

**श्री. अरुण मेहता :** अध्यक्ष महाराज, माझा पॉईंट ऑफ प्रोप्रायटी आहे.

**उपसभापती :** प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अशाप्रकारे हरकतीचे मुद्दे व औचित्याचे मुद्दे वारंवार उपस्थित करून प्रश्नोत्तराचा तास वाया घालविणे हे योग्य नाही.

**अरुण मेहता :** अध्यक्ष महाराज या ठिकाणी एक गंभीर बाब मला गांभीर्याने सदनाच्या लक्षात आणून द्यावयाची आहे. एखाद्या सदस्यांची बोलण्याची पद्धत मंत्र्यांना माहीत नाही, एवढ्यावर हा प्रश्न सुटत नाही. अनेक वेळा अनेक सदस्य एखाद्या प्रश्नाची तड लावण्यासाठी आणि योग्य प्रकारे उत्तर यावे म्हणून आपला प्रश्न प्रकर्षाने मांडतात. तेव्हा तसा तो मांडणे याच्यामध्ये काही दबाव होवू शकत नाही. तो प्रश्न समजावून देण्यामागची त्याची तीव्र भावना असते. ही बाब लक्षात घेतली तर सन्माननीय मंत्र्यांनी या ठिकाणी दबाव आणतात असे जे शब्द वापरलेले आहेत ते सदनाचा मान राखण्यासाठी त्यांनी मागे घेतले पाहिजेत व दिलगिरी व्यक्त केलीच पाहिजे तसेच त्यांच्या प्रश्नांचे उत्तरही दिले पाहिजे.

**उपसभापती :** सदनाच्या या प्रश्नासंबंधीच्या भावना लक्षात घेवून हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे हे बरोबर आहे.

**श्री. अरुण मेहता** : अध्यक्ष महाराज, मंत्र्यांनी ते शब्द परत घेवून दिलगिरी व्यक्त केली पाहिजे.

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी खाली बसावे. मंत्रिमहोदय काय सांगतात ते ऐकून घ्या.

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, मी पहिल्यापासून सदनाला सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की, या वर्षापासून सर्व विभागातील विद्यार्थ्यांना समप्रमाणात न्याय कसा देता येईल....

**श्री.बी.टी.देशमुख** : न्याय कसा देता येईल हा प्रश्न आम्हाला विचारता काय?

**श्री. अरूण मेहता :** अध्यक्ष महाराज, मंत्र्यांचे या पद्धतीचे उत्तर आम्ही ऐकून घेणार नाही. त्यांच्या उत्तराचा निषेध करून आम्ही सभात्याग करतो.

**श्री.बी.टी.देशमुख :** माननीय मंत्र्यांच्या उत्तराचा निषेध करून आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सदस्य घोषणा देत सभात्याग करतात)

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे समप्रमाणांत कसे वाटप करता येईल या दृष्टीने शासनाचा प्रयत्न राहणार आहे आणि यंदाच्या वर्षापासून त्याची अंमलबजावणी शासन करण्याचा प्रयत्न करील.

**श्री. वसंत मालधुरे** : या विषयाची गांभीर्यता लक्षात घेवून शासन काही करण्याबाबत उत्सुक आहे. कदाचित हे शासन नवीन असल्यामुळे त्यांना निर्णय घेण्यासाठी वेळेची आवश्यकता असेल. परन्तु यंदाच्या १२ वी च्या परिक्षेचा निकाल लागण्यापूर्वी शासन या संदर्भात निर्णय घेईल काय?

**श्री. दौलतराव आहेर :** सजेशन फॉर ॲक्शन.

******


शुभेच्छासह

[illegible]

जिल्हा टिम्बर मर्चंटस् असोसिएशन तर्फे

आपण जे कार्य हाती घेतले आहे त्या कार्यात यश मिळो ही शुभेच्छा !

जानमहमंद गिलानी — अध्यक्ष

गोपीकिसन निमोदीया — सचिव

आणि सर्व सदस्य गण टिम्बर मर्चंटस् असोसिएशन, यवतमाळ.

शुभकामनांसह...

बी.बी. आर्टस, एन.बी. कॉमर्स आणि बी.पी. सायन्स कॉलेज

आणि दिनबाई कनिष्ठ महाविद्यालय, दिग्रस. जि.यवतमाळ

विजयकुमार बंग

अध्यक्ष

# अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना १९९४-९५ या वर्षात तळेगांव येथील मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ५० जागा राखून ठेवण्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : पहिले आधिवेशन १९९५ : गुरूवार, दिनांक ६ एप्रिल १९९५*

अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना १९९४-९५ या वर्षात तळेगांव येथील मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ५० जागा राखून ठेवण्याबाबतच्या सूचना. याबाबत सर्वश्री.बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील, कृष्णराव भेगडे व व्ही.यु.डायगव्हाणे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**श्री.बी.टी.देशमुख** : (अमरावती विभाग पदवीधर) अध्यक्ष महाराज, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने मा. आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना सन १९९४-९५ या वर्षात तळेगांव येथील मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयामध्ये ५० जागा राखून ठेवल्याचे व तशा प्रकारच्या सुचना व्यवस्थापक मंडळाला दिल्याचे मा. मुख्यमंत्र्यांनी ३० नोव्हेंबर १९९४ रोजी सभागृहामध्ये मान्य करूनही (सांगूनसुद्धा) त्या बाबत अद्यापपावेतो कोणतीही कारवाई न होणे, सर्वोच्च न्यायालयाने तीन आठवड्यामध्ये याबाबत निर्णय घेण्याचा दिलेला आदेश, तसेच व्यवस्थापन या विद्यार्थ्यांना घेण्यासाठी तयार असतानासुद्धा केवळ शासनाकडून स्पष्ट सूचना न गेल्यामुळे व्यवस्थापनाची झालेली कोंडी, परिणामी या विद्यार्थ्यांचे होत असलेले नुकसान व याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई.

**डॉ. दौलतराव आहेर (आरोग्य मंत्री) :** अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती मा. सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

### निवेदन

मा. सर्वोच्च न्यायालयाने उन्नीकृष्णन विरुद्ध आंध्र प्रदेश या न्यायालयीन प्रकरणी दिलेल्या निर्णयामध्ये विहित केलेल्या योजनेनुसार सन १९९३-९४ वर्षापासून राज्यातील वैद्यकीय प्रवेश देण्यात येतात. प्रचलित पद्धतीनुसार वैद्यकीय महाविद्यालयातील एकूण जागांच्या ३० टक्के जागा राज्यस्तरावरील गुणवत्ता यादीनुसार भरण्यात येतात. सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षापर्यंत नागपूर विद्यापीठ क्षेत्र व अमरावती विद्यापीठ क्षेत्र ही दोन्ही विद्यापीठ क्षेत्रे एकत्रित समजण्यात येऊन या विद्यापीठ क्षेत्रातील ७० टक्के जागा सदर दोन्ही क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार भरण्यात येत होत्या. दरम्यान अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील वैद्यकीय महाविद्यालयाला भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता प्राप्त झाल्यामुळे सन १९९४-९५ या वर्षापासून वरील दोन विद्यापीठ क्षेत्रे प्रवेश प्रक्रियेसाठी वेगळी करण्यात आली. **वरीलप्रमाणे दोन्ही विद्यापीठ क्षेत्रे वेगळी करण्याचा निर्णय योग्य असल्याचा उच्च न्यायालयाने, याबाबतच्या उद्‌भवलेल्या न्यायालयीन प्रकरणी निर्णय देखील दिला आहे.** वरील प्रमाणे दोन विद्यापीठ क्षेत्रे वेगवेगळी केल्याने अमरावती क्षेत्रातील विद्यार्थ्यांना पूर्वीच्या तुलनेत प्रवेशासाठी कमी जागा उपलब्ध झाल्या. अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सदर विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी आंदोलनाद्वारे तसेच लोकप्रतिनिधीमार्फत शासनाकडे त्याप्रमाणे तक्रार दाखल केली होती.

या प्रश्नावर सर्वांगीण विचार केल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दिनांक ३० नोव्हेंबर १९९४ रोजी विधान परिषदेमध्ये असे निवेदन केले की, पुणे विद्यापीठ क्षेत्रातील तळेगाव दाभाडे येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालयास परवानगी देण्याचा निर्णय भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने घेतला असून सदर महाविद्यालयामध्ये ज्या जागा उपलब्ध होणार आहेत त्यातील ५०० जागा या अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. वरील प्रमाणे मा. मुख्यमंत्री यांनी सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेसाठी सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार ३० टक्के प्रवेश जागा राज्यस्तरावरून व उर्वरित ७० टक्के जागा विद्यापीठ क्षेत्रातून भरण्याबाबतची जी कार्यवाही करण्यात येते, तिला अपवाद करून अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील ५० विद्यार्थ्यांना पुणे विद्यापीठ क्षेत्रातील नव्याने सुरू होणाऱ्या महाविद्यालयात सामावून घेण्यासाठी न्यायालयाची रीतसर परवानगी मागण्यासाठी उच्च न्यायालय, नागपूर खंड पिठापुढे योग्य तो अर्ज दाखल करण्यात आला होता. **तथापि, मा. उच्च न्यायालयाकडून सदर अर्ज दि. १७.१.१९९५ रोजी फेटाळण्यात आला.** दरम्यान अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील काही विद्यार्थ्यांनी विद्यापीठ क्षेत्रे वेगळी करण्याच्या उच्च न्यायालयाने पूर्वी दिलेल्या आदेशाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील याचिका दाखल केली होती. त्या याचिकेच्या सुनावणीच्या वेळी राज्य शासनाकडून मा. सर्वोच्च न्यायालयापुढे असे प्रतिपादन करण्यात आले होते की, अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील ५० विद्यार्थ्यांना वरीलप्रमाणे तळेगाव येथील महाविद्यालयामध्ये सामावून घेण्याबाबत राज्यशासनाचा प्रस्ताव आहे. **सदर याचिकेवर मा. सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दि. २७ मार्च १९९५ रोजी निर्णय दिला असून अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांची मागणी मान्य केली नसून, राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यासाठी हे प्रकरण उच्च न्यायालयाकडे सुपूर्त केल्याचे निदेश दिले आहेत.**

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महोदय, सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्यामध्ये तीन आठवड्याच्या आत निर्णय घ्यावा असे निर्देश दिलेले आहेत असे आमच्या नोटीसमध्ये आहे. निवेदनात त्याबाबत काहीही उल्लेख नाही. तीन आठवड्याच्या आत निर्णय घ्यावा असे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात आहे काय?

**डॉ. दौलतराव आहेर :** तीन आठवड्याच्या आत निर्णय घ्यावा असे आदेश होते त्याप्रमाणे शासनाने सर्वोच्च न्यायालयात अमरावती क्षेत्राच्या विद्यार्थ्यांचे प्रकरण पेंडींग होते त्यामध्ये जागा वाटपाच्या बाबतीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. हा निर्णय दि. २७.३.९५ ला झाला. त्या निर्णयाप्रमाणे अमरावती क्षेत्रामध्ये वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशाच्या ज्या जागा उपलब्ध आहेत त्या समप्रमाणात वाटप कराव्यात व १९९५-९६ मध्ये ही कारवाई अंमलात आणावी असे निदेश दिलेले आहेत.

**श्री. बी.टी. देशमुख** : अध्यक्ष महाराज, तीन आठवड्याच्या आत निर्णय घ्यावा असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश होते. त्यापूर्वी नागपूर खंडपीठाने जो निर्णय दिलेला होता त्याची तारीख काय आहे?

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, नागपूर खंडपीठाने पहिला निर्णय दि. ३.३.९४ ला दिला आहे. त्यावेळचा विषय अमरावती व नागपूर विद्यापीठ वेगळे करण्याचा होता. या संदर्भात अमरावतीचे विद्यार्थी नागपूर येथे हायकोर्टात गेले यावर नागपूर खंडपीठाने दि. २७.१०.९४ ला निर्णय दिला की, नागपूर खंडपीठाने घेतलेला निर्णय योग्य आहे असा निर्णय दिला. त्यानंतर हे विद्यार्थी सर्वोच्च न्यायालयात गेले त्यावर नोव्हेंबर ९४ ला त्यांनी अपील दाखल केले. अध्यक्ष महाराज, मी मघाशी सांगितले त्या क्रमामध्ये


गुणवंतराव उपाख्य अण्णासाहेब देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट, पुसद द्वारा संचालित.
१. गुणवंतराव देशमुख शिक्षण महाविद्यालय, पुसद.
२. गुणवंतराव देशमुख प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कवडीपूर (पुसद) ३. मातोश्री शकुंतलाबाई देशमुख बालविद्यामंदिर, पुसद. ४. गुणवंतराव देशमुख उर्दू हायस्कूल, जांब बाजार.
*डॉ. पंजाबराव देशमुख* *संस्थापक* — *विजयसिंह देशमुख* *अध्यक्ष*
प्रा. विजय देशमुख, *सचिव*

हार्दिक शुभेच्छा
*मे. केशवलाल ताराचंद लाठीवाला*
*भारत पेट्रोलियम कार्पोरेशन डीलर, दारव्हा.*

*यवतमाळ जिल्हा परिषद शिक्षक सह. पतसंस्था म.* यवतमाळ मुख्यालय दारव्हा.
श्री. देऊळकर, अध्यक्ष — श्री. गणेश निमकर, सचिव
सदस्य सर्वश्री काठोळे , राऊत, विनोद गिरी, द्रोणागीर गिरी, चौधरी, बारडे आणि श्रीमती घुरडे.

शेतकरी सह. सूतगिरणी म. दारव्हा.
बोरी अरब ता. दारव्हा, जि. यवतमाळ.
श. दे. दशरथ, प्र. व्यवस्थापक — सुधाकरराव दरेकार, उपाध्यक्ष — माणिकराव ठाकरे, अध्यक्ष

दारव्हा तालुका भाजपचे अध्यक्ष व अकोला दुय्यम सेवा निवड मंडळाचे सदस्य
प्रा.अजयभाउ दुबे

जनसामान्यांचे प्रश्न सोडविणारी संघटना
संघर्ष दल, दारव्हा
मदन काशीकर, सचिव — तुळशीराम राऊत, उपाध्यक्ष — रमणिक पटेल, अध्यक्ष

निर्णय झालेला आहे. आता सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला आहे तो आपल्यावर बंधनकारक आहे.

**श्री. बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, सर्वोच्य न्यायालयामध्ये जो निर्णय झाला त्यानुसार याबाबतीत तीन आठवड्यामध्ये निर्णय घ्यावा असे म्हटले आहे. जून, जुलै आणि ऑगस्ट १९९५ पासून निर्णय घेण्यात येणार आहे. या अमरावती भागातील दीड टक्के मुलांना सुद्धा ॲडमिशन मिळालेली नाही. बाकीच्या भागामध्ये चार-पाच टक्के मुलांना ॲडमिशन मिळाल्या आहेत. माननीय मंत्री महोदयाकडून मला पहिली माहिती अशी हवी आहे की, जून जुलै महिन्यांमध्ये या जागांचे समन्यायी वाटप करणार आहात की नाही? बारावी पास असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या आणि महाराष्ट्रामध्ये उपलब्ध असलेल्या जागा यांचे वाटप करणार आहात काय?

**श्री. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, अशा प्रकारचे सर्वोच्य न्यायालयाने आदेश दिले आहेत आणि शासनाचीही अशाच प्रकारची भूमिका आहे. मी आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, **मी विधानसभेमध्ये असतांना येथील विद्यार्थ्यांवर अन्याय होतो म्हणून तत्कालीन शासनाकडून या विषयावरील अन्याय दूर करण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्नशील होतो.** विद्यार्थ्यांची संख्या आणि जागा यांचे वाटप योग्य झाले पाहिजे अशी शासनाची भूमिका राहणार आहे आणि शासन या दृष्टीने धोरण राबवणार आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, येत्या एक-दीड महिन्यामध्ये ॲडमिशनची प्रोसेस सुरू होणार आहे. आमच्या भागामध्ये एका बॅचचे नुकसान झालेले आहे, तेथील लोकांमध्ये नाराजी आहे. तेव्हा हे आदेश केव्हा निर्गमित होणार आहेत?

**श्री.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, **रुल्स आणि रेग्युलेशन तयार करण्याच्या दृष्टिकोनातून तीन लोकांची समिती गठीत करणार आहोत. हे नियम मे महिन्यापर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या ॲकॅडेमिक वर्षापासून ते अंमलात येतील.**

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, हे झाले पुढच्या वर्षासाठी मागच्या वर्षीच्या ५० विद्यार्थ्यांच्या संबंधीचा प्रश्न तसाच राहिला आहे. माजी मा. मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, तळेगाव दाभाडे येथील मेडिकल महाविद्यालयास मेडिकल कॉन्सील ऑफ इंडियाची मान्यता मिळाली असून ते या वर्षी सुरू होणार होते आणि तेथे या ५० मुलांना ॲडमिशन देण्यात येतील.मी सातत्याने येथे सांगत आहे की, सहा महिने उशीर झाला असेल तर पुढील वाढवून दिलेल्या सहा महिन्यामध्ये अभ्यासक्रम पूर्ण केला पाहिजे. नाहीतर या मुलांचे एक वर्ष वाया जाते. मग ती पुढच्या वर्षी कॉम्पीट करू शकत नाहीत. तेव्हा तळेगाव दाभाडे येथील महाविद्यालयामध्ये या मुलांच्या ॲडमिशन झाल्या आहेत की नाही? या प्रवेशाची सद्यःस्थिती काय आहे? या महाविद्यालयामध्ये ५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या बाबतीत आपण काय करणार आहोत?

**श्री. दौलतराव आहेर** : अध्यक्ष महाराज, तळेगाव दाभाडे मेडिकल महाविद्यालयास नोव्हेंबर ९४ मध्ये मान्यता मिळाली. अमरावती विद्यापीठातील विद्यार्थ्यांवर जो अन्याय होत होता त्याबाबतीत या सदनामध्ये मोठ्या प्रमाणात चर्चा उपस्थित झाली आहे. हा अन्याय दूर करण्याच्या दृष्टिकोनातून दि. ३० नोव्हेंबर १९९४ रोजी असे आश्वासन देण्यात आले की, या नवीन मेडिकल कॉलेजमध्ये ५० विद्यार्थ्यांना ॲडमिशन दिली जाईल. ही खास बाब होते. यामध्ये न्यायालयाचा आदेश होणे क्रमप्राप्त होते. म्हणून **नागपूर हायकोर्टाच्या खंडपीठाकडे दि. १६.१.९५ रोजी शासनाने अर्ज केला आणि तो अर्ज दि. १७.१.९५ रोजी फेटाळला गेला. त्यामुळे याची अंमलबजावणी करता आली नाही.** त्याप्रमाणे दि. २०.२.९५ रोजी महाराष्ट्र शासनाचे माननीय मुख्यमंत्री आणि डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशन यांची या विषयाच्या बाबतीत चर्चा झाली. त्यामध्ये असे निष्पन्न झालेले आहे की, पुणे विद्यापीठाने स्पष्ट आदेश किंवा सूचना दिल्या होत्या की, जोपर्यंत मेडिकल कौन्सील ऑफ इंडियाची मान्यता मिळत नाही तोपर्यंत शासनाने ॲडमिशन देण्याचे आदेश देऊ नयेत. असे आदेश दिले तर पुणे विद्यापीठ त्याला मान्यता देणार नाही. आता तळेगाव दाभाडे मेडिकल महाविद्यालयास परवानगी मिळाली आहे अशा ५० विद्यार्थ्यांच्या बॅचला ॲडमिशनला परवानगी देण्याच्या बाबतीत १५ दिवसांमध्ये आपला निर्णय बदलला. त्यांनी परवानगी द्यावी असे म्हटले आहे, परंतु ॲडमिशनच्या दोन टर्मस् संपलेल्या आहेत तेव्हा त्या विद्यार्थ्यांना सामावून घेण्याच्याबाबतीत अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होणार आहेत म्हणून अशा प्रकारची परवानगी देणे शासनाला आता शक्य होणार नाही. पुढच्या ॲकॅडमिक वर्षापासून त्याप्रकारची महाविद्यालयांना परवानगी देण्यात येईल.

**श्री.टी.एम.कांबळे :** सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी या ठिकाणी प्रादेशिक समतोल राखण्यासाठी ॲडमिशनसंबंधी प्रश्न विचारला होता. यासंबधी आणखी एक प्रश्न याच अधिवेशनामध्ये विचारलेला होता. त्यावेळेला याची चर्चा झाली नाही. या ॲडमिशन्स संबधी एक समिती गठीत करण्यात आली आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी आता सांगितले...

**श्री. दौलतराव आहेर :** समिती गठीत करणार आहोत असे मी सांगितले, समिती गठीत करण्यात आलेली नाही.

**श्री. टी.एम. कांबळे :** ही समिती गठीत करणार आहात, माझी सूचना अशी आहे की, या राज्यातील मागासवर्गीय, ओ.बी.सी. व्ही.जे.एन.टी. चे मेडिकल कॉलेजचे विद्यार्थी आहेत हा वेगळा विषय आहे मला मान्य आहे तरी सुद्धा ह्या ॲडमिशनसाठी समिती होणार आहे. तेव्हा त्याचे जे न्याय्य वैधानिक हक्क आहेत ते अबाधित ठेवण्यासाठी या समितीमध्ये या विषयाचा सुद्धा सहभाग होईल का?

**श्री.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, प्रचलित शासन कोणावरही अन्याय करणार नाही. अशाप्रकारचे आम्ही हे सगळे नियम करणार आहोत.

**डॉ.मधुकर वासनिक :** अध्यक्ष महाराज, १९९४-९५ मध्ये जो असमतोलपणा होता. त्यामुळे अमरावती विद्यापीठाच्या मुलांचे नुकसान झालेले आहे. त्यादृष्टीने खास बाब म्हणून तळेगाव दाभाडे महाविद्यालयात या जागा दिल्या पाहिजेत ती बाब आपण समोर ठेवून जरी शासन नागपूरच्या हायकोर्टात गेले होते त्यांनी नाकारले तरी सुप्रिम कोर्टात जावून स्पेशल बाब याच्याकरिता मागवून घ्यावी. ५० मुलांचे जे नुकसान झालेले आहे, ही नुकसान भरपाई आपण करून दिली पाहिजे. आपण जरी या सीटस् पुणे विद्यापीठामधून भरणार असलो तरी त्या ५० सीटस् त्यांना दिल्या पाहिजेत.

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, अशा प्रकारचा रिलीफ सुप्रिम कोर्टाने कुठल्याही प्रकारचा दिलेला नाही. त्यामुळे ती मागणी आता कन्सिडर करता येणार नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, हे बरोबर नाही. या ठिकाणी जी माहिती दिली जात आहे ती बरोबर नाही. हायकोर्टामध्ये ही मुले हरली, कोणत्या ग्राऊंडवर हरली जुना जो सर्वोच्य न्यायालयाचा निर्णय होता की, विद्यापीठनिहाय तुम्ही द्या. त्याप्रमाणे, पण त्याच हायकोर्टाच्या निर्णयामध्ये हे म्हटलेले आहे की, ही प्रेसिडेंट ऑफ इंडियाची ऑर्डर निघाली आहे. स्पेशल रिस्पान्सिबिलीटीची ऑर्डर आहे हायकोर्टाने आपल्या निर्णयात असे म्हटले आहे "We therefore propose to keep the question of equitable distribution of the seats in the whole of the State open"

राज्यामध्ये इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशनचा प्रश्न आम्ही ओपन ठेवीत आहोत असे हायकोर्टाच्या निर्णयात म्हटले आहे. अध्यक्ष महाराज, मूळ त्यांची म्हणजे या विद्यार्थ्यांची मागणी फेटाळल्यामुळे ते सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्य न्यायालयाने सुद्धा हे म्हटलेले आहे. तुमच्या निवेदनात तुम्ही ते दिलेले आहे की, इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन केले पाहिजे. आता माझे म्हणणे असे आहे की, हे कोणी केले? आपण त्यांना न्याय देवू शकला नाही. मुले गेली हायकोर्टामध्ये आणि सुप्रिम कोर्टाने म्हटले ते पुढच्या वर्षापासून तुम्ही लागू करणार. तुमच्या एका मताशी मी पूर्णपणे सहमत आहे की, एक टर्म होवून गेलेली आहे. उशीर


| | |
|---|---|
| **हार्दिक शुभेच्छा**<br>**श्री. गणेश काळे** | **हार्दिक शुभेच्छा**<br>**डॉ एन.पी. उमाळे.** |
| **हार्दिक शुभेच्छा**<br>**डॉ. ए. व्ही. मदनगोपाल.** | **हार्दिक शुभेच्छा**<br>**डॉ. राजेंद्र देशमुख.** |

झालेला आहे हे बरोबर आहे, दोन टर्मस् झालेल्या आहेत, परंतु यासंबंधी इतर प्रवेश सुद्धा आताच दीड दोन महिन्यापूर्वी केलेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, त्या मुलांचे लाईफ वाया जाण्याचा प्रश्न यामध्ये आहे. आपण त्यांच्याकडून तेवढ्या टर्म भरून घ्या उशीराची बॅच आहे असे म्हणा. त्यांना ६-७ महिने पुढे सरकवा. गेली सहा वर्षे निरनिराळी विद्यापीठे उशिरा प्रवेश घेणाऱ्या मुलांसाठी असे करीत आहेत. अभ्यासक्रमाचे ड्युरेशन कमी होणार नाही. पण यावेळेला जर ती मुले ॲडमिट झाली नाहीत तर त्यांच्या लाईफवर तो परिणाम होईल. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, पुढच्या वर्षाबाबत तुम्ही ते करणार त्याबद्दल मला काही प्रश्न विचारावयाचा नाही. इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन सर्वोच्च न्यायालयाने म्हटलेले आहे, या वर्षात जर आपण केले, त्यांची टर्म आपण करून घ्या त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. तर या मुलांना न्याय मिळू शकेल या विषयी आपण निदान विचार तरी कराल का?

**श्री.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, मेडिकल कॉलेजच्या संदर्भात प्रवेश देण्याच्याबाबतीत शासनाच्या हातामध्ये फारसे आहे असे मला वाटत नाही. सगळ्याच गोष्टी या न्यायालयाने आतापर्यंत गव्हर्न केलेल्या आहेत आणि सुप्रिम कोर्टाने १ मार्चला जो न्याय दिलेला आहे, याच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा रिलीफ अमरावती क्षेत्रातील विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेला नाही. त्यामुळे परत अशा प्रकारच्या उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करून कालापव्यय होईल यापेक्षा पुढच्या वर्षापासून जे समन्यायी वाटप करणार आहोत तेवढे शासनाच्या हातामध्ये आहे आणि तेवढे आम्ही करणार आहोत.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, सुप्रिम कोर्टाने म्हटलेले आहे की, इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन झाले पाहिजे, लेट इतके झाले होते की यावर्षी द्या असे त्यांनी म्हटले नाही. पण आपल्याला त्याबाबतीत काही वाटायला नको? हे बरोबर नाही. अध्यक्ष महाराज, सुप्रिम कोर्टाने काही रिलीफ दिला नाही... असे आपण म्हणता परंतु ज्यांच्यासाठी ती मुले भांडत होती त्या त्यांच्या तत्वाला रिलीफ मिळाला नाही असे आपल्याला म्हणायचे आहे काय? काय त्या निर्णयात आहे ते वाचून दाखवा ना?

**डॉ. दौलतराव आहेर :** माझ्या हातात सुप्रिम कोर्टाची ऑर्डर आहे ती मी वाचून दाखवितो. "The aforesaid matter was listed for hearing after notice on 27.3.1995 when Shri. M.C.Bhandare, Sr. Advocate alongwith myself appeared in the matter on behalf of the State. After hearing rival submissions, the Court has finally heard the matter and disposed of the matter with observations. After grant of Special leave to appeal the Court was not inclined to grant any relief to the petitioners with regard to the admissions for 1994-95 Session. It was once again brought to the Notice of the Court that the State Government is willing to give 50 seats from the new medical College at Talegaon Dabhade, Pune to the student from Amravati University area. However, the Court has remitted the matter to the High Court on the question of equitable distribution of seats in the State and further directed the High Court to decide the issue as far as possible before the commencement of the next academic Session."

**श्री.बी.टी.देशमुख :** सुप्रिम कोर्टाने सरळ असे म्हटलेले आहे की, समान वाटप या तत्त्वानुसार या ५० सिट्सचा निर्णय हायकोर्टाकडे सोपविण्यात येत आहे. बॅक इफेक्ट तुम्ही मागितलाच नसेल तर तो मिळणार नाही.

**श्री.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, सुप्रिम कोर्टाच्या निकालातील दोन ओळी मी परत वाचून दाखवितो.

The Court was not inclined to grant any relief to the petitioners with regard to the admissions for 1994-95 Session. It was once again brought to the Notice of the Court that the State Government is willing to give 50 seats from the new Medical College at Talegaon Dabhade, Pune to the student from Amravati University area. However, the Court has remitted the matter to the High Court on the question of equitable distribution of seats in the state and further directed the High Court **to decide the issue as far as possible before the commencement of the next academic Session."**

**श्री.बी.टी.देशमुख :** It could be before that also. शक्य तो १९९५-९६ पासून करा. as far as possible असे शब्द आहेत. परंतु त्याच्या अगोदर करावयास सुद्धा ना नाही असे सुप्रिम कोर्टाचे म्हणणे दिसते. कारण मुलांच्या भवितव्याचा प्रश्न आहे ते आपण कराल काय?

**डॉ. दौलतराव आहेर :** सदनाच्या भावना लक्षात घेऊन इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी नागपूर हायकोर्टाचे परमिशन घ्यावयाचे आहे. ते घेतांना सदनाच्या भावना त्यामध्ये इन्कार्पोरेट करू.

******

## अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना तळेगाव दाभाडे येथील वैद्यकीय महाविद्यालयामध्ये जागा देणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, १९९५*
*शुक्रवार, दिनांक ७ एप्रिल १९९५*

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवलेली शुक्रवार, दिनांक २४ मार्च १९९५ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी*

**सर्वश्री जयवंत ठाकरे, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील :** सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) तळेगाव (जिल्हा पुणे) येथे उघडलेल्या नवीन वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अमरावती विभागातील ५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार १९९४-९५ या वर्षात प्रत्यक्ष किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला आहे,

(२) प्रवेश दिलेला असल्यास, केव्हा;

(३) प्रवेश दिलेला नसल्यास, सदरहू निर्णय अंमलात न येण्याची कारणे काय आहेत?

**श्री.दौलतराव आहेर :** (१) अद्यापि, सदर प्रस्तावित महाविद्यालयामध्ये कोणालाही प्रवेश देण्यात आलेले नाहीत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सन १९९४-९५ ची प्रवेश प्रक्रिया संपल्यावर बऱ्याच कालावधीनंतर तळेगाव दाभाडे येथील प्रस्तावित वैद्यकीय महाविद्यालयास पुणे विद्यापीठाने नुकतीच दिनांक ११ मार्च १९९५ रोजीच्या पत्रान्वये संलग्नता दिलेली आहे. म्हणून सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षाकरिता सदरहू महाविद्यालयात प्रवेश देणे शक्य झाले नाही.

******


**हार्दिक शुभेच्छा**
**डॉ. मनोज गुप्ता.**

**हार्दिक शुभेच्छा**
**वैभव फर्निचर मार्ट.**

**हार्दिक शुभेच्छा**
**गजाभाऊ टेलर्स.**

***भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय परतवाडा***
*(भारतीय विद्या मंदीर अमरावती संचालीत)* फोन नं. २०१७२
**कला व वाणिज्य वरीष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय**
**डॉ. भि. ग. तायडे,** *अध्यक्ष* *प्राचार्य* **अण्णासाहेब वैद्य,** *सरचिटणीस*
**श्री.शंकरराव गावंडे ,** *प्राचार्य*

# विद्यापीठनिहाय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९५*

*सोमवार, दिनांक १० जुलै १९९५.*

(१३) १३४५ **सर्वश्री. बी.टी.देशमुख, जयवंत ठाकरे, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, विजय सावंत, अझहर हुसेन** : तारांकित प्रश्न क्रमांक ५६ ला दिनांक ३१ मार्च १९९५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१) बारावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील एकूण प्रवेश जागा एकत्रित करून त्याचे समन्यायी वाटप करण्याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

२) झालेला असल्यास, शासनाने केलेल्या उपाययोजनेचे स्वरूप काय आहे,

३) अशी उपाययोजना केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ.दौलतराव आहेर** : १) नाही.

२) प्रश्न उद्‌भवत नाही.

३) सर्वोच्च न्यायालयाने वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमाच्या प्रवेश जागांच्या समन्यायी वाटपाबाबत कायमस्वरूपी तोडगा काढावा असे उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठास आदेश दिले आहेत. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : समन्यायी वाटपाची स्कीम तयार करून ती उच्च न्यायालयामध्ये सादर करण्यासाठी अधिकाऱ्यांना सांगण्यात आले होते त्याची स्थिती काय आहे? ती स्कीम सादर केली आहे काय?

**श्री. सुरेश नवले** : ९४-९५ या शैक्षणिक वर्षामध्ये नागपूर आणि अमरावती अशी दोन स्वतंत्र विद्यापीठे करण्यात आली. त्यामुळे अमरावती विद्यापीठातील काही मुलांच्या वाट्याला कमी जागा आल्या. त्यामुळे ही मुले उच्च न्यायालयामध्ये गेली. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर ती सर्वोच्च न्यायालयामध्ये गेली. सर्वोच्च न्यायालयाने या समन्यायी वाटपाबाबत कायम स्वरूपाचा तोडगा लवकरात लवकर काढावा असे नागपूर खंडपीठास सांगितले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : समन्यायी वाटपाची स्कीम तयार करण्याचे काम अधिकाऱ्यांना दिले होते, ती स्कीम अधिकाऱ्यांनी तयार केली काय?

**डॉ. दौलतराव आहेर** : मेडिकल कॉलेजचा प्रश्न कॉम्प्लीकेटेड व किचकट झालेला आहे. बरेच पालक व मुले कोर्टामध्ये जातात. त्यामुळे मुलांना प्रवेश वेळेवर मिळत नाही. गेल्या वर्षी प्रवेशाची प्रक्रिया जानेवारी-डिसेंबर पर्यन्त लांबली होती. जवळ जवळ एक टर्म संपत आली होती. अमरावती विद्यापीठाला सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २७.३.९५ ला अशी नोटीस दिली की, नागपूर खंडपीठाकडून समन्यायी वाटप विद्यापीठनिहाय कसे करावयाचे याच्या गाईड लाईन्स द्याव्यात व त्यानुसार यंदाच्या ॲडमिशन द्याव्यात. त्या अनुषंगाने लोकसंख्येचे प्रमाण, विद्यापीठनिहाय विद्यार्थ्यांची संख्या याचा एक तक्ता दिलेला आहे. तसेच बारावी पास झालेली मुले व बारावीला बसलेली मुले यांचाही तक्ता दिलेला आहे. नागपूर खंडपीठाच्या या संदर्भात ऑर्डर मिळाल्याबरोबर या जागांचे समन्यायी वाटप करण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत व समन्यायी वाटप करण्याचे भारताच्या राष्ट्रपतींनीही मान्य केलेले आहे. असे असतांना आपण त्याबाबतीत काही केले नाही ही गोष्ट बरोबर नाही. आपण आता सांगितले की, याची स्कीम तयार करून फायनल ऑर्डर हायकोर्टाकडून घेवू. माझे म्हणणे असे की, आपण जी स्कीम तयार केली आहे तिची प्रत सभागृहासमोर ठेवाल काय? तसेच या संदर्भात होयकोर्टाकडून तातडीने निर्णय होण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय?

**डॉ. दौलतराव आहेर** : नागपूर हायकोर्टापुढे जी स्कीम ठेवलेली आहे ती सदनाच्या पटलावर ठेवण्याची गरज नाही. नागपूर हायकोर्टाकडून या संदर्भात जो निर्णय होईल त्याची अंमलबजावणी करणे हे सरकारचे काम आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : हायकोर्टापुढे जी स्कीम ठेवलेली आहे ती ओपन आहे. ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास काय हरकत आहे? एक रुपया प्रोसेस फी भरून ती काढता येते. ती सदनाला स्कीम न देणे हे बरोबर नाही. समन्यायी वाटपाच्या बाबतीत अधिकाऱ्यांमार्फत स्कीम तयार करून ती कोर्टाला सादर करू असे आपण पूर्वी सांगितले होते. आता ती स्कीम तुम्ही सादर केलेली आहे. ती स्कीम काय आहे हे जाणून घेण्याचा आम्हाला अधिकार आहे. ती स्कीम आम्हाला येथे मिळत नसेल तर मग सदनाचे कामकाज सोडून आम्ही फी भरून ती स्कीम घेण्यास कोर्टात जातो. तुम्ही याबाबतीत लवकर अंमलबजावणी केली नाही तर पुन्हा विद्यार्थ्यांचे एक वर्ष वाया जाईल.

**श्री. दौलतराव आहेर** : विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जावू नये या दृष्टिकोनातून आम्ही हायकोर्टाला विनंती केलेली आहे की, याबाबतीत लवकरात लवकर निर्णय द्यावा. समन्यायी वाटपाच्या बाबतीत लोकसंख्या आणि विद्यार्थ्यांची संख्या याचा आधार घेतलेला आहे. कोणत्या विद्यापीठाच्या कक्षेमध्ये जास्त विद्यार्थी आहेत याचा सर्व डाटा हायकोर्टाला दिलेला आहे. हायकोर्टाचा जो निर्णय होईल त्याची अंमलबजावणी करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्या दृष्टिकोनातून एक्सपीडाईट करून अमरावती सकट सगळ्याच महाराष्ट्रातील विद्यापीठांना न्याय कसा देता येईल असेच शासनाचे धोरण आहे.

**श्री व्यंकप्पा पतकी** : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी माहिती सदनाच्या पटलावर ठेवण्यास सांगितले आहे. मंत्रिमहोदयांनी ती माहिती सदनाच्या पटलावर ठेवण्याची गरज नाही असे सांगितले. तेव्हा सभापती महोदय, ही माहिती सदनाच्या पटलावर ठेवण्यास आपण निदेश द्यावा.

**सभापती** : मला मंत्रिमहोदयांना विचारावयाचे आहे की, आपण ही माहिती सदनाच्या पटलावर कां ठेवू इच्छित नाही?

**डॉ.दौलतराव आहेर** : न्यायालयामध्ये ती माहिती दिलेली आहे. आता आम्ही न्यायालयाच्या आदेशाची वाट पाहत आहोत.

**सभापती** : न्यायालयाला जी योजना तुम्ही सादर केलेली आहे ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास हरकत नसावी असे मला वाटते.

**डॉ. दौलतराव आहेर** : आपण आदेश दिला तर ती माहिती सदनाच्या पटलावर ठेवू.

**सभापती** : तुम्हाला ती माहिती सदनाच्या पटलावर ठेवावी असे वाटत नाही काय? माझ्या आदेशाची काय गरज आहे.

**श्री रामराव आदिक** : अध्यक्ष महाराज, माझा पॉईंट ऑफ प्रोप्रायटी आहे. हे पब्लिक डाक्युमेंट आहे. सरकारने या संदर्भात काय स्कीम तयार केली आहे ती सदनाला मिळणे हा आमचा हक्क आहे. सरकारची याबाबत काय भूमिका आहे हे आम्हाला समजले पाहिजे. परंतु मंत्रिमहोदय ती माहिती पटलावर ठेवण्यास तयार नाहीत. केवळ सभापती सांगत असतील तर ती माहिती मी सदनाच्या पटलावर ठेवीन असे सांगतात ही गोष्ट सभापतींचा आणि या सभागृहाचा अवमान करणारी आहे.

**डॉ.दौलतराव आहेर** : अध्यक्ष महाराज, आपण मला संरक्षण द्यावे. माननीय सदस्य सांगतात तसा काही माझा हेतू नाही.

**सभापती** : कोर्टामध्ये १ रुपया फी भरून जी माहिती कोर्टातून मिळू शकते ती माहिती सदनाच्या पटलावर ठेवण्यास तुम्हाला हरकत नाही.

**डॉ. दौलतराव आहेर** : अध्यक्ष महाराज, ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

******

*With Best Compliments From.*
**VIDYA PRASARAK MANDAL'S**
Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal.

College of Arts, Science, Commerce, Home Science, M. A. Eco, Mar, Hist. , Pol. Sci. , Eng., Hindi, M. Com., M. Sc. Phy., Chemi. Bot., Zoo., Law & D. B. M.

**Shri Vijaybabu Darda** *President* **Shri. Prakash Chopada** *Secretary*

**श्री. साईनाथ इन्डस्ट्रीज**
**राधानगरी , वडगाव, यवतमाळ.** : *"तुम्हाला नवं ते हवं, ते आम्ही द्यावं".*
निलकमल फर्निचर, गोदरेज,हायफोम, कर्लऑन, एक्झिक्युटिव्ह वंडर चेअर,तसेच वुडन फर्निचरचे निर्माते. फोन नं.४५४७६ फॅक्स ४५४७२ घर ४५४७३ दुकान
*प्रोप्रायटर :* **पांडुरंग खांदवे**

**हार्दिक शुभेच्छा**
***श्री. दीपक आसेगांवकर,***
**अध्यक्ष** : *सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ, पुसद.*

# राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९५*

*शुक्रवार दिनांक २८.७.१९९५*

**श्री.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : अध्यक्ष महाराज, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याच्या दृष्टीने नियम मे १९९५ पर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या ॲकेडेमिक वर्षापासून ते अंमलात येतील" असे सभागृहात सांगूनही त्या कामी शासनाला आलेले अपयश, शेवटी दिनांक १३ जुलै १९९५ रोजी नागपूर खंडपीठाने समन्यायी वाटपांची व्यवस्था शासनाने तयार करावी असे दिलेले आदेश, त्याचबरोबर अमरावती विभागातील विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अन्यायापोटी ५० जागा तळेगाव दाभाडे येथील वैद्यकीय महाविद्यालयामध्ये या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबाबत नागपूर खंडपीठाने दिलेला आदेश, याबाबत शासनाकडून कारवाईस होत असलेला विलंब, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका."

**डॉ दौलतराव आहेर : (वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये मंत्री)** : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**मा. वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये मंत्र्यांचे निवेदन**

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २७.३.१९९५ रोजी राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याबाबतचे प्रकरण मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे वर्ग केले आणि सदर प्रकरणी शक्यतो या शैक्षणिक वर्षापूर्वी तोडगा काढावा असे निदेश मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठास दिले. या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होवून दि. १३.७.१९९५ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने निर्णय दिला आहे. समन्यायी वाटपाचे सूत्र ठरविण्याकरिता न्यायालयाने शासनास अवधी दिला असून अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना तळेगाव दाभाडे येथे नव्याने सुरू होणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयातील ५० टक्के जागांवर या वर्षापुरता प्रवेश देण्याचे निदेश दिले आहेत याची अंमलबजावणी शासनाव्दारे करण्यात येत आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : मा. मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी निवेदन वितरित केलेले आहे. अतिशय दुर्दैवी अशी ही वस्तुस्थिती आहे. एखाद्या भागातील लोकांच्या मनामध्ये आपल्यावर सतत अन्याय होत आहे अशी भावना निर्माण होणे हे बरोबर नाही. या बाबत तेथे विद्यार्थ्यांच्या पालकांच्या अनेक बैठका झालेल्या आहेत. महाराष्ट्राच्या एका जिल्ह्यातील ९३-९४ टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांला मेडिकल ॲडमिशन मिळत नाही आणि दुसऱ्या जिल्ह्यातील मात्र ८९-९० टक्के गुण असलेल्या विद्यार्थ्यांला मेडीकलला ॲडमिशन मिळते ही स्थिती अन्यायकारक आहे. शासनाने या बाबतीत जे करायला पाहिजे ते न केल्यामुळे ही गोष्ट झालेली आहे. म्हणून लोकांच्या मनामध्ये संतापाची भावना निर्माण झालेली आहे. मला येथे असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या बाबतचे रूल्स ॲंड रेग्युलेशन करण्यासाठी ३ लोकांची समिती कबूल केल्याप्रमाणे शासनाने केव्हा नेमली होती. त्या समितीने काय रिपोर्ट दिला.

**डॉ.दौलतराव आहेर** : २७.३.९५ रोजी सुप्रिम कोर्टाने नोटीस दिली....

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, माझा प्रश्न वेगळा आहे.

**डॉ.दौलतराव आहेर** : अध्यक्ष महाराज, या प्रश्नाबाबत शासनाची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. मा. सदस्यांनी जर संधी दिली तर मी निश्चितच त्यांचे समाधान करू शकेन. ही समिती एप्रिल महिन्यामध्ये नेमण्यात आली. या समितीने प्रवेश जागांचे समन्यायी वाटप कसे करता येईल या दृष्टीने विचार केला. या बाबतीत आपल्याला केवळ एम.बी.बी.एस. पुरताच विचार करून चालत नाही तर अलाईड कोर्सेसचा देखील विचार करावा लागतो. डेंटल, एम.बी.बी.एस., होमीयोपॅथी वगैरे कोर्सेस सहा सेक्शन आहेत. विभागीय दृष्टिकोनातून या अलाईड कोर्सेसचा विचार करीत असताना बॅकलॉग दूर करण्याबाबत...

**श्री.बी.टी.देशमुख** : मा. मंत्री महोदय या ठिकाणी जुनीच माहिती देत आहेत. ६ एप्रिल ९५ रोजी असे उत्तर शासनाने दिले होते की, "रूल्स ॲंड रेग्युलेशन तयार करण्यासाठी ३ लोकांची एक समिती गठीत करण्यात येणार आहे. मे महिन्यामध्ये त्याबाबतचे नियम तयार होतील. नागपूर हायकोर्टाकडून ते नियम मान्य करून घेण्यात येतील. व ९५-९६ पासून ते अमलात येतील" माझा प्रश्न एवढाच आहे की, मे महिन्यामध्ये हे रूल्स हाटकोर्टाला सबमीट करण्यात आले होते काय?

**डॉ. दौलतराव आहेर** : जी माहिती जमा करावयाची होती ती जमा केली. सुप्रिम कोर्टाने जी नोटीस दिली होती ती स्पष्ट होती. महाराष्ट्र शासनामध्ये मेडीकलच्या जागाबाबत जो इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशनचा प्रश्न निर्माण झालेला होता त्या बाबत नागपूर हायकोर्टाने हुकूमनामा करण्याअगोदर २९ एप्रिल रोजी उच्च न्यायालयामध्ये महाराष्ट्र शासनाची काय भूमिका आहे हे वकिलामार्फत सबमीट करण्यात आले एकंदर पाप्युलेशन किती आहे? विद्यापीठनिहाय विद्यार्थ्यांची संख्या किती आहे ही माहिती देण्यात आली. ८.५.९५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या लॉ ॲंड ज्युडीसिअरी डिपार्टमेंटने लिव्ह व्हेकन्सीमध्ये बेंच निर्माण करून ॲकेडेमीक इअरपासून हा प्रश्न निकालात निघेल अशी भूमिका घेतली होती. या बाबतीत महाराष्ट्र शासनाने चाल ढकल करण्याची भूमिका घेतली नाही. मी जर याबाबतची आकडेवारी दिली तर आपल्याला सर्व समजू शकेल. मा. सदस्य म्हणतात तसा बॅकलॉग किंवा जनतेच्या मनामध्ये चिडीची भावना निर्माण झालेली नाही. त्या भागातील जनतेच्या मनामध्ये संतापाची भावना झाली आहे असे म्हणणे हे इतर विभागावर अन्याय करण्यासारखे होईल. नागपूर खंडपीठाने इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशनच्या दृष्टीने तातडीने स्टेप घेतली असती तर परत कोर्ट कचेऱ्या झाल्या असत्या आता ज्या ॲडमिशन्स झालेल्या आहेत त्या झाल्या नसत्या. अमरावती येथील विद्यार्थ्यांना तळेगाव दाभाडे येथे मेडिकल कॉलेज काढले त्या ठिकाणी ५० टक्के जागा देण्यास येतील असे ॲफिडेव्हीट महाराष्ट्र शासनातर्फे झाले. त्या जागा भरण्याच्या प्रक्रिया सुरू आहेत. आतापर्यंत शासकीय आणि ज्यांना एम.सी.आय. ची रेकग्नीशन मिळाली अशा प्रायव्हेट मेडिकल कॉलेजच्या ॲडमिशन संपलेल्या आहेत त्याबरोबर ज्यांना एम.सी.आय. ची रेकग्नीशन मिळाली नाही त्यांच्या ॲडमिशन्स आज दुपारी १२ किंवा १ वाजेपर्यंत संपलेल्या आहेत.

**उपसभापती** : मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, मे ९५ पर्यंत नियम तयार करू असे सांगितले होते तरी मे ९५ पर्यंत हे नियम तयार केले का? केले नसतील तर का केले नाहीत हा सन्माननीय सदस्यांचा मूळ प्रश्न आहे.

**डॉ.दौलतराव आहेर** : अध्यक्ष महाराज, हा प्रश्न इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशनचा होता. हायकोर्टाशी संबंधित होता. दुसरी नियमावली जी आहे या नियमावलीप्रमाणे प्रॉस्पेक्टस ३१ मे पूर्वी तयार केलेली आहेत.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, म्हणजे जे तुम्ही येथे सांगितले ते केलेच नाही. ३१ मे रोजी प्रॉस्पेक्टस छापून पब्लीश केले. तेथे जे सांगितले ते केले नाही. येथे तुम्ही सांगितले होते की ९५-९६ या वर्षापासून हे समन्यायी वाटप अंमलात आणू आणि मे महिन्यामध्ये त्याचे नियम तयार करण्यात येतील सभागृहामध्ये हे सांगितल्यानंतर पुढील वर्षापासून म्हणजे ९५-९६ पासून ते


With Best Compliments From

Phone No. (O) 524490 ( R ) 525584

* REGD " A " CLASS CONTRACTOR
* ELECTRICIAL ENGINEER
* CONSULTANT

KAKANI INSURANCE SERVICE
Tank Complex, Rajkamal,
Station Road, Amravati.

A RELIABLE CONSULTANCY FOR
L. I. C., U. T. I., P. P. F., N. S. C., Mutual Fund & Other Investments
Phone ( O ) 77609 ( R ) 72765

समन्यायी वाटप अमलात येणार होते. "तेवढे शासनाच्या हातामध्ये आहे आणि तेवढे आम्ही करणार आहोत" असे या ठिकाणी तुम्ही ६ एप्रिल १९९५ रोजी सांगितले आणि मंत्री महोदय यांनी त्या दिवशी असेही सांगितले होते की, "सदनाच्या भावना लक्षात घेऊन इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे." हे सांगितल्यानंतर तुम्ही ते केले नाही. तुम्ही ३१ मे रोजी जी.आर. काढला मागच्या वर्षीच्या नियमाप्रमाणे प्रॉस्पेक्टस छापून टाकले मागच्या वर्षाचे जुनेच नियम ९५- ९६ साठीसुद्धा लागू केले.

**उपसभापती :** आपला जो प्रश्न आहे तो सोपा करून मी त्यांना सांगितले की, मे ९५ पूर्वी ही नियमावली किंवा हे नियम तयार करून खंडपीठाकडून त्याला मान्यता घेतली काय?

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महोदय, यांनी हायकोर्टामध्ये उलट ॲफिडेव्हीट दिले.

**उपसभापती :** ते का झाले नाही हे मी त्यांना विचारतो ना?

**श्री.बी.टी.देशमुख :** हायकोर्टामध्ये त्यांनी उलटे दिले. दिले ते मी वाचून दाखवितो. १० जुलै १९९५ या दिवशी सभागृहामध्ये मी म्हटले की, "तुम्ही कोर्टाला काय सांगितले ते आम्हाला द्या" त्यावेळी पहिल्यांदा ते नाही म्हणाले मग आपण निर्णय दिला की कोर्टामध्ये जी योजना सादर केलेली आहे ती येथे द्यायला हरकत नसावी. "सभागृहाच्या पटलावर ठेवतो" असे मंत्री महोदय १० जुलै ९५ ला म्हणाले पण त्यांनी ते अजून ठेवले नाही. हायकोर्टामध्ये तुम्ही जे दिले. दाखल केले. त्यामध्ये वेगळे सांगितले आहे आणि सभागृहामध्ये वेगळे सांगितले होते. ती प्रत मी स्वतंत्रपणे मिळविली आहे. हायकोर्टामध्ये तुम्ही असे सांगितले की-

"The time available for this exercise is very limited and it is not possible in this short period to make any recommendations on this issue.

सभागृहामध्ये तुम्ही ६ एप्रिल १९९५ रोजी जे सांगितले त्याच्या हे अगदी उलटे सांगितले हायकोर्टाच्या ॲफीडेव्हीटमध्ये आणखी काय म्हटले आहे?

"The Government would be required to comprehensively apply its mind to this issue. This entire process would take some time and in any event would not be complete before the admissions to the current academic year"

मागच्या वर्षी तुम्ही आमच्या भागातील मुलांचे नुकसान केले होते. ९५-९६ या वर्षी जे करतो म्हणून येथे सांगितले ते कबूल केले ते केले नाही आणि हायकोर्टामध्ये उलटे सांगितले. म्हणून हायकोर्टाने पुन्हा असाच निर्णय दिला. हायकोर्टामध्ये हे ॲफिडेव्हीट केले जून महिन्याच्या शेवटी शेवटी. माझे म्हणणे असे आहे की, हे तुम्ही का केले?

**उपसभापती :** सभागृहामध्ये दिलेले आश्वासन आणि खंडपीठासमोर केलेले ॲफिडेव्हीट याच्यामध्ये काही तफावत आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. हे खरे आहे काय?

**डॉ.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महोदय. ॲडमिशन्स बारावीचा रिझल्ट लागल्यानंतर होतात. ॲडमिशन्स वेळेवर व्हावयाला पाहिजेत या दृष्टिकोनातून प्रॉस्पेक्टस तयार व्हावयाला पाहिजेत आणि मग ज्या वेळेस रिझल्ट लागतो त्यावेळी तो लागल्यानंतर विद्यार्थ्यांच्या हातामध्ये प्रॉस्पेक्टस मिळाले पाहिजे.

**श्री. अजहर हुसेन :** अध्यक्ष महोदय ....

**उपसभापती :** सन्माननीय सदस्य श्री.अजहर हुसेन यांनी खाली बसावे मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्या.

**डॉ.दौलतराव आहेर :** या पद्धतीने होणार असेल तर या प्रश्नाला न्याय मिळणार नाही. म्हणून मला विनंती करावयाची आहे की, सन्माननीय सदस्यांच्या भावना ओळखून.....

**(अडथळा)**

अध्यक्ष महोदय, मी दुसरे तिसरे काही सांगत नाही रूल्स अँड रेग्युलेशन मागच्या वर्षीसुध्दा होते.

**श्री.बी.टी.देशमुख :** आपण उलटे ॲफिडेव्हीट का केले.

**उपसभापती :** सन्माननीय सदस्य बी.टी.देशमुख यांना मी सांगू इच्छितो की मी हाच प्रश्न विचारला की, सभागृहामध्ये दिलेले आश्वासन आणि खंडपीठासमोर केलेले ॲफीडेव्हीट याच्यामध्ये तफावत आहे का? असल्यास ती का आहे?

**श्री.दौलतराव आहेर :** तेच उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. अध्यक्ष महोदय ॲडमिशन तर द्यावयाला पाहिजे. प्रॉस्पेक्टस तर तयार करावयाला पाहिजेत.

**श्री. अरुण मेहता :** अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे.....

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, मी मघाशी या ठिकाणी जे वाचून दाखविले होते येथे सांगितले त्याच्या उलट केले हे खरे आहे काय? असा प्रश्न मी विचारला होता त्याचबरोबर त्या संदर्भात आपण सुद्धा प्रश्न विचारला होता. परंतु त्या प्रश्नाला उत्तर देण्यात येत नाही ही लाजिरवाणी गोष्ट आहे...

**डॉ.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, ॲफिडेव्हीट जरूर करण्यात आले होते आणि हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने ते करण्यात आले होते ॲफिडीव्हीट खरे आहे...

**(एकाच वेळी अनेक सदस्य बोलतात)**

**उपसभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. खंडपीठासमोर करण्यात आलेले ॲफेडेव्हीट खरे आहे किंवा नाही याबाबतीत मी विचारलेले नाही. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनीसुद्धा विचारलेले नाही. सरकारने केलेले ॲफेडेव्हीट हे खरे आहे या संदर्भात सभागृहामध्ये जे आश्वासन देण्यात आले होते ते लक्षवेधी सूचनेमध्ये अवतरण चिन्हात दाखविलेले आहे तेव्हा सभागृहामध्ये दिलेले आश्वासन आणि खंडपीठासमोर सादर केलेले ॲफेडेव्हीट यामध्ये तफावत आहे काय? अशा प्रकारची तफावत असेल तर ती का आहे यासंबंधी मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा.

**डॉ.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महोदय सभागृहामध्ये या संदर्भात आश्वासन देण्यात आले होते. अमरावतीच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होतो आणि तो अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तळेगाव येथे नवीन मेडिकल कॉलेज काढण्यात आले असून या विद्यार्थ्यांसाठी त्या ठिकाणी ५० टक्के जागा देण्यात येतील. दुसरी गोष्ट अशी की इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करण्याच्या संदर्भात सुप्रिम कोर्टाने निदेश दिलेले आहेत ते नागपूर खंडपीठाकडून मंजूर करून घेऊन त्याप्रमाणे १९९५-९६ सालापासून ते ॲप्लीकेबल करावयाचे आहेत. परंतु नागपूर खंडपीठापुढे काही केसेस चाललेल्या आहेत आणि नागपूर खंडपीठाच्या पुढे ज्यावेळी या केसेस सुरू झाल्या त्यावेळी खंडपीठाने असे सांगितले की, या सगळ्या गोष्टींना वेळ लागणार आहे.......

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय मंत्रीमहोदय चुकीचे सांगत आहेत. तुम्ही वेळ लागेल म्हटले त्या ठिकाणी शासनाने काय सांगितले होते हे सांगण्यात यावे ते का सांगत नाहीत?

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज त्या ठिकाणी या संदर्भात चर्चा सुरू झाली होती. खऱ्या अर्थाने कोर्टाने आम्हाला ८-६ ला निदेश दिले होते. इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशनच्या संदर्भात काय म्हणणे आहे हे ऐकून घेण्याच्या बाबतीत केसेस सुरू झाल्या होत्या त्यावेळी कोर्टाच्या असे लक्षात आले की हा मुद्दा कॉम्प्लीकेटेड आहे. त्यामुळे या संदर्भात काय सोल्युशन असेल या दृष्टीने ॲफेडेव्हीट करा असे कोर्टाने सांगितले तेव्हा सोल्युशन देण्याच्या दृष्टीने ॲफेडेव्हीट सादर केलेले आहे.

**श्री. अरुण मेहता :** अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा आहे. हा प्रश्न या सदनामध्ये यापूर्वी अनेकवेळा आलेला आहे. त्याचबरोबर आपण सुद्धा या विषयाशी सुपरिचित आहात. हा विषय सभागृहामध्ये अत्यंत प्रखरपणे मांडून त्यावेळी शासनाकडून पॉझिटीव्ह आश्वासन मिळविले होते. डिसेंबर महिन्यामध्ये हे आश्वासन मिळविले होते. हा प्रश्न आहे तो आताच इतका गंभीर का झाला आहे. सुप्रिम कोर्टाने इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशनच्या संदर्भात जे काही सांगितले होते ते एका वर्षापुरते होते. पुढे इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करा असे त्यांनी सांगितले होते. १९९४-९५ पुरतेच त्यांनी हे मान्य केले होते की तळेगाव येथील मेडिकल कॉलेजमध्ये ५० टक्के जागा ठेवावयाच्या या वर्षाची पोझीशन मात्र पूर्ण अधांतरी राहील. अमरावतीच्या मुलांना ५० टक्के जागा त्या ठिकाणी मिळतील १०० पैकी ५० जागा तळेगावला मिळतील याविषयी यामधून खात्री मिळत नाही. अमरावतीच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्यामुळे हा प्रश्न या ठिकाणी विचारण्यात


[illegible]

**गौरक्षण रोड, अकोला ( महाराष्ट्र )** फोन नं. (०७२४) २७८५०, २६८५६, २३०७२

**( विदर्भ मेडीकल एज्युकेशन अँन्ड रिसर्च फांउन्डेशन )**

*सुबोध ज. गोइनका, सचिव*

*डॉ. देवीदास खरात*
*प्राचार्य*

*आशुतोष ज. गोइनका*
*अध्यक्ष*

आला होता आणि त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी मध्ये हस्तक्षेप करून सांगितले होते की ५० टक्के जागा तळेगावला देण्यात येतील. आता या ठिकाणी जी उत्तरे दिली जातात ती संपूर्णपणे दिशाभूल करणारी आहेत. अध्यक्ष महाराज आम्ही वारंवार प्रश्न विचारत आहोत परंतु सन्माननीय मंत्रीमहोदय त्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे मात्र टाळत आहेत. या लक्षवेधी सूचनेमध्ये पहिल्या तीन ओळीत ज्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे आणि त्या संदर्भातील बाकीची सगळी माहिती सन्माननीय सदस्य बी.टी.देशमुख यांनी वाचून दाखविलेली आहे. शासनाने यापूर्वी सभागृहामध्ये जे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाला पूर्णपणे हरताळ फासावयाचा, दिलेल्या आश्वासनाच्या विरोधी वागावयाचे आणि पुन्हा सांगावयाचे की आम्ही यातून विद्यार्थ्यांचे भले व्हावे असे पाहतो आहोत. काय भले आहे त्यामुळे या हरकतीच्या मुद्दाव्दारे मी आपल्यासमोर मांडू इच्छितो की, असा जर हा प्रश्न लोंबकळत राहिला तर अमरावतीच्या मुलांना कधीही न्याय मिळणार नाही कारण अमरावतीला मेडिकल कॉलेज नाही आणि तेथील १२ वीला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या या गोष्टींचा विचार करून हा निर्णय घेतला होता तेव्हा सन्माननीय सदस्य श्री बी.टी.देशमुख यांच्या प्रश्नाला संपूर्ण न्याय मिळवून देणे महत्त्वाचे आहे.

**उपसभापती :** सन्माननीय सदस्यांच्या हरकतीच्या मुद्दामध्ये तथ्य आहे आणि या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेमध्ये एकंदर जी काही प्रश्नोत्तरे झाली आहेत...

**श्री. गोपीनाथ मुंढे :** अध्यक्ष महाराज आपण या हरकतीच्या मुद्यावर निर्णय देण्यापूर्वी मी आपल्यामार्फत सदनाला काही सांगू इच्छितो. आपण निर्णय दिल्यानंतर आम्ही त्यावर काही बोलू शकणार नाही म्हणून त्यापूर्वी मला आपल्याला काही सांगायचे आहे. अध्यक्ष महाराज अमरावती विभागातील विद्यार्थ्यांवर या प्रवेशासंबंधात अन्याय होऊ नये अशी जी सन्माननीय सदस्यांची भावना आहे तीच या शासनाची आहे. या विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठीच हरकतीच्या मुद्याच्या रुपाने सन्माननीय सदस्य सर्वश्री अरूणभाई मेहता आणि बी. टी. देशमुख हे सारखा आग्रह धरीत आहेत. या संदर्भात या सदनामध्ये शासनाने पूर्वी दिलेले आश्वासन आणि हायकोर्टामध्ये शासनाने केलेले ॲफिडीव्हीट यामध्ये अंतर आहे काय? असा प्रश्न त्यांनी येथे विचारलेला आहे अध्यक्ष महाराज आता या संदर्भात खंडपीठाचा निर्णय लागलेला आहे **आणि महाराष्ट्र सरकारने हायकोर्टात या ॲफीडिव्हीट व्दारा सांगितले आहे की, कोठल्याही रिजनमध्ये अशा प्रकारचा अन्याय यापुढे होऊ देणार नाही** तेव्हा आता याबाबत निर्णय लागल्यामुळे यापुढे १९९६-९७ च्या प्रवेशामध्ये अन्याय होण्याचा काही प्रश्नच राहिलेला नाही. आता सन्माननीय सदस्यांच्या मनात केवळ जो एक प्रश्न आहे वा शंका आहे की **गेल्या वर्षी जसा अमरावतीच्या विद्यार्थ्यांना या प्रवेशासंबंधात अन्याय झाला होता तसाच याही वर्षी होणार आहे काय? तर तो अन्याय झालेला आहे या त्यांच्या मताशी मी सहमत आहे.** यामध्ये सध्या सरकारची अडचण अशी होती की, ७ जून ला सुनावणी झाली, १३ जुलैला निर्णय लागला आणि २४ जुलैला प्रवेश सुरू झाले. तेव्हा गेल्या वर्षी प्रवेशामध्ये अडचण घेण्यात आली त्यावेळी आपण धोरण बदलल्यामुळे लोक कोर्टात गेले आणि मग त्याला विलंब झाला तेव्हा आता या वर्षी प्रवेश घेतले गेले असले तरी या तळेगावच्या कॉलेजमध्ये अमरावतीच्या विद्यार्थ्यांसाठी म्हणून वेगळ्या ५० जागा महाराष्ट्र शासन देणार आहे आणि त्यातून त्याच्यावरील अन्याय दूर करणार आहे. तेव्हा मला वाटते यानंतर सन्माननीय सदस्यांचा काही हरकतीचा मुद्दा राहणार नाही.

**उपसभापती :** आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री मेहता यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे तो योग्य आहे किंवा नाही याचा निर्णय मी देणार आहे. त्या मुद्याबाबत माननीय उपमुख्यमंत्री यांनी काही गोष्टींचा खुलासा केलेला आहे. तरीही मी आपल्याला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांच्या हरकतीच्या मुद्यांमध्ये तथ्य आहे हे मी सुरुवातीलाच सांगितले आहे. या वर्षी अशा प्रकारे अन्याय अमरावती विभागातील विद्यार्थ्यांवर होणार नाही असे निवेदन आपण येथे केले याच्याशी या क्षेत्रातील जे काही प्रश्न उपस्थित करणारे आहेत वा ही लक्षवेधी सूचना देणारे आहेत ते कोठल्याही प्रकारे सहमत नाहीत. कारण या वर्षीची सारे प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यामुळे अमरावतीच्या विद्यार्थ्यांना आता न्याय मिळेल अशी परिस्थिती नाही. आता भविष्यकाळात म्हणजे १९९६-९७ मध्ये मात्र अमरावती विभागातील विद्यार्थ्यांना न्याय मिळेल असे आपण सांगितले ते बरोबर आहे.

**श्री.गोपीनाथ मुंडे :** सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इम्फर्मेशन आहे. आपण एकदा निर्णय दिल्यानंतर आम्हाला बोलायचा अधिकार नाही. मी यावर्षाची सद्यःस्थिती सांगतो. यावर्षी सर्व जनरल ॲडमिशन झाल्या आहेत, त्यामुळे अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांवर अन्याय झाला ही शासनाची भावना आहे. त्यामुळे यावर्षी एमआयटी या संस्थेला शासनाने मान्यता दिली. त्याठिकाणी अजून प्रवेश झाले नाही. त्यामुळे एमआयटी संस्थेमध्ये ९५-९६ करिता अमरावती च्या ५० विद्यार्थ्यांना ॲडमिशन दिली जाईल. त्यामुळे त्यांच्यावर झालेला अन्याय दूर होईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, हायकोर्टाने म्हटले आहे, हे गेल्या वर्षी झाले यावर्षीही झाले "तेव्हा ५० जागा तळेगांव-दाभाडेला मुलांना द्या" ईक्विटेबल डिस्ट्रिब्युशन यावर्षी होवू शकत नाही, तसे तुम्ही त्याठिकाणी नमूद केले. या ५० मध्ये मागच्या वर्षाचे व यावर्षाचे विद्यार्थी कॉम्पिट करतील. तेव्हा या ५० जागा हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे दिल्या आहेत....

**डॉ. दौलतराव आहेर :** आम्ही सांगितल्यामुळे दिल्या आहेत .....

**प्रा. बी.टी.देशमुख :** आता हायकोर्टामध्ये तुम्ही कबूल केले की, ९६-९७ पासून ईक्विटेबल डिस्ट्रिब्युशन लावू. माझे म्हणणे असे की, फक्त ५० जागा यावर्षी दिल्या तुम्ही तसे ॲफीडीव्हीट केल्यामुळे दिल्या हे खरे आहे. प्रश्न असा की, **पुढील वर्षी जूनमध्ये समन्यायी वाटपाची परिस्थिती लागू होईल हे नमूद करून हायकोर्टामध्ये तुम्ही कमिटमेंट दिले** आहे. त्याप्रमाणे मा. हायकोर्टाचा निर्णयही झाला आहे तेव्हा एक महिन्याच्या आत लोकसंख्येच्या आधारावर ईक्विटेबल डिस्ट्रिब्युशन फार्मुला, हायकोर्टामध्ये आपण सादर करणार काय?

**डॉ.दौलतराव आहेर :** मी सदनाला सांगत होतो की, मघाशी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे आपल्याकडे मेडिकल फॅकल्टिज वेगवेगळ्या आहेत....

**उपसभापती :** माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांचा प्रश्न पॉईंटेड आहे, त्याचे नेमके उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे.

**डॉ.दौलतराव आहेर : ईक्विटेबल डिस्ट्रिब्युशन करायला शासन कटिबद्ध आहे.**

**प्रा.बी.टी.देशमुख : नुसते कटिबद्ध नको, एक महिन्यात समन्यायी वाटपाचे सूत्र सादर करणार काय? या माझ्या प्रश्नाला उत्तर येत नाही.**

**डॉ.दौलतराव आहेर :** हा अन्याय फक्त अमरावतीमध्ये झाला नाही तर नॉर्थ महाराष्ट्र, मराठवाडा, शिवाजी विद्यापीठामध्ये सर्वच ठिकाणी झाला.

**प्रा.बी.टी.देशमुख :** मंत्रीमहोदय सर्व काल्पनिक सांगत आहेत. कुठे आहे या अन्यायाविरुद्ध एखादी लक्षवेधी? का अन्याय होवून ते सारे आनंदात आहेत? या अन्यायावर एखादा प्रश्न? एखादी लक्षवेधी? कोणी हायकोर्टात किंवा सुप्रिम कोर्टात गेल्याची बातमी नाही ना? तुम्ही हे काल्पनिक सांगत आहात ते काय म्हणून?

**डॉ.दौलतराव आहेर :** मी काल्पनिक सांगत नाही. हे आकडेवारीने सांगतो.

**प्रा.बी.टी.देशमुख :** मंत्रिमहोदयांच्या पहिल्या वाक्याला दुसरे वाक्य विरोधी आहे...

**डॉ.दौलतराव आहेर :** सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इम्फर्मेशन आहे. मला सभागृहाला संपूर्ण माहिती दिली पाहिजे. मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, बॉम्बे युनिव्हर्सिटीच्या कक्षेत ....

**(गोंधळ)**

(विरोधी पक्षाचे अनेक मा. सदस्य उभे राहून बोलू लागतात)

**उपसभापती :** सर्व माननीय सदस्यांनी खाली बसल्याशिवाय मी कुणालाही बोलावयास परवानगी देणार नाही. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने जे जे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केले आहेत, त्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर या सर्व चर्चेतून मिळत नसल्यामुळे मी ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलीत आहे.

******

*WITH BEST COMPLIMENTS FROM*
*Savitrbai Phule Mahila Mahavidyalaya, Washim.*
*Savitribai Phule Girls Junior College, Washim.*
*S. M. C. English School, Washim.*

**Prof H. N. Kshirsagar** — Secretary
**Satyanarayan Joshi** — President.

[illegible]
*संस्थेद्वारा चालविल्या जाणा-या शैक्षणिक संस्था*
**उस्मान आझाद उर्दू बॉईज हायस्कुल ,**
**रुह अफजा खानम गर्ल्स उर्दू हायस्कुल,**
**के. एम. असगर हुसेन सायन्स, आर्टस,**
**कॉमर्स ज्युनियर कॉलेज,**
**के. एम. असगर हुसेन शिक्षण महाविद्यालय**

**मोहसिन शहीदी खा.** — *सचिव*
**मो. अजहर हुसेन** — *अध्यक्ष*

# राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करणे.

*महाराष्ट्र विधान परिषद : दुसरे अधिवेशन १९९५ : बुधवार, दिनांक ९.८.१९९५*

*दाभोळ येथील एन्‌रॉन प्रकल्पाबाबतच्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा सुरू होण्यापूर्वी (लक्षवेधी सूचनेबाबत)*

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, अंतिम आठवडा प्रस्ताव घेण्यापूर्वी आपल्याकडून मला संरक्षण हवे आहे. दिनांक २८ जुलै १९९५ रोजी राखून ठेवलेली लक्षवेधी सूचना वैद्यकीय महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटपाबाबतची आजच्या कार्यक्रम पत्रिकेतील लक्षवेधी सूचनांमध्ये पहिल्याच क्रमांकावर आहे. आज या सत्राचा शेवटचा दिवस असल्याने घाई होवू नये. ही लक्षवेधी सूचना आपण चर्चेसाठी घ्यावी.

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांच्याकडून माहिती घ्या असे माननीय शिक्षण मंत्र्यांना सांगण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** माझ्याकडून माहिती घेण्याचा प्रश्न नाही. मेडिकलच्या इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशनचा प्रश्न आहे. हा विषय शिक्षण मंत्र्यांचा नसून आरोग्य मंत्र्यांचा आहे.

**सभापती :** आपल्याकडे वेळ नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** आपण १०-१५ मिनिटे तरी या पहिल्या लक्षवेधी सूचनेसाठी द्यावीत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती :** एक लक्षवेधी सूचना घेतली तर बाकीच्या सूचनाही घ्या असे सन्माननीय सदस्य म्हणतील.

**श्री.बी.टी.देशमुख :** माझ्या भागातील हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. तरी निदान १० मिनिटे तरी या लक्षवेधी सूचनेसाठी देण्यात यावीत.

**सभापती :** आपल्याकडे वेळ शिल्लक राहिला तर लक्षवेधी सूचना आपण नंतर घेणार आहोत.

**श्री.बी.टी.देशमुख :** आपण वेळ वाढवून द्या. आम्ही अधिक वेळ बसायला तयार आहोत.

**सभापती :** शक्य झाल्यास वेळ वाढवून देवू.

*दाभोळ येथील एन्‌रॉन प्रकल्पाबाबतच्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा संपल्यानंतर*

**सभापती :** .... यानंतर वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य बी.टी.देशमुख यांनी लक्षवेधी सूचना दिलेली आहे. ही लक्षवेधी सूचना नंतर घेवू असे मी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना कबूल केले होते. त्याप्रमाणे आता आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली पहिली लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्यात येईल.

## *राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करणे.*

***दिनांक २८ जुलै १९९५ रोजी राखून ठेवण्यात आलेली लक्षवेधी सूचना***

**श्री.बी.टी.देशमुख :** (अमरावती विभाग पदवीधर) अध्यक्ष महाराज मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याच्या दृष्टीने नियम मे १९९५ पर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या ॲकेडेमिक वर्षापासून ते अंमलात येतील" असे सभागृहात सांगूनही त्या कामी शासनाला आलेले अपयश, शेवटी दिनांक १३ जुलै १९९५ रोजी नागपूर खंडपीठाने समन्यायी वाटपांची व्यवस्था शासनाने तयार करावी असे दिलेले आदेश, त्याचबरोबर अमरावती विभागातील विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अन्यायापोटी ५० जागा तळेगाव दाभाडे येथील वैद्यकीय महाविद्यालयामध्ये या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबाबत नागपूर खंडपीठाने दिलेला आदेश, याबाबत शासनाकडून कारवाईस होत असलेला विलंब, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका."

**डॉ.दौलतराव आहेर (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री) :** अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

### मा. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्री यांचे निवेदन

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २७.३.१९९५ रोजी राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याबाबतचे प्रकरण मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे वर्ग केले आणि सदर प्रकरणी शक्यतो या शैक्षणिक वर्षापूर्वी तोडगा काढावा असे निर्देश मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठास दिले. या प्रकरणाची सुनावणी पूर्ण होवून दि. १३.७.१९९५ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने निर्णय दिला आहे. समन्यायी वाटपाचे सूत्र ठरविण्याकरीता न्यायालयाने शासनास अवधी दिला असून अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना तळेगाव दाभाडे येथे नव्याने सुरू होणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयातील ५० टक्के जागांवर या वर्षापुरता प्रवेश देण्याचे निदेश दिले आहेत याची अंमलबजावणी शासनाव्दारे करण्यात येत आहे.

राज्यातील वेगवेगळ्या विद्यापीठ क्षेत्रातील प्रवेश जागांच्या वाटपातील असमतोलाबाबत सर्वांगीण विचार करून समन्यायी वाटपाबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, विषयाचे महत्व लक्षात घेवून आज घाई असतांना वेळ दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. आपण त्यादिवशी सांगितल्यानंतर हायकोर्टामध्ये शासनाने जे काय ॲफिडेव्हीट केले ते आज सभागृहासमोर सबमिट झाले आहे. मी त्यादिवशी त्यातील महत्त्वाचा भाग वाचून दाखविला होता. सभागृहामध्ये मा.मंत्रिमहोदयांनी जे सांगितले त्याच्या नेमके उलट ॲफिडीव्हीट त्याठिकाणी हायकोर्टात दाखल झाले. सभागृहामध्ये स्पष्टपणे सांगितले होते की, "आम्ही समिती गठीत करणार आहोत. मे पर्यंत फॉर्म्युला ठरवू आणि जूनमध्ये हाटकोर्टासमोर ठेऊन १९९५-९६ यावर्षापासून लागू करू." पण तसे झाले नाही. माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, "समिती गठीत करणार आहोत. पुढच्या वर्षापासून समन्यायी वाटप करणार आहोत तेवढे शासनाच्या हातामध्ये आहे आणि तेवढे आम्ही करणार आहोत". "सदनाच्या भावना लक्षात घेऊन इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे." अध्यक्ष महाराज, मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, सभागृहामध्ये जे वारंवार सांगितले त्या उलट कोर्टामध्ये ॲफिडीव्हीट केले ते कां म्हणून? कोर्टामध्ये जे सांगितले ते त्यादिवशी मी येथे वाचून दाखविले होते. त्याठिकाणी सांगितले की, "आम्हाला फार अभ्यास करावा लागेल, वेळ लागेल." आता तुमचे म्हणणे लक्षात घेऊन कोर्टाने निर्णय दिला आहे की, इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करावे लागेल. तुम्ही ते कबूल केले आहे आणि तेथे तुम्ही मुदत कबूल केलेली नाही. माझे म्हणणे असे आहे की, लोकसंख्येच्या आधारावर इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशनचा फॉर्म्युला केंव्हा सादर कराल?

*WITH BEST COMPLIMENTS FROM*

**TINA ENTERPRISES**

Satidham Market,
Amravati.

*समन्यायी वाटपाच्या प्रयत्नांना यश मिळो हीच प्रभू चरणी प्रार्थना*

**अशोक कला व वाणिज्य महाविद्यालय, चांदूर रेल्वे**

**के.एस.वरखेड**, *प्रभारी प्राचार्य व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी*

**डॉ. दौलतराव आहेर : अध्यक्ष महाराज, या शासनाची भूमिका एकदम पारदर्शक आहे. स्वच्छ आहे. आम्हाला काहीही लपवून ठेवावयाचे नाही. आम्हाला पुढच्या वर्षापासून लोकसंख्येच्या बेसीसवर इक्वीटेबल डिस्ट्रिब्युशन करावयाचे आहे.**

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज मागच्या वेळेला असे सांगितले होते की, १९९५-९६ पासून करतो. पण ते झाले नाही. आमच्या संपूर्ण भागामध्ये यासंबंधात तीव्र असंतोष आहे. आपण येथे अगोदर सांगितले आणि ते केले नाही. आता पुढच्या वर्षी करतो असे सांगत आहात. माझे म्हणणे असे आहे की, एक महिन्यामध्ये याबाबतची पूर्ण योजना सादर कराल काय?

**डॉ.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, प्रयत्न करू.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, "प्रयत्न करू" हे म्हणणे बरोबर नाही. माझे म्हणणे अतिशय स्पष्ट आहे. मंत्री महोदयांनी ६ एप्रिल रोजी सांगितले की, "रूल्स रेग्युलेशन तयार करण्याच्या दृष्टिकोनातून तीन लोकांची समिती गठीत करीत आहोत. हे नियम मे महिन्यापर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या शैक्षणिक वर्षापासून ते अंमलात येतील." पण तसे केले नाही. काय केले तर जुन्याच नियमांचे प्रास्पेक्टस छापले आणि त्याच्याखाली एक ओळ दिली की "हायकोर्टाचा निर्णय होईल सबजेक्ट टू डॅट." माझे असे म्हणणे आहे की, हा अत्यंत वाईट असा जुना अनुभव लक्षात घेऊन आता एक महिन्यामध्ये ही योजना तयार करून सादर केली जाईल काय? माननीय मंत्री महोदयांनी एक महिन्याच्या ऐवजी दीड महिना म्हटले तरी मला चालेल, पण प्रयत्न करू असे उत्तर अजिबात नको. याविषयी माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगावे.

**डॉ.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, मघाशी शासनाची भूमिका मी सदनापुढे मांडली आहे. एकदम पारदर्शक आहे.

**श्री.व्यंकाप्पा पतकी :** म्हणजे किती पारदर्शकता? लज्जा रक्षणासाठी थोडी कमी करा.

**डॉ.दौलतराव आहेर :** यांना फार लाज वाटायला लागली आहे. अध्यक्ष महाराज, मी आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की, महाराष्ट्र राज्यात ८ विद्यापीठे आहेत ...

**सभापती :** माननीय मंत्रिमहोदय, एक साधी गोष्ट आहे. आपण मघाशी सांगितले की, पुढच्या वर्षी आम्ही हे नक्की करतो. माननीय सदस्यांचे म्हणणे असे आहे की, हे नक्की करतो, याबाबतचा निर्णय करा, महिन्याने करा, दीड महिन्याने करा, दोन महिन्याने करा. तुम्हाला जेव्हा करता येणार असेल तेव्हा करा.

**डॉ.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, मी तोच खुलासा करण्याचा प्रयत्न करीत आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** खुलासा नको आहे. लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटपाची योजना केव्हा सादर करणार आहात ते सांगा.

**डॉ. दौलतराव आहेर :** माझे म्हणणे तर ऐकून घ्या. अध्यक्ष महाराज, आपल्या राज्यामध्ये ८ विद्यापीठे आहेत. त्याच्यापैकी ३ विद्यापीठांमध्ये ही विद्यार्थी संख्या पाप्युलेशनच्या आधारावर जास्त आहे आणि ५ विद्यापीठे अशी आहेत की, तेथे मोठ्या प्रमाणात पाप्युलेशन बेसीसवर रिजनल इंम्बॅलन्स आहे आणि हा काढण्यासाठी राज्यशासनाची भूमिका आहे की, सर्वसाधारणतः जी शासकीय महाविद्यालये यवतमाळ, धुळे, अमरावती, नांदेड याठिकाणी आहेत याची संख्या ५० आहे. ही एमसीआय कडून वाढवून घेण्याचे आमचे प्रयत्न राहणार आहेत. ही संख्या जर वाढवून मिळाली तर हा रिजनल इंम्बॅलन्स निघणार आहे. दुसरी गोष्ट अशी की, **हे सगळे करीत असताना मी शासनाच्या वतीने शब्द देतो की, दीड ते दोन महिन्यामध्ये पॉप्युलेशनच्या बेसीसवर समन्यायी वाटपाच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येईल.** परंतु हे सगळे करीत असतांना मागच्या शासनाने जे केले ते या शासनाला करायचे नाही.....

**(अनेक मा. सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलत असतात)**

**सभापती :** माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

**श्री.पी.जी.दस्तुरकर :** हा विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न आहे. यावर्षी विदर्भातील आणि मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकला नाही म्हणून प्रश्न निर्माण झालेला आहे. पुढच्या वर्षीच्या प्रवेशावर परिणाम होवू नये म्हणून माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबतची मुदत सांगावी. निदान दोन महिन्यात ते करण्यात येईल का?

**श्री.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, मी या ठिकाणी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, तळेगाव दाभाडे येथे अमरावतीच्या विद्यार्थ्यांना जागा ठेवल्या होत्या. त्या जागा भरण्यात आल्या आणि लक्षवेधी सूचनेमध्ये मेरिटचा प्रश्न उपस्थित केला आहे. अमरावतीच्या ९३ टक्के मार्क्स असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही. म्हणून मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देवू इच्छितो की, ज्या नॉन पेईंग जागा आहेत त्या सगळ्या भरल्या गेल्या आहेत. स्टेट मेरिट आणि रिजनल मेरिट पाहिले तर अमरावतीच्या विद्यार्थ्यांची परिस्थिती पाहिली तर २९० हे स्टेट मेरिट आहे आणि २८१ हे रिजनल मेरिटचे आहेत. याच्यापेक्षा हायर मेरिटचे इतर विद्यापीठांमध्ये आहेत. म्हणजे आज जर मेरिटवाईज विचार केला तर कुठल्याही प्रकारचा कुठल्याही विद्यापीठावर अन्याय झालेला नाही हे सकृतदर्शनी स्टेटमेंटवरून दिसत आहे. तथापि **पाप्युलेशन बेसीसवर हा रिजनल इंम्ब्यॅलन्स काढण्याच्या दृष्टिकोनातून शासन दोन महिन्यामध्ये योजना तयार करून नागपूर खंडपीठाकडे सादर करील आणि त्यांच्याकडून जे आदेश येतील त्यानुसार पुढच्या वर्षापासून अंमलबजावणी करण्यात येईल.**

**सभापती :** माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख, तुमचे समाधान झाले आहे का?

**श्री.बी.टी.देशमुख :** "लोकसंख्येच्या आधारावर दोन महिन्यात सादर करतो" असे माननीय मंत्रिमहोदयांनी म्हटले आहे, हे समाधानकारक आहे.

******

## विद्यापीठनिहाय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन १९९५*
*मंगळवार, दिनांक ५ डिसेंबर १९९५*

(१५) ४५१३ **सर्वश्री. जयवंत ठाकरे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, बबन चौधरी, ज.य.टेकावडे, विजय पाटील, रमेश गुप्ता, अजहर हुसेन :** तारांकित प्रश्न क्रमांक १३४५ ला दिनांक १०.७.९५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) लोकसंख्येच्या प्रमाणात महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील एकूण प्रवेश जागा एकत्रित करून त्याचे समन्यायी वाटप करण्याबाबतच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;

(२) झालेला असल्यास, शासनाने केलेल्या उपाययोजनेचे स्वरूप काय;

(३) अशी उपाययोजना केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दौलतराव आहेर :** होय.

(२) (अ) लोकसंख्येच्या प्रमाणात विद्यापीठनिहाय कमी/अधिक असलेल्या जागांचा विचार करून समन्यायी वाटपास उपलब्ध असलेल्या जास्त जागा कमी जागा असलेल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी, सविस्तर माहितीचे विवरणपत्र सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश जागांसाठीचे तयार करून मा. उच्च न्यायालयास सादर केले जाईल व मा. उच्च न्यायालयाचे त्यावर आदेश घेवून समन्यायी वाटप ९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून केले जाईल.

(ब) लोकसंख्येच्या प्रमाणात कमी उपलब्ध असलेल्या ह्या प्रवेश जागा, त्या विद्यापीठातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सध्याची प्रवेश क्षमता (संख्या) वाढविण्याबाबतचा प्रस्ताव केंद्रीय आयुर्विज्ञान परिषदेकडे पाठविण्यात येत आहे. त्यास मान्यता मिळविण्यासाठी पाठपुरावा करून कायमस्वरूपी समन्यायी वाटप करण्याचा प्रयत्न केला जाईल. तूर्त उपरोक्त (अ) प्रस्तावाप्रमाणे सन ९६-९७ सालामध्ये समन्यायी वाटप केले जाईल.

(३) विलंबाचा प्रश्न नाही.

******


*बोके प्रिंटर्स गांधी नगर, अमरावती.*
*बोके ऑफसेट गांधी नगर, अमरावती.*
*बोके झेरॉक्स व ईलेक्ट्रॉनिक टाईपिंग,*
*रेल्वे स्टेशन चौक, अमरावती.*

'नुटा' बुलेटीनला हार्दिक शुभेच्छा ...
**बीड जिल्हा अशासकीय मा. शा. कर्मचारी सह. पतसंस्था (म.) बीड दत्त नगर, नवगण कॉलेज रोड, बीड. ४३११२२ फोन नं. ३०२७३.**
सभासद संख्या ३०४ स्थापना ३०.८.८९ कार्यक्षेत्र बीड जिल्हा भागभांडवल २३ लाख बँक कॅश क्रेडिट ३७ लाख वार्षिक उलाढाल ७० लाख सभासद कर्ज मर्यादा ६० हजार चालू नफा ३- लाख संस्थेची ठळक वैशिष्टये १) दोन वर्षात स्वतःची इमारत बांधण्याचा संकल्प २) ३ लाख इमारत फंड जमा ३) मयत सभासदाच्या पाल्यांना मदत, एच.एस.सी. व एस.एस.सी. वर्गात . ४) गरीब व मागासलेल्या विद्यार्थ्यांना गणवेश आदी उपक्रम राबवले जातात.
द.ना.घुमरे अध्यक्ष, इं. ना. जाधव उपाध्यक्ष, एन. ए. भोसले सचिव ,डी.आर.भोळे ,जे.एस.काळे ए.यु.भोसले, आर.पी. कानडे, जी. टी. भोरे, ए.टी. जाधव, पी. एस.पवळ, डी.बी.घोडपे यू.एस. बांगर, जी. एस. पठाण, व्ही.टी. अन्नलदास, सौ. जी.बी. चव्हाण, जी. डी.वाघ, ए.ए.पुजदेकर, एस.आर. सोळंके, बी. आर. खूळे, सौ. पी.डी. महामुने.

# वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : तिसरे अधिवेशन १९९५ : शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर १९९५.*

**श्री.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : अध्यक्ष महाराज, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"राज्यातील एकूण वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याच्या दृष्टीने "रुल्स आणि रेग्युलेशन तयार करण्याच्या दृष्टिकोनातून तीन लोकांची समिती गठीत करणार आहोत, हे नियम मे महिन्यापर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या ॲकेडेमिक वर्षापासून ते अमलात येतील" असे मा. वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सभागृहात सांगूनही त्याकामी शासनाला आलेले अपयश, त्यामुळे १९९५-९६ या वर्षामध्ये अमरावती विभागातील विद्यार्थ्यांवर समन्यायी वाटपापासून वंचित रहाण्याची पाळी येणे, तसेच "पॉप्युलेशन बेसीसवर हा रिजनल इम्बॅलन्स काढण्याच्या दृष्टीकोनातून शासन दोन महिन्यामध्ये योजना तयार करून नागपूर खंडपीठाकडे सादर करील व त्यांच्याकडून जे आदेश येतील त्यानुसार पुढच्या वर्षापासून अम्मलबजावणी करण्यात येईल" असे दिनांक ९ ऑगस्ट १९९५ रोजी सभागृहात सांगितल्यानंतरसुद्धा अशी योजना खंडपीठाकडे सादर करण्याबाबत यथोचित कारवाई न होणे परिणामी विद्यार्थी व जनमानसामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई"

**श्री. सुरेश नवले (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री)** : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

### निवेदन

राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश नियम तयार करण्याकरिता दि. १९.५.९५ रोजी एक पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सन १९९५-९६ चे प्रवेश नियम तयार केले. सदर समितीने समन्यायी वाटपाच्या संदर्भातही विचारविनिमय केला. प्रवेश प्रक्रिया सुरू असतांना मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे शासनाने प्रवेश जागांचे समन्यायी वाटपाचे विविध पर्याय सादर केले. त्यावेळी मा. उच्च न्यायालयाने अमरावती विद्यापीठातील विद्यार्थ्यांना तळेगांव दाभाडे येथील वैद्यकीय महाविद्यालयातील ५० टक्के जागा १९९५-९६ या वर्षात देण्यात याव्यात असे सुचविले. समन्यायी वाटपाचे तत्त्व शासनाने मान्य केलेले असल्यामुळे याचिका दि. १३.७.९५ रोजी न्यायालयाने निकाली काढली. त्या निर्णयासंदर्भात नागरिक समिती मलकापूर व इतर यांनी एस.एल.पी.क्र. १७८१० व १७८११/९५ दाखल केलेली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. दरम्यान "शासनाने विद्यापीठ क्षेत्रातील लोकसंख्या हा घटक समन्यायी वाटपासाठी निश्चित केला व त्यानुसार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विविध चिकित्सा पद्धतीच्या अभ्यासक्रमामध्येही याच निकषावर विद्यापीठनिहाय जागांचे समन्यायी वाटप करावे यासाठी एकूण प्रवेश जागा व लोकसंख्या विचारात घेऊन विद्यापीठनिहाय जागांचा असमतोल काढला आहे. सदरची विवरणपत्रे आता मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करण्यात येतील व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठनिहाय प्रवेश जागांचे समन्यायी वाटप सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येईल याबाबत शासनाची भूमिका कायम आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात हे जे निवेदन वितरीत करण्यात आलेले आहे आणि १९९५-९६ हे शैक्षणिक वर्ष सुरू होऊन गेलेले आहे परंतु १९९६-९७ वर्षाच्या बाबतीत निवेदनामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे. या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "शासनाने विद्यापीठ क्षेत्रातील लोकसंख्या हा घटक समन्यायी वाटपासाठी निश्चित केला व त्यानुसार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विविध चिकित्सा पद्धतीच्या अभ्यासक्रमामध्येही याच निकषावर विद्यापीठनिहाय जागांचे समन्यायी वाटप करावे यासाठी एकूण प्रवेश जागा व लोकसंख्या विचारात घेऊन विद्यापीठ निहाय जागांचा असमतोल काढला आहे. सदरची विवरणपत्रे आता सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करण्यात येतील व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यापीठनिहाय प्रवेश जागांचे समन्यायी वाटप सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येईल याबाबत शासनाची भूमिका कायम आहे" ही अत्यंत योग्य अशी गोष्ट आहे. याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, आमच्या भागातील या विद्यार्थ्यांचे एक वर्ष निघून गेलेले आहे. त्यामुळे या मुलांचे नुकसान झालेले आहे. अध्यक्ष महाराज, ९ ऑगस्ट १९९५ रोजी या सभागृहामध्ये असे सांगण्यात आले होते की, "पॉप्युलेशनच्या बेसीसवर हा रिजनल इम्बॅलन्स काढण्याच्या दृष्टिकोनातून शासन दोन महिन्यामध्ये योजना तयार करून नागपूर खंडपीठाकडे सादर करील व त्यांच्याकडून जे आदेश येतील त्यानुसार पुढच्या वर्षापासून अंमलबजावणी करण्यात येईल." परंतु नागपूर खंडपीठाकडे अजूनही ही योजना सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे आमच्या मनामध्ये अशी भीती निर्माण झालेली आहे की, हे काही खरे नाही. तत्त्वतः आपण ही गोष्ट स्विकारलेली आहे, परंतु मागच्या वर्षी सुद्धा या विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. "दोन महिन्यात योजना सादर करतो" असे ९ ऑगस्ट १९९५ ला आपण सभागृहात सांगितले होते परंतु अजूनही ही योजना सादर करण्यात आलेली नाही. या भूमिकेबद्दल शासन ठाम आहे ही चांगली गोष्ट आहे परंतु येत्या पंधरा दिवसामध्ये नागपूर खंडपीठाकडे योजना सादर करण्यात येईल काय?

**डॉ. दौलतराव आहेर** : अध्यक्ष महाराज, हा प्रश्न वारंवार सदनामध्ये येतो आहे आणि सगळ्यांच्याच दृष्टीने हा विषय महत्त्वाचा आहे म्हणून मी या संदर्भात आपणास विनंती करतो की, याबाबतचे सविस्तर निवेदन मला करावयाचे आहे, जेणेकरून सगळ्यांचे त्याद्वारा समाधान होईल. आणि या प्रश्नावर कायम स्वरूपी पडदा पडला पाहिजे. अध्यक्ष महाराज, ९ सप्टेंबरला मी या सदनाला सांगितले होते की, नागपूरच्या खंडपीठापुढे या समन्यायी वाटपासाठी तोडगा काढण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. पण अद्याप पर्यंत ते न होण्याचे कारण असे की, मधल्या काळामध्ये सर्वोच्च न्यायालयामध्ये मलकापूरच्या नागरिक कमिटीने १३.७.९५ रोजी नागपूरच्या खंडपीठापुढे जे आपण दिले होते जी चिंता आपण व्यक्त केली होती तीच चिंता व्यक्त करणारा रिट अर्ज दाखल केला होता. त्या संदर्भात म्हणूनच आमच्या वकिलाचे जे पत्र आम्हाला आले आहे तेच मी येथे आपल्या माहितीसाठी वाचून दाखवू इच्छितो. त्यात त्याने म्हटले आहे की-

The aforesaid matter was listed for hearing before Court No. 7 as item No. 56 on 6.11.95 when I appeared in the matter on behalf of the State. The matter was argued at length and the Court has kept it for final disposal after six weeks directing us to file a detailed counter affidavit specifically mentioning the steps to be taken for equitable distribution of the seats in view of the Supreme Court Judgement. It is therefore, requested to direct the concerned officer to prepare an affidavit and send it to this office or in the alternative send a responsible officer to New Delhi to enable us to prepare an affidavit."

म्हणून अध्यक्ष महाराज, सर्वोच्च न्यायालयामध्ये देखील आज हे मॅटर आहे आणि सुट्या संपल्यानंतर ताबडतोब ते पुढे येणार आहे. तेव्हा सुप्रीम कोर्टामध्ये देखील लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटपाचे तत्त्व जे आपण मान्य केलेले आहे त्याबाबत ॲफीडेव्हीट करता येईल आणि नागपूर खंडपीठासमोर देखील १५ दिवसात हे न्याय्य वाटप करण्यासंबंधीचा मुद्दा सादर करण्यात येईल इतकेच मी या प्रसंगी आपल्याला सांगू इच्छितो.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, माननीय आरोग्य मंत्र्यांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे. पण ते लोकही सुप्रीम कोर्टामध्ये का गेले? तर तुम्ही जे या सभागृहामध्ये करतो असे म्हटले होते ते केले नाही म्हणून. आता आपण १५ दिवसात ही बाब हायकोर्टात आणि सुप्रीम कोर्टात दाखल करतो असे म्हटले आहे, तेव्हा त्याचा प्रश्न नाही. पण आपण जेव्हा समन्यायी वाटप करतो त्यावेळी ज्या भागामध्ये कमी सीटस् आहेत तेथे नवीन जागा निर्माण करणे किंवा एका भागातील सीटस् काढून घेऊन त्या कमी असतील तेथे देणे असे प्रकार करावे लागतात. परंतु आज यवतमाळला केवळ ५० जागा आहेत आणि त्या वाढवून देवू असे आपण मागे सभागृहात सांगितले शिवाय अकोला येथेही १०० जागांचे कॉलेज काढण्याविषयीसुद्धा


**ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था, संचालीत**
**साळुंकाबाई राऊत महाविद्यालय,**
*वनोजा ता. मंगरुळपीर जिल्हा अकोला. हार्दिक शुभेच्छा*
*वरीष्ठ महाविद्यालय कला वाणिज्य, कनिष्ठ महाविद्यालय कला वाणिज्य, किमान कौशल्य आधारीत अभ्यासक्रम मुलांचे वसतीगृह, मुलींचे वसतीगृह परिसाराला अवश्य भेट द्यावी.*
**रमेश राऊत** सचिव, **डॉ. मा. सो. राऊत** अध्यक्ष
**रामदास राऊत** कोषाध्यक्ष, **ज्ञानदेव राऊत** उपाध्यक्ष,
**रामकृष्ण राऊत** पो.पा. **राजेंद्र राऊत** मा.सरपंच

**श्री. कोंडेश्वर सहकारी साखर कारखाना मर्यादीत**
*रामनगर, पुबगांव तालुका नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती.*
उस उत्पादकासांठी सुवर्ण संधी आमच्या साखर कारखाना कार्यक्षेत्रातली उस उत्पादकांनी सन ९६-९७ चे लागवड हंगामात उस लागवड केल्यास खालील प्रमाणे प्रोत्साहनपर योजना जाहीर करण्यात आलेल्या आहेत. १) पूर्व हंगामी उस लागवडीसाठी (सप्टेंबर ९६ ते नोव्हे. ९६) रु. २००/- प्रती मेटन शासन दरापेक्षा जास्त इन्सेंटीव्ह म्हणून जादा रक्कम दिली आहे. रु. ७००/- प्रति मेटन उसास दर दिला जाईल. २) सुरु उस लागवडीसाठी (डिसें.९६ ते फेब्रु. ९७) रु. १००/- प्रति मेटन शासन दरापेक्षा जास्त इन्सेटिव्ह म्हणून जादा रक्कम दिली आहे. रु. ६००/- प्रति मेटन उसास दर दिला जाईल. वरील प्रमाणे सवलती देऊन उस क्षेत्रात चाचणी गळीत हंगामात किमान ३.०० लाख मे. टन उस गाळा करण्याचा मानस आहे. तरी शेतक-यांनी हया योजनेचा फायदा घ्यावा व उस लागवड करुन समृध्दीचा मार्ग उघडावा.
**कार्यकारी संचालक, चेअरमन तसेच संचालक मंडळातील सर्व सदस्य.**

आपण मागील वेळेस सदनामध्ये सांगितले होते तर त्याबद्दल आपला काही निर्णय झालेला आहे काय किंवा होणार आहे काय?

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, समन्यायी वाटपाचा हा प्रश्न खरोखरी किचकट असा प्रश्न आहे. एकाचे काढायचे आणि दुसऱ्याला द्यायचे यातून भांडणे लावण्यासारखे होते. म्हणूनच मी आपल्याला सांगू इच्छितो की, ३०.११.१९९५ रोजी महाराष्ट्र शासनाने मेडिकल कौन्सील ऑफ इंडियाकडे एक पत्र दिलेले आहे आणि त्यात आपण ६ महाविद्यालयांच्या मेडिकलच्या जागा वाढवून मिळाव्यात अशी विनंती केलेली आहे. ती सहा महाविद्यालये आणि त्यांच्याकडील वाढवून मागितलेल्या जागा अशा आहेत.

१. गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, औरंगाबाद - १०० सिटस् वरून १५० सीटस् कराव्यात

२. एसआरटीआर मेडिकल कॉलेज, अंबेजोगाई - ५० वरून वरून १०० सीटस् कराव्यात

३. गवर्नमेंट मेडिकल कॉलेज, नांदेड - ५० वरून वरून १०० सीटस् कराव्यात

४. भाऊसाहेब हिरे मेडिकल कॉलेज - ५० वरून वरून १०० सीटस् कराव्यात

५. वसंतराव नाईक गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज, - ५० वरून वरून १०० सीटस् कराव्यात

६. इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज, नागपूर - ६० वरून वरून १०० सीटस् कराव्यात

तर अध्यक्ष महाराज, यातील बॅकलॉग पहिल्यास जास्तीत जास्त बॅकलॉग हा अमरावती विद्यापीठाचा आहे म्हणून इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज नागपूर येथे ज्या ४० जागा वाढवून मागितल्या आहेत त्या अमरावतीसाठी ठेवल्या तर त्यांच्यावरील अन्याय दूर होण्यासारखा आहे. असे मला वाटते आणि दुसरे म्हणजे मराठवाड्यामध्ये, उत्तर महाराष्ट्र आणि अमरावती विद्यापीठ आहे त्यांना मेडिकल कौन्सिलने परवानगी दिली तर हा समन्यायी वाटपाचा प्रश्न कायम स्वरूपी सुटू शकेल असा माझा दावा आहे.

**श्री. अजहर हुसेन :** सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय ने अभी जो कहा है, उससे एक शंका निर्माण होती है. उन्होने खुद कहा है की अगर यह प्रस्ताव आई.एम.सी ने मान्य नही किया तो फीर यह प्रश्न दोबारा निर्माण होगा. इसलिए आई.एम.सी इस प्रस्ताव को मान्य करे. इसके लिए महाराष्ट्र शासन को प्रयास करना पडेगा. अगर आई. एम. सी ने आपका प्रस्ताव मान्य नहीं किया तो यह वाटप आप नही कर पाएंगे तो फिर इस दृष्टी से आप क्या उपाय-योजना करने वाले है?

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, यामध्ये दोन्ही प्रकारचे ऑप्शन आपण ठेवले आहेत. सर्वोच्च न्यायालयाकडे देखील समन्यायी वाटपाचा प्रस्ताव आपण केलेला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे जो गुंतागुंतीचा प्रश्न म्हणून पुढे निर्माण होणार आहे तो येऊ नये म्हणून आपण मेडिकल कौन्सील ऑफ इंडियाकडे विनंती केली आहे. आणि त्याचे परस्युएशन जाणीवपूर्वक करण्यात येईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, थोडेसे स्पष्ट व्हावे म्हणून मी प्रश्न विचारू इच्छितो की, या सीट जेव्हा वाढतील तेंव्हा वाढतील परंतु असलेल्या सीटचे समन्यायी वाटपाचे प्रतिज्ञापत्र १५ दिवसात मा. उच्च न्यायालयासमोर आपण १५ दिवसात दाखल करणार ना?

**डॉ. दौलतराव आहेर :** ते करणार आहोत. आणि त्यानंतर ९६-९७ पासून त्यांना न्याय देण्यात येईल.

**श्री. व्यंकाप्पा पतकी :** सभापती महोदय, या ठिकाणी शासनाने रूल्स आणि रेग्युलेशन तयार करण्यासाठी तीन लोकांची समिती गठीत केली आहे व त्यांनी प्रवेश नियम तयार केले आहेत. हे प्रवेश नियम डावलून काही महाविद्यालयांनी अशा प्रकारे प्रवेश दिले आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे. तेव्हा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये आणि त्यांना परीक्षेला बसायला मिळेल यासाठी आपण वेगळा विचार करणार काय?

**डॉ. दौलतराव आहेर :** सभापती महोदय, माननीय सदस्यांकडे तशी माहिती असेल तर त्यांनी जरूर द्यावी. त्यावर जरूर कारवाई करण्यात येईल. परंतु माझ्या माहितीप्रमाणे असे कुठे घडलेले नाही.

******

# विद्यापीठनिहाय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील जागांचे समन्यायी वाटप

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन १९९६*
*गुरुवार, दिनांक २१ मार्च १९९६*

(८) ७६०८ **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील, अजहर हूसेन :** तारांकित प्रश्न क्रमांक ४५१३ ला दिनांक ५ डिसेंबर १९९५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) लोकसंख्येच्या प्रमाणात महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील एकूण प्रवेश जागा एकत्रित करून त्याचे समन्यायी वाटप करण्याबाबतच्या सविस्तर माहितीचे विवरणपत्र मा. उच्च न्यायालयास सादर करण्याची कारवाई पूर्ण झालेली आहे काय;

(२) असल्यास, शासनाने उक्त विवरणपत्र केव्हा दाखल केलेले आहे;

(३) अद्यापि, विवरणपत्र दाखल केले नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय?

**डॉ. दौलतराव आहेर :** (१), (२) व (३) याबाबतची सद्यःस्थिती अशी आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक १७८१० व १७८११/९५ च्या अनुषंगाने अशाप्रकारे माहितीचे विवरणपत्र दिनांक ४ जानेवारी १९९६ रोजी सर्वोच्च न्यायालयामध्ये सादर करण्यात आलेले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, या प्रश्नाच्या अनुषंगाने मला आपले संरक्षण मिळावयाला पाहिजे. सर्वोच्च न्यायालयामध्ये शासनाकडून जे ॲफीडेव्हीट दाखल केले गेले आहे त्याच्या अंमलबजावणीचा हा प्रश्न आहे. सुप्रिम कोर्टामध्ये यांनी ॲफीडेव्हीट दाखल केले आहे की, लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटप केले जाईल. अध्यक्ष महाराज गेली दोन वर्षे आमच्या भागातील या विद्यार्थ्यांची वाया गेलेली आहेत. जेंव्हा हे ॲफीडेव्हीट दाखल केले त्याच वेळेस शासनाने या संबंधीचे शासन आदेश निर्गमित केले नाही तर त्या प्रतिज्ञा पत्राचा काहीही उपयोग होत नाही. आपण सभागृहामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे पंधरा दिवसामध्ये किंवा त्याच्या एक दोन दिवस मागे पुढे लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटप करण्याचे जे प्रतिज्ञापत्र दाखल केले त्यानुसार शासननिर्णय निर्गमित झालेले आहेत काय? नसेल तर केंव्हा करणार आहात?

**सभापती :** ते ७ मे, नंतर होईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, यापूर्वी दोन तीन वेळा सांगितले परंतु त्याप्रमाणे केले नाही. ज्यावेळेस ॲफीडेव्हीट दाखल केले त्या वेळीच शासन निर्णय निर्गमित करावयाला पाहिजे होते. ते का केले नाही?

**श्री. सुरेश नवले :** अध्यक्ष महाराज, सभागृहात दिलेल्या आश्वासनाबाबत शासनाची बांधिलकी आहे.

**सभापती :** मा. सदस्यांचा प्रश्न असा आहे की, ते आपण कां केले नाही?

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, साधारणतः जे प्रवेश दिले जातात त्या प्रवेशाच्या अगोदर एक महिन्याच्या कालावधीमध्ये कोठला प्रवेश कोठे द्यावयाचा आहे यासंबंधीची नियमावली तयार केली जाते. **ही नियमावली तयार करीत असतांना या ठिकाणी जून जुलैमध्ये ॲडमिशन होत आहे त्याच्या अगोदर ही नियमावली तयार करता येईल.** त्याप्रमाणे सुप्रिम कोर्टामध्ये ॲफीडेव्हीट दाखल केलेले आहे त्याप्रमाणे सगळे निर्णय घेण्यात येतील.

**श्री. जवाहरलाल दर्डा :** अध्यक्ष महाराज, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, मा. मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना त्यामध्ये त्याचप्रमाणे आश्वासनाची भाषा आहे.

**सभापती :** म्हणून मी आपल्याला सांगितले की, ही नवी परिस्थिती निवडणूक डिक्लेअर्ड झाल्यामुळे निर्माण झालेली आहे. आजच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत ही बाब फायनल केली जाईल. तोपर्यंत माझे काम एवढेच आहे की, येथे असलेले पक्ष आणि त्याचे पुढारी यांना प्रोटेक्ट करणे. खरा मुद्दा येथपासून आहे की, लेजिस्लेचर्सला हे लागू आहे की नाही? तेव्हा पुढचा जो प्रश्न आहे त्याचा विचार झाल्याशिवाय ते काही सांगू शकत नाही. मी स्वतः याबाबत पत्र लिहिलेले आहे.

**श्री.जवाहरलाल दर्डा :** अशा परिस्थितीमध्ये जोपर्यंत मा. मंत्रिमहोदयांकडून

*श्री. लाल, बाल, पाल शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालीत*
[illegible]
**अमरावती.**

**बबनराव देशमुख** — अध्यक्ष,
**शरदराव जवंजाळ** — सचिव.

*साईबाबा शैक्षणिक व क्रिडा मंडळ मलकापूर द्वारा संचालीत*
*दादासाहेब रमेशसिंह राजपूत शारिरीक शिक्षण महाविद्यालय,*
*मलकापूर जि. बुलढाणा.*

**रमेशसिंह दादा राजपूत** — *अध्यक्ष*
**संजयकुमार देशमुख** — *प्र. प्राचार्य*

**सातपुडा शिक्षण संस्था, जळगांव ( जामोद ) द्वारा संचालीत**
**शरद पवार कृषी विद्यालय, पशु व दुग्ध व्यवस्थापन अभ्यासक्रम, कृषी विज्ञान केंद्र**
**आ. कृष्णराव इंगळे,** *( जलंब मतदार संघ )*

या गोष्टीचा खुलासा होत नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज कसे चालवावयाचे?

**सभापती :** हे कामकाज सल्लागार समितीने ठरवावयाला पाहिजे. मी ठरवू शकत नाही आणि तुम्हीही ठरवू शकत नाही. आज अडीच वाजता बीएसी ची मिटिंग बोलाविलेली आहे आणि त्यावेळेला हे ठरेल. मा. दर्डा यांना लवकर जावयाचे असेल तर त्यांना लवकर सुटी द्या म्हणूनही सांगता येईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** या ठिकाणी दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी झालेली नाही. गेल्या वर्षीच्या मे मध्ये यासंबधीचे रूल्स तयार केले जातील असे सागंण्यात आलेले होते. पण त्यावेळी ते केले नाही. हे करीत असतांना इलेक्शनचे नोटीफीकेशन काल आले. तेव्हा त्याच्या अगोदर शासनाने निर्णय निर्गमित का केले नाही?

**डॉ. दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, मी याचे उत्तर ऑलरेडी दिलेले आहे. गेल्या वेळेस नागपूर खंडपीठामध्ये सुद्धा आपण ॲफीडेव्हीट केलेले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** आपण ॲफीडेव्हीट काय सांगता? ते उच्च न्यायालयाचे ऑर्डरस् आहेत. हायकोर्टाचा त्यावर निर्णय झाला आहे?

**श्री.रामदास आठवले :** अध्यक्ष महाराज, दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. उत्तर असमाधानकारक आहे. सभागृहाची दिशाभूल करण्यात आलेली आहे.

(अनेक मा. सदस्य उभे राहून एकदम बोलतात)

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज या संदर्भात मा. हायकोर्टाची ऑर्डर आहे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

**सभापती :** सर्व सन्माननीय सदस्यांनी प्रथम खाली बसावे. याबाबतीत हायकोर्टाची ऑर्डर असेल तर......

**डॉ. दौलतराव आहेर :** (बसून) अध्यक्ष महाराज, उभे राहून ओरडून काय होणार आहे?

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, "ओरडून काय होणार आहे" असे म्हणणे बरोबर नाही. मग काय यांची आरती काढायची काय? का पूजा करायची?

(एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात)

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य वेल मध्ये येऊन घोषणा देतात)

**सभापती :** माननीय सदस्य जोपर्यंत जागेवर जाऊन बसत नाही तोपर्यंत मी काहीही सांगणार नाही. सन्माननीय सदस्यांनी आपआपल्या जागेवर जाऊन बसावे. माननीय मंत्रिमहोदयांना मी हे सांगू इच्छितो की, या ठिकाणी त्यांनी बसून काहीही बोलू नये. एखाद्या वेळी बसून बोलले तर माननीय सदस्यांवर त्यांनी कॉमेन्टस् करू नयेत. माननीय सदस्यांना जर ओरडावयाचे असेल तर ते ओरडतील तुम्ही कोण त्याना सांगणार? अशा प्रकारे दोन वेळा झालेले आहे. आता आपण मंत्री झाला आहात तेव्हा पार्लमेंटरी पद्धतीने आपण वागले पाहिजे. पार्लमेंटरी पद्धतीने वागत असतांना आपल्याला फार त्रास झाला तर आपण बाहेर जाऊन या. परंतु अशा पद्धतीने बोलणे काही बरोबर नाही. **सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी जोरात प्रश्न मांडले म्हणूनच ते प्रश्न तडीस गेले आहेत.** सन्माननीय सदस्यांनी येथे असा प्रश्न विचारलेला आहे की हाय कोर्टाने निर्णय दिलेला आहे त्याबाबतीत आता काय करणार आहात? हाय कोर्टाच्या आदेशाचे पालन जर झाले नाही तर कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट होईल.

**श्री. अरुण मेहता :** अध्यक्ष महाराज मी आपल्याला अत्यंत नम्रतापूर्वक सांगू उच्छितो की, दोन वर्षे या विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे. आता यापुढे या विद्यार्थ्यांचे नुकसान होता कामा नये. ॲफीडेव्हीट फाईल व्हायला देखील आपली कमिटी सिस्टिम महत्त्वाची ठरली आहे हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

**सभापती :** जुलै महिन्याच्या आत सगळे होईल असे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महाराज, या अगोदर दोन वेळा असे उत्तर दिले होते. त्यावेळी जी उत्तरे देण्यात आली होती त्याची प्रत माझ्याकडे आहे. या अगोदर सभागृहामध्ये असे उत्तर देण्यात आले होते की, "गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्यामध्ये कमिटी नेमली जाईल आणि मे महिन्यात रूल्स तयार होतील आणि पुढच्या वर्षी म्हणजे मागच्या वर्षी पासून ते अमलात आणले जातील." परंतु या संदर्भात हायकोर्टाचा निर्णय सुद्धा झालेला आहे. अगोदरच्या वर्षी पासून मिळाले नाही म्हणून हे सर्व विद्यार्थी सुप्रिम कोर्टात गेले होते. हे सर्व विद्यार्थी त्या ठिकाणी भांडले होते. आम्हाला एक वर्ष अगोदर न्याय का दिला नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा पूर्वी कबूल केल्याप्रमाणे शासनाने अगोदर हे का केले नाही आणि निवडणूकांच्या तारखा तर काल जाहीर झालेल्या आहेत. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी दोन प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत. पूर्वी का केले नाही? आणि हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे केव्हा करण्यात येणार आहे?

**डॉ.दौलतराव आहेर :** अध्यक्ष महाराज, माझा म्हणण्याचा उद्देश असा होता की शांतता पाळून हा प्रश्न सोडविण्याचा आपण प्रयत्न करू. मागच्या वर्षी ५० जागा तळेगांव दाभाडे येथे दिल्या होत्या आणि रिजनल इम्बॅलन्स काही प्रमाणात कमी करण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. काही विद्यार्थ्यांनी सुप्रिम कोर्टात याचिका दाखल केली आहे. या बाबत सरकारने आता ॲफीडेव्हीट दाखल केले आहे. सुप्रिम कोर्टामध्ये ज्या प्रमाणे निकाल लागेल त्या प्रमाणे कारवाई करणार आहोत. **महाराष्ट्र राज्यात पुढील वर्षात नियम करणार आहोत. प्रवेश देण्यापूर्वी याबाबतची कार्यवाही एक महिन्यात करण्यात येईल त्यामुळे हा प्रश्न आता आम्ही निकाली काढीत आहोत.**

**श्री.बी.टी.देशमुख :** मागील वेळी या प्रश्नाला जे उत्तर दिले आहे.....

**सभापती :** गेल्या वर्षी विद्यार्थ्यांचे नुकसान झाले ते पुन्हा होऊ नये असे माननीय सदस्यांचे म्हणणे आहे काय?

**श्री.बी.टी.देशमुख :** लोकसंख्येच्या आधारे समन्यायी वाटप करण्यात येईल असे आश्वासन गेल्या वेळी देण्यात आले होते. त्यावेळी जे सांगितले होते त्याची अंमलबजावणी झालेली नाही. यापूर्वी जे आश्वासन दिले होते, त्याप्रमाणे कारवाई का करण्यात आली नाही?

**सभापती :** शासनाने या बाबतचा विचार करावा.

**श्री.गोपीनाथ मुंडे :** होय, याबाबत विचार करू.

(अनेक सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात)

**श्री. गोपीनाथ मुंडे :** माननीय सभापतींनी निर्देश दिल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. अमरावती, मराठवाडा तसेच काही विभागावर याबाबत अन्याय झाला आहे. याबाबत काही विद्यार्थी न्यायालयात गेले आहेत. आता या बाबतचे ॲफीडेव्हीट देत असतांना सरकारने असे म्हंटले आहे की, या पुढे अशा प्रकारचा अन्याय कोणत्याही विभागावर केला जाणार नाही. माननीय सभापतींनी याबाबत निर्देश दिले आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** सादर केलेल्या ॲफीडिव्हीट मध्ये इतरही अनेक गोष्टी घालण्यात आलेल्या आहेत.....

**सभापती :** याबाबतीची सद्यःस्थिती काय आहे? हिअरिंग स्टेजला ही बाब आहे काय?

**श्री.दौलतराव आहेर :** सुप्रिम कोर्टात ॲफीडिव्हीट दाखल करण्यात आले आहे त्याचे हिअरिंग व्हावयाचे आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** या ठिकाणी एक उत्तर द्यावयाचे आणि ॲफीडिव्हीटमध्ये दुसऱ्याच गोष्टी घालावयाच्या...

**सभापती : यापूर्वी याबाबतची कारवाई का झाली नाही. यामध्ये चर्चा करण्यात काहीच अर्थ नाही. यापुढे तरी या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये.**

**श्री.गोपीनाथ मुंडे : मुलांचे नुकसान होणार नाही. त्याला होय म्हटले आहे आपण जो निर्णय दिला आहे त्याला मी होय म्हटलं आहे.**

**सभापती : मला याबाबत असे वाटते की, सन्माननीय सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन याबाबत तातडीने कारवाई करावी.**

**श्री.गोपीनाथ मुंडे : होय.**

**श्री.बी.टी.देशमुख :** लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटप.....

**सभापती :** माननीय सदस्यांना जे पाहिजे त्याबाबतची कमिटमेंट होणार नाही.

**श्री.गोपीनाथ मुंडे :** आचार संहिता लागू असल्याने उत्तर देणे बरोबर नाही. माननीय सभापतींनी आदेश दिले आहेत. त्याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे.

(अनेक सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात)

**डॉ. दौलतराव आहेर : ही बाब आम्ही निकाली काढणार आहोत. समन्यायी वाटप आम्ही करणार आहोत.**

**सभापती :** आता माननीय मंत्रिमहोदयांनी काहीच बोलू नये.

******


*Best Prices,* *Best Services*

PCL
No 1 IN PCs

With PCL Authorised
ISO 9002 Certified **TECHCARE** Service
From
D. P. Systems
Walcott Compound, Amravati 444 601 (0721) 79154/73887

*सहपत्र आठ : परिच्छेद ७८, ७९ पहा*

## "राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांचे समन्यायी वाटप" या विषयावर सचिवांनी २० फेब्रुवारी १९९६ ला आश्वासन समितीसमोर सादर केलेले निवेदन

**वै.शि.व.औ.द्र.विभाग/शिक्षण-१**

***विषय :- राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांचे समन्यायी वाटप***

सर्वोच्च न्यायालयाने डी. एन.चंचला विरुद्ध म्हैसुर राज्य (१९७१) या प्रकरणांत दिलेल्या निर्णयानुसार वैद्यकीय प्रवेश जागांचे वाटप विद्यापीठनिहाय करण्यांत येते. त्यानुसार अमरावती व नागपूर विद्यापीठ क्षेत्रात भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने मान्यता प्राप्त वैद्यकीय महाविद्यालय नसल्यामुळे, ही दोन्ही विद्यापीठे एकत्र ठेवण्याची व्यवस्था सन १९९३-९४ पर्यंत सुरू ठेवण्यात आली. सन १९९३ मध्ये अमरावती येथील डॉ.पंजाबराव तथा भाऊसाहेब देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती या खाजगी महाविद्यालयास केन्द्रीय परिषदेने मान्यता दिली.

२. सन १९९३-९४ च्या प्रवेशाच्या वेळी नागपूर खंडपीठाकडे दाखल झालेल्या रिट याचिका क्र. २६८५/९३ मध्ये दोन्ही विद्यापीठ क्षेत्रे एकत्र ठेवण्याच्या या व्यवस्थेत आव्हान देण्यांत आले होते. त्यावेळी वर नमूद केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठ निहाय प्रवेश संख्या वाटप केले जाईल असे आश्वासन शासनाने दिले होते व त्यानुसार अमरावती विद्यापीठ नागपूर विद्यापीठापासून वैद्यकीय प्रवेशाच्या प्रयोजनासाठी वेगळे करण्यांत आले. शासनाच्या सदरहू निर्णयास उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात रिट याचिका क्र. १५९४/९४ अन्वये आव्हान देण्यात आले. या याचिकेवर निर्णय न्यायालयाने दिनांक २७.९.१९९४ रोजी दिला.

या निकालात न्यायालयाने अमरावती व नागपूर विद्यापीठ क्षेत्रे वैद्यकीय प्रवेशासाठी वेगळी करण्याचा शासनाचा निर्णय योग्य असल्याचा निर्णय दिला आहे.

३. रिट याचिका क्रमांक १५९४/९४ प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिलेल्या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (एस.एल.पी.क्रमांक २३२७६/९४) दाखल करण्यांत आली. या याचिकेमधील सिव्हील अर्ज क्रमांक ४१५३/९५ बाबत सर्वोच्च न्यायालयाने प्रवेश प्रश्नाबाबतच्या उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार देवून दिनांक २७.३.१९९५ रोजी सदरहू अर्ज उच्च न्यायालयाकडे पुन्हा वर्ग केला. या न्यायालयीन प्रकरणामध्ये शासनाकडून दिनांक २१.६.१९९५ रोजी शपथपत्र दाखल करण्यात आले. या शपथपत्रामध्ये समन्यायी वाटपाबाबत सखोल अभ्यास करून समन्यायी वाटपाचा प्रस्ताव सन १९९६-९७ या प्रवेश वर्षाच्या अगोदर मान्यतेकरिता सादर करण्यांत येईल असे निवेदन करण्यात आले तसेच तात्पुरती तरतूद म्हणून सन १९९५-९६ या वर्षाकरिता अमरावती विद्यापीठ क्षेत्रातील विद्यार्थ्यांना तळेगांव दाभाडे येथे नव्याने सुरू होणाऱ्या विद्यापीठातील ५० जागा देण्याचा प्रस्तावही न्यायालयासमोर ठेवण्यात आला. समन्यायी वाटप तत्वतः शासनाने स्वीकारल्याचे आणि तोपर्यंत केलेली वरील पर्यायी व्यवस्था या बाबी लक्षात घेवून मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सदरहू अर्ज निकाली काढला. परंतु या निर्णया संदर्भात नागरिक समिती, मलकापूर व इतर यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका (एस.एल.बी.) क्रमांक १७८१० व १७८११/९५, दि. ७.८.९५ दाखल केली आहे.

४. सर्वोच्च न्यायालयात वरीलप्रमाणे दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुमती याचिकेच्या संदर्भात, शासनाने शपथपत्र दाखल केलेले असून सदर शपथपत्रान्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या असेही निदर्शनास आणण्यांत आले आहे की, मा. राष्ट्रपती यांनी भारतीय संविधानाअन्वये वैधानिक विकास मंडळाची स्थापना केली असून राज्यातील शैक्षणिक सुविधांची समन्यायी संधी जनतेला उपलब्ध करून देण्याबाबत योग्य त्या शिफारसी करण्यासाठी मा. राज्यपाल यांनी त्या अनुषंगाने दिनांक २९.७.१९९५ रोजी समिती गठीत केली आहे. सदर समितीच्या अद्यापपर्यन्त दिनांक १३ सप्टेंबर १९९५, दिनांक १०.१०.१९९५ व दिनांक ३ जानेवारी १९९६ रोजी बैठका झाल्या असून समितीच्या शिफारशी फेब्रुवारी अखेरपर्यंत अपेक्षित आहेत.

५. वरीलप्रमाणे समन्यायी जागा वाटपासंबधी मा. राज्यपाल यांचेकडून समिती नियुक्त करण्यात आलेली असल्यामुळे व समितीच्या शिफारशी फेब्रुवारी अखेर उपलब्ध होणार असल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने वरील याचिकेच्या संदर्भात सुनावणी फेब्रुवारी अखेर पर्यन्त स्थगित ठेवली आहे.

६. वरील विवेचनावरून असे दिसून येईल की, राज्यातील वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेश जागांचे समन्यायी वाटप करण्याबाबत राज्यपालांनी गठीत केलेल्या समितीच्या शिफारशी व मा. राज्यपाल यांचा निर्णय शासनाला प्राप्त होऊन असा निर्णय सर्वोच्च न्यायालयापुढे सादर झाल्यानंतर व त्याला सर्वोच्च न्यायालयाची मान्यता प्राप्त झाल्यावर राज्य शासनाला समन्यायी वाटपाबाबतच्या अशा निर्णयाची अंमलबजावणी शक्य होईल.

७. दरम्यान राज्यातील विविध विद्यापीठ क्षेत्रांमध्ये सध्या असलेला प्रवेश जागांचा असमतोल विचारात घेऊन राज्य शासनाने खालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश क्षमता वाढविण्याचा प्रस्ताव भारतीय आयुर्विज्ञान परिषदेकडे पाठविलेला आहे.

| महाविद्यालयाचे नांव | सध्याची प्रवेश क्षमता | | नव्याने प्रस्तावित केलेली प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय औरंगाबाद | १०० | वरून | १५० |
| २. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, अंबेजोगाई | ५० | वरून | १०० |
| ३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड | ५० | वरून | १०० |
| ४. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ | ५० | वरून | १०० |
| ५. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धूळे | ५० | वरून | १०० |
| ६. इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर | ६० | वरून | १०० |

वरील प्रस्तावास अद्याप भारतीय आयुर्विज्ञान परिषदेकडून मान्यता प्राप्त झालेली नाही.

*****

**Nagpur University Teachers' Association**
**MEETING NOTICE : 1**

Dated : 10th October, 1996

From :

**Prof. E. H. KATHALE**
Secretary, NUTA
N-162 Reshim Bag, Nagpur 444 009

To,
All the members of the
Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, No. 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati 444604 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you along with the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- E. H. Kathale**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting: 12.00 Noon on Sunday, the 24th November, 1996***

*Sanjay A. Choudhari*

**SOHIT SALES**

**13, Chaudhari Complex,**
Chaudhari Chowk, Amravati.

***Dealers in :*** *Office Furniture, Nilkamal Moulded Furniture, Executive Chair, Vanishing Blinds etc.*

***भारतीय महाविद्यालय, अमरावती.***

* कनिष्ठ वरिष्ठ महाविद्यालय कला वाणिज्य व विज्ञान तसेच * किमान कौशल्यावर आधारीत व्यावसायिक अभ्यासक्रम १) अकांऊंटसी व ऑडीटिंग २) बँकिंग ३) रिवाईंडिंग, रिपेअर्स अँन्ड मेटिनन्स ऑफ इलेक्ट्रीक मोटर्स * सुसज्ज प्रयोगशाळा व ग्रंथालय, सायन्स विभागात भूगर्भशास्त्र व भूगोल शिकविण्याची सोय.* वरिष्ठ महाविद्यालयात कला विभागात व्यावसायिक अभ्यासक्रमांतर्गत 'फंक्शनल इग्लंश' हा विषय शिकविण्याची व्यवस्था.* एन.सी.सी., एन.एस.एस. व इतर शासकीय सवलती.

**जी. एच. शहा,** *प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, अमरावती.*

*सहपत्र सतरा : परिच्छेद ९८ पहा*

## *मंत्री, पाटबंधारे आणि फलोत्पादन विकास*

**महाराष्ट्र शासन**

*मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ : दिनांक १२.८.९६*

*क्र. पीएलएन १४९५/(२८९/९५) निवसं-१.*

**श्री. महादेवराव शिवणकर**

मा. मंत्री (पा)

**विषय :-** अनुशेष निर्मूलनासाठी १५/८५ चे सूत्र अवलंबिण्याबाबत व अमरावती विभागातील पाटबंधारे प्रकल्पांची कामे गतिमान करण्याबाबत

**प्रिय श्री. देशमुख,**

आपल्या दि. २४.४.९५ च्या पत्रात आपण उपस्थित केलेल्या विविध मुद्यांबाबतची सद्यःस्थिती/अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

वार्षिक योजनेतून पाटबंधारे प्रकल्पांना तरतुदी वितरित करतांना प्रगतावस्थेतील व सिंचनक्षम प्रकल्पांना केंद्रीय जल आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्राधान्य द्यावे लागते. बाह्य सहाय्यित प्रकल्पांच्या बाबतीत कर्जसहाय्य देणाऱ्या संस्थेबरोबर झालेल्या करारातील तरतुदीनुसार निधी उपलब्ध करून द्यावा लागतो. पाणी वाटप लवाद निर्णयातील तरतुदीनुसार राज्याच्या वाट्याला आलेल्या अनुज्ञेय पाणीवापराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संबंधित पाटबंधारे प्रकल्पांचा प्राधान्याने विचार करावा लागतो. प्राधान्यक्रमात सिंचन विकासात अनुशेष दूर करण्याच्या मुद्याबरोबरच उपरोक्त अन्य घटकांचा विचार होणेअपरिहार्य आहे. त्यामुळे **आपण आपल्या निवेदनात सुचविल्यानुसार अनुशेष जिल्ह्यांसाठी ८५ टक्के व इतर जिल्ह्यासाठी १५ टक्के याप्रमाणे अर्थसंकल्पात तरतुदी करणे शक्य होत नाही.** सत्यशोधन समितीने आपल्या अहवालात सर्वसाधारण शिफारशीत अशी शिफारस केली आहे. तथापि या शिफारशीचे तंतोतंत पालन करणे वर नमूद केलेल्या कारणामूळे शक्य होत नाही ही बाब वेळोवेळी स्पष्ट करण्यात आली आहे. सत्यशोधन समितीच्या शिफारसींवर विचार करण्यासाठी शासनाने शक्तीप्रदत्त समिती नियुक्त केली होती. या समितीनेही आपल्या अहवालात १५ टक्के ८५ टक्के सूत्र अवलंबणे व्यवहार्य नसल्याचे मत व्यक्त केले आहे.

याशिवाय आपण आपल्या निवेदनात विविध शहर पाणी पुरवठा योजनांशी संलग्न असणाऱ्या पेनटाकळी (चिखली पाणी पुरवठा) चापडोह (यवतमाळ पाणी पुरवठा) चंद्रभागा (अचलपूर पाणी पुरवठा), घोनसर (रिसोड पाणी पुरवठा) इ. प्रकल्पांची तसेच पूर्णा प्रकल्प, अकोला पूर नियंत्रण प्रकल्प इत्यादी प्रकल्पांची कामे गतिमान करण्यासंदर्भात सूचना केल्या आहेत. यापैकी घोणसर व चापडोह हे प्रकल्प पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत नाहीत. अन्य प्रकल्प निधीच्या उपलब्धतेनुसार लवकरात लवकर पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

अमरावती महसूली विभागात पाटबंधारे विभागाची अतिरिक्त तीन मंडळ कार्यालये उघडण्यांत यावीत असेही आपण सुचविले आहे. पाटबंधारे विभागांतर्गत उपलब्ध आस्थापनेचा बांधकाम कार्यक्रमानुसार वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. व आवश्यकतेनुसार फेरफार करण्यात येतात त्यानुसार अलीकडेच एक मंडळ कार्यालय बुलढाणा येथे नव्याने उघडण्यात आले आहे.

आपला,

**(महादेवराव शिवणकर)**

प्रति,
श्री.बी.टी.देशमुख, वि.प.स.
३ सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालयाजवळ अमरावती - ४४४ ६०४.

*सहपत्र चौदा : परिच्छेद ९४ पहा*

*REVISED*

**RAJ BHAVAN, Malabar Hill**
Bombay 400 035, July 20, 1996

To :
1) Shri Ramesh Dhorde,
Special Counsel for Governor of Maharashtra,
High Court Bench at Aurangabad, Aurangabad.

2) The Assistant Government Pleader,
High Court Bench at Aurangabad, Aurangabad

3) The Secretary to Government
Medical Education & Drugs Department,
Mantralaya, Mumbai- 400 032.

4) The Member Secretary,
Marathwada Development, Aurangabad.

Sir,
With regard to the Writ Petition No. 3260 of 1996 filed by Shri Govinddas Mannulal Shroff before the Aurangabad Bench of the Bombay High Court, I am directed to request you to inform the Hon'ble Court as follows:-

(1) The Governor of Maharashtra has agreed to the proposal of the State Government made in compliance of the directives of the Supreme Court, to distribute the seats in M.B.B.S. courses in medical colleges in the State among the students from different University regions in the State in proportion to the population of the respective University regions for the year 1996-97.

(2) The committee of the Chairmen and members of the three Development Boards was set up on June 20, 1995 to go into the issue of equitable arrangements providing adequate facilities for technical education in respect of the areas of the three Development Boards. The Governor has been informed that the draft report of the committee will be ready in the couple of weeks. As soon as he receives the recommendations of the committee with regards to an equitable basis for distribution of seats in medical colleges, the Governor proposes to consult the Development Boards, the Government, the Universities and experts on the subject, before giving appropriate directions, to the State Government.

(3) The Governor considers such consultations after receipt of the committee's report quite necessary in view of the sensitive nature of the subject and he will be able to issue appropriate directions to the Government within a couple of months after receipt of the report.

Sd/-
(Subrat Ratho)
Deputy Secretary to the Governor.

*सहपत्र अकरा : परिच्छेद ७८ व ८३ पहा*

**सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांनी दिनांक १२ जून १९९६ रोजी समितीसमोर सादर केलेले निवेदन**

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग/शिक्षण-१

**विषय :- राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या जागांचे समन्यायी वाटप,**

वैद्यकीय व दंत महाविद्यालयामधून जून-जुलै १९९६ मध्ये होणाऱ्या प्रवेशाची नियमावली लवकरच प्रसिद्ध करण्यात येत असून प्रसिद्ध केल्या नंतर त्या नियमावलीची प्रत पाठविण्यात येईल.

२. विद्यापीठनिहाय जागांचे समन्यायी वाटपाची व्यवस्था करण्याचा उल्लेख नियमावलीत करण्याचे योजिले असून प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

*विद्या प्रसारक मंडळ दारव्हा द्वारा संचालीत*
**मुंगसाजी महाराज शारीरीक शिक्षण महाविद्यालय दारव्हा जि. यवतमाळ.**
**आमचे महाविद्यालयाअतंर्गत खालील प्रमाणे अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे.**
१) बी.पी.एड. ( एक वार्षीय अभ्यासक्रम ) २) बी. पी. ई. ( तीन वर्षीय अभ्यासक्रम )संस्थेचे वैशिष्टये :- १) २० वर्ष जुनी शैक्षणिक संस्था २) संस्थेची स्वताची प्रशस्त इमारत ३) तज्ञ प्राध्यापक वर्ग ४) खेळाकरीता प्रशस्त मैदान ५)उत्कृष्ण निकाल ६) संस्थेमार्फत ,बी.ए.,बी. कॉम.,बी. एस.स्सी., एम.सी.व्ही.सी. अभ्यासक्रम सुरु आहेत.
**बाळासाहेब घुईखेडकर**, अध्यक्ष,
*मुंगसाजी महाराज शारीरीक शिक्षण महाविद्यालय, दारव्हा जि. यवतमाळ.*

*शिवशक्ती शिक्षण संस्था वेणी कोठा जि. यवतमाळ*
**संस्थापक, अध्यक्ष पंजाबराव भोरे** बी. ए. बी. टी. विधीसभा सदस्य,
*दुरध्वनी :- कोठा ( वेणी ) कार्यालय ०७२०१-७१२२ निवास :- ०७२०१-७१२३*
**शिवशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय,बाभुळगांव जि. यवतमाळ**
**प्राचार्य वा. पुं. भोयर** एम. ए. एम. एड. केंद्रीय कार्यालय :- कोठा ( वेणी ) ता. कळंब
**संस्थेचे उपक्रम :-** १) शिवशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगांव २) शिवशक्ती कनिष्ठ महाविद्यालय, कोठा ( कला, विज्ञान ) ३) शिवशक्ती विद्यालय, कोठा ४) शिवशक्ती तांत्रिक विद्यालय, कोठा ५) शिवशक्ती शिवणकला विद्यालय, कोठा ६) शिवशक्ती सेवकाची सह. पतसंस्था,कोठा ७) किमान कौशल्यावर आधारीत व्यवसाय अभ्यासक्रम कोठा. ८) शिवशक्ती कन्या शाळा, कळंब ९) शिवशक्ती मागावर्गीय मुलींचे वसतीगृह, कळंब १०) शिवशक्ती विद्यार्थी सह.ग्राहक भांडार, कळंब ११) शिवशक्ती उच्च प्रायमरी शाळा, कळंब १२) शिवशक्ती ज्ञानपीठ, कळंब १३) शिवशक्ती वाचानालय, वेणी १४) शिवशक्ती वाचानालय, ताभा १५) शिवशक्ती वाचनालय, हूसनापूर १६) शिवशक्ती वाचनालय, नांदेसावंगी १७) मांडवी वाचानालय, कोठा .

*सहपत्र दहा : परिच्छेद ७८, ८३ पहा*

## विभागीय सचिवांची साक्ष : २० फेब्रुवारी १९९६

***(समितीने ६ फेब्रुवारी १९९६ च्या बैठकीमध्ये ठरविल्याप्रमाणे २० फेब्रुवारी १९९६ रोजी वैद्यकीय शिक्षण व औषधी खात्याचे सचिव श्री. के. एस. बरोई यांची समितीसमोर साक्ष झाली. २० फेब्रुवारी १९९६ रोजी झालेली सचिवांची साक्ष समितीच्या १९९६ च्या कार्यवृत्त पुस्तकामध्ये पृष्ठ ७१ ते ८१ नोंदविलेली असून या साक्षीचे प्रतिवेदन खाली नमूद केलेले आहे.)***

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक, मंगळवार दिनांक २० फेब्रुवारी, १९९६ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. या बैठकीत खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

१) श्री. अरुण मेहता, वि.प.स. समिती प्रमुख
२) श्रीमती नीला देसाई, वि.प.स.
३) श्री. अशोक मोडक, वि.प.स.
४) श्री. मुस्ताक अंतुले, वि.प.स.
५) श्री. पी.जी.दस्तुरकर, वि.प.स.
६) श्री शरद वाणी, वि.प.स.
७) श्री. बी.टी.देशमुख, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. चंद्रकांत कांबळे, अवर सचिव

या बैठकीत सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

*वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग*

**श्री.के.एस्. बरोई, सचिव**

*राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांचे समन्यायी वाटप*

***प्रा.बी.टी.देशमुख :*** राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांचे समन्यायी वाटप करण्याच्या संदर्भात मंत्रीमहोदयांनी सभागृहामध्ये वेळोवेळी जी आश्वासने दिलेली आहेत त्यानुसार कारवाई न होता त्याच्या अगदी उलट अशी कारवाई सभागृहाबाहेर होत आहे असे समितीच्या निदर्शनास येत आहे. दि. ६.४.१९९५ ला मंत्रीमहोदयांनी सभागृहामध्ये असे सांगितले, "रूल्स आणि रेग्युलेशन तयार करण्याच्या दृष्टिकोनातून तीन लोकांची समिती गठीत करणार आहोत व हे नियम मे महिन्यापर्यंत तयार होतील आणि त्याला नागपूर हायकोर्टाकडून मान्यता मिळाल्यानंतर १९९५-९६ या ॲकेडेमिक वर्षापासून ते अमलात येतील" दि. ६.४.१९९५ ला मंत्रिमहोदय पुन्हा असे म्हणाले, "समिती गठीत करणार आहोत असे मी सांगितले आहे" त्यानंतर ते पुढे म्हणाले, "पुढच्या वर्षापासून जे समन्यायी वाटप करणार आहोत तेवढेच शासनाच्या हातामध्ये आहे आणि ते आम्ही करणार आहोत". सभागृहामध्ये असे सांगितल्यानंतर २१ जून १९९५ ला हायकोर्टामध्ये नेमके उलट ॲफीडेव्हीट केले गेले. सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करणारे असे ते ॲफीडेव्हीट नाही. आश्वासनांची परिपूर्ती करण्याच्या संदर्भात जर ॲफीडेव्हीट दाखल केले असते तर समितीला आनंद झाला असता परंतु हे ॲफीडेव्हीट सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनाच्या विसंगत आहे. ॲफीडेव्हीटमध्ये असे म्हटलेले आहे की, हे एक्झरसाईज करण्यासाठी वेळ अत्यंत कमी असल्यामुळे आम्हाला कुठलीही शिफारस करणे शक्य होणार नाही. म्हणजे दि. ६.४.१९९५ ला सभागृहामध्ये जे आश्वासन दिले गेले त्याच्या अत्यंत विपरित असे ॲफीडेव्हीट दि. २१ जून १९९५ ला हायकोर्टात दाखल केले. त्यामध्ये असे म्हटलेले आहे... "The Government would be required to comprehensively apply its mind to this issue. The entire process would take some time and in any event would not be complete before admissions to the current academic year."

एका बाजूला एप्रिल मध्ये असे आश्वासन द्यावयाचे की "या ॲकेडेमिक वर्षापासून आम्ही समन्यायी वाटपाची व्यवस्था करतो" आणि दुसऱ्या बाजूला २१ जूनला ॲफीडेव्हीट करायचे हे काही बरोबर वाटत नाही. त्यानंतर मंत्रीमहोदयांनी ९ ऑगस्ट १९९५ ला जे आश्वासन दिलेले आहे तेही आश्वासन विभागाकडे समितीने पाठविलेले आहे. ९ ऑगस्ट १९९५ ला मंत्रिमहोदय असे म्हणाले, "या शासनाची भूमिका अगदी पारदर्शक आहे, स्वच्छ आहे. आम्हाला काही लपवून ठेवायचे नाही. आम्हाला पुढच्या वर्षापासून लोकसंख्येच्या बेसिसवर इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशन करावयाचे आहे. हे सर्व करीत असतांना मी शासनाच्या वतीने शब्द देतो की, दीड-दोन महिन्यामध्ये पॉप्युलेशन बेसिसवर समन्यायी वाटपाच्या दृष्टीने कारवाई करता येईल" ९ ऑगस्ट १९९५ ला मंत्रीमहोदयांनी असेही सांगितले, "पॉप्युलेशन बेसिसवर हा रिजनल इम्बॅलन्स काढण्याच्या दृष्टिकोनातून शासन दोन महिन्यामध्ये योजना तयार करून नागपूर खंडपीठाकडे सादर करील व त्यांच्याकडून जे आदेश येतील त्यानुसार पुढच्या वर्षापासून अंमलबजावणी करण्यात येईल." ह्या आश्वासनाची नोटीस आम्ही दिनांक १९ सप्टेंबर १९९५ ला आपणास दिली. परंतु समितीला अत्यंत खेदपूर्वक नमूद करावेसे वाटते की, आश्वासनाच्या संदर्भात विभागाकडून काहीही कम्प्लायन्स झालेला नाही. त्यानंतर २२ डिसेंबर १९९५ ला हा विषय सभागृहामध्ये पुन्हा उपस्थित झाल्यानंतर मंत्रीमहोदयांनी जे आश्वासन दिलेले होते त्याची देखील नोटीस आपणास दिलेली आहे. दिनांक २२ डिसेंबर १९९५ ला दिलेले आश्वासन मी आपल्या माहितीसाठी वाचून दाखवितो. मंत्रिमहोदय असे म्हणाले, "अध्यक्ष महाराज, सर्वोच्च न्यायालयामध्ये देखील आज हे मॅटर आहे आणि सुट्या संपल्यानंतर ताबडतोब ते पुढे येणार आहे. तेव्हा सुप्रिम कोर्टामध्ये देखील लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटपाचे तत्त्व जे आपण मान्य केलेले आहे त्याबाबत ॲफीडेव्हीट करता येईल आणि नागपूर खंडपीठासमोर देखील १५ दिवसात हे न्याय्य वाटप करण्यासंबंधीचा मसुदा सादर करण्यात येईल इतकेच मी या प्रसंगी आपल्याला सांगू इच्छितो." त्यावर मंत्रीमहोदयांना असा प्रश्न विचारण्यात आला की, "या सीट जेव्हा वाढतील तेव्हा वाढतील परंतु असलेल्या सीटचे समन्यायी वाटपाचे प्रतिज्ञापत्र १५ दिवसात मा. उच्च न्यायालयासमोर आपण दाखल करणार ना?" या प्रश्नाला मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले ते असे, "ते करणार आहोत आणि त्यानंतर ९६-९७ पासून त्यांना न्याय देण्यात येईल." ही सर्व आश्वासने दिल्यानंतर आणि तत्संबंधी आम्ही नोटीस दिल्यानंतर समितीच्या असे लक्षात आले की, सभागृहाबाहेर अगदी उलट कारवाई सुरू झालेली आहे. तेव्हा समन्यायी वाटपाबाबत १५ दिवसात ॲफीडेव्हीट दाखल केलेले आहे काय? यासंबंधीची माहिती आपण समितीला द्यावी.

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** मी आपल्याला नम्रपणे सांगू इच्छितो की, हा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा आहे. शासन जे काही करते त्याला कोर्टात चॅलेंज केले जाते. लिटीगेशन होते, त्यामध्ये बराच वेळ जातो, त्याप्रमाणे पॉलीसीमध्ये ॲड्जस्ट करावे लागते. नागपूर हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाच्या विरुद्ध मलकापूरच्या लोकांनी सुप्रिम कोर्टात याचिका दाखल केलेली आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आश्वासनांच्या कम्प्लायन्सबाबत आपण समितीला माहिती द्यावी. हा विषय समिती अतिशय गंभीरतेने घेत आहे. शासनाचा लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटप करण्याचा निर्णय झालेला नसताना मंत्रीमहोदयांनी सभागृहामध्ये आश्वासन दिले आहे, अशी वस्तुस्थिती आहे काय?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटप करावयाचे हा बेसिक मुद्दा असून त्याबाबतीत शासनाचे दुमत नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** म्हणजे याबाबतीत शासनाचा निर्णय झालेला आहे.

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** प्रोसिजर असे आहे की, डिपार्टमेंटचे प्रपोजल कॅबिनेटपुढे जाऊन जोपर्यंत ते फायनली ॲप्रुव्हड होत नाही तोपर्यंत ते आम्ही फायनली कम्युनिकेट करीत नाही.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटपाचे तत्त्व मान्य करून त्याप्रमाणे ॲफीडेव्हीट दाखल करण्यात येईल असे मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिलेले आहे.

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** ते ॲफीडेव्हीट दि. ६ जानेवारी १९९६ ला सुप्रिम कोर्टात दाखल केलेले आहे व त्याची एक प्रत समितीलाही पाठविलेली

**श्री.मदनलाल मोंगा गव्हरमेंट कॉंट्रॅक्टर**

**द्वारा एम.बी. ट्रेडर्स**

*रेल्वे स्टेशन रोड, अमरावती.*

**हार्दिक शुभेच्छा**

***स्व. बाबासाहेब व-हाडे शिक्षण संस्था,***

*अमरावती*

आहे.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** समितीला दिलेल्या टिप्पणीमध्ये ॲफीडेव्हीट दाखल केल्याचा उल्लेख नाही.

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** ॲफीडेव्हीट सुप्रिम कोर्टात दाखल केलेले आहे.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** समितीला दिलेल्या टिप्पणीतील परिच्छेद क्र. ४ व ५ मध्ये जी माहिती दिलेली आहे त्यावरून ॲफीडेव्हीट फाईल केलेले नाही असा समज होतो.

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटपाबाबत आम्ही जे ॲफीडेव्हीट फाईल करणार होतो ते दि. ६.१.१९९६ ला फाईल केलेले आहे. त्याची एक प्रत मी समितीला सादर करतो.

ॲफीडेव्हीटच्या परिच्छेद क्र. ६ मध्ये असे म्हटलेले आहे की,

6) After going through the statement (Exh.A) it shows that the University of Amravati, Dr. B.A.Marathwada including (S.R.T.Nanded) Shivaji, Kolhapur and North Maharashtra, are deficient respectively by 134, 87, 34, and 53 in regard to required No of seats of M.B.B.S. Course. On the other hand, Mumbai, Poona and Nagpur Universities are surplus in the seats of M.B.B.S. Course. In order to make the seats available on equitable basis to all the University areas, it is necessary to make surplus seats of one University area available to the students of deficient University area. For this purpose, it was proposed that the students from Amravati University area will be eligible for admission to 68 seats in Nagpur University area, 30 seats in Poona University area, and 36 seats in Mumbai University area, 87 students from Dr. B.A.Marathwada, Aurangabad and S.R.T.Nanded, 34 students from Shivaji University, Kolhapur, 53 students from North Maharashtra, Jalgaon will be given admission to Mumbai University area. In this way, the redistribution of seats could be made so that there is equitable distribution of available seats."

Sir, you will see that we have totally committed to whatever assurance was given.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आपल्याला हे माहीत आहे काय की या इक्वीटेबल डिस्ट्रीब्युशन न केल्यामुळे राज्यातील मागासलेल्या भागांना फार मोठा डिसॲडव्हान्टेज झालेला आहे. म्हणजे मराठवाड्याच्या दोन युनिव्हर्सिटीज, अमरावती युनिव्हर्सिटी आणि कोल्हापूरचा काही भाग यामध्ये अनुइक्वल डिस्ट्रीब्युशन झालेले आहे.

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** आपल्या आर्ग्युमेंटचा आधार आणि पाया तोच आहे. परंतु त्याला पुन्हा विरोध होण्याची शक्यता आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आपल्या आर्ग्युमेंटमध्ये ही बाब आपण मान्य केली ही चांगली गोष्ट झाली.

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** याला पुन्हा विरोध व्हायला नको असे आमचे म्हणणे आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** मा. राष्ट्रपतींचे आदेश आणि मा. राज्यपालांचे अधिकार याचा उल्लेख आपण परिच्छेद क्र. ४ मध्ये केलेला आहे. म्हणजे याबाबतीत आपणास विलंब लावावयाचा आहे काय?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** याच बेसिसवर आम्ही हायकोर्टाला विनंती केली की, तुम्ही हा फॉर्म्युला मान्य करा, जेणे करून त्यांची रेकमेन्डेशन आणि आमची शिफारस यामध्ये फरक राहणार नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** राज्यपालांनी जी समिती नेमलेली आहे ती काय शिफारशी करील तो भाग वेगळा. आज प्रश्न असा आहे की, आपण सभागृहात कबूल केल्याप्रमाणे शपथपत्र नागपूर हायकोर्टामध्ये का दाखल केले नाही?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** हायकोर्टाने सांगितले की, शासनाने घेतलेला निर्णय बरोबर आहे. आम्ही त्याच्यामध्ये दखल देणार नाही. परंतु तो निर्णय मलकापूरच्या लोकांना पटला नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** मलकापूरच्या लोकांना तुम्ही अगोदरच्या वर्षापासून जे कबूल केलेले आहे ते दिलेले नाही. समन्यायी जागा वाटपासंबंधी मलकापूरच्या लोकांनी विरोध केला असे तुम्हाला म्हणावयाचे आहे काय?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** मंत्रीमहोदयांनी सदनामध्ये स्पष्ट आश्वासन दिलेले आहे व तुम्ही हायकोर्टामध्येही स्पष्टपणे कबूल केलेले आहे की, लोकसंख्येच्या आधारावर या जागांचे समन्यायी वाटप करणार आहोत. जर मलकापूरच्या लोकांची हरकत नाही तर याची अंमलबजावणी करण्यास काय अडचण आहे? सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेलेले आहे असे आपण टिप्पणीमध्ये सांगितले आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयाने काही स्टे दिलेला नाही. मग याची अंमलबजावणी या सत्रापासून करण्यास काय अडचण आहे?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** सर्वोच्च न्यायालय आमचे म्हणणे मान्य करील अशी आम्हाला आशा आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयात परत हा आमचा स्टँड कोणी चॅलेंज केला तर अडचण निर्माण होईल. आमची अपेक्षा अशी आहे की, वैधानिक विकास मंडळाच्या समितीच्या शिफारशी तोपर्यंत येतील. त्याचा रिपोर्ट आम्ही सर्वोच्च न्यायालयाला देवू. त्यानंतर सर्वोच्च न्यायालय आमची पोझीशन ॲक्सेप्ट करील आणि शिक्कामोर्तब करील. मग त्यानंतर कोणालाही चॅलेंज करता येणार नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** सदनामध्ये मंत्रीमहोदयांनी वारंवार कबूल केलेले आहे. माझे असे म्हणणे आहे की, हायकोर्टाने ऑलरेडी हे ॲक्सेप्ट केलेले आहे आणि सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात अजून काहीच सांगितलेले नाही. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाला नाहीतर, १९९६-९७ या वर्षापासून समन्यायी जागांचे वाटप करण्यास काही अडचण आहे काय?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय ६ महिने झाला नाहीतरी हायकोर्टामध्ये आपण घेतलेली भूमिका आणि हायकोर्टाने त्यावर दिलेला निर्णय याची आपण अंमलबजावणी करणार आहांत अशी समितीची धारणा झालेली आहे हे बरोबर आहे की नाही?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** हायकोर्टाचा निर्णय झालेला आहे. आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अपेक्षा करत आहोत. आम्ही आमचे मत मांडलेले आहे. त्यांचा निर्णय आला तर आम्हाला अंमलबजावणी करणे सोपे जाईल.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** हायकोर्टाचा निर्णय आपल्या बाजूने झालेला आहे. त्यानुसार खरे म्हणजे अंमलबजावणी करावयास पाहिजे होती. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत थांबावयास नको. कारण सर्वोच्च न्यायालयाने काही स्टे दिलेला नाही. त्यामुळे स्टे दिलेला नसतांना याची अंमलबजावणी करण्यास थांबणे याच्यातून शंका निर्माण झालेली आहे. फेब्रुवारी पर्यंत राज्यपालांच्या समितीच्या शिफारशी येणार आहेत असे आपल्याला अपेक्षित आहे. त्या शिफारशी वेगळ्या आल्या आणि सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वेगळा आला तर काही वेगळे झाले असते काय?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** ती लिगल मॅटर आहे. त्याबाबतीत मी काही निश्चित सांगू शकत नाही. वैधानिक विकास मंडळास घटनात्मक अधिकार आहेत.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** १९९४-९५ ला हायकोर्टाच्या निर्णयाप्रमाणे तुम्ही अंमलबजावणी का केली नाही? सर्वोच्च न्यायालयाने काही स्टे दिला नव्हता. असे असतांना मागासलेल्या भागाला न्याय देण्यासाठी तुम्ही एक वर्ष का थांबलात?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** १९९४-९५ ला हे प्रयोजन करणार होतो. परंतु त्यावेळेस ते युनिव्हर्सिटीवाईज करावयाचे होते.....

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** हायकोर्टाने कोणत्या आधारावर निर्णय दिला होता? तुम्ही जी स्कीम सांगितलेली आहे ती बरोबर आहे असेच त्यांनी सांगितले होते ना?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** १९९४-९५ मध्ये असे डिसिजन दिले होते की, अमरावती व नागपूर हे एकाच रिजनमध्ये समजले जावे.

*Vidarbha Youth Welfare Society's*

**DENTAL COLLEGE & HOSPITAL**

**AMRAVATI** post Box : 213 Fax : 0721 - 662166 Phones : 662166,672226

*(Affiliated to Amravati University & Recognised by D.C.I.)*

| | | | |
|---|---|---|---|
| **Prof. RAm Meghe** | **Shri.S.R. Deshmukh** | **Shri. D.K. Deshmukh** | **Prof. B. D. Hiwase** |
| president, | vice-President | Secretary | Member |

**Dr. Ram Thombare,** Dean **Dental College & Hospital**

***प्रा.बी.टी.देशमुख :*** जुने सांगू नका. लेटेस्ट काय आहे ते सांगा. हायकोर्टाने जो निर्णय दिला आहे तो मी वाचून दाखवितो.

"Now in view of the Affidavit of the State, once the State has accepted to employ the principle of equitable distribution in the matter of admissions to the M.B.B.S., and B.D.S. Courses, there really remains nothing in this petition for us to decide".

I will read further.

As the State Government has accepted the principle of equitable distribution as the criteria for admission of students throughout the State and therefore there is no contest any more in the positions. Hence, we propose to dispose of these writ petitions."

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** समितीला हे जाणून घ्यावयाचे आहे की, समन्यायी वाटपाचे तत्त्व तुम्ही स्वीकारलेले आहे ना?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** होय, युनिव्हर्सिटीवाईज डिस्ट्रीब्युशन झाले पाहिजे असे म्हटलेले आहे. त्यासाठी अमरावती व नागपूर या दोन युनिव्हर्सिटीज एकत्रित केलेल्या आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** सभागृहामध्ये जे आश्वासन दिलेले आहे त्याची अंमलबजावणी कशी करणार याबाबत सांगा. हायकोर्टाने निर्णय दिलेला आहे आणि सांगितले आहे की, ही केस डिस्पोज झालेली आहे. आता सर्वोच्च न्यायालयामध्ये तुम्ही शपथपत्र दाखल केलेले आहे. शासन म्हणून आपण हे मान्य केलेले आहे की, लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी जागांचे वाटप करणार आहोत. तेंव्हा या संदर्भात हायकोर्टाचा निर्णय झालेला असल्यामुळे व जोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा याबाबतीत विरोधी निर्णय होत नाही तोपर्यंत दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यास काही हरकत नाही. तेव्हा त्याबाबतचा निर्णय केव्हा घेणार?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** समन्यायी जागा वाटप करण्याचे शासनाचे धोरण आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय पहावा लागेल.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय २ वर्षे झाला नाही म्हणून मुलांना तुम्ही असेच टांगत ठेवणार आहात काय? तेव्हा फेब्रुवारीनंतर जी.आर. केव्हा काढणार याची माहिती द्या.

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** फेब्रुवारी एन्ड पर्यंत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालासाठी थांबणार आहोत. त्यानंतर परत सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करून सांगणार की, आमची ही पॉलीसी क्लिअर आहे आणि त्याप्रमाणे आम्ही पुढे जात आहोत.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** हायकोर्टाने प्रिन्सीपली मान्य केलेले आहे. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाचा जोपर्यंत वेगळा डिसीजन येत नाही तोपर्यंत तुम्हाला दिलेल्या आश्वासनानुसार अंमलबजावणी करण्यास काय हरकत आहे?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** फेब्रुवारी पर्यंत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची वाट पाहणार आहोत.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** निकालाच्या बाबतच्या तीन स्टेजेस आहेत एक म्हणजे सर्वोच्च न्यायालय तुमचे म्हणणे मान्य करील, दुसरे म्हणजे सर्वोच्च न्यायालय तुमचे म्हणणे रिजेक्ट करील, तिसरे म्हणजे सर्वोच्च न्यायालय काहीच सांगणार नाही. तेव्हा जोपर्यंत सर्वोच्च न्यायालय तुमचे म्हणणे रिजेक्ट करत नाही, तोपर्यंत तुम्हाला दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यास काय हरकत आहे?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** मा. राज्यपालांनी गठीत केलेली जी समिती आहे तिचा निर्णय व शिफारसी फेब्रुवारी अखेरपर्यंत येतील अशी अपेक्षा आहे.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** समन्यायी जागांचे वाटप करण्याबाबतचे राज्य शासनाचे जे धोरण आहे ते कोर्टानेही मान्य केलेले आहे. शासनानेही शपथपत्राच्या सहाव्या परिच्छेदामध्ये ते मान्य केलेले आहे. तेंव्हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय या बाजूला किंवा त्या बाजूचा कोणताही येवो. तुम्ही जी.आर. काढा व आश्वासनांची पूर्ती करा.

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** यामध्ये लिगल कॉम्प्लीकेशन्स आहेत. आता वैधानिक विकास मंडळाचा मुद्दाही नवीन आलेला आहे आणि सर्वोच्च न्यायालयाने आमचे म्हणणे ॲक्सेप्ट केले नाहीतर आम्ही काहीच करू शकणार नाही.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** वैधानिक विकास मंडळाचा नवीन मुद्दा आहे असे जे आपण म्हणता त्यामध्ये अंशतःही सत्यता नाही. कारण तुम्ही तुमचा कम्प्लायन्स रिपोर्ट दिलेला आहे. सदनामध्ये २२ डिसेंबर १९९५ ला आश्वासन दिलेले आहे आणि राज्यपालांनी गठीत केलेल्या समितीच्या दोन बैठका त्याच्या अगोदर १३.९.९५ व १०.१०.९५ ला झालेल्या आहेत आणि असे असतांनाही तुम्ही आश्वासन दिलेले आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** मी सचिवांचे लक्ष वेधू इच्छितो की, कोर्टामुळे सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यास काही हरकत नाही. तुम्ही आता काल्पनिक अडचण सांगता की, समन्यायी जागा वाटपाच्या बाबतीत राज्यपाल आपला अधिकार वापरतील. ही काल्पनिक भिती सांगून दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यास दिरंगाई करण्याचा आपल्याला अधिकार आहे काय?

**श्री.के.एस्. बरोई (सचिव) :** मा. राज्यपालांनी गठीत केलेली समिती कोणत्या शिफारशी करते ते सुद्धा विचारात घ्यावे लागेल एवढेच मला सांगावयाचे होते.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** शासनाचे धोरण आणि हायकोर्टाचा निर्णय हे तात्त्विकदृष्ट्या एकमत असलेले असे आहेत. असे असतांना व सुप्रिम कोर्टाचा निकाल केंव्हा लागेल याची माहिती नसतांना सुप्रिम कोर्टाचा निर्णय जणू निगेटिव्ह लागणार आहे असे समजून तुम्ही तुमचेच धोरण अमलांत आणत नाही काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** असे घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** हायकोर्टाचा निर्णय टर्न-डाऊन होईल, राज्यपाल काही वेगळा आदेश काढतील अशा काल्पनिक भीतीपोटी तुम्ही याची अंमलबजावणी थांबविणार आहांत काय?

***(ऑफ दी रेकॉर्ड)***

***प्रा.बी.टी.देशमुख :*** फेब्रुवारी, ९६ अखेर सर्वोच्च न्यायालयामध्ये काहीच निर्णय न झाल्यास मार्चच्या पहिल्या आठवड्यामध्ये शासन निर्णय निर्गमित करून तो दाखल केला जाईल असे सचिव महोदयांनी सांगितले आहे, ही कार्यवाही मार्चच्या ७ तारखेपर्यंत पूर्ण केली जाईल काय?

**Shri Baroi :** Sir, we will try to see that as far as possible, it is implemented. I will tell you one thing. We will have to publish the rules for admissions in 96-97, and we are going to publish those rules by the end of May, 1996.

***(ऑफ दी रेकॉर्ड)***

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** साक्ष घेतल्यानंतर वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव श्री. बरोई यांनी दिलेल्या एकंदरीत माहितीवरून समिती या निष्कर्षाप्रत आलेली आहे की, शासनाने लोकसंख्येच्या आधारावर वैद्यकीय (एम.बी.बी.एस.) जागांच्या वाटपाचे जे समन्यायी धोरण, तत्त्व म्हणून मान्य केलेले आहे आणि ज्याला नागपूर हायकोर्टाने आपल्या निर्णयात पूर्णतः संमती दिलेली आहे, हे लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय लागेपर्यंत वाट पाहण्याची जरुरी नाही.

आणि म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या स्तरावर किंवा नागपूर खंडपीठाच्या स्तरावर सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यास विभागाला कोणतीही अडचण नाही, असे चर्चेमधून निष्पन्न झाले. त्यामुळे समन्यायी वाटप लोकसंख्येच्या आधारावर करणारा शासन निर्णय निर्गमित होण्यास विलंब होण्याचे कोणतेही वाजवी कारण नाही.

म्हणून समिती अशी शिफारस करते की, या संबंधातील शासन निर्णय ६ मार्च, १९९६ पर्यंत निर्गमित करावा.

***(समितीची बैठक सायंकाळी ५ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली)***

***श्री.शिवाजी शिक्षण संस्था कर्मचारी सह. पतसंस्था चिखली म., बुलढाणा जिल्हा.*** *र.नं. ११०*

**संस्थेची वैशिष्टये :-** सहकारी विभागातील सरकारी कर्मचा-यांना आल्प निकडीची कर्ज वाटप करुन सभासदांची आर्थिक गरज भागविने. संस्थेची सभासद संख्या-४३१ सभासद शेअर्स-२७,३८,३७० संस्थेचे सभासद कर्ज-१,०३,२६,४३६ संस्थेचे फंडस-९३२८३४ सहकारी बँक कर्ज - ५६,३५,९४०३४१ संस्थेची गुंतवणूक - ७,५१,६४०.

**संचालक मंडळ : श्री. एस.एस. डोमळे** *अध्यक्ष,* **डब्लु डी. पडघान** *कार्यकारी संचालक* , **ए. ए. बाहेकर** *संचालक* **एम. झेड. पाटील डी.डी.जाधव, के. एम. चेके, आर. यु. शिंगणे, एस.के. चवरे, डी. एम. मेहेर, कु. आर.ओ.जाधव, बी.डी. पाटील** *बँक प्रतिनीधी* **आर. डी. जाधव.** *व्यवस्थापक* **ए. आर. जरुघाले** *लिपीक* **आर.व्ही.टाले**

***नवसंजीवन शिक्षण मंडळातर्फे चालविण्यात येणारी महाविद्यालये, शाळा व वसतीगृहे.***

१) स्व.गोविंदराव पाटील शिक्षण महाविद्यालय, दारव्हा.२) नवजिवन शिक्षण प्रसारक मंडळाचे औषधी निर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम दारव्हा. ३) जिजामाता कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय दारव्हा. ४) जिजामाता किमान कौशल्यावर आधारित व्यावसायीक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय दारव्हा. ५) कला वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब ६) जिजामाता प्राथमिक मराठी शाळा दारव्हा ६) वसंत विमुक्त जाती प्राथमिक आश्रम शाळा हरू. ७) वसंत विमुक्त जाती माध्यमिक आश्रम शाळा हरू. ८) वसंत विमुक्त जाती प्राथमिक आश्रम वसतीगृह हरू. ९) वसंत विमुक्त जाती माध्यमिक आश्रम वसतीगृह हरू.

**मा. डॉ. व्ही.व्ही. मारोडे** *सचिव*

**आ. आमदार माणिकरावजी ठाकरे** *अध्यक्ष*

## विभागीय सचिवांची साक्ष : ६ मार्च १९९६

*(२७ फेब्रुवारी १९९६ च्या बैठकीत समितीने ६ मार्च १९९६ रोजी विभागीय सचिवांना साक्षीसाठी बोलाविण्याचा निर्णय घेतला. दिनांक ६ मार्च १९९६ रोजी सचिवांची झालेली साक्ष समितीच्या १९९६ च्या कार्यवृत्तपुस्तकामध्ये पृष्ठ १०० ते ११५ वर नोंदविलेली असून या साक्षीचे प्रतिवेदन खाली नमूद केलेले आहे.)*

विधानपरिषद आश्वासन समितीची बैठक, बुधवार दिनांक ६ मार्च, १९९६ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. या बैठकीत खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थिती**

१) श्री. अरुण मेहता, वि.प.स. समिती प्रमुख
२) श्री. अशोक मोडक, वि.प.स.
३) श्री. मुस्ताक अंतुले, वि.प.स.
४) श्री. पी.जी.दस्तुरकर, वि.प.स.
५) श्री. शरद वाणी, वि.प.स.
६) श्री. बी.टी.देशमुख, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. चंद्रकांत कांबळे, अवर सचिव

या बैठकीत सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांची साक्ष घेण्यात आली.

*वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग*

**श्री.के.एस्. बरोई, सचिव**

**श्री. अरविंद चौधरी, अवर सचिव**

*राज्यातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागांचे समन्यायी वाटप*

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** मागील बैठकीत सांगितल्याप्रमाणे आपण समन्यायी वाटपाच्या संदर्भात कोणती कार्यवाही केली?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** मागील आठवड्यात शासनाकडे प्रपोझल पाठविलेले आहे. परंतु त्यास शासनाची मान्यता मिळालेली नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** फेब्रुवारी महिन्यात हिअरींग असल्याचे आपण सांगितले होते.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** हिअरींग फेब्रुवारी नंतर ठेवण्यात येईल असे सांगितले होते.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** हिअरींग होऊन निर्णय होवो अथवा न होवो. समन्यायी वाटपाच्या संदर्भात शासनाचे धोरण तयार केले जाईल असेही आपण सांगितलेले होते .

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** सुप्रिम कोर्टाकडे जे ॲफीडेव्हीट केलेले आहे त्याच्या आधारे व समिती पुढे जी साक्ष दिलेली आहे त्यानुसार शासनाकडे आम्ही समन्यायी वाटपाच्या संदर्भात प्रपोजल पाठविलेले आहे. परंतु त्याबाबतीत अजून शासनाचा निर्णय झालेला नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** डिसेंबर पूर्वीच्या अधिवेशनामध्येही यासंदर्भात मुदतबंद आश्वासन देण्यात आलेले होते. जुलैच्या अधिवेशनामध्ये जी आश्वासने दिलेली होती त्याची माहिती विभागाकडे पाठविलेली आहे. सदरहू माहिती आपणास प्राप्त झालेली आहे काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** माहिती प्राप्त झालेली आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** १९ सप्टेंबर १९९५ रोजीची आश्वासनासंबंधीची आम्ही जी नोटीस पाठविलेली आहे ती आपणास मिळालेली आहे काय? असल्यास त्यामधील आश्वासनाचे स्वरूप काय आहे?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** आश्वासन असे आहे, "डॉ.दौलतराव आहेर : अध्यक्ष महाराज, सर्वोच्च न्यायालयामध्ये देखील आज हे मॅटर आहे आणि सुट्या संपल्यानंतर ताबडतोब ते पुढे येणार आहे. तेव्हा सुप्रिम कोर्टामध्ये देखील लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटपाचे तत्त्व जे आपण मान्य केलेले आहे त्याबाबत ॲफीडेव्हीट करता येईल आणि नागपूर खंडपीठासमोर देखील १५ दिवसात हे न्याय्य वाटप करण्यासंबंधीचा मसुदा सादर करण्यात येईल इतकेच मी या प्रसंगी आपल्याला सांगू इच्छितो."

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आपण ॲफीडेव्हीटच्या संदर्भातील आश्वासन वाचून दाखविले. हे डिसेंबर मधील आश्वासन आहे. डिसेंबर पूर्वी म्हणजे जुलैच्या अधिवेशनामध्ये दिलेल्या आश्वासनासंबंधी समिती शाखेने नोटीस दिलेली आहे. याबाबतीत आपण निर्णय घेतलेला नसेल तर तसे रेकॉर्डवर घ्यावे लागेल.

(उत्तर नाही)

***प्रा.बी.टी.देशमुख :*** १९ सप्टेंबरला जुन्या आश्वासनासंबंधी समिती शाखेने जी नोटीस दिलेली आहे ती आपणास मिळाली आहे काय? ते मुदतबंद आणि गंभीर अशा स्वरुपाचे आश्वासन आहे.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटप करावे असा आश्वासनाचा मुद्दा आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** १९ सप्टेबरला ज्या आश्वासनाच्या संदर्भात नोटीस दिलेली होती ते आश्वासन आपणास माहीत आहे काय? नसल्यास त्या आश्वासनाच्या कम्प्लायन्सच्या संदर्भातील आपली असमर्थता आम्ही रेकॉर्डवर घेतो.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** त्याबाबतीत कोर्ट मॅटर झाले ....

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आपण आश्वासनाची पूर्तता केलेली आहे काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** पार्टली केलेली आहे. सुप्रिम कोर्टात ॲफीडेव्हीट सादर केलेले आहे. ऑर्डर निघावयाची आहे.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** सुप्रिम कोर्टाचा निर्णय काहीही होवो. ६ मार्च पर्यंत शासनाचे धोरण जाहीर करून तसा जी.आर. काढू असे मागील साक्षीच्या वेळी आपण सांगितलेले होते. शिवाय शासनाच्या धोरणाला वेगळे असे डायरेक्टीव्हज् जोपर्यंत सुप्रिम कोर्टाकडून मिळत नाहीत तोपर्यंत ते धोरण चालू ठेवावे असेही समितीने आग्रहाने प्रतिपादन केलेले होते. मॅटर फेब्रुवारी अखेरीस हिअरींगला येईल आणि त्यानंतर ५-७ दिवस इम्पलीमेन्टेशनसाठी लागतील असे आपण सांगितलेले होते. त्यामुळे आजची ६ मार्च ही आपल्या साक्षीची तारीख त्यावेळी ठरविण्यात आली. अजून हिअरींग झालेले नाही. समन्यायी वाटपाच्या संदर्भात १९९४-९५ आणि १९९५-९६ मध्ये इम्पलीमेन्टेशन झाले नाही. आणि आता ते १९९६-९७ या वर्षातही होईल की नाही याबद्दल शंका आहे.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** तोपर्यंत होईल असे मला वाटते.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** १९ सप्टेंबरला जे मुद्दे काढून पाठविलेले आहेत त्याबाबतीत आपण अनभिज्ञ आहात असे वाटते. १९ सप्टेबरला जी आश्वासने काढून पाठविलेली आहेत ती आपणाकडे आहेत काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** ती फाईल मी आणलेली नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** ९ ऑगस्ट १९९५ ला मा. मंत्रिमहोदयांनी दिलेले आश्वासन आपल्या माहितीसाठी मी वाचून दाखवितो. मंत्रिमहोदय असे म्हणाले, "या शासनाची भूमिका पारदर्शक आणि स्वच्छ आहे. आम्हाला काहीही लपवून ठेवावयाचे नाही. आम्हाला पुढच्या वर्षापासून लोकसंख्येच्या बेसिसवर इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन करावयाचे आहे. हे सर्व करीत असतांना मी शासनाच्या वतीने शब्द देतो की दीड-दोन महिन्यामध्ये पॉप्युलेशन बेसिसवर समन्यायी वाटपाच्या दृष्टीने कारवाई करण्यात येईल." या आश्वासनाची पूर्तता झाली की नाही ते सांगावे.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** पार्टली झालेली आहे. याबाबतीत सुप्रिम कोर्टात ॲफीडेव्हीट केलेले आहे. गव्हर्नरची कमिटी असल्यामुळे आणि मॅटर सुप्रिम कोर्टात असल्यामुळे शासनाचा जी.आर. निघू शकला नाही.

***श्री. शरद वाणी :*** सुप्रिम कोर्टामध्ये जो इश्यु आहे तो फक्त मलकापूर येथील विद्यार्थ्यांपुरता मर्यादित आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** दीड-दोन महिन्यामध्ये इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन लागू करण्यासंबंधीचे जे आश्वासन होते त्याबाबतीत काहीही कारवाई आपल्या पातळीवर पूर्ण झालेली नाही, असे आम्ही समजतो.


**दि. अमरावती पिपल्स को-ऑपरेटीव्ह बँक लि.**

*जलाराम मार्केट, जवाहर रोड, अमरावती.*

सुमारे ६० वर्षापासून अमरावती शहराच्या सुखदुःखात भागीदार असणारी विदर्भातील प्रगतीशिल बँक

अमरावती मुख्य शाखा, दसरा मैदान रोड या संगणकीय व प्रस्तावित सराफा (संगणकीय) शाखेसह सहा शाखांव्दारे अतितप्तर सेवा.

| एल.एन. जोशी | बंडूभाउ घोम | वसंत साउरकर |
|---|---|---|
| *प्रबंध संचालक* | *उपाध्यक्ष* | *अध्यक्ष* |

**श्री.शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती व्दारा संचालीत,**

**या.द.व. देशमुख, कला वाणिज्य महाविद्यालय**

**तिवसा**

**तर्फे हार्दिक शुभेच्छा**

| प्रा.वा.मो.उपाख्य दादासाहेब काळमेघ | एम.एम. कंकाळे |
|---|---|
| *अध्यक्ष* | प्राचार्य |
| श्री.शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती | |

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** अजून व्हावयाची आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** ९ ऑगस्ट १९९५ ला मा. मंत्रिमहोदयांनी दिलेले आश्वासन असे आहे, "डॉ. दौलतराव आहेर : अध्यक्ष महाराज, शासनाची भूमिका एकदम पारदर्शक आहे स्वच्छ आहे. आम्हाला काहीही लपवून ठेवावयाचे नाही. आम्हाला पुढच्या वर्षापासून लोकसंख्येच्या बेसिसवर इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन करावयाचे आहे. हे सर्व करीत असतांना मी शासनाच्या वतीने शब्द देतो की, दीड-दोन महिन्यामध्ये पॉप्युलेशन बेसिसवर समन्यायी वाटपाच्या दृष्टीने कारवाई करण्यात येईल."

***प्रा.बी.टी.देशमुख :*** या आश्वासनाप्रमाणे कारवाई झाली का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** पार्टली कारवाई झालेली आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आपली पार्टली कारवाई पूर्ण झालेली त्यामुळे मुलांना पुढच्या वर्षापासून इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन मिळेल का? शासन निर्णय निघत नाही तो पर्यंत त्यांना इक्विटेबल डिस्ट्रीब्युशन मिळणार नाही हे आमचे म्हणणे बरोबर आहे का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** होय.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** मग पार्टली कारवाई झाली या म्हणण्यात काही अर्थ आहे का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** सुप्रिम कोर्टामध्ये प्रकरण आहे...

***प्रा.बी.टी.देशमुख :*** ॲफीडेव्हीटच्या सहाव्या परिच्छेदामध्ये जे लिहिलेले आहे ते मी आपल्याला वाचून दाखविलेले आहे. हा प्रश्न लोकसंख्येच्या आधारावर सोडवावा आणि शासनाने त्याबाबत धोरण ठरवून जी.आर. काढावा हे म्हणणे आपण मान्य केलेले आहे. या ठिकाणी एक गोष्ट अतिशय सरळ आहे. ९ ऑगस्टला शासनाने आश्वासन दिले की, दीड दोन महिन्यामध्ये कारवाई पूर्ण करू. समजा की, आपण जर एखादी गोष्ट तयार केली असेल तर कारवाई सुरू आहे असे आपण म्हणू शकता. हे जर बरोबर आहे तर ९ ऑगस्टच्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही असेच म्हणावे लागेल. २२ डिसेंबर ९५ ला शासनाने पुन्हा आश्वासन दिले. त्यामध्ये असे म्हटले होते की, १५ दिवसामध्ये आम्ही मसुदा सादर करू. त्यानंतर हायकोर्टामध्ये ॲफीडेव्हीट झालेले आहे. इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनची भूमिका आपण मान्य केली असल्यामुळे ही बाब निकालात निघाली आहे असे हायकोर्टाचे असेसमेंट आहे. हे खरे आहे का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** युनिव्हर्सिटीच्या बाबतचा मुद्दा होता तो हायकोर्टाने मान्य केला आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** मा. जस्टीस घोडेस्वार यांचे जजमेंट आहे.

You are going three years back. We are talking about the latest judgement of Hon'ble justice Ghodeswar.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** १९९४-९५ मध्ये आपण युनिव्हर्सिटी वाईज डिस्ट्रिब्युशनचा जो निर्णय घेतला होता तो चॅलेंज करण्यात आला होता आणि त्याबाबत हायकोर्टामध्ये केस होती.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनच्या बाबतीत सुप्रिम कोर्टामध्ये कोणी गेले नाही.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनचा येथे युनिव्हर्सिटीवाईज इक्विटेबल डिस्ट्रिब्युशन असा सेन्स आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** मा. जस्टीस घोडेस्वार यांच्या बेंचने निर्णय दिलेला आहे. समन्यायी वाटप करण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे असे ॲफिडेव्हीट आपण दाखल केले आहे का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** होय

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आपणाला या प्रकरणाची बरोबर माहिती नसल्यामुळे अन्याय होऊ नये असे आमचे म्हणणे आहे. हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर समन्यायी वाटप आम्ही करतो असे कबूल केल्यानंतर हायकोर्टाच्या निर्णयाला स्टे वगैरे नसतांना अजूनही शासन निर्णय निर्गमित झालेले नाहीत हे खरे आहे काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** असे म्हणाता येणार नाही. सुप्रिम कोर्टामध्ये ॲफिडेव्हीट केले आहे. त्याचा निर्णय पाहून आम्ही ऑर्डर काढणार आहोत.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** हायकोर्टाच्या निर्णयाला स्टे नसतांना सुद्धा आपण सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाची वाट पहाणार आहात का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** हो. वाट पहावी लागेल.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** जो पर्यंत सुप्रिम कोर्टाचा निर्णय लागत नाही तो पर्यंत ऑर्डर काढायला हरकत नाही असे आपण म्हटले होते.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** सुप्रिम कोर्टाचा निकाल आल्यानंतर ऑर्डरची अंमलबजावणी करणे सोपे होईल. याबाबत शासन निर्णय घेणार आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** काय झाल्यानंतर काय करणे सोपे होईल याबाबतचे आश्वासन आपण द्याल काय? या ठिकाणी तुम्ही शासनाला रिफ्रेझेन्ट करीत आहात.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** Sir, I am the machinery of the Government. I am not the Government.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** सरकार आम्हाला जी आश्वासने देते त्यांची अंमलबजावणी करण्याचे काम आपल्यावर आहे. मग ते का होत नाही?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** जो पर्यंत या बाबतचा गव्हर्नमेंटचा निर्णय होत नाही तो पर्यंत त्याची अंमलबजावणी कशी होणार?

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** आपण ॲफिडेव्हीटमध्ये मान्य करता मग जी.आर.का निघत नाही?

***श्री. अशोक मोडक :*** आता या ठिकाणी सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाची वाट पाहण्याची सबब सांगितली जात आहे. मंत्र्यांनी असे म्हटलेले आहे की, "सुप्रिम कोर्टाचा निर्णय आल्यानंतर आम्ही हे अंमलात आणू"

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय सहा महिने झाला नाहीतर हायकोर्टामध्ये घेतलेली भूमिका आणि त्याचा निर्णय यांची अंमलबजावणी आपण करणार आहात का? समितीची अशी धारणा झालेली आहे की, हे बरोबर आहे की नाही असा प्रश्न विचारला होता. उत्तर आहे की, "हायकोर्टाचा निर्णय झालेला आहे. आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अपेक्षा करीत आहोत." हायकोर्टाचा निर्णय झालेला आहे आणि तेच मत यांनी ॲफिडेव्हीटमध्ये सहाव्या परिच्छेदामध्ये म्हटलेले आहे. या वर्षीच्या मे महिन्यापर्यंत हा निर्णय आला नाही तर आपण त्याची अंमलबजावणी करणार नाही असा त्याचा अर्थ आहे. जून, जुलै किंवा ऑगस्टमध्ये जर सुप्रिम कोर्टाचा निर्णय लागला तर मग पुन्हा येरे माझ्या मागल्या अशीच परिस्थिती चालू राहील. आता या ठिकाणी असा मुद्दा आहे की, तुम्ही ॲफिडेव्हीटमध्ये मान्य करून शासनाची भूमिका मांडलेली आहे. आता मे महिन्यामध्ये निर्णय लागला नाहीतर कोणत्या धोरणाने मेडिकलसाठी ॲडमिशन देण्यात येणार आहेत? सांगितले होते की, हायकोर्टाचा निर्णय फेब्रुवारीच्या अखेरपर्यंत होईल मग लोकसंख्येच्या आधारावर समन्यायी वाटपाबाबतचा जी. आर. एका आठवड्यानंतर आम्ही काढतो. आज ६ तारखेला तो आठवडा पूर्ण झालेला आहे. आपण आता या बाबतीत काय निर्णय घेणार आहात?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** गव्हर्नमेंटची मान्यता मिळाल्यानंतर जी.आर. काढला जाईल. ॲफीडेव्हीटमध्ये असे म्हटलेले आहे की, It is therefore submitted that pending the receipt of Governor of Maharashtra's directives on the subject, it may not be possible for the State Government to chalk out any firm policy in required equitable distribution of seats."

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** या बाबीवर आपली चर्चा झालेली आहे. सभागृहामध्ये सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांशी याचा काही संबंध नाही.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** मी जी साक्ष दिलेली आहे त्याच्याशी याचा संबंध आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** मग पुन्हा तुमच्यावर आरोप चिकटतो की, हे ॲफिडेव्हीट आपण सभागृहामध्ये का सांगितले नाही?

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** यावर मागच्या वेळी चर्चा झालेली आहे. जी गोष्ट आपण ऑगस्ट महिन्यामध्ये केली ती तुम्हाला आश्वासन देताना माहिती नव्हती का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** नाही.

***श्री. पी.जी.दस्तुरकर :*** स्टॅच्युटरि डेव्हलपमेंट बोर्डाची आडकाठी येईल

[illegible]

**75, M.I.G.H. Mehclipalnam**

**Hydrabad 500 028**

*Phone : Res. 3531051 Off. 3530027*

[illegible]

असे उत्तरामध्ये कोठेही नव्हते. हे विनाकारण तुम्ही आणले आहे.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** हे पॉलीसी मॅटर आहे आणि ते सुप्रिम कोर्टाचे देखील मॅटर आहे. ही फॅक्च्यूअल पोझीशन आहे. ती आपल्यासमोर आणली पाहिजे.

***श्री. पी.जी.दस्तुरकर :*** या ठिकाणी नवीन मुद्दा ॲड करणारे तुम्ही कोण?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** ही फॅक्च्यूअल डेव्हलपमेंट आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आमचे म्हणणे असे आहे की, स्टॅच्युटरि बोर्डाच्या बाबत आता आपण जी माहिती देत आहात ती ऑगस्टमध्ये मंत्र्यांना माहिती होती का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** त्या वेळेस ऑगस्टमध्ये मंत्री महोदयांना याची माहिती नव्हती. स्टॅच्युटरि डेव्हलपमेंट बोर्ड समिती नंतर झाली.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** त्यामुळे आपल्यावर जी.आर. काढण्याबाबत काही कायदेशीर बंधन येते काय? दोन गोष्टीमधील फरक आपल्याला न समजल्यामुळे आपण हे उत्तर दिलेले आहे असे आम्हाला वाटते. राज्यपालांनी आदेश इश्यू करणे आणि आदेश करणे, करण्याचा विचार चालू असणे यामध्ये फरक आहे. मा. राज्यपालांनी ऑर्डर इश्यू केल्या आहेत की, करण्याचा त्यांचा विचार चालू आहे?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** यासाठी कमिटी फॉर्म करण्यात आली आहे ही फॅक्ट आहे. मा. राज्यपालांनी त्यांना रेकमेंडेशन देण्यास सांगितले आहे. त्यामुळे त्यांच्या शिफारसी काय येणार आहेत हे पहावे लागेल.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** कमिटी नेमल्यामुळे आपल्याला जी.आर. काढण्यासाठी बंधन आले आहे असे आपले मत आहे का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** होय ती कमिटी आपला रिपोर्ट मा. राज्यपालांना देईल आणि मग राज्यपाल ऑर्डर देतील...

***प्रा.बी.टी.देशमुख :*** हे हायपोथेटीकल आहे. राज्यपाल काय निर्णय देतील हे आताच सांगता येणार नाही.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** ही कमिटी कॉन्स्टिट्यूशनल प्रोव्हीजनप्रमाणे गठीत केली आहे आणि मा. राज्यपाल जी ऑर्डर देतील त्यावर शासनाला विचार करावा लागेल.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** राज्यपाल ज्या दिवशी याबाबतचे आदेश निर्गमित करतील ते आपल्यावर बंधनकारक असतील हे सांगण्यासाठी आम्हाला सचिवांची आवश्यकता नाही. असे आदेश निर्गमित होण्यापूर्वी इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनची ऑर्डर इश्यू करण्याबाबत आपल्यावर बंधन आहे की नाही? मा. राज्यपालांचे असे आदेश निर्गमित झालेले आहेत की, व्हायचे आहेत?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** कमिटी बाबतचे आदेश झालेले आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** कमिटी स्थापन झाल्याबरोबर इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनची ऑर्डर इश्यू करण्यास आपले हात बांधलेले आहेत. आपल्याला तशी ऑर्डर इश्यू करता येत नाही असे आपले मत आहे का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** इक्विटेबल डिस्ट्रिब्यूशनच्या बाबतीत मा. राज्यपाल ऑर्डर्स देतील, त्या शासनाला विचारात घ्याव्या लागतील. त्यानंतर याबाबतीत शासन जी.आर. काढू शकेल.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** आज कोणत्या ऑर्डर आहेत?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** मा. राज्यपालांनी एक कमिटी स्थापन केली आहे व त्या कमिटीने रेकमेंडेशन द्याव्यात असे सांगितलेले आहे.

**The Chairman :** If the Governor has not restrained the Government from declaring any policy about equitable distribution based on population, why Government is not coming out with the G.R. If the Governor gives you directives afterwards, then you may go by those directives. We have no objection for that. But you are taking it for granted that recommendations of the Governor are going to be different than that of equitable distribution based on population. This is hypothetical proposition.

**Shri.Baroi :** Sir, it is not hypothetical. What I am Submitting is that the recommendations of the Committee will be submitted to the Governor, and then Governor will pass order, suppose, the Government without waiting for the order of the Governor, issues the G.R. about equitable distribution based on population and suppose after fifteen days or one month Governor gives directives stating that now Government cannot issue this order about equitable distribution should be like this then what will be the position.

**The Chairman :** We accept this position. But it is not restraining you from what you have accepted in para VI of your affidavit, which you have filed in the supreme Court.

**Shri. Baroi :** Sir, our submission is that since we have waited so long, let the Governor's recommendations come and then we will issue the G.R. We will issue the G.R. after receipt of those recommendations from Governor. This is our thinking. The Governor may issue another order.

**The Chairman :** Whether any time limit is given to the Committee constituted by the Governor to submit its recommendations

**Shri. Baroi :** Yes, They have been given time upto the end of February 96.

**Shri. Dasturkar :** On what basis you are saying like that

**Shri. Baroi :** The Governor has gives the time limit.

**The Chairman :** We are anxious about the implementation of the present policy of the Government regarding equitable distribution based on population, on the premise that Governor is likely to take a different stand or likely to recommend or likely to direct something also than what you have agreed as policy in the Affidavit filed before Supreme Court, you are not issuing the G.R. With due respect to the Governor's orders we suggest that, till then you come out with G.R. and if Governor's directive is contrary to your G.R. or partly contrary to your G.R. to that extent you can correct it otherwise that will survive,

***प्रा.बी.टी.देशमुख :*** ही समिती शिफारस करण्यासाठी येथे बसलेली नाही तर दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेसाठी बसलेली आहे. आता आपण पुन्हा मुळ मुद्यावर येऊ या. माननीय राज्यपालांचे लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटपासंबंधीचे आदेश ज्या दिवशी निर्गमित होतील त्या दिवशी आपले आदेश काढले जातील असे आपले जे म्हणणे आहे त्यासंबंधात घटनात्मक तरतुदी काय आहेत याची या समितीला माहिती आहे. सुप्रिम कोर्टात यासंबंधात वेगळा निर्णय झाला तर हे करता येणार नाही याची या समितीला जाणीव आहे. तथापि मी आपल्याला पुन्हा प्रश्न विचारतो की, लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटप रिस्ट्रेन करणारे माननीय राज्यपालांचे आदेश निर्गमित झालेले आहेत काय व त्यामुळे तुम्हाला हे करता येत नाही काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** सर्वोच्च न्यायालयाने लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटप रिस्ट्रेन करणारे आदेश निर्गमित केले आहेत काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** तिसरा प्रश्न विचारतो. सर्वोच्च न्यायालय आणि माननीय राज्यपाल यांनी रिस्ट्रेन करणारे आदेश निर्गमित केलेले नसतांना यासंबंधीचा शासन निर्णय निर्गमित करण्यामध्ये आणि आश्वासनाची अंमलबजावणी करण्यामध्ये आपल्याला निश्चित काय अडचण आहे?

फक्त ५ वर्षासाठी विशेष अधिकार मिळालेल्या मा. राज्यपालांनी अधिकार मिळाल्यानंतरच्या तिसऱ्या वर्षातसुद्धा **नोकऱ्यांमध्ये समन्यायी वाटप** देणारे आदेश घटनेच्या कलम ३७१ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून अजूनही काढलेले नाहीत,

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** यासंबंधात गव्हर्नमेंटकडे प्रपोजल पाठविलेले आहे. गव्हर्नमेंटची त्या प्रपोजलला मान्यता मिळाल्यानंतर आदेश काढण्यात येतील. गव्हर्नमेंटची मान्यता मिळाली नाही ही आमची अडचण आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आपण समितीला ही जी माहिती दिली आहे त्याबद्दल समिती आभारी आहे. सुप्रिमकोर्टाचे रिस्ट्रेन करणारे आदेश निर्गमित झालेले आहेत काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** नाही.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने आपल्यावर काही बंधने घातली आहेत काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** सर्वोच्च न्यायालयाने असे काही बंधन घातलेले नाही. परंतु सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतर आम्हाला यासंबंधीची अंमलबजावणी त्वरित करणे सोपे जाईल.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** तिन्ही ठिकाणाहून आपल्यावर कोणतेही बंधन घालण्यात आलेले नसतांना आणि सभागृहात वारंवार मुदतबंद आश्वासन दिले असतांना शासन निर्णय निर्गमित करू शकत नाही यामधील आपली नेमकी अडचण काय आहे?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** सुप्रिम कोर्टाने, हायकोर्टाने किंवा राज्यपालांनी रिस्ट्रेन करणारे आदेश निर्गमित केलेले नाहीत परंतु शासनाचे जे धोरण आहे ते धोरण सुप्रिम कोर्टाने मान्य केले आणि त्याप्रमाणे ऑर्डर निघाली तर आपल्याला ऑर्डर इम्प्लीमेंट करणे सोपे होईल.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आपल्याला आश्वासनाची अंमलबजावणी करणे सोपे कसे होईल यासाठी या ठिकाणी ही कमिटी बसली आहे असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** तसे नाही. शासनाने एखादा जी.आर. इश्यू केल्यानंतर ते प्रकरण कोर्टात गेले तर पुन्हा शासन अडचणीत येते. अशा प्रकारच्या अडचणी पूर्वी आलेल्या आहेत.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आपण काल्पनिक बोलत आहात आणि या ठिकाणी आपल्याला काल्पनिक बोलता येणार नाही.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** काल्पनिक नाही. कारण याची शासनाला माहिती आहे. कोर्टामध्ये अशा प्रकारच्या केसेस झालेल्या आहेत. शासनाने जी.आर. इश्यू केल्यानंतर ते प्रकरण कोर्टात गेल्यानंतर शासनाला खूप अडचणी येतात. म्हणून मी नम्रपणे सांगतो की, सर्वोच्च न्यायालयाचे एकदा यावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर हे इम्प्लीमेंट करणे सोपे होईल.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** आपण या ठिकाणी काल्पनिक मांडीत आहात. त्यामुळे फजिती होईल, असे झाले तर याची चर्चा सभागृहात होत नाही. या सभागृहाच्या कोणत्याही समितीमध्ये काल्पनिक बाबीवर चर्चा होत नाही. सुप्रिम कोर्टाचे जजमेंट आल्यानंतर आम्हाला अंमलबजावणी करणे सोपे होईल अशा अर्थाचे विधान सचिवांनी केले आहे असे समितीने समजावयाचे काय? सुप्रिम कोर्टाचा निकाल आल्यानंतर आम्हाला अंमलबजावणी करणे सोपे होईल या म्हणण्याला काय अर्थ आहे? सुप्रिम कोर्टाचे रिस्ट्रेन नाही, राज्यपालांचे रिस्ट्रेन नाही आणि हायकोर्टानेही तसा निदेश दिला नाही हे आपण सांगितले आहे. त्यानंतरही आपण आदेश काढत नाही. गव्हर्नमेंटच्या प्रोसेसमध्ये वेळ लागतो, गव्हर्नमेंटमधील जी प्रोसेस आहे ती अडचणीची आहे असे याबाबतीत आपले म्हणणे आहे असे आम्ही जे समजलो ते बरोबर आहे काय?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** होय गव्हर्नमेंटमधील प्रोसेसमुळे अडचण होते.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** काय अडचण आहे ते रकॉर्डवर येऊ द्या म्हणजे झाले.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** आपण प्रपोजल गव्हर्नमेंटकडे सबमिट केले आहे. गव्हर्नमेंटची जेव्हा मान्यता येईल तेव्हा ऑर्डर काढू.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** मागच्या वेळेला आपली समितीसमोर साक्ष झाल्यानंतर ते प्रपोजल काढलेले आहे ना? आणि त्यामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटप हे धोरण मांडलेले आहे ना?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** याचे उत्तर शासनाचा जी.आर. आल्यावर स्पष्ट होईल.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** येथील साक्षीचा दिवस संपल्यानंतर आपण गव्हर्नमेंटपुढे धोरणात्मक प्रपोजल सादर केलेले आहे. त्यामुळे समितीला विचारावयाचे आहे की, हायकोर्टाने दिलेला निर्णय, सुप्रिमकोर्टाने त्याला कुठल्याही तऱ्हेचा न दिलेला रिस्ट्रेन आणि राज्यपालांनी आदेश काढून अशा स्वरूपाचे धोरण स्वीकारू नका असे कळविलेले नाही म्हणून लोकसंख्येच्या प्रमाणात समन्यायी वाटप व्हावयास पाहिजे. असे प्रपोजलमध्ये म्हटलेले आहे का?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** आम्ही तसेच म्हटलेले आहे. The record is already there with the Committee on the same basis, we have submitted the proposal.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** सभागृहामध्ये जे कबूल केलेले आहे त्याच्या विरुद्ध कोर्टात ॲफिडेव्हीट केलेले आहे.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** असे कुठे म्हटलेले आहे?

***प्रा.बी.टी.देशमुख :*** पहिल्या पानावर पहिले वाक्य असे आहे की, "समिती गठीत करणार आहोत व पुढच्या वर्षीपासून ते समन्यायी वाटप करणार आहोत. तेवढेच शासनाच्या हातात आहे आणि आम्ही ते करणार आहोत." असे मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये दि. ६.४.१९९५ ला सांगितले आहे त्यानंतर दिनांक २१ जून १९९५ ला जे ऍफिडेव्हीट केलेले आहे त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "The Government would be required to comprehensively apply its mind to this issue. This entire process would take some time and in any event would not be complete before admissions to the current academic year."

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** हे ॲफिडेव्हीट बाजूला ठेवून हायकोर्टाने निर्णय दिला आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** सुप्रिम कोर्टात केलेल्या ॲफिडेव्हीटमध्ये जो भाग टाकण्यात आलेला आहे तो सभागृहाच्या आश्वासनाशी विसंगत आहे.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** त्यावेळेला ही डेव्हलपमेंट नव्हती. धिस ईज अ न्यू डेव्हलपमेंट.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** तो मुद्दा आपल्यासमोर नाही. हायकोर्टाचे लोकसंख्येच्या आधारावर जे जजमेंट झालेले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे यासंबंधात रिस्ट्रेन करणारे आदेश निर्गमित झालेले नाहीत. तसेच राज्यपालांचेही काही आदेश निर्गमित झालेले नाहीत. असे असतांना सुद्धा शासन निर्णय निर्गमित झालेला नाही याचे कारण आपल्याला सांगता आले तर ते नेमक्या शब्दात सांगा.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** गव्हर्नमेंटकडे प्रपोजल सबमिट केलेले आहे. गव्हर्नमेंटची मान्यता मिळाल्यानंतर ऑर्डर इश्यू करतो.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** गव्हर्नमेंट म्हणजे नेमके कोणाकडे ?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** मुख्य सचिव, राज्यमंत्री, मंत्री आणि मुख्यमंत्र्यांकडे हे जाते.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** हे प्रपोजल आता कुठल्या लेव्हलवर आहे? ते पुढच्या पायरीवर थाबू नये म्हणजे झाले.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** मुख्यमंत्री स्तरापासून राज्यमंत्री स्तरापर्यंत ते कुठे तरी आहे.

***श्री. पी.जी.दस्तुरकर :*** हे प्रपोजल शासनाकडे कधी सबमिट केले आहे.

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** ३ तारखेला सबमिट केलेले आहे.

***प्रा.बी.टी.देशमुख :*** सभागृहात दिलेल्या आश्वासना बद्दलचा सिरियसनेस शासनाच्या लक्षात आला पाहिजे.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** कुठल्याही ठिकाणी हे प्रपोजल थांबू नये, ते सध्या कुठे थांबलेले आहे?

***श्री.के.एस्. बरोई (सचिव) :*** ते कुठल्या पायरीवर थांबलेले आहे ही मी चौकशी केलेली नाही.

***समिती प्रमुख श्री.अरुण मेहता :*** ठीक आहे.

***(यानंतर समितीची बैठक दुपारी ४.१५ वाजता स्थगित झाली)***

**दांडेकर समितीच्या निकषाप्रमाणे जून १९८२ च्या राज्यसरासरीवर विदर्भामध्ये जलसिंचनाचा ५२७ हजार हेक्टरचा अनुशेष होता. तो जून १९९० च्या सरासरीवर ६२० हजार हेक्टरचा व जून १९९२ मध्ये ६३६ हजार हेक्टरचा झाला**

## *विभागीय सचिवांची साक्ष : १२ जून १९९६*

विधान परिषद आश्वासन समितीची बैठक बुधवार, दिनांक १२ जून १९९६ रोजी दुपारी २.३० वाजता विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीत खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :-

१. श्री. बी.टी.देशमुख वि.प.स. कार्यकारी समिती प्रमुख
२. श्री. अशोक चव्हाण, वि.प.स.
३. श्री. मुस्ताक अंतुले, वि.प.स.
४. श्री. अशोक मोडक, वि.प.स.
५. श्री. पी.जी.दस्तुरकर, वि.प.स.
६. श्री. शरद वाणी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
श्री. चंद्रकांत कांबळे, अवर सचिव

समितीप्रमुख श्री. अरूण मेहता हे आजच्या बैठकीला अनुपस्थित राहिल्यामुळे समितीच्या बैठकीचे कामकाज सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी पहावे असे सन्माननीय सदस्य श्री. दस्तुरकर यांनी सुचविले न त्यास सन्माननीय सदस्य श्री. मोडक यांनी अनुमोदन दिले.

सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी कार्यकारी समितीप्रमुख पद ग्रहण केले व समितीच्या कामकाजाला सुरूवात केली.

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग
श्री.के.एस.बरोई, सचिव.

***कार्यकारी समिती प्रमुख (श्री.बी.टी.देशमुख) :*** उपस्थित सन्माननीय सदस्य व अधिकाऱ्यांचे स्वागत करतो व आजच्या बैठकीच्या कामकाजाला सुरूवात करतो. वैद्यकीय व दंत महाविद्यालयांतून जून-जूलै १९९६ मध्ये होणाऱ्या प्रवेशाची नियमावली लवकरच प्रसिद्ध करण्यात येत असून प्रसिद्ध केल्यानंतर त्या नियमावलीची प्रत पाठविण्यात येईल असे आपण आम्हांला कळविलेले आहे. यासंबंधीचे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये पण दिलेले आहे. याबाबत समितीला असे जाणून घ्यायचे आहे की, नियमावलीची प्रत प्रसिध्द करण्यासाठी अजून साधारणपणे किती कालावधी लागेल?

***श्री.के.एस. बरोई (सचिव) :*** नियमावली तयार असून त्यावर फक्त सरकारची सही व्हायची आहे. नियमावलीवर सही झाल्यावर ती लगेच प्रसिद्ध करण्यात येईल. साधारणपणे या महिन्याच्या अखेरपर्यंत नियमावली प्रसिध्द होईल अशी मला खात्री आहे.

***कार्यकारी समिती प्रमुख (श्री.बी.टी.देशमुख) :*** सुप्रिम कोर्टामध्ये ६ जानेवारी १९९६ ला ॲफिडेव्हीट दाखल केलेले आहे. त्याचा निर्णय काय झालेला आहे?

***श्री.के.एस. बरोई (सचिव) :*** सुप्रिम कोर्टात मागच्या महिन्यामध्ये सुनावणी झाली होती. १५ दिवासात रिप्लाय द्या असे सांगण्यात आले होते.

***कार्यकारी समिती प्रमुख (श्री.बी.टी.देशमुख) :*** आपण सुप्रिम कोर्टाकडे जी मुदत मागितलेली आहे ती कोणत्या तारखेला मागितलेली आहे?

***श्री.के.एस. बरोई (सचिव) :*** दिनांक ५ जून १९९६ रोजी आम्ही मुदत मागितलेली आहे. व मुदत आम्ही दोन आठवड्याची मागितली होती.

***कार्यकारी समिती प्रमुख (श्री.बी.टी.देशमुख) :*** आपण असे सांगावे की, दोन आठवड्यांची मुदत कशासाठी मागितली होती?

***श्री.के.एस. बरोई (सचिव) :*** एक म्हणजे ६ मेडिकल कॉलेजमध्ये ५०-५० जागा वाढवून मिळण्यासाठी भारत सरकारकडे अर्ज केला होता आणि दुसरे म्हणजे याबाबत अद्यापि सरकारची ऑर्डर व्हायची आहे. यात ॲडिशनल स्ट्रेन्थ मिळाल्यावर डिस्ट्रिब्युशनमध्ये थोडा बदल होईल.

***कार्यकारी समिती प्रमुख (श्री.बी.टी.देशमुख) :*** मुदतवाढीचे निश्चित असे कारण काय आहे?

***श्री.के.एस. बरोई (सचिव) :*** जो निर्णय झालेला आहे त्याप्रमाणे डिस्ट्रिब्युशन करणार आहोत. दुसरे म्हणजे केंद्र सरकारकडे अतिरिक्त जागा वाढवून मागितल्या आहेत आणि ते मान्य झाले तर थोडा फरक डिस्ट्रिब्युशनमध्ये पडेल.

***कार्यकारी समिती प्रमुख (श्री.बी.टी.देशमुख) :*** मुदत वाढविण्यासंबंधीचे पत्र आता तुमच्याकडे उपलब्ध आहे का?

***श्री.के.एस. बरोई (सचिव) :*** मुदतवाढीचे पत्र आता उपलब्ध नाही.

***कार्यकारी समिती प्रमुख (श्री.बी.टी.देशमुख) :*** मुदतवाढीसंबंधी सुप्रिम कोर्टाकडे जी विनंती केली आहे त्यासंबंधीच्या पत्राची प्रत विधानपरिषद आश्वासन समितीच्या शाखेला आज संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत आपण सादर करावी. सुप्रिम कोर्टाची ऑर्डर आल्यानंतर आपण १५ दिवसांची मुदत मागितलेली आहे. आपण मला सांगा आपल्याकडे ऑर्डर किती तारखेला आली?

***श्री.के.एस. बरोई (सचिव) :*** दिनांक ६ मे १९९६ रोजीचे वकिलाचे पत्र आहे व ते आम्हाला दिनांक २० मे १९९६ रोजी मिळालेले आहे आम्हाला वकिलाचे पत्र उशिराने मिळालेले आहे.

***कार्यकारी समिती प्रमुख (श्री.बी.टी.देशमुख) :*** विद्यापीठनिहाय जागांचे समन्यायी वाटपाची व्यवस्था करण्याचा उल्लेख नियमावलीत करण्याचे योजिले आहे असे आपण नमुद कलेले आहे. सुप्रिम कोर्टामध्ये आपण जे ॲफिडेव्हीट केलेले आहे त्यात काय नमुद केलेले आहे?

***श्री.के.एस. बरोई (सचिव) :*** विद्यापीठनिहाय जागांचे समन्यायी वाटपाची व्यवस्था करण्याचा उल्लेख नियमावलीत करण्याचे योजिले आहे. ह्या प्रिन्सिपलनुसारच आम्ही सुप्रिम कोर्टामध्ये ॲफिडेव्हीट सादर केलेले आहे.

***कार्यकारी समिती प्रमुख (श्री.बी.टी.देशमुख) :*** आपण आज संध्याकाली ५.०० वाजेपर्यत विधान परिषद आश्वासन समिती शाखेला १५ दिवसांची मुदत वाढविण्यासंबंधीच्या सुप्रिम कोर्टाच्या पत्राची प्रत व ६ मे १९९६ रोजीच्या पत्राची प्रत सादर करावी.

**(समितीची बैठक ४वाजून १० मिनिटांनी स्थगित झाली)**

*सहपत्र तेरा : परिच्छेद ८४ पहा*

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
*No. ADM/1095/383/CR-11/95/ED*
*Medical Education and Drugs Department*
*Mantralaya, Mumbai 400 032*
Date 5th June, 1996

To,
**Shri. D.M.Nargolkar,**
Government Advocate,
Law & Judiciary Department, Maharashtra Sadan,
Copernicus Marg, New Delhi- 110 001.

**Sub. :** SLP (C) No. 17810-11/95 (From the Judgement and Order dated 13.7.95 of the Bombay High Court Nagpur Bench, in W.P. No. 1594/94 and 1690/94)

*Nagrik Samiti, Malkapur & Ors. Vs State of Maharashtra.*

**Ref :** Your letter No. 368/95/637 dated 6.5.96.

Sir,

Kindly refer to your letter under reference dated the 6th May, 1996 on the subject mentioned above.

2. Your letter referred to above was received by this Department on the proposal regarding the equitable distribution of seats of Medical and Allied faculties is submitted to the Government, for its approval. It may, however, take sometime to issue the necessary orders of the Government, regarding equitable distribution of seats. Therefore, you are requested to move to the Hon'ble Supreme Court by way of appropriate application praying for extension of time limit by further four weeks. The further developments in this respect may please be communicated to this Department.

Yours faithfully,
**Sd/- (Arvind Choudhary)**
Under Secretary to the Government.

**वैद्यकिय व इतर अभ्यासक्रमातील प्रवेशांच्या जागांचे समन्यायी वाटप करणारे आदेश घटनेच्या कलम ३७१ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन मा. राज्यपालांनी अजूनही काढलेले नाहीत**

*सहपत्र पंधरा : परिच्छेद ९५ पहा*

**प्रा. बी.टी.देशमुख,** फोन नं. ७३६४६
विधान परिषद सदस्य, ऑफिस ७५०८०
३, सुबोध कॉलनी, क्रमांक एलसी/५९७
विदर्भ महाविद्यालयाजवळ, दिनांक:३०.१०.१९९४
अमरावती - ४४४ ६०४.

प्रति,
**मा. राज्यपाल,**
महाराष्ट्र राज्य,
राजभवन, मलबार हिल,
मुंबई ४०० ०३५.

***संदर्भ*** *:- १) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ अन्वये भारताच्या राष्ट्रपतींचा दिनांक ९ मार्च १९९४ रोजीचा आदेश.*

*२) महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी टाकणारा 'विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश १९९४.'*

***विषय*** :- जलसिंचनाच्या विकासक्षेत्रामध्ये जिल्हा या नात्याने राज्यसरासरीच्या वर असलेल्या सर्व जिल्ह्यांना १५ टक्के व सरासरीच्या खाली असलेल्या जिल्ह्यांना ८५ टक्के या प्रमाणात ९५-९६ च्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निधीचे वाटप करण्याबाबत निर्देश देण्याविषयी.

मा. महोदय,

महाराष्ट्राच्या विविध विभागांचा समतोल विकास झालेला नसून निरनिराळ्या विकास क्षेत्रामध्ये फार मोठा प्रादेशिक असमतोल आहे याची आपणास जाणीव आहेच. प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीच्या अहवालाने ही गोष्ट अतिशय स्पष्टपणे पुढे आलेली आहे. जलसिंचन या विकासक्षेत्रामध्ये तर हा असमतोल फारच मोठा असून अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर गेल्या १० वर्षात प्रगत जिल्ह्यांनी फार मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतुदी ओढून नेल्यामुळे जून १९९२ च्या सरासरीवर मोजमाप केले असता १९८२ च्या सरासरीवर मोजलेला या मागास जिल्ह्यांचा अनुशेष कमी झाला नसून तो मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे हे स्पष्टपणे दिसून येते.

२. हा असमतोल कमी करण्यामध्ये शासनाला अपयश आल्यामुळे झालेल्या मागणीच्या पोटी भारताच्या मा. राष्ट्रपतींना संदर्भ १ वर नमूद केलेला आदेश काढावा लागला व परिणामी संदर्भ दोनवर नमूद केलेला आदेश आपणाला महाराष्ट्राचे राज्यपाल या नात्याने निर्गमित करावा लागला याची आपणास जाणीव आहेच.

३. अनुशेष दूर करण्यासाठी राज्यस्तरीय निधीचे वाटप करण्यासाठीची एक निश्चित पद्धती सत्यशोधन समितीने सुचविली होती. "आमच्या या पद्धतीमध्ये प्रत्येक वार्षिक योजनेमध्ये विवक्षित क्षेत्र, योजना, उपक्षेत्र, कार्यक्रम यांच्यासाठी तरतूद किती आहे हे पाहणे, यापैकी १५ टक्के रक्कम ही अनुशेषाशी संबधित नसलेली चालू कामे पूर्ण करण्याकरिता व नैसर्गिक वाढविस्ताराच्या सर्व जिल्ह्यांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता राखून ठेवणे, आणि उरलेल्या ८५ टक्के निधीचे वाटप अनुशेष असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये त्यांच्या आजच्या राज्य सरासरीपासून काढलेल्या अनुशेषाच्या प्रमाणात वाटून देणे या तीन गोष्टींचा समावेश आहे" अशा प्रकारची शिफारस समितीने परिच्छेद १७.३३ मध्ये केलेली आहे.

४. समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद १७.२५ मध्ये असाही इशारा स्पष्टपणे दिलेला आहे की, "अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांमध्ये चालू असलेली कामे व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्यपातळीवरील निधीमधून १५ टक्के रक्कम राखून ठेवावी. असे आम्ही सुचविले आहे. १५ टक्के रक्कम ही यासाठीची कमाल मर्यादा मानावी हे बजावून सांगितले पाहिजे. राज्यपातळीवरील निधीमधून यापेक्षा अधिक प्रमाणात रक्कम अनुशेषाशी असंबद्ध कामासाठी वापरली तर आजच अनुशेष भरून काढण्याची वा कमी करण्याची प्रक्रिया पार मंदावेल".

५ सत्यशोधन समितीच्या या शिफारशीकडे शासनाने संपूर्णपणे दुर्लक्ष केले व प्रगत जिल्ह्यांना फार मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूदी उपलब्ध करून दिल्या व अनुशेष जिल्ह्यांना मात्र अत्यंत तुटपुंज्या तरतुदी देण्यात आल्या. १९८२ ते १९९० या आठ वर्षात मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावर महाराष्ट्र शासनाने २१४७.४४ कोटी रुपये खर्च केले. जिल्हा स्तरावरून अजिबात अनुशेष नसलेल्या नांदेड या जिल्ह्याला २११.०३ कोटी, सोलापूर १९९.१९ कोटी, परभणी १७७.३९ कोटी व पुणे या जिल्ह्याला १४०.३२ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला. पण बराच मोठा अनुशेष असलेल्या अकोला जिल्ह्याला १६.३४ कोटी व बुलढाणा जिल्ह्याला १७.८२ कोटी रुपये इतका तुटपुंजा निधी या आठ वर्षात उपलब्ध करून देण्यात आला.

६. जिल्हा हा घटक धरून सत्यशोधन समितीने एका निश्चित सूत्रानुसार जून १९८२ च्या राज्यसरासरीवर निश्चित केलेला जलसिंचन या विकास क्षेत्रातील अनुशेष या समितीच्या अहवालाच्या तक्ता ७.५ मध्ये नमूद केलेला आहे. जिल्हा या नात्याने कोणता जिल्हा राज्य सरासरीच्यावर आहे व कोणता जिल्हा राज्यसरासरीच्या खाली आहे हे या तक्त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे.

७. सत्यशोधन समितीने निश्चित केलेला अनुशेष हा जून १९८२ च्या स्तरावर प्रत्येक जिल्ह्याने पदरात पाडून घेतलेल्या सिंचन क्षमतेवर (प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये) मोजलेला होता. आता जून १९९२ पर्यंत प्रत्येक जिल्ह्याने पदरात पाडून घेतलेले सिंचन क्षमतेचे हेक्टरी परिमाण अधिकृतपणे उपलब्ध झालेले आहे. (गुरुवार दिनांक ३० डिसेंबर १९९३ रोजी विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या सातव्या यादीतील प्रश्न क्रमांक ३०९८१ च्या उत्तरामध्ये ही आकडेवारी समाविष्ट आहे.)

८.१९८२ च्या जून मध्ये २२.५५ टक्के असलेली राज्य सरासरी जून १९९२ मध्ये ३२.०१ झाली असल्याचे या अधिकृत शासकीय आकडेवारीमध्ये स्पष्टपणे दिसून येते. अमरावती, अकोला, औरंगाबाद, बुलढाणा, उस्मानाबाद, यवतमाळ, जालना, लातुर, धुळे, रत्नागिरी, चंद्रपूर, वर्धा, सिंधुदुर्ग, ठाणे, बीड, नाशिक, रायगड हे सतरा जिल्हे राज्यसरासरीच्या काही हजार हेक्टरने खाली असल्यामुळे अनुशेषात असलेले जिल्हे म्हणून स्पष्टपणे दिसून येतात. इतर १३ जिल्हे हे जिल्हा या नात्याने राज्यसरासरीच्या बरेच वर असल्याने बिगर अनुशेष जिल्हे आहेत.

९. बिगर अनुशेष व अनुशेष जिल्ह्यांसाठी निधी वाटपाचा १५ / ८५ चा वर परिच्छेद ३ व ४ मध्ये नमूद केलेला फॉर्म्यूला शासनाने न स्वीकारल्याने अनुशेष भरून काढण्याची वा कमी करण्याची प्रक्रिया पार मंदावेल असे समितीने आपल्या अहवालात नमूद केले होते. १०/१२ वर्षाच्या अनुभवावरून ८२ मध्ये अनुशेषांत असलेल्या अनेक जिल्ह्यात ही प्रक्रिया सुरूच झाली नाही असे दिसून येते. परिणामी १९८२ च्या सरासरीवर काढलेले त्यातील अनेक जिल्ह्यांचे अनुशेष ९२ च्या राज्यसरासरीवर

**सत्यशोधन समिती नेमावी म्हणून विधान मंडळाच्या उभय सभागृहामध्ये दसपट गोंधळ झाला असेल तर त्या समितीची एकहि शिफारस अजून अमलात आली नाही म्हणून गेल्या १२ वर्षात एकपट सुद्धा प्रयत्न कुठे झालेला आहे काय? याचा तपास करावा लागेल.**

मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसून येतात.

१०.शासनाने सभागृहात दिलेल्या अधिकृत आकडेवारीच्या आधारे १९९२ च्या राज्यसरासरीवर प्रत्येक जिल्ह्याचा निश्चित झालेला अनुशेष व सत्यशोधन समितीच्या १५/८५ च्या फॉर्म्यूल्याप्रमाणे अंदाजे १००० कोटी रुपयाचे ९५-९६ च्या वित्तीय विवरण पत्रातील पाटबंधारे प्रकल्पांवरील निधीचे वाटप दर्शविणारा तक्ता या पत्रासोबत परिशिष्ट 'अ' म्हणून जोडलेला आहे. स्तंभ दोन मध्ये जिल्ह्याचे नाव नमूद केले असून स्तंभ ३ मध्ये जून १९९२ च्या राज्यसरासरीवरील त्या जिल्ह्याचा अनुशेष नमूद केला आहे ( हजार हेक्टरात) राज्य अंदाजपत्रकातील ८५ टक्के रक्कम या सर्व अनुशेष जिल्ह्यांना देतो म्हटले तर या प्रत्येक जिल्ह्याच्या वाट्याला किती निधी उपलब्ध व्हावा हे स्तंभ चार मध्ये नमूद केले आहे. (कोटी रुपयात) असे करीत असतांना १९९५ - ९६ च्या महाराष्ट्र राज्याच्या अंदाजपत्रकामध्ये पाटबंधारे प्रकल्पासाठी १००० कोटी रुपये निधी उपलब्ध होईल असे गृहित धरले आहे. प्रत्यक्ष यापेक्षा कमी किंवा जास्त निधी उपलब्ध झाल्यास प्रत्येक जिल्ह्यासाठीची रक्कम त्या प्रमाणात कमी जास्त होईल. १५ टक्के रक्कम बिनअनुशेष जिल्ह्यासाठी राखून ठेवली आहे. ८५ टक्के रक्कम अनुशेष असलेल्या १७ जिल्ह्यामध्ये वाटून दिली असून त्या त्या जिल्ह्यांच्या अनुशेषाच्या प्रमाणात निधी वाटप केलेले आहे.

*परिशिष्ट अ*

**१९९२ च्या राज्यसरासरीवर निश्चित झालेला अनुशेष व सत्यशोधन समितीच्या १५/८५ च्या फार्म्युल्याप्रमाणे अंदाजे १००० कोटी रुपयाचे ९५-९६ च्या वित्तिय विवरण पत्रातील पाटबंधारे प्रकल्पावरील निधिचे वाटप दर्शविणारा तक्ता**

| अ.नं. जिल्ह्याचे नाव | १९९२ च्या सरासरिवर निश्चित अनुशेष (हजार हेक्टर) | ८५ टक्के निधिचे अनुशेषाच्या प्रमाणात वाटप (कोटी रुपये) |
|---|---|---|
| १ २ | ३ | ४ |
| १. अमरावती | १७४.१९८ | १२०.१६८ |
| २. अकोला | १४९.१३८ | १०२.८८० |
| ३. औरंगाबाद | १३४.०३६ | ९२.४६२ |
| ४. बुलढाणा | ११७.१३६ | ८०.८०४ |
| ५. उस्मानाबाद | ११६.३७७ | ८०.२८० |
| ६. यवतमाळ | ९३.४९५ | ६४.४९६ |
| ७. जालना | ६८.८१६ | ४७.४७१ |
| ८. लातुर | ५८.७६५ | ४०.५३८ |
| ९. धुळे | ५७.६०१ | ३९.७३५ |
| १०. रत्नागिरी | ५६.७१० | ३९.१२० |
| ११. चंद्रपूर | ५४.५४५ | ३७.६२६ |
| १२. वर्धा | ४८.२६३ | ३३.२९३ |
| १३. सिंधूदुर्ग | २६.८३४ | १८.५१० |
| १४. ठाणे | २४.८९४ | १७.१७२ |
| १५. बीड | २३.७८९ | १६.४१० |
| १६. नाशिक | १८.१४६ | १२.५१७ |
| १७. रायगड | ९.४३७ | ६.५०९ |
| | १२३२.१८१ | ८५०.००० |
| बिनअनुशेष जिल्हे | | १५०.००० |
| एकूण | | १०००.००० |

*शेरा (१) १९९५-९६ च्या महाराष्ट्र राज्याच्या अंदाजपत्रकामध्ये पाटबंधारे प्रकल्पासाठी १००० कोटी रुपये निधी उपलब्ध होइल असे गृहित धरले आहे. प्रत्यक्ष यापेक्षा कमी किंवा जास्त निधी उपलब्ध झाल्यास प्रत्येक जिल्ह्यासाठीची रक्कम त्या प्रमाणात कमी जास्त होईल.*

*(२) १५ टक्के रक्कम बिनअनुशेष जिल्ह्यांसाठी राखून ठेवली आहे.*

*(३) ८५ टक्के रक्कम अनुशेष असलेल्या १७ जिल्ह्यांमध्ये वाटून दिली असून त्या त्या जिल्ह्यांच्या अनुशेषाच्या प्रमाणात निधी वाटप केलेले आहे.*

११. वैधानिक विकास मंडळाच्या स्थापनेचे आदेश ३० एप्रिल १९९४ रोजी निघाल्यामुळे १९९४-९५ च्या अंदाजपत्रकामध्ये अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने कोणतीही उपाय योजना करता आली नाही याची आपणास जाणीव आहेच. १९९५-९६ चे अंदाजपत्रक सुद्धा या प्रयोजनासाठी निरुपयोगी ठरू नये यासाठी तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे असे आम्हाला वाटते. संदर्भ २ वर नमूद केलेल्या आदेशाच्या परिच्छेद ७ मध्ये विकास खर्चासाठी निधीचे वाटप करण्याचे अधिकार विशेष जबाबदारी म्हणून राज्यपाल या नात्याने आपणाकडे सोपविण्यात आलेले आहेत. याच आदेशाच्या परिच्छेद ८ मध्ये स्पष्टपणे असेही नमूद केलेले आहे की, "The allocation of funds or outlays made by the Governor shall be effected in the Annual Financial Statement to be placed before the State Legislature and the developmental activities with regard to the outlays as aforesaid shall be carried out or caused to be carried out by the State Government and the funds so allocated shall be non divertible from the area of one Board to that of another Board."

१२ वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाल्यानंतर लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी विभागीय मुख्यालयांच्या ठिकाणी आपण बैठकी घेणार असल्याचे तसेच औरंगाबाद व नागपूर येथे लोकप्रतिनिधींच्या प्रत्यक्ष बैठकी घेतल्याचे आम्ही वृत्तपत्रातून वाचले होते. अमरावती विभागाच्या लोकप्रतिनिधींची बैठक आपण घ्याल त्यावेळी याबाबतचे विचार मांडण्याची संधी मिळेल अशी अपेक्षा होती. पण त्या संधीची वाट पहात राहिल्यास बराच उशीर होईल व १९९५-९६ च्या अंदाजपत्रकामध्ये प्रस्ताव समाविष्ट करण्याची वेळ कदाचित निघून जाईल असे वाटल्यामुळे लेखी निवेदनाद्वारे हे विचार सादर केलेले आहेत.

१३. **विनंती** : जून १९९२ च्या राज्यसरासरीच्या अनुषंगाने १३ जिल्हे बिगर अनुशेष जिल्हे व १७ जिल्हे अनुशेष जिल्हे म्हणून निश्चित झालेले आहेत. संदर्भ दोनवर नमूद केलेल्या आदेशाच्या परिच्छेद ७ व ८ अन्वये आपणास प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आपण जलसिंचनाच्या विकासक्षेत्रामध्ये जिल्हा या नात्याने राज्यसरासरीच्या वर असलेल्या १३ जिल्ह्यांना १५ टक्के व सरासरीच्या खाली असलेल्या १७ जिल्ह्यांना ८५ टक्के या प्रमाणात ९५-९६ च्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निधीचे वाटप करण्याबाबत तत्परतेने निर्देश द्यावे व इतर विकास क्षेत्रामध्ये सुद्धा हेच १५/८५ चे निधी वाटपाचे सूत्र लागू करावे अशी आपणास विनंती आहे.

आपला विश्वासू,

**(बी.टी.देशमुख)**

विधान परिषद सदस्य

**घटनेच्या कलम ३७१ अन्वये राज्यपालांना विशेषाधिकार देणारी व्यवस्था अस्तित्वात यावी म्हणून उभय सभागृहामध्ये त्यावेळी शतपट उंच आवाजात मागणी करणाऱ्यांपैकी किती जणांनी "आता अधिकार मिळाले असल्यामुळे त्याचा वापर करा" अशी मागणी दबत्या आवाजात कां होईना पण मा.राज्यपालांकडे केलेली आहे, याचा शोध घ्यावा लागेल.**

*सहपत्र सोळा : परिच्छेद ९८,९९ पहा*

**प्रा. बी.टी.देशमुख,** **फोन नं.** ७३६४६
*विधान परिषद सदस्य,* ऑफिस ७५०८०
३, सुबोध कॉलनी, **क्रमांक** : एलसी/५९७
विदर्भ महाविद्यालयाजवळ, **दिनांक** : २४.४.१९९५
**अमरावती - ४४४ ६०४.**

प्रति,
**श्री महादेवरावजी शिवणकर**
*मा. पाटबंधारे मंत्री,*
महाराष्ट्र राज्य,
**मुंबई ४०० ०३२.**

***मार्फत :-*** *मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.*

***संदर्भ*** *:- अमरावती प्रादेशिक विभागांतर्गत चार जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पाबाबत मा. पाटबंधारे मंत्री यांनी बोलाविलेली २४.४.१९९५ रोजीची बैठक.*

***विषय*** *:- जलसिंचनाच्या विकासक्षेत्रामध्ये जिल्हा या नात्याने राज्यसरासरीच्या वर असलेल्या सर्व जिल्ह्यांना १५ टक्के व सरासरीच्या खाली असलेल्या जिल्ह्यांना ८५ टक्के या प्रमाणात ९५-९६ च्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निधीचे वाटप करण्याबाबत.*

मा. महोदय,

महाराष्ट्राच्या विविध विभागांचा समतोल विकास झालेला नसून निरनिराळ्या विकास क्षेत्रामध्ये फार मोठा प्रादेशिक असमतोल आहे याची आपणास जाणीव आहेच. प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीच्या अहवालाने ही गोष्ट अतिशय स्पष्टपणे पुढे आलेली आहे. जलसिंचन या विकासक्षेत्रामध्ये तर हा असमतोल फारच मोठा असून अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर गेल्या १० वर्षात प्रगत जिल्ह्यांनी फार मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतुदी ओढून नेल्यामुळे जून १९९२ च्या सरासरीवर मोजमाप केले असता १९८२ च्या सरासरीवर मोजलेला या मागास जिल्ह्यांचा अनुशेष कमी झाला नसून तो मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे हे स्पष्टपणे दिसून येते.

**२.** अनुशेष दूर करण्यासाठी राज्यस्तरीय निधीचे वाटप करण्यासाठीची एक निश्चित पद्धती सत्यशोधन समितीने सुचविली होती. "आमच्या या पद्धतीमध्ये प्रत्येक वार्षिक योजनेमध्ये विवक्षित क्षेत्र, योजना, उपक्षेत्र, कार्यक्रम यांच्यासाठी तरतूद किती आहे हे पाहणे, यापैकी १५ टक्के रक्कम ही अनुशेषाशी संबधित नसलेली चालू कामे पूर्ण करण्याकरिता व नैसर्गिक वाढविस्ताराच्या सर्व जिल्ह्यांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता राखून ठेवणे, आणि उरलेल्या **८५ टक्के निधीचे वाटप अनुशेष असलेल्या सर्व जिल्ह्यांमध्ये त्यांच्या आजच्या राज्यसरासरीपासून काढलेल्या अनुशेषाच्या प्रमाणात वाटून देणे** या तीन गोष्टींचा समावेश आहे" अशा प्रकारची शिफारस समितीने परिच्छेद १७.३३ मध्ये केलेली आहे.

**३.** समितीने आपल्या अहवालाच्या परिच्छेद १७.२५ मध्ये असाही इशारा स्पष्टपणे दिलेला आहे की, "अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांमध्ये चालू असलेली कामे व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्यपातळीवरील निधीमधून १५ टक्के रक्कम राखून ठेवावी. असे आम्ही सुचविले आहे. **१५ टक्के रक्कम ही यासाठीची कमाल मर्यादा मानावी हे बजावून सांगितले पाहिजे.** राज्यपातळीवरील निधीमधून यापेक्षा अधिक प्रमाणात रक्कम अनुशेषाशी असंबद्ध कामासाठी वापरली तर आजचा अनुशेष भरून काढण्याची वा कमी करण्याची प्रक्रिया पार मंदावेल".

**४.** सत्यशोधन समितीच्या या शिफारशीकडे शासनाने संपूर्णपणे दुर्लक्ष केले व प्रगत जिल्ह्यांना फार मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूदी उपलब्ध करून दिल्या व अनुशेष जिल्ह्यांना मात्र अत्यंत तुटपुंज्या तरतुदी देण्यात आल्या. १९८२ ते १९९० या आठ वर्षात मोठ्या व मध्यम पाटबंधारे प्रकल्पावर महाराष्ट्र शासनाने २१४७.४४ कोटी रुपये खर्च केले. जिल्हा स्तरावरून अजिबात अनुशेष नसलेल्या नांदेड या जिल्ह्याला २११.०३ कोटी, सोलापूर १९९.१९ कोटी, परभणी १७७.३९ कोटी व पुणे या जिल्ह्याला १४०.३२ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला. पण बराच मोठा अनुशेष असलेल्या अकोला जिल्ह्याला १६.३४ कोटी व बुलढाणा जिल्ह्याला १७.८२ कोटी रुपये इतका तुटपुंजा निधी या आठ वर्षात उपलब्ध करून देण्यात आला.

**५.** जिल्हा हा घटक धरून **सत्यशोधन समितीने** एका निश्चित सूत्रानुसार **जून १९८२ च्या राज्यसरासरीवर निश्चित केलेला** जलसिंचन या विकास क्षेत्रातील **अनुशेष** या समितीच्या अहवालाच्या तक्ता ७.५ मध्ये नमूद केलेला आहे. जिल्हा या नात्याने कोणता जिल्हा राज्य सरासरीच्यावर आहे व कोणता जिल्हा राज्यसरासरीच्या खाली आहे हे या तक्त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे.राज्यसरासरीच्या खाली असलेले अनुशेष जिल्हे समितीच्या अहवालांमध्ये १७ नमुद करण्यात आले असून ते जिल्हे व त्यांचा अनुशेष (हजार हेक्टरात) पुढील प्रमाणे समितीने नमुद केला आहे. :- १. अमरावती (१३४.३३), २. अकोला (९२.३२), ३. औरंगाबाद (४८.०५), ४. बुलढाणा (८४.७८), ५. उस्मानाबाद (९१.७७), ६. यवतमाळ (१०४.४१), ७. जालना (२२.५२), ८. लातूर (४४.८८), ९. रत्नागीरी (४३.१०), १०. वर्धा (४३.८९), ११. चंद्रपूर (५४.९०), १२. धुळे (२९.९६), १३. बीड (५३.४५), १४. सिंधुदुर्ग (२१.४०), १५. ठाणे (४१.०८), १६. नाशिक (०.७७), १७. नागपूर (११.६५).

**६.** जुन १९८२ ला २२.५५ टक्के असलेली राज्य सरासरी **जून १९९०** च्या अधिकृत आकडेवारी नुसार ३०.४५ टक्के (प्रमाण रब्बी समतुल्य) झाली या **सरासरीवर अनुशेष** जिल्ह्यांची संख्या १७ असून ते जिल्हे व त्यांचा अनुशेष (हजार हेक्टरात) पुढील प्रमाणे आहेत :- १. अमरावती (१६९.२३), २. अकोला (१४४.१२), ३. औरंगाबाद (१२५.९३), ४. बुलढाणा (११७.६९), ५. उस्मानाबाद (११२.६७), ६. यवतमाळ (८६.९१), ७. जालना (५९.०३), ८. लातूर (५५.१०), ९. रत्नागीरी (५४.८९), १०. वर्धा (५२.६०), ११. चंद्रपूर (४९.५०), १२. धुळे (४४.६३), १३. बीड (३९.१०), १४. सिंधुदुर्ग (२७.२६), १५. ठाणे (२२.८५), १६. नाशिक (१२.४५), १७. रायगड (६.८७).

**७.** महाराष्ट्राच्या काही भागात शेतीसिंचनासाठी भूपृष्ठावरील जलाशयातून मुबलक पाणी उपलब्ध असतांना विदर्भाच्या या भागात पिण्याच्या पाण्यासाठीसुद्धा भूपृष्ठावर जलाशये उपलब्ध नाहीत. परिणामी भूगर्भात दूरवर गेलेल्या खोल विंधन विहिरीवर, पिण्याच्या पाण्याचे उद्भव म्हणून, मोठमोठ्या नगरांना विसंबून रहावे लागते. पिण्याच्या पाण्यासाठी 'डीप बोअर'च्या माध्यमातून जो उपसा होत आहे त्यामुळे आमच्या भागातील नद्या त्रिवेणी संगमातील सरस्वतीस्वरूप झाल्या आहेत. इतकेच नव्हे तर लोकांच्या विहिरी व भुडक्यासारखे खाजगी स्त्रोतसुध्दा संकटात आले आहेत. जलसिंचन प्रकल्पातून विशिष्ट टक्केवारी ही पिण्याच्या पाण्यासाठी राखून

**२०३२ खेड्यांचा आमचा १९८३ मध्ये असलेला "इतर रस्ते पध्दतीचा अनुशेष" कमी झाला नाही तर तो वाढत जावून १९९१ मध्ये ३०७२ खेड्यावर गेला**

ठेवण्याचे धोरण देशभर स्वीकारण्यात आलेले असून महाराष्ट्रातही आपण त्याचा स्वीकार केलेला आहे. ज्या चार जिल्ह्यांची आपण आज बैठक बोलावलेली आहे त्यातील अशा प्रकल्पाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

**(१) चिखली पाणीपुरवठा व पेनटाकळी मध्यम प्रकल्प** :- सार्वजनिक व्यवस्थेद्वारा उन्हाळ्यात नागरिकांना दहा दिवसातून एकवेळ फक्त पाणीपुरवठा देता येतो अशी महाराष्ट्रातील एकमेव नगरपालिका ही चिखली येथील आहे. २८ लक्ष लिटर्स दरदिवशी अपेक्षित पाणीपुरवठ्याच्या ऐवजी फक्त ८ लक्ष लिटर्स पाणी उपलब्ध होत असल्याने "नागरिकांना १० दिवसांनी पाणी मिळू शकते" हे शासनाने १९.७.९४ रोजी विधानपरिषद सभागृहात कबूल केले आहे. "वास्तविक पहाता हे धरण पूर्ण करण्यासाठी पाच वर्षे लागतील अशी माझ्याकडे माहिती आहे. त्या धरणामध्ये पाणी उपलब्ध होण्यासाठीचा कालखंड मर्यादित करावा. हा कालखंड ३ वर्षाचा दिलेला आहे. त्याप्रमाणे ती योजना पूर्ण केली जाईल" असे स्वतः मा. मुख्यमंत्र्यांनी दिनांक ५ एप्रिल १९९५ रोजी विधानपरिषदेत सांगितले (पृष्ठ ए-४) "पाटबंधारे खातेसुद्धा शासनाचेच असल्यामुळे ते धरण लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करू" असे त्याच दिवशी मा. मुख्यमंत्र्यांनी विधानपरिषदेत सांगितले. पाणीपुरवठ्याची योजना तीन वर्षाच्या आत बांधून व्हावी म्हणून आम्ही लोकप्रतिनिधी नगरविकास विभागाकडे, मा. मुख्यमंत्र्यांकडे प्रयत्न करू. त्याचबरोबर तीन वर्षामध्ये पाटबंधारे विभागाने आपला प्रकल्प पूर्ण करावा अशी स्पष्ट भूमिका पाटबंधारे विभागाने घेण्याची आवश्यकता आहे.

**(२) यवतमाळ शहर वाढीव पाणीपुरवठा योजना व चापडोह प्रकल्प** :- सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार या चार जिल्ह्यात नागरी पाणीपुरवठ्याचा महत्तम अनुशेष असलेले अमरावती व अकोला शहरानंतरचे तिसऱ्या क्रमांकाचे यवतमाळ हे शहर असून समितीने या शहराचा निश्चित केलेला अनुशेष ११.५० दशलक्ष लिटर्स दरदिवशी एवढा आहे. या शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेस नगरविकास विभागाने २१ एप्रिल १९९४ ला प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून केंद्र शासनाने ऑगस्ट ९४ मध्ये तांत्रिक मंजुरी दिली आहे. या योजनेचा उद्‌भव चापडोह प्रकल्प असून या प्रकल्पाचे काम पुरेशा वेगाने सुरू नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. "सदरहू काम हे अनामत ठेव रक्कम काम म्हणून करण्यात येत असल्याने जेवढा निधी उपलब्ध होईल तेवढे काम करू" (२२.११.९४ तारांकित प्रश्न ४०८९३) अशी भूमिका पाटबंधारे विभागाने घेतली आहे. "५० लक्ष निधी नगरविकास विभागाने उपलब्ध करून दिला म्हणून ५० लक्ष खर्च करण्याचे नियोजन आहे" (२४.४.९५ / ७.४.९५ तारांकित प्रश्न क्रमांक २२) या पाटबंधारे विभागाच्या उत्तरामध्ये बदल होणे गरजेचे आहे. पूर्ण रक्कम भरल्याशिवाय प्रकल्प नगरविकास विभागाला हस्तांतरीत करू नये, पण प्रकल्पाच्या बांधकामाला पाटबंधारे विभागाने वेग द्यावा असे सुचवावेसे वाटते.

**(३) रिसोड पाणीपुरवठा व घोनसर प्रकल्प** :- रिसोड या २१ हजार लोकसंख्येच्या अतिशय पाणी टंचाईच्या 'क' वर्ग नगरपालिकेच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेचा उद्‌भव घोनसर प्रकल्प योजिलेला आहे. "१५ दिवसात प्रशासकीय मान्यता देणार आहोत हे पाटबंधारे विभागाचा प्रमुख म्हणून मी मान्य केले आहे" असे मा. पाटबंधारे मंत्र्यांनी विधान परिषदेत सांगितले. (२२.११.९४ पृष्ठ ए-४) प्रशासकीय मान्यता मिळणे व प्रत्यक्ष कामाच्या प्रगती बाबत स्पष्ट सूचना निर्गमित होणे आवश्यक आहे.

**(४) अचलपूर पाणीपुरवठा व चंद्रभागा प्रकल्प** : अचलपूर व परतवाडा या शहरांच्या पाणीपुरवठा योजनेचे विद्यमान उद्‌भव हे सापन मध्ये घेतलेल्या विंधन विहिरीवर अवलंबून असल्याने भरवशाचे नाहीत व त्यामुळे तातडीच्या पाणीपुरवठा योजनेवर अवलंबून रहावे लागते. नगरविकास विभागातर्फे उत्तर देतांना दिनांक ३.४.९५ रोजी मा. मंत्रिमहोदयांनी विधानपरिषदेत "चंद्रभागा प्रकल्पामधून काही आरक्षण देता येईल कां याचाही विचार केला जाईल" असे सांगितले. (पृष्ठ ई-३) २६ सप्टेबर १९९० ला प्रशासकीय मान्यता मिळालेला हा प्रकल्प "५ वर्षात पूर्ण करण्यात येईल" असे शासनाच्या वतीने स्पष्टपणे सांगण्यात आले होते. १९९५ मध्ये या प्रकल्पाचा अर्धा प्रवास सुद्धा पूर्ण झालेला नाही. १५ ते २० कोटी रुपये १९९५-९६ या आर्थिक वर्षात खर्च करता येवू शकतील एवढी यंत्रणा प्रकल्पस्थळी उपलब्ध असूनही केवळ निधीच्या उपलब्धतेअभावी काम रेंगाळले आहे.

**८. पाटबंधारे विभागाच्या रचनेत अंगभूत असलेल्या या महसूली विभागावरील अन्याय दूर करण्याबाबत :-** पाटबंधारे विभागाच्या रचनेतील अंगभूत विषमता हीसुद्धा या विभागाचा अनुशेष दूर होण्यात एक मोठीच अडचण झाल्याचे दिसून येते. ही विषमता तत्परतेने दूर होणे आवश्यक आहे. **(१) पुणे विभाग :** जिल्हा स्तरावरून अजिबात अनुशेष नसलेल्या या विभागामध्ये (A) मुख्य अभियंता पाटबंधारे विभाग पुणे = ६ मंडळ कार्यालये (B) मुख्य अभियंता (विनिर्दिष्ट प्रकल्प) पाटबंधारे विभाग पुणे = ८ मंडळ कार्यालये (C) मुख्य अभियंता कोयना प्रकल्प पुणे = २ मंडळ कार्यालये अशी एकूण ३ *मुख्य अभियंत्याच्या अंतर्गत १६ मंडळ कार्यालये कार्यरत आहेत.* **(२) नाशिक विभाग :** अत्यंत अल्प अनुशेष असलेल्या नाशिक विभागात (A) मुख्य अभियंता उत्तर महाराष्ट्र प्रदेश नाशिक = ६ मंडळ कार्यालये (B) मुख्य अभियंता (यांत्रिकी) नाशिक = ५ मंडळ कार्यालये अशी एकूण २ *मुख्य अभियंत्यांच्या अंतर्गत ११ मंडळ कार्यालये कार्यरत आहेत.* **(३) औरंगाबाद विभाग :** (A) मुख्य अभियंता पाटबंधारे विभाग औरंगाबाद = ५ मंडळ कार्यालये (B) मुख्य अभियंता (विनिर्दिष्ट प्रकल्प) औरंगाबाद = ४ मंडळ कार्यालये अशी एकूण २ *मुख्य अभियंत्याच्या अंतर्गत ९ मंडळ कार्यालये कार्यरत आहेत.* **(४) कोकण विभाग :** मुख्य अभियंता कोकण प्रदेश मुंबई यांच्या अंतर्गत सहा मंडळ कार्यालये कार्यरत आहेत. त्याशिवाय मुख्य अभियंता (विद्युत) जलविद्युत प्रकल्प मुंबई यांच्या अंतर्गत ४ मंडळ कार्यालये कार्यरत आहेत. **(५) नागपूर विभाग :** मुख्य अभियंता *नागपूर पाटबंधारे विभाग यांच्या अंतर्गत ६ मंडळ कार्यालये कार्यरत आहेत.* **(६) अमरावती विभाग :** एकटा अमरावती विभाग हा महत्तम अनुशेष असलेला विभाग असा आहे की जेथे मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, **अमरावती यांच्या अंतर्गत फक्त तीन मंडळ कार्यालये कार्यरत आहेत.** पाटबंधारे विभागाच्या अंगभूत रचनेतील हा दोष दुरुस्त व्हावा व किमान तीन मंडळ कार्यालये, आवश्यक त्या डिव्हिजन्ससह, ताबडतोबीने या महसूली विभागात स्थापीत केली जावी अशी आमची मागणी आहे. *(का.अ.१९९४-९५ पा.वि.१ P.15)*

**९. जलसिंचनाचा सर्वात जास्त अनुशेष असलेला महसूली विभाग म्हणून सत्यशोधन समितीच्या अहवालामध्ये अमरावती विभाग नमूद केलेला आहे.** १९८२ च्या सरासरीवर सत्यशोधन समितीने हा अनुशेष ४१६ हजार हेक्टरचा निश्चित केला होता तो कमी न होता सतत वाढत असून १९९० च्या सरासरीवर ५१७ हजार हेक्टरचा झाला असून १९९२ च्या सरासरीवर ५३४ हजार हेक्टर एवढा निश्चित झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सत्यशोधन समितीचा निधीवाटपाचा १५/८५ चा फॉर्म्युला प्रत्यक्ष अमलात आणल्याशिवाय हा अनुशेष कमी होण्याची सुतराम शक्यता नाही. जुलै १९९५ मध्ये सादर होणाऱ्या वित्तीय विवरणपत्रामध्ये अमरावती जिल्ह्यासाठी १२० कोटी, अकोला जिल्ह्यासाठी १०२ कोटी, बुलढाणा जिल्ह्यासाठी ८० कोटी व यवतमाळ जिल्ह्यासाठी ६४ कोटी रुपयाचा निधी जलसिंचन प्रकल्पांना उपलब्ध व्हावा अशी मागणी मी करीत आहे. पाटबंधारे विभागाचे अंदाजपत्रक एक हजार कोटींचे असेल असे गृहित

**नवा अनुशेष निर्माण होणार नाही व जुना संपुष्टात येईल अशा हिशेबाने विकास कामाच्या निधिचे समन्यायी वाटप करणारे आदेश घटनेच्या कलम ३७१ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून मा. राज्यपालांनी अजूनही काढलेले नाहीत**

धरून ही मागणी केली आहे. प्रत्यक्ष रक्कम कमी जास्त उपलब्ध झाल्यास त्याप्रमाणात या रकमाही कमी जास्त होतील हे उघड आहे. ८५ टक्के निधी अनुशेषाच्या प्रमाणात वितरित करण्याच्या सूत्रावर ही मागणी आधारित आहे. *(परिशिष्ट अ पहा)*

**१०.** दिवा लावणे व अंधार दूर करणे ही दोन वेगवेगळी कामे नाहीत. पहिले काम झाले की दुसरे परिणाम म्हणून आपोआप पदरी पडते. **निधी उपलब्ध करून देणे व अनुशेष दूर करणे ही दोन वेगवेगळी कामे नाहीत. निधी उपलब्ध झाला की अनुशेष आपोआप दूर होईल,** म्हणूनच या चार जिल्ह्यातील प्रकल्पांचा प्रकल्पनिहाय ऊहापोह या निवेदनात करण्याचे मी टाळत आहे, तथापि अकोला शहर पूर नियंत्रक योजना व त्यामध्ये अंतर्भूत असलेले प्रकल्प याची निकड मुद्दामहून आपल्या लक्षात आणून द्यावीशी वाटते. पूर्णा प्रकल्पासाठी "८ कोटीची तरतुद पुढच्या आर्थिक वर्षात करावी लागेल" असे पाटबंधारे मंत्र्यांनी भूमिपूजनाच्या कार्यक्रमात जाहीर रीतीने घोषित केले असतांना ९५-९६ च्या वित्तीय विवरणामध्ये तरतूद फक्त ४२ लाख रुपये *(Appendix C Page C 43)* करण्यात आली आहे हे सखेद नमूद करावेसे वाटते.

**११.** जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये आघाडीवर असलेल्या महाराष्ट्रातील विकसित भागांनी सत्यशोधन समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतरसुद्धा दुष्काळी तालुक्यांच्या नावाखाली खूप मोठ्या प्रमाणात निधी पळविला व अविकसित भागांची मोठीच पिळवणूक केली. आज महाराष्ट्रातील **हे विकसित भाग "कृष्णा खोरे पाणी तंटा लवादाचे" निमित्त करून मोठ्या प्रमाणावर निधी पळवू मागत आहेत.** "महाराष्ट्राच्या वाट्याला आलेले पाणी सन २००० हजार पर्यंत वापरले नाहीतर त्या पाण्यावरील महाराष्ट्राचा हक्क गमावला जाईल" असा धडधडीत असत्य प्रचार मोठ्या गाजावाजाने गेली काही वर्षे महाराष्ट्रात चालू आहे. व मोठ्या प्रमाणात निधी पळविणे हाच या असत्य प्रचारामागील हेतू आहे, हे उघड आहे. वस्तुतः कृष्णा खोऱ्याच्या बाबतीत लवादाने जो निर्णय दिलेला आहे त्याच्या आठव्या प्रकरणात असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की :-"Failure of any state to make use of any portion of the water allocated to it during any water year shall not constitute forfeiture or abandonment of its share of water in any subsequent water year, nor shall it increase the share of any other state in any subsequent water year even if such state may have used such water" *-Clause VIII (B) of chapter 7* इतकेच नव्हे तर इ.स.२००० नंतर पुनर्विलोकनाची तरतूदसुद्धा या निर्णयात पुढील शब्दात नमूद आहे :-"At any time after the 31st May 2000 this order may be reviewed or revised by a competent authority or Tribunal" *- Clause XIV (A) of chapter 7* गेली दोन तीन वर्षे सभागृहामध्ये मी हे सातत्याने सांगत आहे. असत्य प्रचाराच्या आधारावर सुद्धा राजकीय लूटमारीचे स्वरूप यावे एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी पळविण्याच्या या प्रकाराला पाटबंधारे विभागाला प्रतिबंध करता आला नाही. बीड व उस्मानाबाद जिल्ह्यांचा काही भाग कृष्णा खोऱ्यात येतो एवढा अपवाद सोडला तर कृष्णा खोऱ्यातील सर्व जिल्हे, जिल्हा या नात्याने सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार राज्यसरासरीच्या बरेच वर होते व १९९२ मध्ये ते आणखी वर गेलेले आहेत हेही नमूद करणे आवश्यक वाटते.

**१२.** सत्यशोधन समितीने निश्चित केलेला अनुशेष हा जून १९८२ च्या स्तरावर प्रत्येक जिल्ह्याने पदरात पाडून घेतलेल्या सिंचन क्षमतेवर (प्रमाण रब्बी समतुल्यमध्ये) मोजलेला होता. **आता जून १९९२ पर्यंत प्रत्येक जिल्ह्याने पदरात पाडून घेतलेले सिंचन क्षमतेचे हेक्टरी परिमाण अधिकृतपणे उपलब्ध झालेले आहे.** (गुरुवार दिनांक ३० डिसेंबर १९९३ रोजी विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या सातव्या यादीतील प्रश्न क्रमांक ३०९८१ च्या उत्तरामध्ये ही आकडेवारी समाविष्ट आहे.)

**१३.** १९९२ च्या जून मध्ये २२.५५ टक्के असलेली राज्य सरासरी जून १९९२ मध्ये ३२.०१ झाली असल्याचे या अधिकृत शासकीय आकडेवारीमध्ये स्पष्टपणे दिसून येते. अमरावती, अकोला, औरंगाबाद, बुलढाणा, उस्मानाबाद, यवतमाळ, जालना, लातुर, धुळे, रत्नागिरी, चंद्रपूर, वर्धा, सिंधुदुर्ग, ठाणे, बीड, नाशिक, रायगड **हे सतरा जिल्हे** राज्यसरासरीच्या काही हजार हेक्टरने खाली असल्यामूळे **अनुशेषात असलेले** जिल्हे म्हणून स्पष्टपणे दिसून येतात. **इतर १३ जिल्हे** हे जिल्हा या नात्याने राज्यसरासरीच्या बरेच वर असल्याने **बिगर अनुशेष जिल्हे** आहेत.

**१४.** बिगर अनुशेष व अनुशेष जिल्ह्यांसाठी निधी वाटपाचा १५ / ८५ चा वर परिच्छेद **२ व ३** मध्ये नमूद केलेला फॉर्म्युला शासनाने न स्वीकारल्याने **अनुशेष भरून काढण्याची वा कमी करण्याची प्रक्रिया पार मंदावेल** असे समितीने आपल्या अहवालात नमूद केले होते. १०/१२ वर्षाच्या अनुभवावरून ८२ मध्ये अनुशेषांत असलेल्या **अनेक जिल्ह्यात ही प्रक्रिया सुरूच झाली नाही** असे दिसून येते. परिणामी १९८२ च्या सरासरीवर काढलेले त्यातील अनेक जिल्ह्यांचे अनुशेष ९२ च्या राज्यसरासरीवर मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसून येतात.

**१५.** शासनाने सभागृहात दिलेल्या अधिकृत आकडेवारीच्या आधारे १९९२ च्या राज्यसरासरीवर प्रत्येक जिल्ह्याचा निश्चित झालेला अनुशेष व सत्यशोधन समितीच्या १५/८५ च्या फॉर्म्यूल्याप्रमाणे अंदाजे १००० कोटी रुपयाचे ९५-९६ च्या वित्तीय विवरण पत्रातील पाटबंधारे प्रकल्पावरील निधीचे वाटप दर्शविणारा तक्ता या पत्रासोबत ***परिशिष्ट 'अ'*** म्हणून जोडलेला आहे. स्तंभ दोन मध्ये जिल्ह्याचे नाव नमूद केले असून स्तंभ ३ मध्ये जून १९९२ च्या राज्यसरासरीवरील त्या जिल्ह्याचा अनुशेष नमूद केला आहे ( हजार हेक्टरात) राज्य अंदाजपत्रकातील ८५ टक्के रक्कम या सर्व अनुशेष जिल्ह्यांना देतो म्हटले तर या प्रत्येक जिल्ह्याच्या वाट्याला किती निधी उपलब्ध व्हावा हे स्तंभ चार मध्ये नमूद केले आहे. (कोटी रुपयात) असे करीत असतांना १९९५ - ९६ च्या महाराष्ट्र राज्याच्या अंदाजपत्रकामध्ये पाटबंधारे प्रकल्पासाठी १००० कोटी रुपये निधी उपलब्ध होईल असे गृहित धरले आहे. प्रत्यक्ष यापेक्षा कमी किंवा जास्त निधी उपलब्ध झाल्यास प्रत्येक जिल्ह्यांसाठीची रक्कम त्या प्रमाणात कमी जास्त होईल. १५ टक्के रक्कम बिनअनुशेष जिल्ह्यांसाठी राखून ठेवली आहे. ८५ टक्के रक्कम अनुशेष असलेल्या १७ जिल्ह्यांमध्ये वाटून दिली असून त्या त्या जिल्ह्यांच्या अनुशेषाच्या प्रमाणात समितीच्या सूत्राप्रमाणे निधी वाटप दाखविलेले आहे.

**१६. विनंती** : जून १९९२ च्या राज्यसरासरीच्या अनुषंगाने १३ जिल्हे बिगर अनुशेष जिल्हे व १७ जिल्हे अनुशेष जिल्हे म्हणून निश्चित झालेले आहेत. जुलै १९९५ मध्ये अंदाजपत्रक सादर करतांना जलसिंचनाच्या विकासक्षेत्रामध्ये जिल्हा या नात्याने राज्यसरासरीच्या वर असलेल्या १३ जिल्ह्यांना १५ टक्के व सरासरीच्या खाली असलेल्या १७ जिल्ह्यांना ८५ टक्के या प्रमाणात ९५-९६ च्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये निधीचे वाटप करण्याबाबत पाटबंधारे विभागाने काळजी घ्यावी अशी आपणास विनंती आहे.

आपला स्नेहांकित

**(बी.टी.देशमुख)**
*विधान परिषद सदस्य*

***(सोबत : परिशिष्ट अ याच अंकाच्या पृष्ठ १०५ वर पहा.)***

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **PUBLISHER AND ACTING EDITOR :** R. Chittaranjan, Gulmohar Colony, Camp, Amravati-444 602 Composed at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601.
**PRINTED AT** Bokey Offset Gandhi Nagar, Amravati. (M.S)
**REGD NO.** ATI 263 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10**
Name of the Posting office : **R.M.S. Amravati.**
Date of Posting : **16 - 10 - 1996**

Authorised Distrubutor for Software
**D.P.Systems, Amravati**
**Walcott Compound, Amravati 444 601 Tel. (0721) 79154**
***Nurturing the living Languages***

*पुढील मजकुर पृष्ठ ६६ वरुन .....*
एकचे शहर (३२ दशलक्ष लिटर्स दरदिवशी) म्हणजे अमरावती, **पण १९९४ मध्येच या शहराचा हा अनुशेष संपुष्टात आलेला आहे.** विदर्भातील नागरी पाणी पुरवठ्याचा दरदिवशीचा ५६ दशलक्ष लिटर्स अनुशेष निश्चित झालेला क्रमांक दोनचा जिल्हा म्हणजे अकोला व क्रमांक दोनचे शहर सुद्धा अकोलाच. (दरदिवशी ३० दशलक्ष लिटर्स) **अकोला शहराचा सुध्दा नागरी पाणी पुरवठ्याचा अनुशेष संपुष्टात येत आहे.**

**१०४.** दांडेकर समितीच्या अहवालानुसार दरदिवशीचा ३० लक्ष लिटर्सचा पिण्याच्या पाण्याचा अनुशेप निश्चित झालेल्या चिखली शहरासाठी १५०४ लक्ष रूपयाची वाढीव पाणी पुरवठ्याची योजना, वाशिम (४२.५) शहरासाठी ८२ लक्ष रूपयाची योजना, *(शहराच्या नावासमोर कंसात नमुद असलेला अंक दांडेकर (सत्यशोधन) समितीने निश्चित केलेला त्या शहराचा पिण्याच्या पाण्याचा दरदिवशीचा अनुशेष लक्ष लिटर्समध्ये दर्शविणारा आहे.)* कारंजा (४२.५) शहरासाठी ११४ लक्ष रूपयाची योजना, मुर्तिजापूर (३२.५) शहरासाठी १५३ लक्ष रूपयाची योजना, बाळापूर (३०.००) शहरासाठी ७० लक्ष रूपयाची योजना, तेल्हारा (१५.००) शहरासाठी २१ लक्ष रूपयाची योजना, पातूर (१२.५) शहरासाठी ६३ लक्ष रूपयाची योजना, मंगरूळपीर (२१.५) शहरासाठी ३७५ लक्ष रूपयाची योजना, अचलपूर (९.००) शहरासाठी १२२ लक्ष रूपयाची योजना, मोर्शी (२२.५) शहरासाठी ३०३ लक्ष रूपयाची योजना, दर्यापूर (२७.५) शहरासाठी ४१७ लक्ष रूपयाची योजना, चांदूर बाजार (२५.००) शहरासाठी ७४ लक्ष रूपयाची योजना, शेंदूरजना घाट (२०.००) शहरासाठी ३५७ लक्ष रूपयाची योजना, चांदूर रेल्वे (१७.५) शहरासाठी २०७ लक्ष रूपयाची योजना, मलकापूर (४७.५) शहरासाठी २९८ लक्ष रूपयाची योजना, मेहकर (२७.५) शहरासाठी २४५ लक्ष रूपयाची योजना, चिखलदऱ्यासाठी १५७ लक्ष रूपयाची योजना, देऊळगांव राजा (१७.५) व सिंदखेड राजा या शहरांसाठी १६४६ लक्ष रूपयाची संयुक्त योजना, वणी (३२.५) शहरासाठी ६३ लक्ष रूपयाची योजना, दारव्हा (२२.५) शहरासाठी १०२ लक्ष रूपयाची योजना, पांढरकवडा (२०.००) शहरासाठी १४६ लक्ष रूपयाची योजना, घाटंजी (१५.००) शहरासाठी १९ लक्ष रूपयाची योजना, या सर्व वाढीव पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून त्यातील कांही पूर्ण झालेल्या आहेत. काही पूर्ण होत आहेत. काही बांधकामाधीन आहेत तर काहींच्या कामाला सुरूवात झालेली आहे/होत आहे. पिण्याच्या पाण्याच्या अनुशेषाने ग्रस्त असलेल्या या शहरांच्या वाढीव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित होवून हा अनुशेष संपुष्टात येण्यासाठी या भागातील लोक प्रतिनिधींनी सभागृहात केलेले सांसदिय युद्ध हे अभिमान वाटावा असेच आहे. विदर्भाबाहेरील सर्वश्री.अरूण मेहता, पी.जी.दस्तुरकर, अशोक मोडक, दि.बा.पाटील, सौ.निला देसाई या सदस्यांचा या लढाईतील सहभागसुद्धा उल्लेखनीय म्हणावा लागेल. अनुशेष निर्मूलनाचे हे काम सभागृहाच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींच्या प्रयत्नाने साध्य झाले आहे, हे नमुद करीत असतांना विदर्भ स्तरावरील अनुशेष निर्मूलनाच्या संघटीत योजनेचा भाग म्हणून नव्हे तर लोकप्रतिनिधींनी एकमेकांशी व्यक्तिगत स्तरावर स्थापन केलेल्या सभागृहातील सदन-सहकार्याच्या पोटी हे प्रयत्न झालेत हेहि नमुद करणे आवश्यक वाटते.काही योजनाबाबत सदन सदस्य नसलेल्या लोकप्रतिनिधींनी व्यक्तीशः उल्लेखनिय कार्य केलेले आहे.

**१०५. अनुशेष निर्मूलनासाठी विदर्भातील लोकप्रतिनिधींनी विधानमंडळ स्तरावर संघटीत प्रयत्न केले नाहीत हे जेवढे खरे आहे तेवढेच निर्माण झालेल्या व निर्माण होणाऱ्या अनुशेषाला पालथा घालण्यासाठी संघटीत चळवळ विदर्भात उभी होवू शकली नाही हेहि खरे आहे.** अमरावती व अकोला वाढीव पाणी पुरवठ्याच्या योजनेवर आलेले १० टक्के लोकवर्गणीचे गंडांतर नजरेला येताच त्या त्या वेळी त्या त्या शहरात निर्माण झालेला क्षोभ व्यक्त करण्यासाठी उभी झालेली तात्कालिक चळवळ ते गंडांतर दुर करण्यासाठी समर्थ ठरली हे खरे असले तरी विदर्भ स्तरावरील सर्व विकासक्षेत्रातील अनुशेष निर्मूलनाच्या संघटीत चळवळीचा तो भाग नव्हता हे कुणालाहि कबुलच करावे लागेल.

११.५० दशलक्ष लिटर्स दरदिवशीचा अनुशेष निश्चित झालेल्या यवतमाळ शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेला अकोला - अमरावती सारखे तात्कालीक चळवळीचे बळसुध्दा मिळू शकले नाही. सभागृहातील लक्षणिय झटापटीनंतर २७.२० कोटी रूपये किमतीच्या या शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेला प्रशासकीय मान्यता प्रदान करणारा शासननिर्णय २१ एप्रिल १९९४ ला निघाला परंतू शासनाने त्यात अनेक अवाजवी अटी टाकल्या हे एक व तात्कालीक चळवळीचे बळसुध्दा या योजनेला मिळाले नाही हे दुसरे. **या दोन कारणामुळे उन्हाळ्यात "एक दिवसाआड पाणी पुरवावे लागते" अशी स्थिती असलेल्या यवतमाळ शहराची योजना पुढे सरकू शकली नाही. अमरावतीची ७८ कोटी रुपयाची योजना काय? किंवा अकोला शहरासाठीची ३५ कोटीची योजना काय? देऊळगांवराजा व सिंदखेडराजा या शहरासाठीची १६४६ लक्ष रूपये किमतीची संयुक्त पाणीपुरवठा योजना काय? किंवा चिखली शहराची १५०४ लक्ष रुपये किमतीची वाढीव पाणीपुरवठा योजना काय? लोकप्रतिनिधींनी सभागृहामध्ये दिलेल्या चिकाटीच्या व चिवट सांसदिय लढाईच्या पोटी पदरी पडल्या हे या लढ्याच्या इतिहासाचे अधिकृत प्रतिवेदन वाचल्यावर कोणाच्याहि सहज लक्षात येईल.** अंजनगाव सुर्जी (रुपये १४ कोटी) या शहराच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश ठराविक मुदतीच्या आत निर्गमित करण्याची आश्वासने सुध्दा अशाच प्रखर सांसदिय झटापटीनंतर पदरी पडलेली आहेत.

**१०६.** अनुशेष निर्मुलनासाठी प्रयत्न झाला तर तो अनुशेष प्रयत्नांच्या प्रमाणात दुर होवू शकतो हे नमुद करण्यासाठी उपरोक्त विवेचन केले आहे. सर्व विकासक्षेत्रातील एकंदर अनुशेषाच्या मानाने नागरीपाणीपुरवठा या एका विकास क्षेत्रातील भरून निघालेला किंवा निघत असलेला अनुशेष अत्यंत किरकोळ व लहानसा आहे हे नमूद करणे आवश्यक आहे. **सर्वांगीण विकासाची जननी असलेल्या जलसिंचन या एका विकासक्षेत्रातील अनुशेष कमी तर होतच नाही पण तो प्रचंड प्रमाणात वाढत आहे ही अत्यंत तीव्र अशी चिंतेची बाब आहे.** कृष्णा खोऱ्याच्या जलसिंचन सम्पन्नतेचा व समृद्धीचा इतिहास लिहायला घेतला तर आपोआपच या विकासक्षेत्रातील राज्याच्या अनुशेषाचा इतिहास लिहून पूर्ण होईल, एवढ्या ह्या दोन बाबी अभिन्न आहेत. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरच्या २०-२२ वर्षामध्ये महाराष्ट्राच्या विकसित भागांनी खूप मोठ्या प्रमाणावर निधी पळविल्याने जो फार मोठा आरडाओरडा झाला त्यातून सत्यशोधन समिति निर्माण झाली.

**१०७.** महाराष्ट्र विधान मंडळाच्या दोनही सभागृहात २९ जुलै १९८३ रोजी शासनाच्या वतीने जे निवेदन करण्यात आले होते त्या निवेदनामध्ये व समितीची स्थापना करणाऱ्या शासन निर्णयामध्ये "**विकासाच्या संदर्भात जिल्हावार असमतोल निश्चित करणे यासाठी ही समिती नेमण्यात आली आहे.**" असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले असतांना समितीने काही जिल्ह्यामध्ये तालुकानिहाय अनुशेष काढावा म्हणून या समितीवर कृष्णा खोऱ्याचा प्रचंड राजकीय दबाव आला. "प्रदेश व जिल्हा पायाभूत घटक मानले जावे असे सूचित असतांनाही समितीने आपला मार्ग सोडून तालुका हा पायाभूत घटक मानला आहे. (उदाहरणादाखल सिंचन व उद्योगधंदे या क्षेत्रामध्ये) विश्लेषणाच्या दृष्टीने तालुका हा घटक पायाभूत व मध्यवर्ती मानून आपण केलेल्या संपूर्ण अभ्यासाची सुधारित पुनरावृत्ती करावी अशी शिफारस समितीने केली आहे. ही शिफारस करण्याचे कोणतेही सबळ कारण नव्हते. ही शिफारस अनिष्ट आहे....... आपल्या विचारार्थ सोपविलेल्या विषयापासून समिती पुष्कळ वेळा मार्गभ्रष्ट झालेली आहे." असे या समितीच्या एका सदस्याने खुद्द या अहवालातच लिहून ठेवले आहे. **दुष्काळी तालुक्यांच्या नावाखाली असा अनुशेष काढण्यात आला** व जिल्हा(स्तरावरून) म्हणून अजिबात अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांच्या नावाने तो अनुशेष "अनुशेषाचे सुधारित अंदाज" या मथळ्याखाली तक्ता क्रमांक ७.७ मध्ये दाखविण्यात आला. जिल्हा घटक धरून काढलेला अनुशेष समितीच्या अहवालाच्या तक्ता ७.५ मध्ये दाखविण्यात आला आहे.

**१०८.** नाशिक व पुणे विभागातील जिल्ह्यांना समितीने (१६६.९५ + २३८.६४) ४०५.५९ हजार हेक्टरचा "सुधारित अनुशेष" काढून दिला होता. त्यानंतरच्या दहा वर्षात (जून १९८२ ते जून १९९२) या जिल्ह्यांच्या पदरात (३४३.२० + ५२१.९२) ८६५.१२ हजार हेक्टरची सिंचनक्षमता पडली. **ज्या दुष्काळी तालुक्यांच्या नावाने हा सुधारित अनुशेष काढण्यात आलेला होता त्या तालुक्यातील प्रत्यक्ष अनुशेष दूर झाला किंवा नाही या विषयीची निश्चित आकडेवारी आता उपलब्ध झालेली असून त्या आकडेवारीनुसार तो अनुशेष दूर झालेलाच नाही,** असे दिसून येते. पश्चिम महाराष्ट्राच्या नऊपैकी आठ जिल्ह्यांमध्ये समितीने काढून दिलेल्या सुधारित अनुशेषापैकी २१२.८८ हजार हेक्टरचा अनुशेष अजून शिल्लक आहे. नाशिक या जिल्ह्यात ३३.२६ हजार हेक्टर, धुळे १३.८०, जळगांव १०.७७ अहमदनगर २५.२१, पुणे १८.८४, सातारा १९.७०, सांगली ३३.७३ व सोलापूर या जिल्ह्यात ५७.५७ म्हणजे एकूण २१२ हजार हेक्टरचा अनुशेष शिल्लक आहे, असे अधिकृत शासकीय प्रकाशनांत नमूद आहे. *("अनुशेष दूर करण्यासाठी (१) १९९४-९५ च्या वार्षिक योजनेत केलेल्या विशेष तरतुदी व (२) ३१ मार्च १९९४ अखेर झालेली भौतिक प्रगती दर्शविणारी पुस्तिका" महाराष्ट्र शासन नियोजन विभागाचे प्रकाशन एप्रिल १९९४ पृष्ठ १२४)*

**१०९.** सुधारित अनुशेषाच्या दुप्पट सिंचनक्षमता असा अनुशेष निश्चित झाल्यानंतर च्या १० वर्षाच्या काळात (मार्च ९२ पावेतो) पदरात पाडून घेतली असून सुद्धा १२ वर्षानंतरची शासकीय आकडेवारी त्यापैकी जवळ जवळ निम्मे (२१२.८८ हजार हेक्टर) अनुशेष अजून शिल्लक आहे.

असे दाखविते **याचा अर्थ दुप्पट सिंचनक्षमता या पुढारलेल्या जिल्ह्यांच्या पदरात पडली असली तरी ती त्या दुष्काळी तालुक्यांच्या नशिबी आलेली नाही. दुष्काळी तालुक्यांच्या नावाने ओढलेले "घी" मोठ्या प्रमाणात त्याच जिल्ह्यातील संपन्न तालुक्यांनी पकविलेल्या खिचडीमध्ये घुसले ही गोष्ट उघड आहे.**

**विकसित जिल्ह्यातील ज्या प्रवृत्ती राज्यातील अविकसित जिल्ह्यांची पिळवणूक करतात त्याच प्रवृत्ती आपल्याच जिल्ह्यातील अविकसित भागामध्ये सुद्धा लूटमार करण्यास कमी करीत नाहीत. प्रसंगी ते भाग दुष्काळी असले तरीही. शिवाय आपल्याच जिल्ह्यातील अशा तालुक्यांना अविकसित ठेवण्यात पुन्हा नव्या सरासरीवर अनुशेष काढतांना त्यांच्या दुष्काळीपणाची झोळी पुढे करून आपल्या कपाळावरील "अनुशेषाचा बोर्ड" कायम ठेवण्याचा या विकसित जिल्ह्यांचा मार्ग शाबूत राहतो.**

**११०.** महाराष्ट्राच्या विकसित भागांनी अविकसित भागांची जलसिंचन या विकासक्षेत्रामध्ये पिळवणूक करण्याच्या इतिहासाचे तीन प्रमुख कालखंड पडतात. महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून तर **सत्यशोधन समितीचा अहवाल प्रसिद्ध होईपर्यंतचा** (१९६० चे १९८२) **पहिला कालखंड.** याला चुपचाप निधी ओरपण्याचा कालखंड म्हणता येईल. **दुसरा कालखंड म्हणजे सत्यशोधन समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतरचे दशक** (१९८३-१९९२) हा कालखंड अजिबात अनुशेष नसलेल्या जिल्ह्यांनी दुष्काळी तालुक्यांच्या नावाखाली (त्यांचा अनुशेष दूर न होवू देता) निधी पळविण्याचा कालखंड म्हणून सांगता येईल. **"कृष्णा आली हो अंगणी" चा तिसरा कालखंड** १९९३ ते इ.स. २००० हा मोठ्या झगमगाटात आता सुरू झाला आहे. कोणताही विधिनिषेध न बाळगता कृष्णा अवार्डाविषयी असत्य माहिती सांगून निधी लांबविण्याच्या या प्रकाराने तिसऱ्या कालखंडात घेतलेला वेग विस्मयचकित करणारा आहे.

**१११.** १९९२-९३ च्या मूळ अर्थसंकल्पात अनुशेष भागातील प्रकल्पांना तरतुदी पुरेशा नसल्या तरी पुरवणी तरतुदींच्या माध्यमातून तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुधाकरराव नाईक यांनी काही जादा निधी उपलब्ध करून दिला होता. १९९३-९४ च्या मूळ अर्थसंकल्पामध्ये अशा प्रकल्पांसाठी जास्तीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली होती पण ते वर्ष संपण्याच्या आतच "९३-९४ सालाकरिता इतर प्रकल्पासाठी जास्तीची तरतूद केली होती ती कमी करून कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पांना दिली" असे खुद्द पाटबंधारे मंत्र्यांनी २१ मार्च ९४ रोजी सभागृहात सांगितले. निधी ओरपण्याचा हा प्रकार एवढ्या बिनदिक्कतपणे चालू झाला की भूकंपग्रस्त भागासाठी इतरांच्या प्रकल्पामध्ये कपात करून गोळा केलेला निधी निःसंकोचपणे कृष्णा खोऱ्यात पळविण्यात आला. **"दिनांक ३० सप्टेबर १९९३ रोजी मराठवाड्यात झालेल्या भुकंपामुळे पुनर्वसन कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने विविध विकास क्षेत्राच्या १९९३-९४ च्या तरतुदींना कपात लावली आहे"** असे स्पष्ट उत्तर पाटबंधारे मंत्र्यांनी विधानपरिषदेत तारांकित प्रश्न क्रमांक ३४६९१ ला सोमवार, दिनांक २१ मार्च १९९४ रोजी दिले होते. पुढे परदेशातून आलेली मदत भुकंपग्रस्त भागात पुरेशी आहे, असे त्यावेळच्या शासनाला वाटले. नागपूर व "अमरावती भागामध्ये २० टक्के कपात पाटबंधाऱ्यावर लावली आहे" हे जसे मंत्रिमहोदयांनी कबूल केले तसे त्याच प्रश्नावर झालेल्या अनुपुरक चर्चेमध्ये **"कृष्णा खोऱ्यातील प्रकल्प पूर्ण करून आपल्या वाट्याला आलेले ५८० टीएमसी पाणी इसवीसन २ हजार सालापर्यंत अडविण्यासाठी जास्तीची तरतुद करणे गरजेचे होते. ९३-९४ सालाकरीता इतर प्रकल्पासाठी जास्तीची तरतुद केली होती ती कमी करून कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पांना दिली"** असेहि स्पष्ट शब्दात कबुल केले. भुकंपग्रस्तासाठी अनुशेष भागाच्या प्रकल्प तरतुदीत कपात करून गोळा केलेला पैसा भुकंपग्रस्तांसाठी न वापरता कृष्णा खोऱ्यासाठी पळविण्यात आला. आता तर काय महामंडळच स्थापन करण्यात आले आहे. ७१०० कोटी रूपये सर्वांनी उपलब्ध करून द्यावयाचे आहेत. ३५०० कोटी रूपये शासन भाग भांडवल म्हणून देणार, ३६०० कोटीचे कर्ज आपण सारे मिळून उभारून देवू. त्याच्या परत फेडीचे उत्तरदायित्व शासनाने स्विकारलेलेच आहे.

**११२.** कृष्णा खोऱ्याचे गळफास अनुशेष भागातील प्रकल्पांच्या गळ्याभोवती आवळायला सुरूवात झाली आहे. सारे तपशिल देता येणे शक्य नाही पण शितावरून भाताची कल्पना येवू शकते. जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील चंद्रभागा हा लहानसा मध्यम प्रकल्प आहे. भूमिपुजनाच्या कार्यक्रमात २८ नोव्हेंबर १९९१ रोजी हजारो लोकांच्या सभेमध्ये पाटबंधारे राज्यमंत्र्यांनी **"पांच वर्षामध्ये हा प्रकल्प पूर्ण करण्याची आमची योजना आहे"** असे घोषित केले होते. मा. मुख्यमंत्र्यांनी त्याच सभेत हा निर्धार पुनर्घोषित केला होता. (उद्धरण ध्वनिमुद्रित भाषणावरून मुद्रित)

या प्रश्नावर आम्ही सभागृहामध्ये चर्चा उपस्थित केली, तेव्हा मा. पाटबंधारे मंत्र्यांनी स्पष्ट शब्दात **"धरणाबरोबर कालवे आणि वितरिकांची कामे होतात आणि हे सर्व काम ५ वर्षात निश्चितपणे पूर्ण केले जाईल"** असे उत्तर तारांकित प्रश्न क्रमांक ३८३६० वरील अनुपुरक चर्चेमध्ये (पृष्ठ डी-३) २२ जुलै १९९४ रोजी दिले होते. काटेकोर आणि ठोस शब्दात विधानपरिषदेत दिलेल्या या आश्वासनाची आज काय गत आहे? हे पहावे म्हणून १९ जुलै १९९६ रोजी याच विषयावर तारांकित प्रश्न क्रमांक ८७९० च्या निमित्ताने आम्ही चर्चा उपस्थित केली होती. **या प्रकल्पाच्या उर्वरित कामाची किम्मत आता १०९ कोटी रूपये झाली असून ३१ मार्च १९९६ पर्यंत फक्त २३.९५ कोटी रूपये खर्च झाला आहे.** हजारो लोकांच्या सभेत मुख्यमंत्र्यांनी व विधानपरिषदेत खुद्द पाटबंधारे मंत्र्यांनी "५ वर्षात निश्चितपणे पूर्ण केले जाईल" म्हणून आश्वासित केलेल्या व महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील एका मध्यम प्रकल्पाची ही दुर्गती आहे. पाटबंधारे मंत्री हे आमच्या भागातील असले तरी त्यांच्या गळ्यात कृष्णेची धोंड बांधली असल्याचा हा उघडउघड परिणाम आहे. त्यांचे हात इतके बांधले आहेत की "सदरहू काम पूर्ण करण्यास येणाऱ्या अपेक्षित खर्चाच्या रकमेचे कशा प्रकारे नियोजन करण्यात आले आहे?" या प्रश्नाचे प्रामाणिक उत्तर देण्याची उजागरीसुध्दा त्यांना राहिलेली नाही. ४५ दिवस अगोदर प्रश्न नोटीस देवूनसुध्दा **"प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन निधिच्या उपलब्धतेवर अवलंबून आहे"** असे भोंगळ लेखी उत्तर त्यांनी दिले. अनुपुरक चर्चेमध्ये "काम पूर्ण करण्याचे नियोजन काय आहे?" या प्रश्नाला ते वारंवार **"सध्या ती माहिती माझ्याजवळ नाही"** असे उत्तर देत होते. पूर्णा प्रकल्पाची स्थिती याहीपेक्षा वाईट आहे. विदर्भातील सर्वच जलसिंचन प्रकल्पांचा प्रवास अनुशेषाच्या नव्या जहाजातून सुरू झाला आहे.

**११३.** अनुशेषाचा विचार करित असतांना जलसिंचनाच्या खालोखाल व पाणीपुरवठ्याच्या बरोबरीने महत्व असलेल्या "रस्ते" या विकासक्षेत्राबाबत काही महत्वाच्या वस्तुस्थितीची नोंद घेणे मला आवश्यक वाटते. दांडेकर समितीने रस्त्यांविषयीचा विदर्भाचा जो भौतीक अनुशेष निश्चित केला होता तो अनुशेष कमी झाला नसून वाढलेला आहे. **अनुशेष ठरविण्याचे निकष किंवा दर्शक दांडेकरांनी काय ठरविले होते?** त्या निकषामध्ये आम्ही कुठे होतो आणि आज कुठे आहोत? याची माहीती दांडेकरांच्या फुटपट्टीने मोजून समजून घेण्याची आवश्यकता आहे. खेडे खेड्याशी व खेडे मुख्य रस्त्यांशी जोडणारा रस्ता म्हणजे "इतर रस्ता". "जिल्ह्यातील किती गावे रस्त्यांनी जोडली गेली हे पहाण्याऐवजी किती टक्के लोकसंख्या रस्त्यांनी जोडली गेली हे पहाणे महत्वाचे व उचित होईल." असे दांडेकर समितीने म्हटले आहे व **"मुख्य रस्त्याच्या जाळ्याशी जोडल्या गेलेल्या ग्रामिण लोकसंख्येची टक्केवारी."** हा इतर रस्ते पद्धतीचा अनुशेष मोजण्यासाठीचा मापदंड त्यांनी ठरविला. **कीती टक्के लोकसंख्या बारमाही रस्त्यांनी जोडली गेलेली आहे. त्याची टक्केवारी दांडेकरांनी दिली आहे. राज्याची सरासरी ६८.३५ टक्के निघाली.** दांडेकर समितीच्या अहवालामध्ये ग्रामिण भागात राहणारी बारमाही रस्त्यांनी जोडलेल्या लोकसंख्येची राज्याची सरासरी टक्केवारी ६८.३५ टक्के इतकी आहे. इतर रस्ते पध्दतीचा अनुशेष निर्धारीत करतांना त्यांनी म्हटले आहे की, जे जिल्हे ६८.३५ टक्क्याच्या खाली असतील ते अनुशेषात आहेत. आणि जे जिल्हे ६८.३५ टक्क्याच्या वर असतील ते बिगर अनुशेषजिल्हे आहेत. पुढे त्यांनी असे म्हटले आहे की **"जे खाली आहेत त्यांना सरासरीवर आणा. त्यांना सरासरीवर आणणे म्हणजे त्यांचा अनुशेष दुर करणे होय."**

**११४. ३१ मार्च १९८३ ची इतर रस्ते पद्धतीच्या अनुशेषाची स्थिती पुढील प्रमाणे आहे :** दांडेकर समितीच्या अहवालाप्रमाणे लोकसंख्येची राज्यसरासरी टक्केवारी ६८.३५ टक्के, कोकण ७१.९४ टक्के, पश्चिम महाराष्ट्र ७४.१९ टक्के, मराठवाडा ६५.८१ टक्के, विदर्भ ५९.०० टक्के. जोडल्या गेलेल्या लोकसंख्येची प्रदेश निहाय सरासरी पाहिली तर कोकण व पश्चिम महाराष्ट्र हे प्रदेश म्हणून राज्य सरासरीच्या वर होते. पण त्यामध्ये काही जिल्हे राज्य सरासरीच्या खाली असल्यामुळे जिल्हा स्तरावरून तेथे अनुशेष होता. मराठवाडा व विदर्भ हे प्रदेश राज्य सरासरीच्या खाली होते. किती खेडी जोडली म्हणजे राज्यसरासरी गाठता येईल याचे उत्तर दांडेकरांनीच दिलेले आहे. जोडणी आवश्यक असलेल्या खेड्यांची संख्या म्हणजे भौतीक अनुशेष. तो पुढील प्रमाणे :- कोकण १७० खेडी, पश्चिम महाराष्ट्र ४७४ खेडी, मराठवाडा ४८९ खेडी, विदर्भ २०७२ खेडी, राज्याचा खेड्यांमध्ये एकूण अनुशेष ३२०५ खेडी.

गुरूवार दिनांक २५ जुलै १९९६ रोजी विधानपरिषदेमध्ये या विषयावरील चर्चेमध्ये सहभागी होतांना केलेल्या भाषणामध्ये मी याबाबतचे विचार पुढील शब्दात मांडले. :-

"दांडेकरांनी अहवालाच्या परिच्छेद ५२ मध्ये म्हटले होते की, **"जे भाग सरासरीच्या पुढे आहेत त्यांचा आणखी विकास होउन सरासरी वाढू शकते. तसेच जे तळाशी आहेत त्यांना वर उचलून सरासरी वाढू शकते"** या दोन्ही कारणांनी राज्याची सरासरी वाढणार आहे. ६८ च्या वर जे होते ते आणखी वर गेले. त्यामुळे सरासरी वाढली. जे ४० वर होते ते ४५ वर गेले

तरी सरासरी वाढली. १९९१ मध्ये राज्य सरासरी ८३ झाली..... ३१ मार्च १९९१ ची इतर रस्ते पध्दतीची परिस्थिती उपलब्ध करुन दिली आहे, सुदैवाने ह्या सभागृहाच्या या आश्वासन समितीने. दांडेकरांनी अनुशेष काढला १९८३ च्या पातळीवर. त्यावेळी राज्याची सरासरी ६८ होती. आश्वासन समितीच्या १०८ व्या अहवालातील परिशिष्ट १० मध्ये आकडेवारी दिली आहे. १९९१ मधील आकडेवारी असे दाखविते की,.... राज्याची ही सरासरी ८३ टक्के झालेली आहे."

**११५.** विधानपरिषदेतील माझ्या भाषणामध्ये १९९१ ची अनुशेषाची स्थिती मी पुढील शब्दात मांडली :-

"अध्यक्ष महोदय, दांडेकर समितीच्या अहवालामध्ये दिलेले आहे की, **बुलढाणा जिल्हा ८३ खेड्यांनी राज्य सरासरीच्या मागे होता.** आता १९९१ च्या सरासरीवर तो जिल्हा २२४ खेड्यांनी मागे आहे; म्हणजे ८३ खेडी जोडली गेली असती तर दांडेकरांची सरासरी बुलढाणा जिल्ह्याने गाठली असती. .... तो आताच्या म्हणजे १९९५-९६ सालाच्या नाही, तर..... १९९१ सालच्या वेळी जी सरासरी होती ती म्हणजे ८३ टक्के, त्यावर यावयाचे असेल तर **बुलढाणा जिल्हा २२४ खेड्यांनी मागे आहे. अकोला जिल्हा १४३ खेड्यांनी मागे होता तो आता ४५० खेड्यांनी मागे आहे. अमरावती जिल्हा हा १९० खेड्यांनी मागे होता तो आता ३९३ खेड्यांनी मागे आहे. यवतमाळ जिल्हा हा २७७ खेड्यांनी मागे होता तो आता ५२८ खेड्यांनी मागे आहे.** वर्धा जिल्हा हा ६९ खेड्यांनी मागे होता तो आता नविन सरासरीच्या मागे नाही. नागपुर जिल्हा हा ३४३ खेड्यांनी त्यावेळी मागे होता तो आता १७२ खेड्यांनी मागे आहे. भंडारा मुळात मागे नव्हता तो आता २५४ खेड्यांनी मागे आहे. ८३ टक्के सरासरीचे हे आकडे अधिकृत आहे. ..... **दांडेकर अहवालामध्ये मागे असलेला चंद्रपुर जिल्हा मागे असण्यात पहीला नंबर टिकवून आहे व तेही जास्त गुणांनी. तो ९५१ खेड्यांनी मागे होता तो ११०७ खेड्यांनी मागे आहे.** ही १९९१ ची सरासरीची गोष्ट मी सांगतो आहे. मग आपल्याला दिसेल की, दांडेकर अहवालात इतर रस्ते पध्दतीच्या अनुशेषात **विदर्भातील जिल्हे २०७२ खेड्यांनी राज्य सरासरीच्या मागे होते, आता ते ३१२८ खेड्यांनी मागे आहेत.** "

**३१ मार्च १९९१ ची इतर रस्ते पद्धतीच्या अनुशेषाची स्थिती पुढील प्रमाणे आहे** : दांडेकर समितीच्या निकषाप्रमाणे लोकसंख्येची राज्यसरासरी टक्केवारी ८३ टक्के, कोकण ९७ टक्के, पश्चिम महाराष्ट्र ८४ टक्के, मराठवाडा ८६ टक्के, विदर्भ ६८ टक्के. जोडल्या गेलेल्या लोकसंख्येची प्रदेश निहाय सरासरी पाहिली तर कोकण, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा हे प्रदेश म्हणून १९९१ च्या राज्य सरासरीच्या वर आहेत. विदर्भ मात्र १९९१ मध्ये १९८३ च्या राज्यसरासरीवरसुद्धा पोचला नाही.

अकोला जिल्ह्याचे उदाहरण घेवून हे स्पष्ट करू. जोडल्या गेलेल्या लोकसंख्येची राज्यसरासरी ६८.३५ टक्के असतांना हीच टक्केवारी अकोला जिल्ह्यामध्ये ६२.०३ इतकी होती त्यामुळे हा जिल्हा अनुशेषात आहे असे दांडेकर समितीच्या अहवालात नमुद आहे. व या जिल्ह्याचा अनुशेष १४४ खेड्यांचा दांडेकरांनी दर्शविलेला आहे. याचा अर्थ असा की, अकोला या अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील १४४ खेडी १९८४ मध्ये बारमाही रस्त्यांनी जोडली गेली असती तर हा जिल्हा "इतर रस्ते" या विकास क्षेत्रामध्ये अनुशेषमुक्त झाला असता. सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये १४४ खेडी जोडली गेली व या जिल्ह्याचा अनुशेष संपुष्टात आला असे शासनाच्या अधिकृत पुस्तकात दाखविण्यात आले आहे. *("अनुशेष दूर करण्यासाठी (१) १९९५-९६ च्या वार्षिक योजनेत केलेल्या विशेष तरतुदी व (२) ३१ मार्च १९९५ अखेर झालेली भौतिक प्रगती दर्शविणारी पुस्तिका" महाराष्ट्र शासन नियोजन विभागाचे प्रकाशन जुलै १९९५ पृष्ठ १२३)*

पण याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की १९९१ मध्ये राज्याची सरासरी टक्केवारी ८३ झाली असून अकोला जिल्ह्याची टक्केवारी ६३.२४ इतकी आहे. म्हणजे हा जिल्हा १९९१ च्या राज्यसरासरीच्या ४५० खेड्यांनी मागे आहे. ती १४४ खेडी जोडल्या गेली नसती तर तो (४५० + १४४) ५९४ खेड्यांनी मागे राहीला असता.

**११६.** मा. सार्वजनिक बांधकामे मंत्री श्री. नितीन गडकरी हे मंत्री होण्यापूर्वी अतिशय जिद्दीने अनुशेषाच्या प्रश्नावर तुटून पडत असत आपल्या खात्याच्या माध्यमातुन नवा अनुशेष निर्माण होता कामा नये याची महत्तम काळजी ते घेतांना दिसतांत व ही आनंदाची गोष्ट आहे. मात्र जुन्या अनुशेष निर्मुलनाबाबतच्या त्यांच्या समजुती त्यांनी दुरूस्त करून घेण्याची आवश्यकता आहे. "**पुढील चार वर्षामध्ये इतर रस्ते पद्धतीचा अनुशेष संपूर्णपणे दुर केला जाईल**" असे त्यांनी सभागृहातहि सांगितले व ते बाहेरहि अनेक सभातून तसेच सांगत आहेत. याबाबत दांडेकरांनी काढून दिलेला **बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा या सहा जिल्ह्यांचा "इतर रस्ते पद्धतीचा भौतिक अनुशेष" यापूर्वीच ३१ मार्च १९९५ पावेतो पूर्णपणे संपुष्टात आला आहे.** अशी स्पष्ट माहिती नियोजन विभागाच्या उपरोक्त अधिकृत शासकीय प्रकाशनामध्ये देण्यात आलेली आहे. २०७२ खेड्यांचा दांडेकरांनी जो अनुशेष काढला होता, त्यापैकी ३१ मार्च १९९५ पर्यंत १६३० खेडी जोडली गेल्यामुळे आता फक्त ४४२ खेड्यांचा अनुशेष यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या तीन जिल्ह्यात ३१ मार्च १९९५ ला उरला आहे असे या शासकीय प्रकाशनामध्ये स्पष्टपणे नमुद आहे. "**दांडेकरांच्या निकषानुसार १९८३ च्या राज्यसरासरीवर (६८.३५ टक्के) निश्चित झालेला अनुशेष**" व "**दांडेकरांच्याच निकषानुसार १९९१ च्या राज्यसरासरीवर (८३ टक्के) निश्चित झालेला अनुशेष**" या दोन मधील फरक समजून घेणे गरजेचे आहे. पहिल्या सुत्राप्रमाणे विदर्भ २०७२ खेड्यांनी १९८३ मध्ये राज्यसरासरीच्या मागे (अनुशेषात) होता. त्याच सुत्राप्रमाणे १९९१ मध्ये तो ३१२८ खेड्यांनी राज्यसरासरीच्या मागे आहे. ८३ ते ९१ या काळांत १६३० खेडी जोडली गेली हे खरे. पण समजा ती जोडली गेली नसती तर १९९१ च्या सरासरीवर विदर्भ (३१२८ + १६३०) = ४७५८ खेड्यांनी मागे राहीला असता.

**११७.** १९८३ ची आकडेवारी दांडेकरांच्या रिपोर्टमध्ये दिलेली आहे. "ती १९९१च्या स्तरावर विधानपरिषद आश्वासन समितीच्या १०८ व्या रिपोर्टमध्ये दिलेली आहे. माझी मा. मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, .... **१९९५-९६ मधील आकडेवारी तरी सभागृहाच्या पटलावर ठेवावी. आणि ही माझी बिनापैशाची मागणी आहे.**" अशी स्पष्ट मागणी मी विधानपरिषदेतील चर्चेमध्ये केली होती. या चर्चेला मा. मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना "चार वर्षामध्ये हा अनुशेष दुर करू" असे सांगितले. उत्तरानंतर मी असा प्रश्न विचारला की, "**अध्यक्ष महोदय, मा. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, चार वर्षामध्ये हा अनुशेष दुर करु. माझे या बाबतीतील म्हणणे असे आहे की,** ४ वर्षामध्ये हा अनुशेष दूर करणार असे म्हणत असतांना दांडेकर समितीने जो भौतिक अनुशेष काढलेला आहे तो दुर करणार? दांडेकरांच्या सुत्राप्रमाणे १९९१च्या सरासरीवर अनुशेष काढलेला आहे. तो दुर करणार?..... की त्याच सुत्राप्रमाणे १९९५-९६ सालच्या सरासरीवर अनुशेष काढणार आहेत,. तो दूर करणार? **हा अनुशेष दुर करण्याच्या बाबतीत आपल्या मनामध्ये या तीनपैकी नेमकी काय कल्पना आहे?**"

त्यावर मा. मंत्रिमहोदयांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिले. "अध्यक्ष महोदय, दांडेकर समितीने ६०० कोटी रुपयांचा अनुशेष काढलेला आहे. त्याच्यामध्ये दरवर्षी १० टक्के भाववाढ गृहीत धरुन जो अनुशेष काढला आहे तो अनुशेष चार वर्षात शुन्यावर आणू असे मी म्हटले होते. **१९९१ च्या सरासरी आकडेवारी विषयी सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे, या बाबतीत सन्माननीय सदस्यांशी चर्चा करून समजून घेऊ.** "

**११८.** मार्च १९८३ ची ग्रामिण भागातील बारमाही रस्त्यांनी जोडल्या गेलेल्या लोकसंख्येची जिल्हावार टक्केवारी व राज्याची सरासरी टक्केवारी दांडेकरांच्या अहवालामध्ये नमुद आहे. याच सुत्रानुसार मार्च १९९१ ची जिल्हावार व राज्यस्तरीय टक्केवारी याविषयीची अधिकृत शासकीय आकडेवारी आम्हा विधानमंडळ सदस्यांना विविध सांसदिय आयुधांचा वापर करून उपलब्ध करवून घेण्यात १९९४ साल उजाडले. त्याची छापील प्रकाशने विधानमंडळ सदस्यांना उपलब्ध होवून विश्लेषणोत्तर त्यातील निष्कर्ष सर्वप्रथम २५ जुलै १९९६ रोजी विधानपरिषदेत केलेल्या भाषणामध्ये मी मांडले. (आज ते मी जाहिरपणे मांडत आहे) वाढलेल्या अनुशेषाची अधिकृत आकडेवारी तपशिलाने मी सभागृहात मांडली. भाषण संपवून मी खाली बसलो तर आमच्या सभागृहात नव्यानेच आलेले शिवसेनेचे सदस्य श्री. रविंद्र मिर्लेकर यांनी मला चिठ्ठी पाठवून "अत्यंत अभ्यासपुर्ण भाषण झाले. प्रत्येक विषय आपण पोटतिडकीने मांडतांना पहातो. ह्या सभागृहात मी नविन असल्याने आपल्या सारख्यांकडून काही शिकावे असे वाटते" असे कळविले. सभागृहाची बैठक तहकुब झाल्यावर अनेक सदस्यांनी माझे अभिनंदन केले. माझ्या भाषणाच्या वेळी सभापतीस्थानी असलेले मा. उपसभापती श्री.ना.स.फरांदे म्हणाले. "अप्रतिम! अभ्यास, तळमळ आणि संयत आक्रमकता यांचा त्रिवेणी संगम यांचे पुनर्दर्शन आपल्या भाषणात दिसले. अभिनंदन." बरे काम केल्याबद्दल मुख्याध्यापकांनी किंवा उपमुख्याध्यापकांनी "बरे केले" असे म्हटले तर कोणत्या शिक्षकाला बरे वाटणार नाही?

जी आकडेवारी विधानमंडळ सदस्याला ४ वर्षांनी उपलब्ध होवू शकते ती विभागाच्या प्रमुख असलेल्या मा. मंत्र्यांनी मनावर घेतले तर त्यांना ४ आठवड्यात उपलब्ध होवू शकते. मार्च १९९६ ला बारमाही रस्त्यांनी जोडल्या गेलेल्या ग्रामिण लोकसंख्येचे जिल्हावार व राज्यसरासरी टक्केवारीचे अधिकृत आकडे उपलब्ध झाले तर विदर्भाचा अनुशेष ४ हजार खेड्यांच्या जवळपास गेल्याचे दिसून येईल. (एक खेडे जोडण्याची किम्मत दांडेकरांनी १० लाख रूपये धरली होती. ती आता २५ लाख रूपयाच्या वर गेलेली आहे) दांडेकरी सरासरीवर काढलेल्या नव्हे, तर मार्च १९९१ च्या राज्यसरासरीवर निश्चित

झालेला इतर रस्ते पद्धतीचा अनुशेष दुर करण्याचा कार्यक्रम ठरविणे हे खरे "इतर रस्ते" या विकास क्षेत्रातील अनुशेष निर्मुलनाचे काम आहे.

**११९.** राज्यपुनर्रचनेच्या इतिहासाचे अवलोकन करणाऱ्यांच्या ही गोष्ट स्पष्टपणे लक्षात आल्याशिवाय रहात नाही की भारतात यापूर्वी **नविन राज्ये फक्त दोनच मार्गानी निर्माण झालेली आहेत. एक म्हणजे केंद्र शासनात सत्ताधारी असलेल्या पक्ष किंवा पक्षसमुहांना राजकिय दृष्ट्या सोयीचे असेल तर व दुसरे म्हणजे नव्या राज्याच्या निर्मितीशी संबंधीत असलेल्या जनसमुहाने याबाबतीत निर्णय निर्धारण शक्ती धारक केंद्रशासनाला जबरदस्त आंदोलनाच्या माध्यमातुन घायाळ करून निर्णय घेण्यास भाग पाडले असेल तर.** यापैकी पहिल्या मार्गाने विदर्भ निर्माण होणार असेल तर त्यास्थितीत तुम्ही आम्ही काही करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. रेल्वेगाडी सुरू करण्याचे ठरल्यानंतर **हिरवी झेंडी** कुणी दाखवावयाची? किंवा नवे राज्य निर्माण करावयाचे ठरल्यास **"मंगलकलश"** कोणी आणायचा? एवढ्यापुरताच तो प्रश्न मर्यादित असेल.

**जबरदस्त आंदोलनाच्या दुसऱ्या मार्गाने विदर्भ मिळवावयाचा तर हे जबरदस्त आंदोलन अनुशेषाच्या कंबरेवर लाथा घालण्यासाठी का करावयाचे नाही?** या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर निदान आपले आपल्याला आपल्याशी तरी द्यावेच लागेल. सत्यशोधन समिती नेमावी म्हणून विधान मंडळाच्या उभय सभागृहामध्ये दसपट गोंधळ झाला असेल तर त्या समितीची एकहि शिफारस अजून अमलात आली नाही म्हणून गेल्या १२ वर्षात एकपट सुद्धा प्रयत्न कुठे झालेला आहे काय? याचा तपास करावा लागेल. **१५/८५ ची एक शिफारस जरी अम्मलात आली असती तरी अनुशेषाचा आजचा डोंगर दिसला नसता.** घटनेच्या कलम ३७१ अन्वये राज्यपालांना विशेषाधिकार देणारी व्यवस्था अस्तित्वात यावी म्हणून उभय सभागृहामध्ये त्यावेळी शतपट उंच आवाजात मागणी करणाऱ्यांपैकी किती जणांनी "आता अधिकार मिळाले असल्यामुळे त्याचा वापर करा" अशी मागणी दबत्या आवाजात कां होईना पण राज्यपालांकडे केलेली आहे, याचा शोध घ्यावा लागेल.

**120.** VÉ¤É®únù°iÉ VÉxÉ+ÉÆnùÉä±ÉxÉÉSªÉÉ "ÉÉvªÉ"ÉÉiÉÖxÉ ±ÉføÉSÉ tÉ´ÉªÉÉSÉÉ +°Éä±É iÉ®ú

1. फक्त ५ वर्षासाठी विशेष अधिकार मिळालेल्या राज्यपालांनी अधिकार मिळाल्यानंतरच्या तिसऱ्या वर्षातसुद्धा नोकऱ्यांमध्ये समन्यायी वाटप देणारे आदेश घटनेच्या कलम ३७१ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून अजूनही काढलेले नाहीत, *या विरूध्द लढा देण्याची गरज आहे.*

२. गेले तीन वर्षे विदर्भात १२ व्या वर्गाची परिक्षा पास झालेले विद्यार्थी व त्यांचे पालक मैदानात व न्यायालयात समन्यायी वाटपासाठी लढत आहेत. वैद्यकिय व इतर अभ्यासक्रमातील प्रवेशांच्या जागांचे समन्यायी वाटप करणारे आदेश घटनेच्या कलम ३७१ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून राज्यपालांनी अजूनही काढलेले नाहीत, *या विरूध्द लढा देण्याची गरज आहे.*

३. नवा अनुशेष निर्माण होणार नाही व जुना संपुष्टात येईल अशा हिशेबाने विकास कामाच्या निधिचे समन्यायी वाटप करणारे आदेश घटनेच्या कलम ३७१ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून राज्यपालांनी अजूनही काढलेले नाहीत, *या विरूध्द लढा देण्याची गरज आहे.*

४. जून १९८२ च्या राज्यसरासरीवर दांडेकर समितीच्या निकषाप्रमाणे व अहवालाप्रमाणे विदर्भामध्ये जलसिंचनाचा ५२७ हजार हेक्टरचा (प्रमाण रब्बी समतुल्य) अनुशेष होता. दांडेकरांच्याच निकषाप्रमाणे जून १९९० च्या सरासरीवर तो ६२० हजार हेक्टरचा व त्याच निकषाप्रमाणे जून १९९२ मध्ये ६३६ हजार हेक्टरचा झाला, या विरूध्द लढा देण्याची गरज आहे.

५. ज्या जिल्ह्यात अजिबात अनुशेष नव्हता त्या जिल्ह्यात तालुक्यांच्या नावाने काढलेला नकली अनुशेष दूर होतो पण आमचा खरा अनुशेष दूर होत नाही, या विरूध्द लढा देण्याची गरज आहे.

६. जिल्हा या नात्याने बिगर अनुशेषात असलेले व दांडेकरी सरासरीच्या (जून १९८२ च्या) हजारो हेक्टरनी वर असलेले जिल्हे जून १९९२ च्या राज्यसरासरीच्यासुद्धा हजारो हेक्टरनी वर जातात आणि विदर्भ मात्र जुन्या व नव्या सरासरीवर चढत्या क्रमाने अनुशेषात जातो, या विरूध्द लढा देण्याची गरज आहे.

७. इतर रस्ते पद्धतींनी जोडल्या गेलेल्या लोकसंख्येची १९८३ ची राज्यसरासरी ६८.३५ टक्के असताना, विदर्भाची ५९.०० टक्के होती. १९९१ मध्ये राज्यसरासरी ८३ टक्के झाली असतांना, आमची ६८.३५ सुद्धा झाली नाही. म्हणजे आम्ही १९८३ च्या राज्यसरासरीवर सुद्धा आलो नाही, या विरूध्द लढा देण्याची गरज आहे.

८. २०३२ खेड्यांचा आमचा १९८३ मध्ये असलेला "इतर रस्ते पध्दतीचा अनुशेष" कमी झाला नाही तर तो वाढत जावून १९९१ मध्ये ३०७२ खेड्यावर गेला, या विरूध्द लढा देण्याची गरज आहे.

९. इतर रस्ते पद्धतीमध्ये मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र किंवा कोकण हे प्रदेश या नात्याने १९९१ च्या सरासरीच्या वर आहेत. त्याचवेळी विदर्भ या नावाचा प्रदेश मात्र १९८३ च्या ६८.३५ टक्के या राज्यसरासरीच्या खाली आहे, या विरूध्द लढा देण्याची गरज आहे.

१० ग्रामिण व नागरी पाणीपुरवठ्यासह सर्वच विकास क्षेत्रात अनुशेष वाढला, या विरूध्द लढा देण्याची गरज आहे.

**१२१.** काही बाबतीत जशी संघटीतपणे लढण्याची गरज आहे तशी विदर्भातील सर्वच जाणकारांनी काही गोष्टींचा विचार करण्याची गरज आहे.

१. केंद्रस्थानी सत्तेवर असलेल्या पक्षाने किंवा पक्षसमुहाने राजकीय दृष्ट्या सोईचे आहे म्हणून तसा निर्णय घेतला असेल किंवा घेण्याचा त्यांचा विचार असेल तर व त्यासाठीच्या केवळ वातावरण निर्मितीमध्ये आपला सहभाग मागितला जातो आहे काय? याचा विचार करण्याची गरज आहे.

२. अनुशेष निर्माण होत असतांना आणि तो प्रचंड वाढत असतांना सतत एका राजकीय पक्षाला विदर्भातील लोकांनी बहुमताने निवडून दिले पण हा अनुशेष मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे हे लक्षात आल्यावर विदर्भातील जनतेने त्या पक्षाला निवडणुकीत पराभूत केले. त्याबद्दल "शिक्षा म्हणून तर हे बक्षीस" दिले जात नाही ना? याचा विचार करण्याची गरज आहे.

३. विकसित भागातील नेत्यांच्या कर्तृत्वामुळे व आमच्या अकर्तृत्वामुळे विदर्भाचा अनुशेष मोठ्या प्रमाणात वाढला असल्यामुळे एवढा सारा अनुशेष भरून काढण्याची कटकट नको म्हणून ही ब्याद बाजूला सरकवून द्या म्हणून विकसित भागामार्फत प्रत्यक्षाप्रत्यक्ष चाललेल्या प्रयत्नामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे आपण सहभागी होत आहोत काय? याचा विचार करण्याची गरज आहे.

४. वेगळ्या शब्दांत सांगायचे झाले तर वेगळे राज्य आपण काढून मागत आहोत की ते आम्हाला काढून देत आहेत? याचा विचार करण्याची गरज आहे.

५. "कृष्णा आली हो अंगणी" चा ७१०० कोटी रुपयाचा प्रचंड थोरला घास घशाखाली उतरवित असतांना अविकसित भागांचे लक्ष त्यावरून विचलित व्हावे म्हणून "अनुशेषग्रस्त भागात तात्कालिक रान उठविण्यासाठी" तर आपला उपयोग केल्या जात नाही ना? याचा विचार करण्याची गरज आहे.

**१२२.** निर्माण झालेला अनुशेष हे आमच्या एका पिढीचे पाप आहे, व तो भरून काढणे हे कठीण असले तरी अशक्य नाही. संघटित शक्ती उभी झाल्यास ते आमच्याच पिढीला शक्य आहे. त्यावेळच्या पिढीच्या असामान्य त्यागातून व अनेकांच्या हौतात्म्यातुन पुढच्या अनेक पिढ्यासाठी निर्माण झालेले संयुक्त महाराष्ट्र हे एक सुंदर व देखणे लेणे आहे. महाराष्ट्राच्या सर्व भागांनी ही भावना जोपासली पाहिजे. या भावनेची एकतर्फी जोपासना विदर्भाने करावी ही अपेक्षा व्यर्थ आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर निर्माण झालेल्या विकासाच्या प्रचंड असमतोलाने या भावनेला मोठा धक्का पोचला आहे. ७१०० कोटी रुपये एवढ्या भारी किमतीचा खिळा ठोकण्याचा प्रयत्न यशस्वी झाल्यास, तो शेवटचा खिळा असेल. अजूनही वेळ गेलेली नाही. सात हजार कोटी रुपये कृष्णा खोऱ्यात देत असतांना निदान ७ हजार कोटी रुपये प्रत्येक अनुशेषग्रस्त भागाला दिले पाहिजे, म्हणजे **जुना अनुशेष दूर केल्याचे पुण्य पदरात पाडता आले नाही तरी निदान नवा अनुशेष निर्माण केल्याचे पाप पदरी पडणार नाही.** विदर्भाच्या अनुशेष निर्मुलनासाठी संघटीतपणे जोरदार लढल्यामुळे ज्यांच्या कपाळावरून घामाच्या धारा थबथबत आहेत, असे नेते जेंव्हा "अपमानित जिणे जगण्यापेक्षा स्वाभिमानाने आपण वेगळे होवू" म्हणतील तेव्हा, तो स्वयंपूर्ण होतो का होत नाही? याचा विचार न करता विदर्भातील लोक त्या नेत्यांच्या हाकेला ओ देतील. **हा अनुशेष दूर करण्यासाठी संघटीतपणे कोणी लढलेच नाहीत, हे दुःख लोकांच्या मनामध्ये असतांना ज्यांनी अनुशेष वाढविला तेच एकाएकी व अकस्मातपणे वेगळ्या राज्याची मागणी करीत आहेत, हे पाहून विदर्भातील जनता विस्मयचकित झाली आहे.**

- **प्रा.बी.टी.देशमुख,** विधान परिषद सदस्य

५.१०. १९९६